# ‘क्ष’ किरणे

## समग्र सावरकर वाङ्मय खंड ५

स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय स्मारक प्रकाशन

www.savarkar.org

- **मुद्रक-प्रकाशक**
  **श्री. पंडित बखले, मुंबई.**

  **श्री. नाना गोडसे, पुणे.**

  स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय स्मारक प्रकाशन

  २५२ स्वातंत्र्यवीर सावरकर मार्ग, शिवाजी उद्यान

  दादर, मुंबई ४०००२८ फोन ४४६५८७७

© सौ. हिमानी सावरकर

- **मुद्रणस्थळ**
  जॉली ओफसेट

  १४, वडाळा उद्योग भवन,

  मुंबई ४०००३१

- मूल्यः रु .५००.००

# अनुक्रम


मनोगत ............................................................................................................ ५

१ हिंदूंचा अडाणीपणा नि मुसलमानांचा - ....................................................................६

१.१ पोटावर सरपटण्यात जाण्याचा नवस ................................................................८

१.२ आता एक बैठे व्रत पाहा !.............................................................................९

१.३ आता मुसलमानी अघोर व्रते !........................................................................११

२. गायः एक उपयुक्त पशू, माता नव्हे, देवता तर नव्हेच नव्हे ! ..........................................१५

३ . पोथीनिष्ठेची बाधा .................................................................................... २४

१.४ आता ही पाहा ख्रिश्चन धर्मभोळेपणाची गंमत ! ................................................... २५

१.५ रजपूत जातिधर्माच्या नावे जाटांची डोकी फोडतात!...............................................२६

४ . गोरक्षक की गायळ ?...................................................................................३०

५. हा गाभारा की गोठा?....................................................................................३९

१.६ ही झाली भाबडी गोभक्ती; आता ही पाहा दांभिक उंदीरभक्ती .................................... ४३

६ .जगातील यच्चयावत युद्धे अशक्य करून टाकणारा अलौकिक शास्त्रीय शोध ! ..................... ४७

१.७ उच्चांक म्हणजे रेकॉर्ड................................................................................ ५३

१.८ कायदा म्हणजे निर्बंध ................................................................................. ५४

७ . उच्चांकांची साथ.........................................................................................५५

८ . धार्मिक छा-छूचा कार्यकारणभाव.......................................................................६२

१.९ पाण्यात बुडणारी नौयाने...............................................................................६२

१.१० धार्मिक छा-छूचा कार्यकारणभाव ....................................................................६३

१.११ विडी नि ब्रह्म ह्यांचा कार्यकारणसंबंध...............................................................६४

१.१२ सौभाग्यकांक्षिणी कुमारी कालवडीचे लग्न ........................................................ ६५

९ . पुन्हा एकदा गायः हानिकारक धर्मभावना ............................................................. ६७

१.१३ नव्या देवतेची मूर्ती .....................................................................................६८

१.१४ धर्मभोळेपणाचा पूर .....................................................................................६९

१.१५ अमेरिकेत गोमाहात्म्याविषयी आमच्या भ्रामक कल्पना! ..............................................६९

१.१६ गोभक्षक अमेरिका ..................................................................................... ७०

१.१७ वरदान कोणत्या अर्थी ?...............................................................................७१

१.१८ नट्या पंचगव्य पितात? ........ ७२
१.१९ गाय माता कोणाची ? ........ ७३
१.२० अहो! पण शिवाजी महाराजही स्वतःला 'गोब्राह्मणप्रतिपालक' म्हणवीत! ........ ७५
१.२१ तीच गोष्ट परमपूज्य पंडित मालवीयजींच्या 'मानबिंदू' विषयी! ! ........ ७६
१०. ही भूतदया की भूतबाधा? ........ ७८
१.२२ जी मानवी हितास पोषक तीच खरी भूतदया ........ ७८
१.२३ मनुष्यदया नि भूतदया ........ ७८
१.२४ दांभिक शब्दच्छल ........ ८४
१.२५ तर मग शक्य त्या तौलनिक भूतदयेची, सापेक्ष अहिंसेची कसोटी कोणती ? ........ ८६
११. तत्काल बहिष्कार्य असे काही परकी शब्द ........ ८९
१.२६ भाषाशुद्धीची कसोटी ........ ९०
१.२७ तो अत्यंत लज्जास्पद परशब्द म्हणजे 'कायदा' (निर्बंध)! ! ........ ९९
१.२८ नागपूरचे एक पत्र ........ १००
१२. धर्मभोळेपणाचा कळस ........ १०२
१३. आजच्या तिबेटातील काही गमती ! ........ ११३
१४. राहुल सांकृत्यायन यांचे तिबेटामधील संशोधन ........ १२१

# मनोगत

'झाले बहु, होतील बहु परंतु या सम हा' या प्रसिद्ध वचनाचे प्रत्यक्ष प्रारूप म्हणजे विनायक दामोदर सावरकर. आपल्या परमप्रिय मातृभूमीवरील अविचल श्रद्धेपोटी त्यांनी वैराण वाळवंटातून अखंड प्रवास केला. त्यांचे दिव्य दारूण व्रत अढळपणे सुरू असताना भारतीय समाज संघटित करून आपल्या पाठीशी उभा ठेवण्याचा त्यांचा प्रयत्न होता. धारदार लेखणी आणि अमोघ वाणी ही त्यांची साधने होती. स्वातंत्र्यासाठी समाज पेटून उठावा असे त्यांना वाटत होते. समाजाला सत्य स्थितीची जाणीव करून देऊन एका निश्चित दिशेने वाटचाल व्हावी असा त्यांचा प्रयत्न होता. स्वातंत्र्याबरोबर समाजाचे सर्वांगीण परिवर्तन व्हावे असे त्यांना मनोमन वाटत होते. त्यांचे निबंध, बातमीपत्रे आणि भाषणे या तीन साधनांच्या वाचनातून या गोष्टीचा प्रत्यय येतो.

भारतातील उदारमतवादी नेते ब्रिटिश अधिकाऱ्याच्या आणि संस्कृतीच्या छायेत वावरत होते. आज ना उद्या ब्रिटिश लोक भारताला स्वातंत्र्य देतील यावर त्या नेमस्त नेत्यांचा दृढ विश्वास होता. ब्रिटिशांच्या सहवासामुळे भारतीय समाजाचे सर्वांगीण उत्थापन होईल, अशी त्यांची समजूत होती. सावकरकरांनी ब्रिटिशांचे स्वार्थी, दुटप्पी आणि दुष्ट अंतरंग प्रकाशात आणले. त्याचबरोबर भारतातील भोळसट नेत्यांवर कठोर टीका केली. सत्य आणि अहिंसेच्या मार्गाने भारताला स्वातंत्र्य मिळेल अशी म. गांधींची भूमिका होती. सावरकरांनी म. गांधींच्या विचारातील विसंगती समाजासमोर ठेवली. म. गांधींचा मार्ग व्यवहार-विसंगत असल्याचे कठोर शब्दात दाखवून दिले. सावरकरांनी राष्ट्रीय हिताला सर्वश्रेष्ठ स्थान दिल्यामुळे त्यांच्या दृष्टीने जे जे राष्ट्रहित विघातक होते त्या त्या गोष्टीवर घणाघाती टीका केली.

सावरकरांच्या राष्ट्रवादी विचारांत राष्ट्रीय स्वातंत्र्य ही एक बाजू होती तर समाजाचा सर्वांगीण उत्कर्ष ही दुसरी बाजू होती. सावरकरांची आधुनिक विज्ञान आणि तंत्रज्ञानावर अपरिमित श्रद्धा होती. अद्ययावतता हा त्यांच्या विज्ञान विचारांचा मूलमंत्र होता. भारतीय मुस्लीम विज्ञाननिष्ठ झाले, तर त्यांच्यातील धर्मवेड कमी होईल. त्यातून त्यांचे नि हिंदूंचे भले होईल असे त्यांना मनोमन वाटत होते. त्यांचा अनुभव मात्र वेगळा होता. हिंदूंनी आधुनिक विज्ञान आणि तंत्रज्ञान अवगत करावे नि आपला उत्कर्ष साधावा यासाठी त्यांनी विज्ञाननिष्ठेचा आवर्जून पुरस्कार आणि प्रचार केला. तर्काच्या कसोटीवर न बसणाऱ्या हिंदू जीवन पद्धतीतील दुष्ट स्वरूपाच्या रूढी, परंपरा नि प्रथांवर कठोर टीका केली. त्यांच्या निबंधांतून याचा प्रत्यय येतो. हिंदू समाजातील अतर्क्य आणि दुष्ट पद्धती म्हणजे जाति व्यवस्था होय. जन्मधिष्ठित जातिव्यवस्था आणि स्पृश्यास्पृशता यांच्यावर त्यांनी कठोर आघात केला. त्यांच्या जात्युच्छेदक निबंधांतून त्याचा प्रत्यय येतो. सावरकर हे हिन्दुत्वाचा आग्रही पुरस्कार करणारे थोर क्रांतिकारक विचारवंत तर होतेच पण समाजपरिवर्तकही होते. त्यांनी केवळ सामाजिक विचाराचा सिद्धांत मांडला नाही तर त्याचे प्रत्यक्षात उपयोजन केले. सावरकरांचा हा सर्व विचार या खंडद्वयांत समाविष्ट केला आहे. या सहाव्या खंडात विज्ञाननिष्ठ निबंध, अंधश्रद्धा निर्मूलन कथा आणि जात्युच्छेदक निबंध समाविष्ट केले आहेत. त्यातून वाचकाला सावरकरांच्या द्रष्टेपणाची प्रचीती येते. प्रकाशकानी केलेल्या अनमोल कार्याबद्दल त्यांचे अंत:करणपूर्वक अभिनंदन !!!

*वर्षप्रतिपदा २००१*

*शं. ना नवलगुंदकर*

# १ हिंदूंचा अडाणीपणा नि मुसलमानांचा -

मनुष्याच्या शरीरात खोल रूतून बसलेली किंवा बाहेरच्या स्थूल दृष्टीला न दिसता आतच बळावून आतून जीवन पोखरीत असलेली जीवनघातक बाह्य द्रव्ये वा आंतर रोगाणूंचे घाव जसे ‘क्ष’ किरणांच्या— एक्स रेज् च्या – अंतर्भेदी प्रकाशाने यथावत निरीक्षता येतात, तसेच समाजाच्या शरीरात खोल रूतून बसलेल्या सामाजिक दोषांचे अस्तित्व, स्वरूप नि परिणाम नुसत्या तात्विक विवेचनापेक्षा त्या दोषांमुळे समाजाला जी दुःखे व्यक्तिशः भोगावी लागतात त्या फुटकळ, वैयक्तिक नि डोळ्यांसमोर घडणारया दृश्यांच्या उजेडातच मनावर पक्केपणी ठसू शकतात, मनाला धक्का देऊन त्यांची तीव्र जाणीव भासवू लागतात.

निरपराध माणसाचा छळ करू नये, आपला जीव तसा दुसरयाचा मानावा. वाटमारेपणा, दरोडेखोरी, विश्वास दिलेल्याचा केसाने गळा कापणे ही समाजघातक महापापे होत, अमानुष क्रुरता होय. हे तात्विक विवेचन, हे सामान्य नीतिसूत्र वारंवार उपदेशिल्याने मनावर काहीतरी परिणाम होतोच. पण उजाड रस्त्यात चालता चालता एखाद्या लहान मुलाच्या गळ्यातील सोन्याची कंठी पाहून त्याच्यावर अकस्मात झडप घालून, त्याचा गळा दाबून ती कंठी काढून उलट त्याच मुलाला सुरयाने भोसकून कुणी राक्षसी मनुष्य पळाला असता त्या रक्तबंबाळ लेकरास पाहताच मनाला जो धक्का बसतो आणि अशा राक्षसी प्रवृत्तीची जी चीड येते त्या नुसत्या सात्विक सूत्राच्या परिणामाहून कितीतरी तीव्रतर असते. त्या घटनेचा किरण थेट हृदयाला चटका देतो, तो क्ष किरणासारखा अंतर्भेदी असतो.

समाजातील कोणत्या दुष्ट रूढीने समाजाची दूरवर हानी होत आहे याच्या जाणिवेचाही तोच प्रकार आहे. उदाहरणार्थ, आपली हिंदूंची बाटविली जाणारी खुळी भावना पाहा. दुष्काळात निरूपायाने वा एखाद्या दंग्यात बळाने धरून नेल्यामुळे आपल्या लहान मुलांस मिशनमौलवींचे अन्न खावे लागताच ती जन्माची बाटली असे आपले कोटयावधी हिंदू अजूनही समजतात. गोमांतकात पूर्वी पाद्रयांनी विहिरीत पाव-रोटी टाकली तर त्या विहिरीचे पाणी नकळत भरणारया मुलींनासुद्धा तत्काळ जातिबहिष्कृत करून घरांची दारे धडाधड बंद करण्यात येत; त्या मुली, ती गावेच्या गावे वंशपरंपरेने ‘बाटलेली’ म्हणून ख्रिश्चनांच्या गोटात ढकलण्यात येत. ह्या खुळ्या भावनेचे हे नुसते सामान्य वर्णन ऐकून किंवा त्याचमुळे होणा-या सामाजिक संख्याबळाचा

-हास किती भयंकर असतो त्याचे तात्विक विवेचन ऐकून तिच्या खूळेपणाचा नि आत्मघातकी परिणामांचा मनावर काहीतरी ठसा उमटतोच; पण तो इतका स्थूल नि वरवरचा की, जसा बिहारच्या भूकंपाच्या नुसत्या वर्णनाचा धक्का महाराष्ट्रीय वाचकांना बसतो ! पण त्या भूकंपात सापडलेल्या नि घर धडधडत खाली कोसळत असता जीव घेऊन बाहेर पडणारया माणसास त्याच धक्क्याची जी भयंकर प्रत्यक्ष जाणीव होते ती किती निराळी ! त्याचप्रमाणे प्रत्यक्ष आपले एखादे मूल दंग्यात मुसलमानांच्या हाती पडले, तिथे त्यांचे— त्यांच्या बंदीत— अन्न त्याने चार दिवस खाल्ले नि पाचव्या दिवशी त्याची सुटका होऊन ते दाराशी परत येताच आपण त्यास कडकडून मिठी मारून घरात नेऊ लागलो असता गावचे गाव जेव्हा भट, खोत, कुलकर्ण्यापाटलासहित ओरडत उठते की, ‘हां, हां ! हे तुमचे मूल बाटले आहे ! त्याला घरात घेताच तुम्ही सारेच्या सारे बाटाल ! विहिरी, घरे, आप्तइष्ट सारे

बंद होतील ! आणि जातीबहिष्काराच्या धाकामुळे ते आपले मूल केविलवाणेपणे रडत रडत जेव्हा घराच्या, गावाच्या बाहेर जाताना पाहत असता दुःखाच्या चाबकाखाली आपले हृदय झोडपले जाऊ लागेल, तेव्हा त्या एका वैयक्तिक घटने सरशी ह्या दुष्ट रूढीच्या घातक परिणामांचा आपल्या मनावर जो तीव्रातितीव्र ठसा उमटेल तो तिच्यावरील नुसत्या वाचलेल्या तात्विक टीकेच्या परिणामाहून कितीतरी अधिक मर्मभेदी असेल बरे ! हिंदू राष्ट्राच्या देहात रुजलेल्या त्या दुष्ट रूढीची, त्या रोगाने त्या देहाच्या आतील जीवन कसे भयंकरपणे पोखरले जात आहे त्याची जाणीव, ते भीषण दृश्य त्या वैयक्तिक फुटकळ नि प्रत्यक्ष घटनेच्या क्ष किरणानेच कोणत्याही तात्विक अनुमान-सिद्धान्तापेक्षा कितीतरी अधिक अशी मर्मभेदक परिस्फुटता पावते.

समाजशास्त्राचे तात्विक नियम हे मूलतः वैयक्तिक घटनांच्या अवलोकनावरच उभारलेले असतात. अर्थातच ज्यांना समाजातील रूढी चांगल्या की वाईट हे ठरवून त्यांच्या हानिकारक परिणामाकडे समाजाचे लक्ष इतक्या उत्कटपणे वेधावयाचे असते की, समाजाने प्रसंगी त्यांच्याविरूद्ध बंडही उभारावे. त्यांनी ते कार्य साधण्यास तात्विक विवेचन हे साधनही जसे योजिले पाहिजे, तसेच त्याहूनही मर्मभेदक असणारे त्या रूढींच्या दुष्परिणामास प्रत्यक्ष नि प्रत्यही बळी पडणारया व्यक्तींच्या फुटकळ घटनांसही वारंवार समाजाच्यासमोर बोलपटासारखे प्रदर्शविण्याचे साधनही उपयोजिले पाहिजे. तशा प्रत्येक घटनेच्या मर्मभेदी किरणाने समाजाच्या हृद्-रोगाचे अंतःस्थ घाव इतके प्रकटपणे यथावत प्रकटिले जातात की, त्यांच्या दर्शनासरशी समाजाच्या चित्तास धक्काच बसावा. त्यांच्या दुष्परिणामांची जाणीव एखाद्या मर्मी शिरलेल्या शल्यासारखी असह्यपणे बोचू लागावी आणि नक्की कोणते नि किती विषारी शल्य कुठे बोचते तेही झटकन ध्यानी यावे.

या हेतूने पोथीजात जातिभेदाचे, तदनुसारी स्पर्शबंदी, सिंधुबंदी, वेदोक्तबंदी, रोटीबंदी प्रभृती आज हिंदू राष्ट्राच्या स्वास्थ्यास नि संवर्धनास अत्यंत हानिकारक होत असणा-या रूढींच्या आणि भाबडया शब्दनिष्ठ प्रवृत्तीमुळे या वैज्ञानिक युगातही पुरातन विवेकशून्य व्रतविधींच्या छंदाच्या फासात अटकल्याने राष्ट्राच्या होत असलेल्या बुद्धिहत्येचे दुष्परिणाम जे आम्ही तात्विकदृष्ट्या आजवर विवेचित आलो, त्यामुळे प्रत्यक्ष व्यवहारातही पदोपदी आपल्या समाजाची केवढी हानी होत आहे ते अधिक तीव्रतेने चित्तावर ठसविण्यासाठी वैयक्तिक फुटकळ घटनांच्या प्रखर क्ष किरणांसारख्या मर्मभेदक किरणशलाकाही या स्तंभातून वेळोवेळी पाडू इच्छितो.

त्यातही त्या गोष्टी परिणामास अनुकूल अशा काल्पनिक नावागावाच्या आड दडून रचण्यापेक्षा प्रत्यक्ष घडलेल्या त्याच त्याच घटना ( फॅक्ट्स) आम्ही देण्याचा यत्न करू. कारण कथा काय हव्या तशा जुळविता येतात. त्यांचाही प्रचारकार्यास दांडगा उपयोग असतो. परंतु त्या कथा केव्हाही प्रत्यक्ष पुरावा होऊ शकत नसतात. पण घटनांचा पुरावा हाच दुसरया कोणत्याही पुराव्यापेक्षा अधिक अनुत्तरणीय ( अन्-आन्सरेबल) नि परिणामकारक असतोच असतो.

## १.१ पोटावर सरपटण्यात जाण्याचा नवस

अशा प्रत्यक्ष चालू घटनांचा हा पहा पहिला क्ष किरण ! देवास प्रसन्नविण्यासाठी प्रयागकडे कोण्या सद्-गृहस्थाने किंवा ,साधूने नवस केला आहे की, प्रयागपासून हरिद्वारपर्यंत मी पोटावर सरपटत जाईन ! त्याचप्रमाणे तो भक्त प्रयागहून निघून सरपटत चालला आहे अजून ! मनुष्याला सरपटणारया किडयापेक्षा श्रेष्ठ अशी माणूसकी यावी म्हणून देवाने त्यास पाय दिले, हा भक्त त्या पाय देणारया देवाच्या वरास शापासमान समजून त्यांच्या उपयोगाने देव जितका प्रसादतो त्याहून माणसाने पोटावर सरपटत चालण्याने अधिक प्रसादेल म्हणून समजतो ! त्याने देवाची चूक देवाच्या पदरी ठीक बांधली ! माणसाने किडा होण्यातच खरी माणूसकी आहे हे देवाच्यादेखील आता ध्यानात येईल अशी आशा आहे ! हिंदुस्थानातील आमची ही उच्च आकांक्षा, पवित्र तपस्या, दिव्य साहसाची पद्धती, देवलसीपणाची व्याख्या पाहा ! माणसाने धडधाकट असलेले पाय बळेच पांगळे करून घेऊन किडयासारखे शत योजने सरपटत जाणे, माणसाने किडा होणे ! ही आमची प्रतिज्ञा ! हे व्रत !

आणि तिकडे युरोपातील तपस्येची, साहसाची, व्रताची, प्रतिज्ञेची व्याख्या पाहा ! अठरा अठरा मुली प्रतिज्ञा करीत आहेत की, मी अटलँटिक उडणार ! दुसरा प्रतिज्ञा करतो की, मी उत्तर ध्रुवाकडील अज्ञात खंड शोधून काढीन ! तिसरा प्रतिज्ञा करतो की, मी सारया महासागरांच्या तळाशी जाऊन त्यांची छायाचित्रे काढून आणतो ! ज्ञात वातावरणाच्या वरचा आकाशस्तर इतका विरल की त्यात मनुष्यास श्वासोच्छवासातही येणे दुर्घट. तिकडे काही जणांनी हेच दुर्घट व्रत घेतले की, त्या विरल स्तरावरही मनुष्यास उडता येणे शक्य आहे अशी युक्ती, असे विमान मी काढीन; असे साहस मी करीन ! नुसत्या पायाने भूमीवरच चालणा-या मनुष्याचा पंखाने उंच उंच उडणारा, गरूडासही खुजा करून सोडणारा, स्वर्गाच्या अधिक निकटनिकटतर भरारणारा देवदूत करून सोडीन ! ही त्यांची प्रतिज्ञा !

जर देव हा मनुष्याचा धाता, त्राता, हितकर्ता असेल, तर त्यास त्याच्या प्राणिसृष्टीतील अत्यंत लाडका मनुष्य, हा नर त्या नारायणाच्या श्रद्धेच्याच शपथेप्रमाणे असलेले परमव्यक्त प्रतीक, त्या ह्या माणसास किडा झालेले पाहून, पोटावर सरपटत चाललेला पाहून कृतकृत्यता वाटेल की त्या त्याच्या पुत्राची, त्या माणसाची आकाशात उंच उंच दिग्विजय करीत जाणारी भव्य दिव्य प्रगती पाहून वाटेल? देव ह्या दोन व्रतांपैकी सारे धर्म सांगतात तसा सृष्टीचा स्वामी होण्यासाठीच निर्मिलेल्या माणसाची कोणती प्रतिज्ञा पाहून त्यास धन्यवादील? किडयासारखे पोटावर सरपटत चालण्याची वा भूजलविजयामागोमाग आकाशाचा दिग्विजय करू पाहणारया अतिमानुष साहसाची ? देवदूत होण्याच्या महत्वाकांक्षेची ?

जर स्वर्गाचे मुसलमान , ख्रिस्तीप्रभृती बहुतेक धर्मांनी वर्णिलेले स्थान उंच आकाशात असेल, इंद्राचे सिंहासन ‘परमे व्योम्नि’ विराजत असेल, तर वैमानिक साहसाची रोमांचकारी चढाओढ लावून आकाशात अधिकाधिक उंच उंच जाणारा नरवीरच देवाच्या, स्वर्गाच्या अधिकाधिक संनिकट जात असला पाहिजे. आणि पायाच्या उंचीवरसुद्धा उभे राहण्याचे पाप वाटून धुळीत किडयासारखे सरपटत जाणारा माणुसकीससुद्धा अधिकाधिक अंतरत असला पाहिजे. त्या मानाने आपण एवढया आशेने

दिलेल्या पायाचा काहीच उपयोग न करण्यातच धन्यता मानणारा त्याचा तो अधःपात पाहून देव अशा व्रतांनी असंतुष्टच होत असला पाहिजे !

युरोपचे व्रत, प्रतिज्ञा माणुसकीस देवस्कीच्या अत्युच्च पदाकडे नेण्याचे साहस—एका बाजूस महासागरांचे बुड गाठणे, दुसरया बाजूस आकाशातील वायुस्तराच्या वरील स्तरावर चढून जाण्याचे, चंद्रमंगळावर स्वारी करण्याचे. आम्हास ते दुरापास्त साहस सांप्रत लुप्त झाल्याने, पण काहीतरी अमानुष करण्याचे व्रत घेण्याची हौस तर सुटत नसल्याने आमचे विशिष्ट व्रत, अलौकिक साहस म्हणजे धुळीत पोटावर सरपटत प्रयागाहून हरिद्वाराला जाण्याचे !! ह्या दोघांच्या भिन्न व्रतांची फळेही यथाकर्म, यथान्याय, यथासाहस दोघांनाही मिळालेली आहेत ! अतिमानुष आकाशसंचाराची हाव धरली त्या युरोपने मनुष्याच्या इतिहासात अश्रुतपूर्व असा अतिमानुष सृष्टिविजय प्रत्यही चालविला आहे. ते सृष्टीचा नवनवा प्रांत प्रत्यही आक्रमीत चालले आहेत. आम्ही पोटावर सरपटण्याची व्रते देवाच्या नावे करू लागलो; आमचे राष्ट्रच्या राष्ट्र आज धुळीत त्या आक्रमक जगताच्या पायाखाली किडयासारखे चेचले जात आहे ! हे भौतिकशास्त्राच्याही नियमास धरून आहे. 'यो यत् श्रद्धः स एव सः !'

## १.२ आता एक बैठे व्रत पाहा !

हे झाले एक सरपटते व्रत! आता एक निव्वळ बैठे व्रत ऐका! नाशिक येथे लहरीमहाराज नावाच्या कोणा साधुमहाशयांनी सध्या मौन व्रत आचरले आहे. त्यानिमित्त बसल्या बसल्या देवास प्रसादविण्यास्तव त्यांनीही दुर्घट अशी महान कामगिरी करण्याची प्रतिज्ञा करून असा संकल्प सोडली आहे की, रामनाम लिहिलेल्या अकरा लक्ष चिठ्ठ्या सुगंधी पिठाच्या गोळ्यागोळ्यांतून घलून गंगेस अर्पिल्या जातील...त्यायोगे जगत्कल्याण साधल्यावाचून आणि प्रस्तुत जी भूकंपादिक संकटे लोकांवर येतात ती निवारण झाल्यावाचून केव्हाही राहणार नाहीत, ही त्यांची निश्चिती आहे !

जगत्कल्याण साधण्याच्या लहरीबुवांच्या सदिच्छेस सन्मानूनही असे विचारावेसे वाटते की, ज्याअर्थी जगतात माणसेही असतात आणि लोकांवरील संकटे टळण्यासाठी मी हे करणार म्हणून त्यांच्या प्रतिज्ञेत उल्लेख आहे, त्याअर्थी या व्रताने माणसाचेही काहीतरी कल्याण ते साधू इच्छीत असलेच पाहिजेत. जर तसेच असेल तर त्या कार्यी ही लाख रामनाम म्हणून पत्ता लिहिलेली पत्रे पिठाच्या एक लक्ष गोळ्यांतून गंगेत टाकल्याने माणसांचा एक दमडीचाही प्रत्यक्ष लाभ नसून जर प्रत्यक्ष असा जगतापैकी कोणाचा लाभ होत असेल, तर तो माशांचा नि बेडकांचा होय. कारण ह्या एक लक्ष पिठाच्या गोळ्या गंगेत सोडल्या की, त्या वाहत वाहत कुठेतरी धारेलगतच्या दलदलीत, डबक्यात वा प्रवाहातळाच्या गाळात रुतून बेडूक नि मासे हेच त्यांस गिळून टाकणार ! रामाचा पत्ता जरी त्या चिठ्ठ्यांवर संस्कृतमध्ये लिहिलेला असला तरी माशांस वा बेडकांस संस्कृत येत असल्याचे वा तो पत्त वाचण्याइतका साक्षरतेचा प्रसार झाला असल्याचे फारसे ऐकिवात नसल्यामुळे त्या पिठाच्या गोळ्या त्या बेडकांच्या नि माशांच्याच पोटात पडणार; देवाकडे कशा जाणार ? देवाकडची पत्रे टाकण्याच्या बेडकांची नि माशांची पोटे ह्या पोस्टाच्या पेट्या आहेत की काय ? असे एखादे वचन असल्यास गोष्ट

निराळी आणि जरी परलोक-टपाल-विभागाचा असा एखादा नवा नियम प्रसिद्धीला गेला असला तरीही अन्नान्न दशा झालेल्या क्षुधित मनुष्याच्या पोटाला अन्न दिले असता तेही भगवंतास संतोषितेच, देवास ते पत्रही पावतेच पावते, हा जुना परलोक-टपालाचा नियम जो श्रुतिस्मृतींच्या पानोपानी आढळतो तोही काही रद्द झालेला नाही ना ? मग ह्याच पिठाच्या भाकरी चांगल्या खुसखुशीत भाजून जर कोण्या दहा-पाच असहाय, हीनदीन पण क्षुधित सज्जनांच्या एक वेळच्या भुकेस दिल्या असत्या तर त्यात त्यांच्या अंतरात्म्याला नि नरांच्या अंतरात्म्यांतच त्यातल्या त्यात उत्कटपणे व्यक्त असणारया नारायणाला संतोष झाला नसता का ?

किंवा असेही समजू की, गोलिकाव्रतावाचून दुसरा कोणताही प्रकार न रूचावा अशीच गोळ्या वळण्याची कंड लहरीबुवांच्या बोटास नि मनास आली होती, तरीदेखील जगत्कल्याणास पार विकरून जाण्याइतकी तरी ती लहर ज्या अर्थी वेडगळ नव्हती, उलट लोकहितसाधक म्हणून ते गोलिकाव्रत करण्यास प्रवर्तले म्हणून म्हणताता, त्या अर्थी बुवांनी गोळ्या का होइनात पण त्या मनुष्याला प्रत्यक्षपणे हितावह होतील अशा एखाद्या स्वरूपात आत हवे तर रामनाम घालून विनियोगायच्या होत्या. उदाहरणार्थ, एक लक्ष पिठाच्या गोळ्या बेडूक, मासेप्रभृती गंगेच्या गाळातील नागरिकांत वाटून देण्यापेक्षा जर एक लक्ष क्विनिनच्या गोळ्या स्वतः करून वा करवून त्या आपल्या आश्रमात मलेरियाने जर्जर झालेल्या पण क्विनिन घेण्याचीही अर्थशक्ती नसलेल्या बिचारया शेतकरी, विद्यार्थी, बायाबापड्यांस विनामूल्य वितरिण्याचे व्रत लहरीबुवा धरते तर त्यात सर्वच सोयी किती छान साधल्या असत्या बरे ! गोळ्याच वळण्याची बुवांच्या बोटास नि मनास आलेली कंडही शमली असती; हिवतापाने फडफडणारया दीन दारिद्र्यांचे दुःख होय ना होय कमीच झाले असते नि त्यांच्या अंतरात्म्याच्या प्रसन्नतेने नि बुवांच्या ह्या दयाशील परोपकारी व्रताने तो नारायण गाळातल्या बेडकांस नि माशांस गव्हाचे पीठ खाऊ घालणारया पात्रापात्रविवेकशून्य व्रतानेही संतोषत असेल तर तशा विवेकयुक्त दीनदुःखविमोचक व्रताने शतपट संतोषलाही असताच असता. ऐहिक रोखठोक राष्ट्रसेवेचा, रोगनिवारणाचा लाभही पदरी पडता. परत्रही त्या पुण्याने बेडकांस रामनामाच्या चिठ्ठ्या पिठाच्या गोळ्यातून चारल्याने जर प्रसादत असतील तर देवही प्रसादतेच प्रसादते! कारण, ‘देशे काले च पात्रे च’ हीच सर्व व्रतदानविधिविधानांची कसोटी गीतेत त्यांनी सांगितली असून त्या कसोटीस उतरणारया व्रतास सात्विक म्हटले आहे.

तीच संस्कृत कसोटी आजच्या प्राकृत नि अद्ययावत् परिभाषांमध्ये सागावयाची तर अशी की, ज्या व्रताने आजच्या परिस्थितीत अवश्य अशी आपल्या हिंदू राष्ट्राची किंवा मानवाची काहीतरी प्रत्यक्ष सेवा घडेल, हीनदीनदलितांची दुःखे काहीतरी प्रमाणात अगदी ‘हेचि देहीं हेचि डोळा’ दुरविता येतील, काहीतरी व्रताच्या प्रीत्यर्थ भोगाव्या लागणारया देहकष्टाच्या वा अर्थव्यवसायाच्या मानाने राष्ट्राची प्रत्यक्ष सेवा नि रोखठोक परोपकार घडेल, ते तेच व्रत हिंदू साधुसंतांनी नि सामान्य स्त्रीपुरूषांनी आचरावे. त्यामुळे पोटावर सरपटत यात्रा करणे किंवा गंगेत लाख रामनामाच्या चिठ्ठ्या पिठाच्या गोळ्यातून सोडणे यांसारख्या अगदी खुळचट नि देशकालपात्राच्या विवेक नसलेल्या तामसी व्रतांहून हिंदू धर्म नि हिंदू राष्ट्र यांचा जो अभिमानी जो भगवान ज्यास साधुसंत भजू नि पुजू इच्छितात तोही अधिक निःसंशयपणे प्रसादला जाईलच जाईल. श्रद्धेच्या शब्दनिष्ठ शास्त्रालाही हे नाकारता येणार नाही.

ह्या कसोटीच्या व्रतांनी काही झाले तरी परोपकारांचा भौतिक लाभ तरी पदरात पडतोच पडतो आणि पारलौकिक लाभाविषयी कमीतकमी इतकी तरी निश्चिती आस्तिकनास्तिक अशा उभयतांनाही असतेच असते की, परलोक जर ‘नास्ति चेन्न हि नो हानिरस्ति चेदुपकारिता ।।’

## १.३ आता मुसलमानी अघोर व्रते !

ही झाली हिंदूंची व्रते. आता सुदैवाने म्हणा, दुर्दैवाने म्हणा, ज्यांच्या ुरोपर आपणा हिंदूंस शत्रुत्वाने हो वा मित्रत्वाने हो परंतु एकत्र एकराष्ट्रीय नात्याने नांदणे भागच आहे आणि आमच्याबरोबर नांदणे त्यांनाही भागच आहे, त्या आपल्या राष्ट्राच्या दुसरया मोठ्या घटकाची—मुसलमानांची—धर्मविषयक प्रकृती कशी आहे त्यावर मर्मभेदक प्रकाश पाडणारया आणि याच चालू महिन्यात दो महिन्यांत बाहेर आलेल्या माहितीपैकी अगदी दोन-तीनच घटना पाहा. मुसलमानातील धर्मवेडासही विज्ञानाच्या धारेचे पाणी चाखविल्यावाचून हिंदुस्थानच्या काय किंवा एखाद्या मानवी संस्कृतीच्या काय, प्रगतीस धोका पोचल्यावाचून आणि आजवर त्या आततायीपणाने केली तीहूनही अधिक हानी झाल्यावाचून कशी राहणार नाही, ही आवश्यकता तुम्हा आम्हा मुसलमान नसलेल्यांसच नव्हे तर ज्ञानाने नि विज्ञानाने ज्यांचे डोळे उघडले आहेत त्या मुसलमान तुर्कांना का वाटली, जे जे धर्मवेडे रानटीपण आहे त्याची त्याची बेडी तोडूनच आपले राष्ट्र अद्ययावत विज्ञानाच्या पायावर उभारणे कां भाग पडले, जसे त्या प्रत्यक्ष खलिफांच्या नि सुलतानांच्या अत्यंत पुढारलेल्या मुसलमानी गाजीस, त्या केमाल आतातुर्कास नि त्याच्या सारया तुर्क राष्ट्रास—ते या फुटकळ घटनांच्या क्ष किरणशलाकांच्या उजेडात पटकन प्रकटून उठते.

मलकापुरात आर्यसमाजाचे प्रमुख मंत्री श्रीयुत लाला विश्वेश्वरप्रसाद वैद्य यांनी एक शुद्धी केली. तीही कोटिक्रमाने त्या मुसलमान झालेल्या हिंदूचे मन वळवून. आता अल्लाउद्दीन-औरंगजेबापासीन तो काश्मीर-मलबारप्रभृती प्रांतातील मुसलमानी आततायांच्या दंग्यापर्यंत हजारो हिंदू बलात्कारानेदेखील बाटविणे ज्या मुसलमानास वावगे वाटत नाही, त्यांना तरी केवळ मतपरिवर्तनाने केलेल्या शुद्धीविषयी आर्यसमाजावर रागवण्यास तोंड नाही. पण त्यांची देवाची व्याख्या ही की, बलात्कारानेदेखील हिंदूस मुसलमान करणे हे ज्यास पुण्य वाटते, पण हिंदूने आपल्या स्वतःच्या मुलामाणसांससुद्धा अशा रीतीने नित्याचे भ्रष्ट न होऊ देता त्यास परत आपल्या घरी आणल्यास ते मात्र घोर पाप असून खरया मुसलमानाने अशा हिंदूस ठार मारले पाहिजे अशी जो निकडीची आज्ञा देतो, तो ‘देव’ ! देवाचीच जिथे अशी राक्षसी व्याख्या, तिथे विवेक कसला नि विचार कसला ! वास्तविक पाहता त्या ज्या मनुष्याला ‘शुद्ध’ केले तो ‘बाटला’ म्हणूनच केले ना? शुद्धी म्हटली की भ्रष्टीकरण तिच्या आधीच असले पाहिजे. मग शुद्धीला खूळ, पाप, अपराध जे काय विशेषण लावाल ते तिच्या आधीच घडलेल्या भ्रष्टीकरणास लावलेच पाहिजे. पण ज्यांनी त्या हिंदूला पूर्वी मुसलमान केले, त्या मुल्लामौलवींवर न रागावता उलट त्यांस ते सत्कृत्यच केल्याविषयी सन्मानीत. देवाची वरील राक्षसी व्याख्या करणारया काही मुसलमान गुंडांनी लाला विश्वेश्वरप्रसाद घरी निजले असता ह्या गुंडांनी त्यांच्या घरात घुसून त्यांच्यावर

हल्ला केला.  पण लालाजीही काही कच्च्या मातीचा घडा नव्हते.  त्यांनी उशाशी घेतलेली फरशी घेऊन अकस्मात ते गुंडांवर तुटून पडले त्यासरशी मुसलमान गुंडच रक्तबंबाळ होऊन जीव घेऊन पळू लागले.

उदाहरण म्हणून आणखी एक ताजी घटना तेवढी सांगू.  इंदूरला गेल्याच वर्षी एक हिंदू अबलाश्रम स्थापिला असून त्याचे अध्यक्ष श्रीमंत सरदार किबे महाशयांसारखा उत्तरदायी (रिस्पॉन्सिबल) पुरूष आहे.  त्या संस्थेच्या ताज्या त्रैमासिक प्रतिवृत्तात अनेक मुस्लिम गुंडगिरीच्या ‘धार्मिक ’ अत्याचारांची उदाहरणे आहेत.  पैकी हे एकपाहा.  सूरजबाई नावाची २७  वर्षांची एक नि नगूबाई नावाची १७  वर्षांची दुसरी अशा दोन हिंदू तरूणी इंदोर स्टेशनवर उतरल्या.  आजकाल, मोठमोठ्या स्टेशनांवर, निशेषतः उत्तर हिंदुस्थानात, मुसलमान तांगेवाल्यातील अनेक लोकांचे हे एक धार्मिक कर्तव्यच होऊन बसलेले असते की, एकटीदुकटी हिंदू स्त्री पाहिली की तिला तिच्या घरी नेऊन पोचविण्याकरिता म्हणून जी ताग्यात घालवायची ती थेट त्या मुसलमानी गुंडांच्या अड्ड्यात नेऊन बळाने भ्रष्टवून, पळवून कुठच्या कुठे धाडून द्यावयाची; आणि धार्मिक राक्षसीपणा इथवर जाऊ शकतो की, त्या बिचारया निरपराध त्यांच्या प्रेमाच्या आई, माय, बहिणी, भाऊ, प्रियकर आप्तेष्टांच्या आठवणीने स्फुंदून स्फुंदून रडणारया हिंदू अनाथ अबलांना मोठमोठ्या मशिदींतून की जे देवाचे देवलसी पवित्र मंदिर असावयास हवे,-- त्यातच दिल्ली, लखनौ, मुंबई, हैदराबाद, कराची अशा केंद्रातून मुसलमानी धर्माची दीक्षा देण्यात येते—कोण्यातरी मुसलमानाच्या पदरी तिला ढकलण्यात येते.  तिचा गळा वैवाहिक बंधनाने करकच्च आवळला जातो !  जर ही ‘धर्म’ दीक्षा असेल तर गुंडात नि देवात फरक तो काय राहिला ?   परंतु अशाच गुंडगिरीने देव प्रसादतो, अशा धर्मवेडाने आज लक्षावधी मुसलमान भारलेले आहेत ही गोष्ट निदान हिंदूंनी तरी स्पष्टपणे सागण्यास कचरणे म्हणजे निव्वळ मुर्दाडपणा होय.

त्या दोन तरूणी इंदोर स्टेशनावर उतरताच ह्या तागेवाल्यांपैकी बरेच गुंड त्यांना घेरू लागले.  त्यांची ओढाताण चालली असता ही बातमी अनाथाश्रमास पोचली.  परंतु त्यांचे कर्मचारी तिथे येतात तो एका तांगेवाल्याने त्या दोघा तरूणींस पळवूनही नेले होते !  पण त्या तांग्याच्या मागोमाग एक संघटनाभिमानी हिंदू स्वयंसेवक गुप्तपणे लागला होता म्हणून निभावले.  त्याने संस्थेत येऊन तो मुसलमानांचा अड्डा कुठे आहे ते सांगताच पोलीस सब्-इन्स्पेक्टरच्या साहाय्याने कडक झडती चालली.  शेवटी मुन्नेखां वल्द कालेखां नावाच्या मनुष्याच्या तबेल्यात गवताच्या देरीआड त्या बिचारया दोघी तरूणींना धाकदपटशाने दडवून ठेवलेले आढळले !  त्यांची सुटकाही लगेच करण्यात आली.

ही मुसलमानांतील गुंडांची धर्मप्रवृत्ती !  पोटावर सरपटणारया हिंदूंची भाबडी व्रते फार फार तर खुळचट म्हणता येतील; पण असा क्रुरपणा धर्माच्या नावाखाली चालविणारे जे आततायी गुंड मुसलमानांत हजारांनी सापडतात त्यांची ही व्रते त्याहून शतपचींनी मनुष्यजातीस कलंक लावणारी, शुद्ध राक्षसीच म्हटली पाहिजेत.

आमच्या हिंदू राष्ट्रातील आजच्या वैज्ञानिक युगात टाकाऊ असणारया खुळचट रूढी, व्रते, मते त्यांनी सोडावी हे वारंवार सांगणे जसे आमचे कर्तव्य आहे, तसेच हिंदुस्थानी राष्ट्राचे आज अपरिहार्य उपांग

असलेल्या मुसलमानी समाजासही आमचे हेच सांगणे आहे की, तुमचा समाजही ज्या धर्मवेडाच्या रानटी समजुतींनी नि क्रुर आचारांनी बुजबुजला आहे ते उपद्रवी आचार नि क्रुर धर्मवेड तुम्ही शक्य तितक्या लवकर सोडणे तुमच्याच हिताचे आहे. हिंदूंवर उपकार करण्यासाठी नव्हे, हिंदू त्या तुमच्या धर्मोन्मादास भितात म्हणून नव्हे, तर तुमच्या माणुसकीसच तो बट्टा आहे म्हणून, आणि विशेषतः एका जुनाट मागासलेल्या संस्कृतीलाच घट्ट बांधून घेऊन कालाच्या मार्गात आडवे पडाल तर विज्ञानाच्या टाचेखाली तुम्हीही निःसंशय चिरडून जाल म्हणून, तुम्ही ती कुराणास त्रिकालाबाधित ईश्वरोक्त अक्षर नि अक्षर अनुल्लंघनीय मानणारी सनातन प्रवृत्ती सोडून कुराणाचा योग्य तो सन्मान राखीतच पण त्यांतील त्या काळच्या भांडणतंट्यास नि अरबस्थानसारख्या त्याकाळी मागासलेल्या नि आम्ही तुच्छलेल्या एका आकुंचित जमातीस ते बरे वाटले म्हणूनच काय ते ते निर्बंध त्रिकालाबाधित न मानता मनुष्य जातीच्या हितास जे आज उपयुक्त ते ते बेखटक आचरण्याची अद्यतन प्रवृत्ती स्वीकारा ! हिंदूंवर उपकार करण्यासाठी नव्हे; कारण औरंगजेबी धर्मोन्मादाचेही कंबरडे त्यांनी मोडलेले आहे तिथे ह्या आजकालच्या लुंग्यासुंग्या गुंडगिरीची काय कथा ? पण मुसलमान अद्ययावत बनल्यावाचून त्यांचा स्वतःचाही नाश होणार आहे म्हणून आता विज्ञाननिष्ठ बना.

युरोप धार्मिक आंधळेपणा सोडून या जगात ज्या काळी जे हितकर ते ते शास्त्र समजू लागून बायबलच्या बंदीतून सुटताच मुसलमानहो, तुमची त्याने कोण दुर्दशा केली आठवा बरे! तुम्हाला स्पेन मधून हुसकले, सरसहा कत्तलवून नामशेषिले. ऑस्ट्रिया, हंगेरी, सर्व्हिया, बल्गेरिया ठिकठिकाणी ठेचून ठेचून तुमचा फन्ना उडविला. हिंदुस्थानात तुमची मोगल बादशाही छिनली. अरब, मेसापोटेमिया, इराक, सीरियातून तुमच्या छातीवर ते राज्य करताहेत. जसा आमचा यज्ञ, वेद, जप, तप, शाप, शिव्या त्यांचे काही एक वाकडे करू शकले नाहीत तसेच तुमचे कुराण, कुरबानी, निमाज, ताईत, तावीज त्यांचे काही वाकडे करू शकत नाहीत. एकदा ‘अल्ला’ हा मंत्र ज्या ध्वजावर असतो तो ध्वज अजिंक्य अशा भावनेने मौलवींनी सैन्यावरील ध्वजावर सहस्त्रावधी संख्येने ‘अल्ला’ हा मंत्र लिहविला नि त्या ध्वजाखाली मपसलमानांनी ख्रिश्चनांवर हल्ला केला, जसे सर्वारिष्टशांतिप्रीत्यर्थ आमचे पंडित कोटी रामनामाचा जप करतात ! पण युरोपची शस्त्रास्त्रे अधिक परजलेली असल्यामुळे त्यांनी मुसलमानी सैन्याचा नुसता चेंदामेंदा केला इतकेच नव्हे तर ‘अल्ला’ हा मंत्र लक्ष वेळा लिहिलेला त्या ध्वजाचाही पाडाव केला, नि त्याच्याशी पोरांच्या खेळण्याशी खेळावे तसे सोजीर खेळू लागले.

म्हणूनच केमाल आतातुर्काने तुर्क राष्ट्रास कुराणातील आज अत्यंत मागासलेले म्हणून जे जे निर्बंध आढळले त्यांच्या बेड्यांस तडातड तोडून विमोचिले. नागरविधान (सिव्हिल लॉ), दंडविधान (क्रिमिनल लॉ), सैनिकविधान ही स्वित्झर्लंड, फ्रान्स, जर्मनी जेथे अद्ययावत आढळली तेथून घेऊन कुराणआतील ते ते निर्बंध रद्द केले. कुराणात काय सांगितले आहे हा शब्जनिष्ठेचा प्रश्नच उरला नाही. आजच्या मानवी विज्ञानाच्या प्रत्यक्षनिष्ठ दृष्टीने राष्ट्राच्या तारणास आजच्या परिस्थितीत काय अवश्य आहे इतकाच प्रश्न! केमालने तुर्क राष्ट्र अद्यतन नि विज्ञाननिष्ठ केले म्हणून तुर्कस्थान करी युरोपच्या भक्ष्यस्थानी पडला नाही. जर केमाल सुलतानासारखा वा खलिफासारखा कुराणाच्या दोन पुठ्ठ्यातच गुरफटून राहता तर आज जसे हिंदी मुसलमान तसे ते तुर्कही युरोपचे पाय चाटीत पडले असते !

अर्थातच जर हिंदी मुसलमानांस तुर्कासारखे प्रगत व्हावयाचे असेल तर त्यांनीही हजारो वर्षापूर्वीच्या रानटी धर्मवेडास सोडून विज्ञानाची कास धरावी.

२. गायः एक उपयुक्त पशू, माता नव्हे, देवता तर नव्हेच नव्हे !

गायीला आणि बैलाला देवता मानून पूजिण्याचा प्रघात केवळ आपल्या हिंदू घर्मातच आहे असे नव्हे. प्राचीन काळी आपल्या राष्ट्राच्या महाभारतीय युगाशी समकालीन असणारया ज्या असीरीयन, खाल्डियन, मिसर, इन्को प्रभृती मोठमोठ्या संस्कृती, धर्म नि राष्ट्रे होती, त्यांच्यातील कित्येकांत बैलांची नि गायींची पूजा होत असे. ही गोपूजा नि वृषभपूजा त्या प्राचीन काळच्या लोकांत जवळ जवळ सारया जगभर इतकी बद्धमूल झालेली होती आणि ह्या पशूविषयीची पूज्य भावना कोट्यावधी हृदयांत इतकी बळावली होती की, जेव्हा जेव्हा कोणी कोणी सुधारक एकेश्वरी मताचा प्रसार करण्यासाठी आले, तेव्हा तेव्हा त्यांना त्यांच्या अनुयायास ह्या गोपूजेपासून नि वृषभपूजेपासून परावृत्त करण्याचे काम अत्यंत कठीण गेले. ऊदाहरणार्थ, मोसेस प्रभृती यहुद्यांच्या पैगंबराचा इतिहास पाहा. मोसेस हा ईशप्रेषित – Prophet ! ईश्वराशी समक्ष बोलण्याचा त्याचा अधिकार ! सारया यहुदी राष्ट्राने त्याचा दिव्य अधिकार मानून त्याचा शब्द म्हणजेच देवाचा शब्द असे समजावे. परंतु त्या मोसेस पैगंबराने जेव्हा वृषभपूजेच्या विरुद्ध आंदोलन हाती घेतले तेव्हा त्याच्या त्या मताला मात्र लोक काही केल्या मनापासून मानीतनासे झाले. प्रत्यक्ष देवाशी, जेव्होव्हाशी, दैदीप्यमान तेजांच्या नि धुरांच्या लोटांतून बघत संभाषण करण्यासाठी तो एका पर्वतावर गेला असता त्याची पाठ फिरलेली पाहून यहुद्यांनी लगेच एका (Golden Calf) सुवर्णवत्साची मूर्ती स्थारून वृषभपूजा नि गोपूजा पुन्हा कशी चालू केली आणि त्या त्यांच्या विश्वासघाताने तो जेव्होव्हा देव नि त्याचा दूत मोसेस हे दोघेही चवताळून त्यांनी यहुदी राष्टास किती कठोर दंड केला, किती निर्भत्सिले, रागारागाने त्या सुवर्णवत्साच्या मूर्ती कशा तोडून फोडून टाकल्या, त्याची गमतीची कथा जुन्या करारात (Old Testament मध्ये) आपणास अजूनही वाचावयास मिळते !

वृषपूजा ही लिंगपूजेचीच एक आनुष्गिक पद्धती आहे. प्रजननात्मक सृष्टिशक्तीचे जे महदाश्चर्य मनुष्यमात्रास सहजच वाटते त्याची ती व्यक्ती आहे. सृष्टीशक्तीचे उत्तान, प्रकट नि उत्कट असे जे प्रतीक प्राचीन मनुष्यास दिसले त्याची त्याने पूजा आरंभावी हे त्या काळाला साहजिकच होते. त्यामुळेच लिंगपूजेचा प्रघात जगातील प्रचीन अशा बहुतेक धर्मांतून जगभर पसरलेला आढळतो. लिंगाचे नि नंदीचे साहचर्यही तसेच नि त्याच कारणासाठी प्राचीन राष्ट्रांतून जगभर रुढावलेले होते. नंदीच्या वृषणास स्पर्शून वंदिण्याची धार्मिक क्रिया ही त्या सृष्टिशक्तीतील बलशाही पूबीजाचा गौरव करण्याची उत्तान पद्धत होय.

महोत्कट डुरकाळ्या फोडीत चाललेला तो वृषणशाली बळकट वृषभ हा जसा पुंशक्तीचे सहजगम्य नि सचेतक प्रतीक ठरला, तसेच नि त्याच्याच अनुषंगे मातृशक्तीची प्रतीक ठरली गोमाता! किती दुधाळ, किती वत्सल, किती सहनशील ती गाय! 'दात न थे तब दूध दिया' त्या गाईने; आणि दात येताच धान्य दिले त्या वृषाने! मनुष्यास त्याच्या अगदी वन्य स्थितीच्या युगापासून अत्यंत उपयोगी पडलेल्या आणि पशुपालनयुगाच्या अगदी प्रारंभापासून कुत्रा, घोडा, शेळ्या प्रभृती जे पशू मनुष्याचे जवळ जवळ मनुष्यासारखेच सहकारी होण्याइतके माणसाळलेल्या पशूंत अत्यंत माणसाळलेल्यांनी शेजारलेल्या अशा ह्या गाईबैलांती मनुष्यास युगायुगांची जडलेली माया हीच ह्या गोपूजेस नि वृषभपूजेस प्राचीन

जगतात आफ्रिकेतील मिसरपासून ते अमेरिकेतील मेक्सिकोपर्यंत अत्यंत लोकप्रिय करुन सोडण्यास कारण झाली.

त्या प्रचीन काळी गोघ्न जातीही जगात नव्हत्याच असे नव्हे. आपल्या इकडेही त्या असत. गोमेधही वेदादिकांत तुरळकपणे उल्लेखिलेले आहेत. पण एकंदरीत गाईच्या खिल्लाराच्या रक्षणार्थ लढणारया इंद्राची स्तुती करणारया ऋग्वेदापासून, 'मा गामनागावधिः' अशी करुणा भाकणारया वेदमंत्रातून ते कृष्णभगवानाच्या भागवतातील गोकुलापर्यंत, जेथे पहाल तिथे, आपल्या हिंदू वंशाची गायीविषयीची अत्यंत आवड, कृतज्ञता नि भक्ती हीच प्रामुख्याने प्रकटत आहे. गोपालन नि कृषी हीच ज्या ज्या राष्ट्राची मुख्य उपजीविका होती त्या त्या जगातील बहुतेक प्राचीन राष्ट्रात गोभक्तीचा उदय व्हावा नि गोपूजा नि वृषभपूजा प्रचलावी हे त्या प्राचीन जगाच्या भावनाप्रधान धर्मप्रवृत्तीला साजेसे नि साहजिकच होते.

पण लिंगपूजा, पशुपूजा, वृक्षपूजा प्रभृती 'धर्म' ही धर्माची तामस नि अपकृष्ट स्वरूपे आहेत. जेव्हा त्या 'धर्मा'हून उच्चतर नि सत्यतर धर्म मनुष्याच्या रानटी नि प्राथमिक अवस्थेत कळलेलाच नव्हता, तेव्हा या सृष्ट पदार्थांची पूजा हास्यास्पद वाटत नसे. पण मनुष्याचे सृष्टपदार्थविज्ञान जसे वाढत गेले तसे देवाची नि देवतांची प्रतिकेही अधिक प्रकृष्ट नि तात्विक बनत गेली. काही झाले तरी मनुष्याने ज्याची देवता म्हणून पूजा करायची ते सत्व, ते प्रतीक, मनुष्याहून मानवी गुणांत तरी सर्वतोपरी श्रेष्ठ असावयास पाहिजे. मनुष्याचा देव हा मनुष्याहूनही हीनतर असेल तर त्या देवानेच त्या भक्ताची पूजा करणे उचित ठरेल! मनुष्याहून प्रगती-इच्छा-बुद्धी-शक्ती-ज्ञाती प्रभृती सर्व गुणांत हीनतर असणारया पशूस देव मानण्याची चाल ही यासाठीच आज जगातील युरोप-अमेरिका प्रभृती बहुतेक प्रगत नि सभ्य राष्ट्रांस अत्यंत लाजिरवाणी वाटत आहे. मग धर्माचे अत्यंत सात्विक नि तात्विक असे परमोच्च स्वरूप उपदेशिणारया वेदान्ताच्या अनुयायांनी, आम्ही हिंदूंनी अजूनही या अपकृष्ट, तामस नि माणुसकीस लाज आणणारया पशुपूजेस चिकटून राहावे हा रूढीचा केवढा प्रताप! उभ्या राष्ट्राचा बुद्धीभ्रंश 'धर्मा' चा छाप बसलेली रूढी कशी करू शकते त्याचे हे एक चटकदार प्रत्यंतर आहे.

त्यातही बुद्धीविपर्यासाची गंमत ही की आपल्या धर्माचे तत्वज्ञान 'सर्वं खल्विदं ब्रह्म ' या धर्मविचारांच्या अत्युच्च पदाप्रत पोचल्यामुळेच आमच्या धर्मात हे पशुपूजेचे अत्यंत हिणकस वेड आजून टिकाव धरून आहे. प्रज्ञही त्या अज्ञतेचे असे कौतुक करीत आहेत की जर हे आब्रह्मस्तंभपर्यंत सारे चराचर विश्व त्या परमात्म्याचीच व्यक्ती आहे, तर पशूही त्या ब्रह्माचे प्रतीक कां होऊ नये? गाय ही देव कां होऊ नये? बैलाचीही पूजा कां करू नये? त्यास उत्तर असे की आपण हे उत्तर जे देता ते बर्ह्मसृष्टीतील विचाराचे की मायासृष्टीतील व्यवहाराचे? जर पहिले असेल, तर प्रश्न एक नि उत्तर भलतेच असे होईल. मायासृष्टीतील मुद्याचा जो प्रश्न की मनुष्याने मनुष्याहून हीनतर वस्दूंस देव मानावे की काय, त्याचे उत्तर मायासृष्टीतील मोजमापानेच दिले पाहिजे. ब्रह्मसृष्टीत गाय नि गाढव ही समानच आहेत, म्हणून गायीचे पंचगव्य पिण्याच्या संस्काराच्या ठायी यज्ञादी धर्मविधींत गाढवीचे पंचगाढव्य ब्राह्मणाने प्यावे की काय? जे गोभक्त वेदान्ती ह्या हीन पशुपूजेस शेकडो कथापुराणप्रवचनादी प्रसंगी ह्या बह्मवादाच्या आधारे समर्थितात, त्या त्या सभांमध्ये जोडा डोक्यास घालून नि पागोटे पायात घालून ते

आलेले नसतात; त्यांच्या गोठ्यातल्या दुधाळ गायी कुंभाराच्या गोठयात नेऊन दिल्या नि कुंभाराच्या घरच्या लाथाळ गाढवी या गोभक्तांच्या गोठयांत आणून बांधल्या तर त्यांस ते खपेलसे दिसत नाही. फार काय, आम्ही असे अनेक प्रामाणिक, प्रख्यात नि सच्छील गोभक्त पाहिले आहेत की जे गोमातेचे गोमूत नि गोमय वरील ब्रह्मवादाच्या आधारे गाय ही देवता कां नाही, म्हणून आव्हानपूर्वक निचारीत भरसभेत पंचगव्य पितात, गोमूत ओंजळ ओंजळ भरून देवळांत शिंपडतात, पण डॉ. आंबेडकरांसारख्या एखाद्या शुद्ध नि त्यांच्याहूनही सुप्रज्ञ पूर्वास्पृश्याच्या हातचे स्वच्छ गंगोदकही पिण्याचे राहोच पण त्यांच्या अंगावर शिंपडले जाताच विटाळ झाला म्हणून स्नान करू लागतात. त्यांचा वाद तिथे मूग गिळून कां बसतो? सुबुद्ध, दयाशील नि प्रामाणिक मनुष्यांचीही बुद्धी धर्माची झापड डोळयांवर पडली की कशी भ्रंशते पाहा! किंबहुना गोरक्षण न करता गोभक्षण कां करू नये? ब्रह्मवादाने दोन्हीही लटकी किंवा दोन्हीही खरी आहेत, स्वीकार्य आहेत. भक्षण नि रक्षण हा भेदच ब्रह्मसृष्टीत नाही. ‘नासतो विद्येत भावः नाभावो विद्यते सतः ’ ही ब्रह्मसृष्टी ! मग गोभक्षण कां करू नये?

गायीत देव आहेत म्हणून पोथ्या सांगतात तर वराहावतारी देव डुक्कर झाले होते असेही पोथ्या सांगतात! मग गोरक्षण कां करावे? डुक्कर-रक्षण संघ स्थापून डुक्कर-पूजा कां प्रचलवू नये? ज्याअर्थी गोरक्षँ, गोपूजा, गोभक्ती ह्या कल्पनाच मुळी मायासृष्टीतल्या आहेत, त्याअर्थी त्यांचे स्वीकरण वा धिक्करण हेही ह्या व्यावहारिक, प्रापंचिक नि तुलनात्मक विवेकानेच करणे शक्य आहे, उचित आहे. त्या मायासृष्टीत जोवर मनुष्य आहे आणि गाय वा बैल पशू आहे, तोवर मनुष्याने त्याच्याहून सर्व गुणांत हीनतर असलेल्या पशूम देव मानणे म्हणजे मनुष्यास पशुहून नाच मानण्यासारखे आणि माणुसकीसच कमीपणा आणणारे आहे.

मनुष्याहून सर्व गुणांत अत्युच्च असलेल्या प्रतीकासच मनुष्याच्या देवाचे प्रतीक मानणे उचित. गाढवाने पाहिजे तर त्याहून श्रेष्ठ पशू असलेल्या गाईस देव मानावे; पण मनुष्याने तसे मानण्याचा गाढवपणा करू नये.

ब्रह्मवादाने गो किंवा वृषभासारख्या पशूंस देव म्हणून पूजण्याचा प्रघाताचे जसे समर्थन होत नाही, तसे युक्तिवादानेही होत नाही. ‘गोपूजेच्या भावनेमुळे गाय ही देवता आहे, तिची पूजा तीच देवाची पूजा, अशी ईश्वरीय धर्माच्या आज्ञेचीच राजमुद्रा तिच्यावर ठोकल्याने गोरक्षणाची भावना आज कोटयावधी हिंदू लोकांच्या रोमरोमी खिळून गेलेली आहे ! !’ हा गोपूजकांचा युक्तिवाद मनुष्याच्या धर्मभोळ्या युगात कितीही खरा ठरलेला असला तरी आता यापुढे नि आजच्या विज्ञानयुगात तो पटला तर लोकांच्या हितापेक्षा अनेक पटीने अधिक अशा अहितास कारण होणारा आहे आणि न पटला तर हास्यास्पद ठरणारा आहे.

कारण कोणत्याही गोष्टीस तो धर्म आहे असे पोथीत सांगितले आहे म्हणूनच तसे डोळे मिटून मानण्याची पोथीनिष्ठ अंधळी भावना आता झपाटयाने मावळत आहे आणि ती मावळत जावी हेच आता मनुष्याच्या वैज्ञानित प्रगतीस अत्यंत अवश्य आहे. पाच हजार वर्षापूर्वीच्या पोथ्यांत सांगितलेली प्रत्येक गोष्ट आता आम्ही जर अद्ययावत् निज्ञानाच्या कसोटीवर पारखून न घेतली, प्रत्यक्षनिष्ठ

ज्ञानाच्या ती विरुद्ध जाताच किंवा आजच्या परिस्थितीत आपल्या हिंदू राष्ट्राच्या हितास हानिप्रद ठरताच आम्ही तत्काळ टाकून न दिली, तर आपले हिंदू राष्ट्र नि हिंदू धर्मही पाच हजार वर्षाइतकाच मागासलेला राहून ह्या विज्ञानाच्या वैमानिक युगातील टकराटकरीत आपण टिकाव धरू शकणार नाही. प्रश्न एका फुटकळ प्रकरणाचा नाही, तर एका सर्वस्पर्शी राष्ट्रीय प्रवृत्तीचा आहे. पोथीनिष्ठ की प्रत्यक्षनिष्ठ, पुरातन की अद्यतन, प्रश्नशून्य विश्वासशील ‘धर्म’ की प्रश्नशील प्रयोगक्षम विज्ञान? ह्या दोन प्रवृत्तींपैकी अद्यतन, प्रत्यक्षनिष्ठ नि प्रयोगसिद्ध विज्ञानच आदच्या परिस्थितीत नि आजच्या जागतिक प्रतिस्पर्धेत आमच्या राष्ट्राचा वेज झाला पाहिजे! आणि ह्या प्रवृतितीला जर तुमची गोपूजा न पटली तर ती टाकाऊच ठरली पाहिजे. कारण तशी मूर्खपणास ‘धर्म’ मानण्याची, केवळ पोथीत तसे आहे म्हणून धडधडीत बाष्कळपणास मान तुकविण्याची सवय राष्ट्रास लागल्याने जे त्याचे सर्वनाशी अहित होईल, ते तुम्ही म्हणता त्या गोपूजनामुळे होणारया यःत्किंचित लाभापेक्षा—ते लाभ होतात असे गृहीत धरले तरी—अनेत पटीने भयंकर नि घातक आहे. एक वेळ राष्ट्रात थोडी गोहत्या झाली तर चालेल, पण उभ्या राष्ट्राची बुद्धिहत्या होता कामा नये. यास्तव गाय वा बैल हे पशू आपल्या कृषिप्रधान देशात तर मनुष्यहितास अत्यंत उपकारक आहेत इतकेच सिद्ध करुन आणि त्या पशूंचा उपयोग आपल्या राष्ट्रास ज्या प्रमाणात नि ज्या प्रकारे होईल त्या प्रमाणात नि त्या प्रकारेच त्या पशूंची पशू म्हणूनच जोपासना करू म्हणाल तरच ते गोरक्षण राष्ट्राच्या निर्भेळ हिताचे होईल. पण त्या हेतूने गाय ही देव आहे, कारण पोथीत तिची पूजा करणे हा ‘धर्म’ आहे, इत्यादि थापा माराल तर त्यावर जरी राष्ट्राने यापुढेही विश्वास ठेवला नि गोरक्षण थोडेसे अधिक झाले तरीही त्या पोथीजात प्रवृत्तीला उत्तेजन देण्याचे जे अपकार्य त्यायोगे करावे लागते त्याचे परिणाम राष्ट्राची शतपटीने अधिक हानी करील. एक दिवसाच्या थंडीपुरता शेक हवा म्हणून कोणी घरालाच पेटवू लागला तर त्यास ‘अल्पस्य हेतोर्बहु हातुमिच्छन् विचारमूढः प्रतिभासि मे त्वम्’ असेच बजावावयास हवे.

आणि तसेच त्या गोभक्तासही बजावावयास हवे की, जो लोकांना गोरक्षणाचे महत्व पटविण्यासाठी व्याख्यानात वा पुराणात गाईची भरमसाट स्तुती करता करता इतका वाहवतो की, ती गाय ही एक देवता आहे इतकेच म्हणून न थांबता यच्चयावत तेहतीस कोटी देवता गाईतच राहतात म्हणून शपथेवर सांगू लागतो ! आधार ? पोथी! खरोखरीच आपल्या पुराणातून तशी स्तुती केलेली गोमहात्म्ये आहेत! ती शुद्ध संस्कृतातील अनुष्टुपे ऐकताच मागच्या भाबडया युगांत जरी भोळी भक्ती माना डोलवीत राहिली तरी आजच्या काळात त्यास तशीच मान तुकविणारा दुधखुळा वर्ग दिवसेंदिवस विरळाच होत जाणार! आणि तसा दुधखुळेपणा नाहीसा होणेच इष्ट आहे! काय ते स्तोत्र आणि काय ते चित्र! विष्णू, ब्रह्मा, शंख, चंद्र, सूर्य, सोम, यम प्रभृती झाडून सारया देवांची तिच्या शरीरात एकच दाटी झालेली! कोणी डोळयांत, कोणी दातांवर, ज्याला जिथे साधले तिथे तो लगटला. पाठीच्या कण्यात तर, मधल्या सुटीत शाळेतील उनाड पोरे एखाद्या बाकावर गमतीने करतात तशी देवांच्या दाटीची रेटारेटी चाललेली आहे की, वाळत घातलेले स्वतःचे गहू खाताना त्या गाईला पाहून गोभक्तदेखील जेव्हा एखादे लाकूड तिच्या पाठीत घालतो तेव्हा दहापाच तरी लंबे झाल्यावाचून राहूच नयेत! वर ही गर्दी झालेली पाहून कुल पर्वत खालूनच तिच्या पायात घुसले. नाग पुच्छात, महर्षी केसाकेसांच्या भोकात! ‘पुच्छे नागाः खुराग्रेषु ये चाष्टौ कुलपर्वताः । मध्ये देवगणाः लर्वे लोमकूपे महर्षयः!’ पण सगळयांत अत्यंत केविलवाणी दशा झाली त्या बिचारया मरुताची नि वरुणाची! Bone

for the latecomers या न्यायाने उरलेल्या ज्या दोन जागीच शक्य त्या समाधानात राहण्याची पाळी आली त्यांजवर त्या दोन जागा म्हणजे ‘अपाने तू मरुद्देवो योनौ च वरुणः स्थितः ! आणि ‘मूत्रे गंगा’ !!!

एका पशूला देवता बनविण्याच्या धांदलीत देवांनाच पशूहून पशू बनविले! त्या गायीच्या शिंगांच्या टोकापासून ते तिच्या शेपटाच्या केसांच्या टोकांनादेखील असे लोंबकळत चिकटून राहावयास देव म्हणजे गोचिडांची एखादी जात आहे की काय? असल्या पशूस स्तुतीची असली वर्णने एक लाक्षणिक काव्य या दृष्टीनेदेखील एक असह्य अतिशयोक्ति आहे! शिवाजीला रायगडचा कुत्रा म्हणणे किंवा दारच्या तिखट कुत्र्यास शिवाजी म्हणणे हा जसा श्लोक नसून शिमगा आहे तसेच देवांची विटंबना करुन पशूंस देवाधिदेव करणारे हे श्लोक लाक्षणिक अर्थीदेखील एक शिमगा आहेत! परंतु आमचे गोभक्त ह्या श्लोकांना लाक्षणिकही न मानता अक्षरशः सत्य म्हणूनच जेव्हा शपथेवर सांगतात तेव्हा सारी सहनशीलता संपून असे विचारावेसे वाटते की, जेव्हा तो कसाई ह्या देवतेस सुरयाच्या एका वारासरशी ठार करतो तेव्हा तिच्या शरीरात राहणारया या तेहतीस कोटी देवांपैकी एकही मायेचा पूत पुढे सरसावून त्या कसायास शिक्षा का करत नाही? त्या गाईचे शिर कां वाचवित नाही? की ते देव त्यांच्या भजकांसारखेच मुर्दाड झालेले आहेत? या तुमच्या तेहतीस कोटी देवांनी गजबजलेल्या गाईस एका घावासरशी लंबे करणारा मी कसाई तुमच्या तेहतीस कोटी देवांहूनही पराक्रमी नाही काय, म्हणून आव्हानिणारया म्लेंच्छ कसायाची ही दर्पोक्ती जितकी अक्षम्य आहे, तितकीच ती मूळ कारणीभूत होणारी ही आपली गोस्तुतीची मूर्ख अतिशयोक्ती असह्य आहे.

गाईच्या देवत्वाची भाबडेपणापायी झालेली जशी ही विटंबना पाहिली, तशीच आता आमच्या हिंदुत्वाची एका गोभक्ताने नकळत केलेली विटंबना पाहा. हिंदुत्वाची व्याख्या एका गोभक्ताने अशी केलीः ‘धेनुर्यस्य महामाता.’ हिंदू कोण? तर ज्याची महामाता धेनू आहे तो! हे हिंदुत्वाचे एक मुख्य लक्षण? भाबडेपणाच्या लहरीत ह्या ‘भाला’कारांसारख्या देशभक्ताच्या ध्यानात आले नाही की, धेनू जर कोणाची खरोखरच महामाता असेल तर बैलाची होय! हिंदूंची नव्हे!! ज्या हिंदुत्वास गाईच्या पायावरच-उभे राहावे लागते ते गायीच्या पायांसारखेच संकटाच्या पहिल्या झटक्यात मटकन खाली बसलेच पाहिजे. देवाचे गुण भक्तात उतरतात, गायीला देव मानता मानता, गायींची पूजा करता करता हिंदूंचे राष्ट्रच्या राष्ट्र गाय होऊन गेले, त्यानी दाती तृण धरले! आता जर कोणाच्या पायावर आपले हे हिंदुत्व उभारावयाचे असेल तर ते सिंहाच्या पायावर उभारले पाहिजे. मदोन्मत्त दिग्गजांची गंडस्थाने एका झेपेसरशी फोडून, फाडून टाकणारी तीक्ष्ण नखे ज्याची आहेत तो नृसिंह आता पुजला पाहिजे. हिंदुत्वाचे ध्येय ते, खूण ती, गाईची खूर नव्हे!!

गोरक्षण हा ‘धर्म’ आहे नि ‘स्वधर्मे निधनं श्रेयः ’ आहे, या दोन भावनांची सांगड पडताच विवेकबुद्धी कशी साफ आंधळी झाली, बेशुद्ध झाली त्याचे प्रत्यंतर आपल्या इतिहासात जे सापडले ते सांगावयालादेखील लाज वाटते! मुसलमान जेव्हा हिंदुस्थानावर चालून आले तेव्हा त्यांच्यातील कित्येक लुच्चा सेनापतींनी मुसलमानी सैन्यापुढे गायींच्या कळपांचे गोल रचून चाल करावी. हिंदूंचे सैन्य त्यावर उलट चालून जाताच अकस्मात थबकावे, मागे मागे हटू लागावे! कां? हिंदूंच्या हाती शस्त्रास्त्रे नव्हती म्हणून वा ते रणात काटाकाटी करण्यास भ्याले म्हणून? नव्हे! तर ती शस्त्रास्त्रे

देशशत्रुंच्या सैन्यावर सोडली तर प्रथम ते गायींचे पुढे आलेले कळपच मरतील म्हणून! म्हणून हिंदू सैन्याने शस्त्रास्त्रे उपसण्याचे साफ नाकारले! गोवध हे महापाप. सोशिकपणा त्यांच्या हाडीमासी खिळलेला. पण देशशत्रूंची नि धर्मशत्रूंचीआततायी चढाई रोखणे हेच महापुण्य ही शिकवण त्यांस उत्कटत्वाने कोणी दिलेली नव्हती! गायी मरू नयेत म्हणून राष्ट्र मरू दिले! मुलतानचे सूर्यमंदिर आम्ही पाडून टाकू म्हणून मुसलमानांनी धाक घालताच हिंदू सेनेने हाती आलेले विजय सोडून ढाला परतविल्या! मुलतान मुसलमानांच्याच हाती राहू दिले! काशी घेण्यासाठी पुढे याल तर येथील देवळे उद्ध्वस्त करू ब्राह्मणांची करू, म्हणून नबाबाने धमकी देताच काशीचे हिंदू पेशव्यांनी काशीवर स्वारी करू नये म्हणून धरणे धरुन बसले! आणि शक्ती असताही पेशव्यांचा जो उत्कट मनोदय की, 'श्री सोडवावी ', काशी क्षेत्र म्लेच्छांच्या हातून घेऊन स्वतंत्र करावे, तो विफल झाला! 'धर्म', शब्दनिष्ठ पोथीजात 'धर्म' म्हटला की, बुद्धी कशी आंधळी होते, किंबहुना बुद्धीचे डोळे काढून घेण्यासाठीच कित्येक वेळा 'धर्मा' चे सांडस तापवून हेतितःच कसे घुसविले जातात, त्याची ही ऐतिहासिक उदाहरणे केवळ चाचणी म्हणून सांगितली. याहूनही भयंकर नि असंख्य उदाहरणे आपल्या हिंदू इतिहासात घडली आहेत; आजही अस्पृश्यता, सिंधुबंदी, रोटीबंदी, जातिभेद प्रभृती खुळचटे 'धर्मा' पायी घडत आहेत! मनुष्यास उपयुक्त म्हणून नि त्या प्रमाणातच गोरक्षण करावे असे स्पष्ट सांगितले असते, ती व्यावहारिक भालनाच काय ती असती, तर त्या हिंदू सैन्याने ते गायींचे कळप आपल्या स्वतःच्या तलवारीने चराचर चिरुन लागोपाठ मुसलमानांच्या मुंडक्यांचाही ढीग रणांगणावर रचला असता; एकही मुसलमान न मारविता ती ती रणे मुसलमान जिंकू शकते ना. मुलतानचे एक सूर्यमंदिर धुळीस मिळाले असते; पण मुलतानहून मुसलमानास मागे हटविल्याने हिंदू राज्य सुरक्षित राहाते. काशीची दहा देवळे भंगती; पण हिंदूंचे धर्मछत नि राज्यछत जर अभंग राहते तर सारया हिंदुस्थानची देवळे अभंग राहती! पण ते पटले नाही; याचे कारण गोरक्षण, मंदिररक्षण हे व्यावहारिक कर्तव्य न ठरविता एकदम परिस्थितिनिरपेक्ष 'धर्म' करुन टाकला—त्रिकालाबाधित, सनातन, अशंकनीय, अप्रतिवादार्ह 'धर्म'! यास्तव तोच अधर्म झाला, अनर्थ झाला आणि ते गाईंचे चार कळप वाचवून लाखो गाईंची प्रत्यही कत्तल करणारे कसाईखाने सारया हिंदुस्थानभर नित्याचे उभारुन ठेवण्याचे पुण्य जोडले! एक देवाचे देऊळ पडू नये मिहणून देवाचे राज्यच्या राज्यच बुडवू दिले! जणू काय अल्लाउद्दिन, औरंगजेबादी म्लेंच्छांच्या राज्यात गाई मरत नाहीत, देवळे पाडीत नाहीत! गोरक्षणास 'धर्म' समजल्याने गोभक्षण मात्र बळावले! आधी बुद्धी जाते नि नंतर भांडवल!

हा जसा भूतकाळ तसाच आजचा वर्तमानकाळ. आजचे गोभक्त नि गोधर्मही तसाच रानटी राहिलेला आहे ! गायीला प्रथम बाष्कळपणापायी माता म्हटली, पण तेवढयाने समाधान न होता मातेलाही जे पावित्र्य नाही ते त्या पशूला देऊन ठेवले. प्रत्यक्ष आईचे फार फार तर दूध तेवढे पेय, पण गायीचे? पंचगव्य ही पेय, पावन! अमेरिकेत आमच्या वेदान्तातील तत्वज्ञान ऐकून कित्येक बुद्धिमान लोक हिंदू धर्माची दीक्षा घ्यावयास उतावीळ होतात. पण ती दीक्षा देण्याच्या आरंभीच जेव्हा त्यांची हिंदू धर्माच्या आजच्या आचारांशी गाठ पडते, तेव्हा त्यास कोण किळस वाटत असेल याची कल्पना करा ! सवयीने तो पंचगव्य हा संस्कृत शब्द आपणास ब्रह्मज्ञान शब्दासारखाच पवित्र वाटतो. मासेमा-या कोळ्यांच्या घरात माशांची दुर्गंधी सवयीने मुळीच येत नाही, पण इतरांस त्या आळीत पाय टाकताच नाक दाबून धरावे लागते. तसेच हिंदू तत्वज्ञानाने भारलेल्या त्या अमेरिकनादी प्रगत लोकांस हिंदू धर्माची दीक्षा देण्यासाठी गंभीरतेने बसवून आम्ही त्या दीक्षेचा पहिला विधी म्हणून जर त्यास त्याच्या

डोळ्यांसमक्ष गायीचे मूत्र नि शेण कालवून ते प्या म्हणून सांगितले, तर त्यास आमच्या या धार्मिक हिंदू आचाराची इतकी किळस येईल की, शेण खाण्यानेच जो धर्म स्वीकारता येतो त्याचे तोंड देखील ते पाहू इच्छिणार नाहीत! आम्ही जर त्यास सांगितले की, ‘अहो, गाय ही देवी आहे, माता आहे !’ तरी देखील ती भावना लाक्षणिक अर्थी एक वेळ स्वीकारूनही ते धिक्काराने उत्तरतील, ‘अहो मातादेखील म्हणतो हवे तर त्या पशूस; पण मग तिचे ते त्रिगव्य आम्हांस द्या—दूध, दही, तूप ! पण हे काय त्यात मिसळता आहा ? गोमूत नि गोमय ? आईच्या दूधातदेखील केवळ मातृप्रेमासाठी तिच्या ह्या वस्तूंचा मसाला आम्ही घालीत नाही !!’

खरोखर हा किळसवाणा प्रकार निदान परधर्मातील लोकांच्या हिंदूकरणाच्या संस्कारात आढळता कामा नये. रत्नागिरी हिंदू सभेच्या शुद्धिसंस्कारात पंचगव्यास चाट दिली आहे ती यासाठीच. फार तर तुळशीपत्र खावयास द्यावे. शेण खाणे ही शिवी आहे, संस्कार नव्हे !!

गायीला देवता मानणे नि गोभक्तीचे पारणे गोमूत्र खाऊन फेडणे हा भाबडा मूर्खपणाही एक वेळ क्षम्य होईल; पण त्या गोमूत्र खाण्यापिण्याचे समर्थन वैज्ञानिक बुद्धिवादानेही करू पाहणारा पढतमूर्खपणा तर केवळ अक्षम्य होय ! त्यांचे म्हणणे असे की, ‘गायीच्या शेणात नि गोमुत्रात तसेच काही रोगपरिहारक नि ‘पौष्टिक’ गुण आहेत ! म्हणून आमंच्या त्रिकालज्ञानी स्मृतिकारांनी ते शेण खावे नि गोमूत्र प्यावे म्हणून सांगितले!’ मोठमोठया सभांतून नि लेखांतून गंभीरपणे अनेक गोभक्त ही भाषा आजही वापरतात ! पण आधी असे पाहा की, कोणकोणत्या रोगांवर गोमूत्र नि शेण अगदी रामबाण उपाय आहे हे डॉक्टर मंडळाने सहीशिक्क्यानिशी प्रसिद्धिले आहे ? ज्या रोगांवर तो रामबाण उपाय ठरेल त्या रोगाच्या वेळी ते पंचगव्य खुशाल प्या. पण श्रावणी प्रभृती प्रसंगी जी आपण मंडळी जमतो ती काय त्या त्या रोगांनी सारीच्या सारी पछाडलेली असतो ? अणि युरोप अमेरिकेत हे पौष्टिक शेण पिढयानपिढया कोणीही खाल्ले नाही म्हणून तिकडचे स्त्रीपुरूष आज अगदी क्षयाने झिजलेले अशी पाप्याची पितरे झाली आहेत नाही ? उलट आज रोगग्रस्त पाप्यांच्या पितरांची जन्मसिद्ध पितृभूमी जर कोणती झाली असेल तर ती ही गायीचे शेण नि गोमूत या पौष्टिकांचा उकाडा पिढयान्-पिढया खाणारी बिचारी आपली भरतभूमीच होय ! गोमुतात म्हणे औषधी गुण आहेत ! पण ते नाहीत कशात ? नास्तिमूलमनौषधम् ! गोमूत्रात जसे काही गुण आहेत तसेच नृमूत्रांतही आहेत ! बंदीगृहात जे अट्टल सोदे असतात त्यांना जेव्हा कळते की आपणांस फटक्यांची शिक्षा होणार, तेव्हा रात्री ते आपल्या कोठडीत बंद असता पहाटेच स्वतःचे मूत्र गटागट पितात! कारण त्या नृमुत्राचा गुण ते असा स्वानुभवाने सांगतात, की त्याच्या पिण्याने अंग बधिर होते नि फटक्यांच्या वेदना फार कमी होतात ! पण नृमूत्रातही काही गुण आहेत म्हणून मनुष्याचे पंचगव्यही प्रत्येक धार्मिक नि पवित्र संस्कारात पीत बसावयाचे काय ? ब्रँडी ही कफक्षयादी विकारावर औषध आहे. म्हणून श्रावणीत तिचीही आचमने घ्यायची काय ? विषही काही रोगांवर औषध असते—त्या रोगावर ते घ्या. म्हणून प्रत्यही का ते धार्मिक संस्कार म्हणून प्यायचे ?

अशा भाकड नि मूर्ख संस्कारांस आता चाट द्यावी हेच आपल्या धर्माच्या नि संस्कृतीच्या थोरवीस साजेसे होईल. गोरक्षणाच्या दृष्टीनेही आजच्या वैज्ञानिक युगात पशूस देवता मानणारी ती

खुळचट गोमाहात्म्ये सांगून भागणार नाही. तसली भाबडी प्रवृत्ती राष्ट्रात पसरविण्याचे सोडून जर आमचे गोरक्षक व्याख्याते या कृषिप्रधान देशात त्या उपयुक्त पशूंचा आर्थिक उपयोग किती मोठा आहे, गाईची नि बैलांची वीण कशी वाढवावी, त्यांच्या मलमूत्रांची खते कशी करावी, गायीच्या दूधतूपाच्या संवर्धनाचे प्रयोगार्ह उत्कृष्ट प्रकार कोणते, गुण कोणते हे सर्व प्रयोगसिद्ध नि रासायनादिक घटकांसह प्रत्यक्षनिष्ठ भाषेत सांगतील नि गोशाळा प्रभृती संस्था गाईंच्या आणि बैलांच्या जोपासनेचा मनुष्यास अधिकात अधिक प्रत्यक्ष उपयोग कसा होईल याच ऐहिक दृष्टीने चालवितील, तरच आता गोरक्षणाचे महत्व लोकांस अधिक पटणारे आहे. थोडक्यात म्हणजे गाय हा पशू उपयुक्त आहे म्हणून रक्षणीय आहे, अशा धोरणाने गोरक्षणाचे धार्मिक स्वरूप सोडून त्यास आर्थिक स्वरूप दिले की झाले. त्यायोगे गोरक्षण हवे त्याच प्रमाणात नि प्रकाराने होईल. धार्मिक स्वरूपाने आजच्या युगात काही लाभ नसून उलट भाबडी प्रवृत्ती पसरविण्याची हानी मात्र आहे. म्हशीला देवी म्हणून म्हैसमाहात्म्य अजून कुठे रचलेले नाही. पण म्हणून म्हशीचे रक्षण केवळ तिच्या आर्थिक लाभासाठीच कोणी करीत नाही की काय ? ती अमेरिका पाहा, आज ते राष्ट्र एका अर्थी गोभक्षक असताही गोरक्षणाच्या कामी आमच्याहून शतपट पुढारलेले आहे. कारण त्या प्रश्नात धार्मिक आंधळेपणाचा गडबडगुंडा न चालू देता निव्वळ आर्थिक नि वैज्ञानिक दृष्टीने ते तो सोडवितात. आपल्या भागवतातील गोकुळे जर कुठे आज पाहावयाची असतील तर ती आम्हा गाईस देवता मानणा-या गोभक्तांच्या पांजरपोळात नव्हेत, तर गाई-बैल निर्भेळ पशू मानणा-या अमेरिकेतच होत. कोण धष्टपुष्ट सुंदर ती गायींची खिल्लारे, ते दुधाचे क्षीरसागर, गायींचा दुधाळपणा, ती शास्त्रशुद्ध जोपासना, उत्तम गायीबैलांची पिढ्यान्-पिढ्या कोष्टके बांधून बांधून केलेली वंशोन्नती, दर पिढीला सुधारत जाणारी ती अनुवंशाच्या प्रत्यक्ष नि प्रयोगक्षम नियमांनी केलेली वीण! दहा मरावयास टेकलेल्या गाईंना माणसांना मिळत नाहीत ती पक्वान्ने वाढलेली पाने, देवतांसारखा नैवेद्य दाखवून, खाववून पाळीत बसणे म्हणजे गोरक्षण नव्हे!

सुदैवाने अशा काही उपयुक्ततावादी गोरक्षण संस्था आज चालू आहेत. आणि त्यांना आमची पूर्ण सहानुभूती आहे. इतर प्रामाणिक गोरक्षण कार्यकर्त्यांसही आमची विनंती आहे की, धार्मिक भाकडपणा जनतेस न पसरविता ती चळवळ सुस्पष्ट नि प्रयोगक्षम अशा आर्थिक नि वैज्ञानिक पायावर उभारावी, चालवावी, म्हणजे अमेरिकेप्रमाणेच आपल्याइकडेही खरे गोरक्षण होईल. उगीच, एखादी गाय वा बैल, देव वा देवी म्हणून गावोगाव हिंडवीत भाक मागतात तशांना एक दमडी कोणी देऊ नये. त्या बैलाला कामास जुपवावा न् त्या भीकमाग्या गोभक्ताला राष्ट्रासाठी वेठीस धरावा.

लेखनमर्यादा संपली असताही एक चेतावणी आणखी दिलीच पाहिजे. ती ही की गोरक्षणांस हिंदूंनी दिलेले धार्मिक स्वरूप कितीही भाबडेपणाचे असले तरी दुष्टपणाचे नाही. कारण मनुष्यास अत्युपयोगि अशा गायीबैलांसारख्या पशूंचे रक्षण करण्याचाच, म्हणजे मानव हिताचाच, त्यात हेतू असतो. पण ज्या कित्येक अहिंदूंचा 'धर्मच मुळी गोघ्न' आहे, त्यांचे ते धार्मिक वेडेपण नुसते भाबडेच नसून दुष्टही आहे त्यांना हिंदूंस हसण्याचा लवलेश अधिकार नाही. उलट हिंदूंनी स्वतःच्या धार्मिक भाबडेपणास सोडणे हे जितके आवश्य, त्याहूनही देवास गायच मारली तर आवडते, अमक्या दिवशी गायीचेच मांस खाणे पवित्र इत्यादि राक्षसी विश्वास उराशी बाळगणा-या अहिंदूंच्या धार्मिक दुष्टपणास त्यांनी सोडून देणे अधिक आवश्यक आहे, माणुसकीचे आहे. आर्थिक दृष्टीनेही जी गाय मनुष्यास

उपयुक्त आहे, त्या शेकडो गायींची कत्तल देवाच्या नावे करणे, ते धार्मिक कर्तव्य समजणे, म्हणजे देवासच राक्षस बनविणे आहे ! हिंदूंच्या गोभक्तीत कृतज्ञता, दया, जीवैक्यबुद्धी प्रभृती सद्-गुणांचा अतिरेक आहे. पण अशा गोघ्न अहिंदूंच्या गोहत्येत क्रुरपणा, कृतघ्नपणा आणि आसुरी जीवनहत्या प्रभृती दुर्गुणांचा अतिरेक आहे तो धार्मिक खुळेपणाच नव्हे, पण अपधार्मिक दुष्टपणाही आहे. ह्यास्तव त्या अहिंदूंनीही तो धार्मिक ‘गोद्वेष’ सोडून देऊन आर्थिक दृष्टीचे गोरक्षण हेच कर्तव्य समजावे.

*महाराष्ट्र शारदा, एप्रिल १९३५*

३ . पोथीनिष्ठेची बाधा

मौलवी विचारतातः 'दूरध्वनी (टेलीफोन) सैतानाचा शोध आहे की देवाचा? '

ह्या महत्वाच्या प्रश्नाने मध्यअरबमध्ये अलीकडे जी मोठी खळबळ उडवून दिली, तीवरूनही धार्मिक छापाचे पुरातन शब्दनिष्ठ अज्ञान, भौतिक अद्ययावत विज्ञानाच्या मार्गात पदोपदी कसे आडवे येते, मनुष्याची बुद्धिहत्या कशी करते हे स्पष्ट होईल. त्यातही हिंदूंस धर्मभोळे काफर म्हणून हिणनिणा-या मुल्लामौलवींचाच तो अस्सल अरबी धर्मवेडेपणा असल्याने दो शब्दनिष्ठ जुनाटाचा पूजक तो तो हिंदू एसो, मुसलमान असो, कसा अडाणी असतो, ते पाहण्यासारखे आहे! तो प्रश्न असा उठला.

इब्-नसाऊदचे राज्य अरबस्थानच्या मध्यप्रदेशावर युरोपियन राष्ट्रांच्याच महायुद्धातील कारस्थानांच्या साहाय्याने स्थापले गेल्याने त्याच्या राजवटीवर युरोपियन सुधारणांचा थोडा परिणाम झालेला आहे. त्या सुधारणांपैकी दूरध्वनीची (टेलिफोन) सुधारणा त्याने मध्यअरबात जेव्हा प्रथम चालू केली तेव्हा ते विक्षिप्त यंत्र पाहून तेथील 'कुराणा' वर ईश्वरीय धर्मग्रंथ म्हणून अत्यंत कट्टरपणे अवलंबणा-या शब्दनिष्ठ मुल्लामौलवींनी मोठा कोलाहल केला ! कुराणात उल्लेखिलेले जे नाही ते ते सैतानी ही त्यांची व्याख्याच असल्याने कुराणात ज्याचा मागमूस नाही, मक्केला बोलावे ते, एका खोलीत बोलावे तसे, मदिनेला जे ऐकिवते असे हे विक्षिप्त धूरध्वनी-यंत्र पाहताच त्या मुल्लामौलवींनी तत्काळ निर्णयिले की, " हे यंत्र सैतानी आहे ; कारण ते कुराणात उल्लेखिलेले नाही ! कोणत्याही 'दीनदार' मुसलमानाने या यंत्रास स्पर्शता कामा नये. दूरध्वनी वापरणे हा मुसलमानी धर्माविरूद्ध 'गुन्हा' आहे !"

मोठ्या कडाक्याच्या वादानंतर इब्-नसाऊदच्या धर्मसभेत असे ठरले की, ह्या यंत्राच्या कर्णात प्रथम कुराणाचे पवित्र मंत्र बोलावे, म्हणजे सा-याच वादाचा समाधानकारक निकाल लागेल. कारण जर हे यंत्र सैतानाची युक्ती असेल, गुन्हा असेल, तर त्यातून पवित्र कुराणाचा मंत्र कधीही आरपार जाणार नाही ! सैतान पवित्र कुराणाचा फैलाव कसा करील ? पण जर कुराणाची पवित्र वाक्ये ते यंत्र जसेच्या तसे बोलले, तर अर्थातच ते यंत्र मसलमानी मताचे असले पाहिजे, 'पाक' असले पाहिजे ! ज्या परमज्ञानी धर्मनिष्ठ डोक्यातून ही शक्कल निघाली तिची वाहवा करीत ते अडाणी मुसलमान अरब त्या यंत्रा भोवती समारंभाने जमले. मौलवीने त्या दूरध्वनीच्या कर्ण्यात भीतियुक्त कापरेपणाने कुराणाचा मंत्र उच्चारला. तो कोण आश्चर्य ! सुदूर, घोडटपालही एका दिवसात पोचू नये अशा सुदूर स्थानी बोलता बोलता बोललेले ऐकू जाऊ लागले! कुराणाचा शब्द एकीकडे बोलला जातो तोच अगदी तसाच दुसरीकडे ऐकू येत चालला ! अर्थातच जो दूरध्वनी कोण्याही मौलवीइतक्याच शुद्ध स्वरात पवित्र कुराण म्हणू शकतो तेव्हा अल्लाला तो प्रिय असलाच पाहिजे, दीनदार मुसलमानांनी त्यास स्पर्शिण्यास 'गुन्हा' नाही, असे सर्वानुमते ठरले ! प्रश्न एकपट मूर्खपणाचा, तर समाधान दसपट मूर्खपणाचे!

कारण की, दूरध्वनी हा पदार्थ काय आहे हेही अजून माहिती मसलेले, ते यंत्र सैतानी पक्षाचे वा कुराणशरीफच्या मताचे आहे अशी कुशाग्र शंका काढू शकणारे आणि त्या यंत्रातून पवित्र कुराणाचे मंत्र

आरपार जाताच त्या शास्त्रोक्त संकेची सशास्त्र निवृत्ती करून घेणारे ते मुल्लामौलवी सगळेच सगळे इतके नि इतकेच काय ते शहाणे नि समंजस होते म्हणून बरे झाले! जर का त्यात एखादा इतका प्रचंड शहाणा नसता तर तो 'पवित्र कुराणा' वर कडक टीका करणारा 'दयानंद स्वामींच्या 'सत्यार्थप्रकाशा' तील 'कुराणसमीक्षण' हा अध्यायही त्या यंत्रातून तसाच यथावत् ऐकू जातो की नाही तेही पाहावे' म्हणूनही सुचविता ! आणि सारेच ऑफस होऊन जाते ! !

## १.४ आता ही पाहा ख्रिश्चन धर्मभोळेपणाची गंमत !

धर्मभोळेपणाची हकालपट्टी आज जर कुठे प्रत्यक्ष व्यवहारात झाली असेल तर ती त्यातल्या त्यात युरोपात होय. धर्मभोळ्या घरभरणीवाचून घरे, नरबळीवाचून पूल, बायबलातील जपजाप्यावाचून विवाह, मुहूर्तावाचून प्रयाणे, पुजेवाचून तोफा, शांतिपाठावाचून सुखप्रसूती, प्रत्यक्ष ऐहिक असे जे जे व्यवाहार ते ते ऐहिक विज्ञानाच्याच प्रयोगसिद्ध सूत्रांप्रमाणे त्यात धार्मिक, शब्दनिष्ठ गडबडगुंडा मुळीच चालू न देता युरोपात बहुधा प्रचलू लागले आहेत. विज्ञानयुगात शब्दनिष्ठेला वावच नाही. आमच्या ग्रंथात आहे म्हणूनच अमुक खरे हे बोलणेच बंद. प्रयोगात प्रत्यक्षसिद्ध तेच टिकणार, पटणार. पण 'धर्म' म्हणजे शब्दनिष्ठा ! त्या अर्थी जो धर्म त्याच्या अर्थातच अशा विज्ञानाशी, तपनाशी तमाचे साहचर्य केवळ अशक्यच असणार !

एकंदर युरोपात जरी हे विज्ञानयुग नि बुद्धिनिष्ठा बळावलेली आहे, तरी त्यातही मागासलेले असे स्पेन, पोर्तुगाल, बाल्-कन प्रभृती काही भाग हे पूर्वी ख्रिश्चन शब्दनिष्ठेच्या सावटाखाली युरोप असता त्यांचीही किती भाबडी वृत्ती असे ते आजच्या जगास दाखविणारे एक 'प्रदर्शक'च (exhibit) आहेत. त्यात धर्मभोळेपणाच्या गमती अजूनही घडताता. त्यांपैकीच ही पाहा एक गंमत.

पाईरिनीज पर्वताच्या भागावर एक व्हिला नामक पहाडी गाव आहे. स्पेन सरकारने या दूरवरच्या भागातही टेलिफोन यंत्र चालू करावयाचे ठरविले. त्या पहाडी गावक-यांत त्या दूरध्वनी यंत्राचे वर्णन वाचून इतके आश्चर्य आधीच वाटत होते की, ज्या दिवशी ते दूरध्वनी यंत्र चालू होणार म्हणून प्रसिद्धिले होते तो दिवस सार्वजनिक सणासारखा गावक-यांनी पाळला. इतक्यात, मध्यअरब मुसलमान मुल्लामौलवींनी काढला तितका धर्मवेडा जरी नसला तरी, तोफ उडविण्याआधी पूजा करणा-या आपणा हिंदूइतक्या धर्मभोळेपणाचा प्रश्न तरी धर्मोपाध्यायांनी उपस्थित केलाच! मुसलमानांनी म्हटले, 'ते यंत्र दैवी कुराणात नाही, अर्थात ते सैतान असलेच पाहिजे!' ते यंत्र बायबलातही नाही; पण ख्रिस्ती लोक त्या मुसलमानांहून अधिकसुधारलेले नि विवेकशील; त्यांनी त्याला सैतानी म्हणून धडाक्यासरशी शिवीच न हासडता सामोपचाराने ख्रिस्ती धर्माची दीक्षा देण्याचे ठरविले. गावक-यांची मिरवणूक निघाली. सगळ्यांच्या पुढे पाद्रीमहाशय धर्माध्यक्षाच्या अधिकृत वेशात क्रुस उंच उभारून चालले होते! यंत्रापाशी येताच कोणाही ख्रिस्त्याचे धार्मिक तोंड त्या यंत्रास लागून अशुद्ध होऊ नये , म्हणून त्या यंत्रास ख्रिस्तविधीप्रमाणे 'पवित्र' करण्यात आले. त्यावर बाप्तिस्मासारखे मंत्रित पाणी शिंपडून बायबलातील लॅटिन मंत्र पढले गेले. नंतर त्या मंत्रास त्या यंत्राच्या कानात उच्चारले.

त्यासरशी दुस-या बाजूने थेट मॉद्रिद राजधानीत ते यंत्र ते लॅटिन ख्रिस्ती मंत्र जसेच्या तसे बोलू लागले! त्या ख्रिश्चन संस्कारांनी पवित्रिल्यानंतर मग या यंत्रास स्पर्शण्याची धार्मिक अनुज्ञा ख्रिश्चनांस देण्यात आली !

बिचारे यंत्र ! मध्यअरबात ते मुसलमानी ठरते, स्पेनात ख्रिस्ती, रशियात नास्तिक— Godless ! ! जो त्यातून जे बोलेल ते त्याचे मत, तो त्या यंत्राचा धर्म !

सामान्यतः मनुष्यही अशा या शब्दनिष्ठ धर्मप्रकरणी असेच एक 'दूरध्वनी' यंत्र नाही काय? शब्दप्रामाण्य हेच जिथे धर्मनिर्णयाचे साधन तिथे लहानपणी एकाच्या कानात 'कुराण हाच धर्म' हे गुणगुणले की तो मुसलमान, 'बायबल हाच धर्म' हे पढविले की तो जन्माचा ख्रिस्ती! कुराण खरे की बायबल की वेद हे त्याला स्वतः तोलून पाहायची सोयच नाही!

म्हणूनच ज्या मनुष्याला धर्माचे नुसते एक दूरध्वनी-यंत्र बनायचे नसेल, माणूस म्हणून स्वतःचे बुद्धिनिष्ठ मत हवे असेल, त्याने शब्दनिष्ठेला उच्छेदून वेदअवेस्ता, बायबल-कुराण हे सारे आदरणीय नि अभ्यसनीय पण निव्वळ मनुष्यकृत ग्रंथ आहेत असे ठाम मत ठरवून त्यांस इतर कोणत्याही मनुष्यकृत ग्रंथाप्रमाणे सादर अभ्यासावे. त्यांच्यात जे जिथे आजच्या विज्ञानाच्या कसोटीस उतरेल ते तेथून घ्यावे; जे आज मनुष्यहितसाधक ते आचरावे; जे अनुभवांती आज टाकाऊ, अडाणी, बुद्धिशून्य ठरते ते साफ सोडावे.

विज्ञानालाही आज सृष्टीची भौतिक नि आत्मिक अशी अनेक गौप्ये कळणार नाहीत, कोडी सुटणार नाहीत. पण विज्ञान 'ती तशी आज मला सुटत नाहीत, कळत नाहीत' म्हणून निःसंकोचपणे सांगते. ती सोडविण्याच्या प्रयोगात प्रत्यक्ष सिद्धी म्ळेतो त्याच्याविषयीची त्याची कल्पना एक उपपत्ती, एक कर्क, एक सूचना म्हणूनच काय ती पुढे माडील; पण काही न कळता ईश्वराने सहा दिवसांत जग रचले नि सातव्या दिवशी रविवारी सुटी घेतली म्हणून रविवार पवित्र, असल्या काहीच्या बाहीच गोष्टी सिद्धान्त म्हणून प्रत्यक्ष ईश्वराच्या नावे सांगून वर एक शापही देऊन ठेवणार नाही की, जो माझे अमक्यातमक्या ईशप्रेषिताचे (प्रॉफेट-पैगंबर अवताराचे) हे देवदत्त अमके पुस्तक शब्दन्-शब्द खरा मानणार नाही त्या काफराचे ह्या लोकी डोके फोडा नि परलोकी नरकात ढकला!

## १.५ रजपूत जातिधर्माच्या नावे जाटांची डोकी फोडतात*!*

विवेकालाच पाप ठरविणारी 'शब्दनिष्ठा' मनुष्याला किती धर्मांध बनविते, धर्माचा छाप पडलेल्या दुष्ट आचारासही कशी सोडीत नाही, याचे हे आणखी एक उदाहरण पाहा, पोथीजात जातिभेदाचा हा प्रताप ऐका! जयपूर राज्यात खुडी नावाचे एक छोटेसे गाव आहे. गेल्या २८ मार्चला तिथे जाटांच्या एका वरातीची मिरवणूक निघाली. पण त्या मिरवणूकीत तो जाट घोड्यावर बसला होता. हे पाहताच रजपूत लोक खवळले! कारण पोथीजात जातिभेदाच्या कोष्टकाप्रमाणे जाटांना

रजपूत हीनतर जाती मानतो. जाटांना घोड्यावर बसण्याचा अधिकार नाही. घोडा हे केवळ क्षत्रियांचे, रजपुतांचे वाहन!

वास्तविक प्रत्यक्ष गुणावरून पाहता पंजाबपासून काशीपर्यंत जाट जाती रजपुतांसारखीच झुंजार ठरलेली आहे. शिखांतील शूरांतील शूर वीर जाट आहेत, होते. रजपुतांच्या सैन्यांना मोठमोठ्या लढायांत जाट घोडेस्वारांनी आपल्या टाचांखाली तुडवुले आहे. अनेक संस्थानेच नव्हेत, भरतपूरच्या सूरजमल जाटासारख्या जाटांनी राज्ये स्थापली. घोड्यावरच काय, पण पराक्रमाने जिंकलेल्या राजगादीवर ते बसलेले आहेत!

पण पराक्रमाने क्षत्रिय ठरतच नाही, पोथीने ठरतो! मुर्दाड जरी असला तरी रजपुतच क्षत्रिय; मर्द जाटाहून तो पराकमी मानलाच पाहिजे! घोड्यावर बसणार तो मुर्दाड, हा मर्द नव्हे. कारण तसेच पोथीत लिहिले आहे!

...तेव्हा तो जाट घोड्यावर बसलेला पाहून रजपूत खवळले! त्यांनी त्या जाटाची वरात वेढून त्या सा-यांस बेदम मार दिला. रजपुतांच्या सिंहासनास छिनून त्यावर मुसलमान बसले, इंग्रज बसले, त्याचा त्या शूर क्षत्रिय रजपुतांस कधीही आला नाही इतका राग त्याच्याच पैशाने त्यानेच खरेदिलेल्या त्याच्या घोड्यावर बसणा-या त्या स्वधर्मीय हिंदू जाटाचा आला! कुठे कुठे तर जाट रजपुतांसमोर खाटेवरही बसू शकत नाहीत! आणि हा जाट घोड्यावर बसतो काय बेटा! रजपुतांनी लाठी चालविली—इतकी क्रुरपणे की, लग्नासाठी जमलेल्या जाटांच्या त्या वरातीत एक ठार नि चाळीस घायाळ झाले!

ब्राह्मणांनी जातिभेदाच्या नावाने क्षत्रियांस हीन ठरविण्याची लुच्चेगिरी केली म्हणून सात्विक संतापाने ब्राह्मणांस शिव्या हासडणा-या क्षत्रियांनी याच जातिभेदाच्या नावे हीनतर ठरलेल्या जाटांस लाठ्यांनी झोडपून काढले! !

काय म्हणता! ! बिचारे जाट? क्षत्रिय किती अत्याचारी? थोडे थांबा, नि हे खालील ताजे वृत्त वाचा.

*रजपुतांनी ज्या सूत्रान्वये जाटांस छळले म्हणून जाटांनी निषेध केला,*

*त्याच सूत्रान्वये जाट अस्पृशांस छळतात ! !*

लाहोरहून एप्रिल २७ ला लाला मोहनलाल, कोर्यवाह हरिजन सोवक संघ प्रतिवेदितात (reports) की, रोहटक भागातील चिरी नावाच्या गावी सुमारे शंभर घरांची चांभार वस्ती आहे. त्यांच्या पाण्याचे अत्यंत हाल. त्या गावी सगळ्या विहिरी मचूळ; पण ह्यांना तर विहिरच नव्हती. मोठया प्रयासाने त्यांनी जाटांपासून एक पडीक जागा मिळवून स्वतः विहिर खणण्यास आरंभिले. सुदैवाने त्याला पाणी लागले, इतकेच नव्हे तर गोडे पाणी लागले. आनंदाच्या भरात चांभारांनी सगळ्या गावात दहापांच

रूपयांचा गूळ वाटला!  तोच ‘आमच्या विहिरी मचूळ असता चांभारड्यांना गोडी विहिर असावी!’ म्हणून जो तो जाट संतापला. त्यांनी ती विहिर बळाने चांभारांपासून छिनावून घेतली नि सांगितले की, त्यांना हवे तर दुरून पाणी ओतण्यात येईल, पण जाटांच्या विहिरीस शिवून ती बीटविता येणार नाही! चांभार गयावया करू लागले की, निदान एका बाजूचा एक रहाट तरी त्यांचा म्हणून राखून ठेवावा! उत्तर ?  जाटांच्या लाठया. त्या विहिरीवर, आमच्या ब्राह्मणांच्या विहिरीवर, बसतात तशा कावळेचिमण्या बसणार, आत बेडूक! त्या सज्जनांना ‘मानव’ स्मृती वा नगरसंस्थेचे नियम लागू नसल्याने त्यांच्या लहरीप्रमाणे त्या विहिरीचा उपयोग संडास म्हणूनही त्या कावळे-चिमण्या-बेडकी करणारच!  पण विहीर त्याने बाटते असे पोथीत नाही, म्हणून ती बाटत नाही. पण माणसासारख्या माणसांनी—त्या चांभारांनी—स्वच्छ हाताने सामाजिक ओटे, जे स्पृशांनीच बांधले, त्याला न शिवता, तो वरचा रहाट जरी ओढला तरी खालचे तळाचे पाणी बाटते! कारण? पोथी तसे सांगते, धर्मरूढी तसे सांगते! की, जाट हा जन्मतःच स्पृश्य, चांभार हा जन्मतःच अस्पृश्य!  चांभाराने तो धंदा सोडून हायकोर्टीत जज्ज झाला तरी तो अस्पृश्य; जाट शेतकाम करता करता त्याच्या बैलासारखाच जरी मठ्ठ नि चिखलाची पुटे अंगावर चढलेला असला तरी तो जन्मतःच सिपृश्य, श्रेष्ठ!  पोथीजात जातिभेदाच्या कोष्टकातच तसे आहे. आणि पोथीचा शब्द अशंकनीय!  अप्रतिविधेय!

रजपूत जन्मतःच श्रेष्ठ, जाट हलका, म्हणून जाटाने घोडयावर वा खाटेवर बसताच त्याचे टाशके फोडू निघालेल्या रजपुतास जाट म्हणाले, “कोण अत्याचार! ज्या रजपुताला गाढवदेखील मिळेना बसायला त्याने स्वतःच्या दुर्दैवाने रडावे; पण मी जाट, माझ्या स्वतःच्या पैशाने घोडा घेऊन त्यावर स्वारी भरताच त्याला हरकत करणारा हा कोण अरेराव?  काय ह्या ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्यादिक ऊच्च वर्णाची ही दंडेली!  म्हणे पोथी!  जाळून टाका ती!”  तेच जाट त्याच पोथीचे तेच सूत्र दाखवून अस्पृश्य पाणी भरायला येताच ‘तू जन्मतःच अस्पृश्य! कुत्र्याकावळ्याहून ओवळा! विहिरीस शिवलास तर मुडदा पाडीन!’ म्हणून अस्पृश्यांवर धावतात!

काय म्हणता?  बिचारे अस्पृश्य? थांबा. प्रथम हे वाचा.

*‘ब्राह्मणाने माझ्याबरोबर जेवावे पण मी भंग्याबरोबर जेवणार नाही!’*

*–महार- चांभार म्हणतो !*

ज्या चांभारांना अस्पृश्य म्हणून जाटांनी पाणी शिवू दिले नाही तेच चांभार भंग्याचे पाणी घेत नाहीत! सहभोजनांच्या पंगतीत चांभार हा ब्राह्मणमराठयांबरोबर अगदी माणुसकीचा वैदान्तिक अधिकार सांगून जेवावयास बसतो. इतक्यात भंगी त्याच पंगतीत बसू लागले तर ताडकन उठून जातो! माणूसकीचा, समानतेचा सारा वेदान्त चुलीत कोंबून ओरडून उठतो, ‘आम्ही चांभार! राजवंशी! ह्या भंग्यास जीव गेला तरी शिवणार नाही!  मग जेवण कुठले! मळखाऊ नीच जात ती!’ रत्नागिरीस जात्युच्छेदक चळवळीच्या प्रारंभी चांभार महारांबरोबर नि महार भंग्यांबरोबर जेवायचे साफ नाकारून ‘ब्राह्मणांच्या पंगतीत बसू हवे तर. महार-भंग्यांच्या पंगतीस ब्राह्मण बसले तरी आम्ही बसणार नाही!’ असे जळफळत उठून जात! आता हे खरे की, आजकाल त्यांच्यातही ती जात्युच्छेडक चळवळ दृढमूल

झाल्यामुळे सहभोजनात काय, संव्यवहारात काय रत्नागिरीस तेही सारे सरमिसळ भाग घेतात. अखिल हिंदू उपहारगृहात ब्राह्मण-मराठा जसा भंग्याबरोबर चैनीत चहा पिताना दिसतो, तसेच शेकडो चांभार-महारही आपसांत नि भंग्यात म्सळून शेव-चिवडा, पुरीभाजी निःसंकोचपणे नि 'जातपात सब झूट है' याच विषयावर समर्थक व्याख्याने झोडीत खातपीत बसलेले आढळतात. पण ते ती रूढ धर्माची पोथी, ती शब्दनिष्ठा, ते जातीपातीचे पोथीजात कोष्टक पायाखाली तुडविल्यानंतर! चार-पाच वर्षांच्या आटोकाट नि सक्रिय प्रचारानंतर! अर्थात पोथीजात जातिभेदामुळे उच्च जाती नीच जातीवर जे अत्याचार करतात त्याचा दोष सा-या जातींकडे, ते पाप सा-या जातींचे, ते खापर ब्राह्मणांपासून भंग्यांपर्यंत सा-यांच्या माथ्यावर फोडले पाहिजे; केवळ ब्राह्मण-क्षत्रियांवरच नव्हे! हा पोथीजात जातिभेद भंग्यांनासुद्धा डोंबावर उच्च जातिमत्ता गाजवायला वाव मिळे म्हणून त्या त्या प्रमाणात सा-यांना हवासाच वाटला; म्हणून तो टिकला, टिकत आहे. तो आजही कारण नसता टिकविण्याचा दोष सा-यांचा, असे आजही प्रत्यही घडणा-या या वरीलसारख्या घटनांवरून सिद्धच आहे. तेव्हा उत्तम मार्ग हा की, दोष सा-यांचा, तो सुधारण्याचे उत्तरदायित्वही सा-यांचे! घर सर्वांनी मिळून बुडविले. ते होउन गेले. आता आपण सर्व हिंदूंनी मिळून ते अखिल हिंदुत्वाच्या पोलादी पायावर पुन्हा उभारावे हेच उचित!

*—मनोहर, जून १९३५*

## ४ . गोरक्षक की गायळ ?

*की समयी न वदावी तरि मग केव्हा सदुक्ति बोलावी?* — मोरोपंत

‘महाराष्ट्र शारदे’त गाय ह्या विषयावरील आमचा लेख प्रसिद्ध झाल्यामुळे त्या आमच्या लिखाणातील मुख्य विधेयांकडे हिंदू जनतेचे लक्ष, निदान महाराष्ट्राततरी, अपेक्षेहूनही तीव्रतरपणे वेधले गेले ही समाधानाची गोष्ट आहे. गोरक्षण, गोग्रास, मन्वंतर, धर्मजागृती प्रभृती कित्येक वृत्तपत्रांतून त्या लेखाची अनुकूल-प्रतिकूल चर्चा अद्याप चालू आहे. इतर अनेक पत्रांतून त्या लेखाविषयीचे उल्लेख नि त्यातील उतारे आलेले आहेत. काही सभांतून नि सम्मेलनांतून त्या लेखाच्या निषेधाचे ठरावही आणण्याचा यत्न झाला, वादविवाद रंगले आणि निषेधाचा ठराव संमत झाल्याचे जरी एखादे उदाहरण घडलेसे आढळत नाही, तथापि ज्यांना तो लेख निषेधावासा वाटला, त्यांचे म्हणणे आम्हीही लक्षपूर्वक वाचले आहे, विवेचिले आहे. त्याविना आमच्याकडे गोरक्षणकार्यी ज्यांनी अभिनंदनीय राष्ट्रसेवा केली त्यांची आणि इतर ठळक ठळक अशा विचारकी गृहस्थांची पत्रेही बरीच आली. या लेखाची भाषांतरे हिंदुस्थानातील इतर भाषांत होत आहेत. ती अनुकूल पक्षाच्याच वतीने तेवढी होत नसून ज्या आमच्या धर्मबंधूंना तो लेख निषेधार्ह वाटतो तेही ती भाषांतरे करून, सर्वत्र वाटून अखिल भारतीय गोरक्षक संस्थांकडून त्या लेखाचा प्रकट निषेध व्हावा असे इच्छित आहेत, असे गोग्रास पत्रावरून कळते.

काहींच्या मते तर हा लेख सर्व गोभक्तांनी एका संमेलनात जमून प्रकटपणे जाळावा असे आहे. त्यांचा हा बेत अजून तडीस गेला नाही, ही खेदाची गोष्ट आहे. तो लेख नुसता वाचला जाऊन त्याचा जो प्रकाश पडला त्यापेक्षा तो लेख जाळला गेला असता त्याचा शतपट अधिक प्रकाश पडेल आणि त्या प्रकाशातच गोभक्तीचा भाबडेपणाही अधिकच उघडकीस येईल!

‘महाराष्ट्र शारदा’ मासिकात प्रसिद्धिलेल्या लेखाने एका राष्ट्रीय विचारशक्तीस त्या प्रकरणी इतकी चालना द्यावी, तो लेख इतक्या विस्तृत प्रमाणावर हजारो लोकांकडून अंक धुंडाळून वाचला जावा, विवेचिला जावा आणि कोणास प्रशंसार्ह तर कोणास निषेधार्ह वाटला असला तरी उपेक्षणीय असा कोणासही वाटला जाऊ नये, ही आनंदाची गोष्ट आहे.

आता या झालेल्या चर्चेत काही आक्षेप असे आहेत की, जे गैरसमज झाला म्हणून केले गेले आणि काही गैरसमज व्हावा म्हणून केलेले आहेत. पैकी पहिल्या वर्गाच्या आक्षेपांचा निरास, तो गैरसमज दूर करण्याचा यत्न केल्यास, होण्यासारखा आहे. आणि दुसऱ्या वर्गाच्या आक्षेपकांना स्वतःचे समाधान जरी करता आले नाही—कारण तसे समाधान करून घ्यायचे नाही म्हणूनच त्यांनी काहीतरी आक्षेप आणलेले आहेत—तरीही त्यांच्या त्या आक्षेपांचा फोलपणा दाखविला असता इतरांचे झालेले गैरसमज दूर होण्याचा संभव आहे. यास्तव या दोन्ही वर्गांपैकी निवडक अशा दोघा-तिघा टीकाकारांच्या लेखांस थोडक्यात प्रत्युत्तर देऊ.

अगदी आरंभीच प्रामाणिक गोरक्षक कार्यकर्त्यांत अग्रगण्य असलेले, ज्यांनी गोरक्षणाच्या दिशेने पुष्कळ राष्ट्रसेवा केली आहे आणि ज्यांनी गाईची सुधारणा करून गोधन हे राष्ट्रास या लोकीदेखथील अधिक उपयोगी होईल अशा वैज्ञानिक उपायांसही अवलंविण्यास कमी केले नाही, त्या साधुशील श्री. चौंडेमहाराजांच्या टीकेस विचारात घेऊ. खरे पाहिले असता त्या बिचाऱ्या प्रामाणिक कार्यकर्त्याने उगीच वाह्यात वा शिवराळ टीका अशी केलीच नाही. वेडेपणास शहाणपणा ठरविण्याचा कोणताही उपद्-व्याप न करता त्या भाविक मनाच्या गोभक्ताने थोडे रागावून, पण सरळपणे स्वतःचे हृद्-गत तेवढे दहा-पाच वाक्यांतच सांगून टाकले. त्यांचा भावार्थ असा की, आमची गाईविषयीची ही देवतेची भावना, वेडी म्हणा, शहाणी म्हणा, आम्हाला आपली आवडते, आनंदविते. तेव्हा आमच्यापुरती आमची इच्छा इतकीच की, 'असेच आम्ही वेडे असावे!' या वाक्याचाच त्यांनी त्यांच्या छोटयाशा लेखास मथळाच दिला आहे. लेखाच्या शेवटीही ते पुन्हा म्हणतात की, " हा गाईचे गोमूत्र नि गोमय ह्यांच्या सेवनाने स्वतःचा देह पवित्र होतो असे मानण्याचा वेडेपणा आम्हास जन्मोजन्मी लाभावा! आम्ही सदैव असेच वेडे असावे! ! "

तथास्तु! 'यो यत्-श्रद्धः स एव सः! !' या एकाच वाक्यात आम्हीही पण त्यांच्या इच्छेस त्यांच्या व्यक्तीपुरता पाठिंबा देऊन त्यांचा निरोप घेतो.

प्रत्युत्तरासाठी दुसराच लेख जो आम्ही निवडला आहे, तो त्यातील युक्तिवादाच्या महत्वाने निवडण्यास तितकासा योग्य आहे म्हणून नव्हे; त्याचा लेखक चौंडेमहाराजांसारखा धार्मिक दृष्टीने गोरक्षणकार्य असे स्वतः थोडेफारदेखील करीत आहे म्हणूनही नव्हे; परंतु वास्तविकपणे त्या लेखापेक्षा, इतर काही टीकालेखांतच विचार करण्यासारखी नि उत्तर देण्यासारखी काही विधेये असताही सविस्तर उत्तर देण्याचा अग्रमान हेयाच लेखास जो आम्ही देत आहो, तो त्या लेखकाचे सांगोपांग नाव, जे त्या लेखावर गोरक्षण मासिकात छापलेले आहे, ते 'लेखकः समाजशास्त्रज्ञ श्री गो.म.जोशी, बी. ए. (ऑनर्स)' असे असल्यामुळे आणि त्या सांगोपांग नावातील 'समाजशास्त्रज्ञ बी. ए. (ऑनर्स)' या दोन पदव्यांची दया आल्यामुळेच काय ते होय! उत्तर देण्याइतकेही तथ्य ज्यात नाही असे लेख 'समाजशास्त्रज्ञ बी. ए. (ऑनर्स)' हेही लिहू शकतात असा भलताच समज या एका तुच्छ अपवादाने, सामान्य वाचकांचा न व्हावा, यास्तव त्या पदव्यांच्या नावाखाली लिहिलेल्या लेखास अगदीच उत्तर न देणे बरे नव्हे.

चौंडेबुवांसारख्या भाविकाने 'गोभक्ती वेडेपणा असला तरी आम्हाला आपला तोच आवडतो', असे गोभक्तास शोभेशा सरळपणे सांगून टाकले. पण 'असला वेडेपणा हाच शहाणपणा होय' असे सांगण्यास पुढे सरसावले आहेत 'समाजशास्त्रज्ञ श्री गो.म.जोशी, बी. ए. (ऑनर्स)' !

'हरि ओम' म्हटल्यावाचून भाविक सनातनी कोणताही वेदपाठ वा शास्त्रपाठ जसा सहसा म्हणत नाहीत, तसाच कुठल्यातरी पाश्चिमात्य—युरोपियन, विशेषतः इंग्लिश—ग्रंथातला कोणाचा लागू-बिनलागू उतारा दिल्यावाचून श्री जोशी कोणत्याही लेखास, लेखकांस, लेखच्छेदकास आरंभीत नाहीत. कोणत्याही विधेयकास पूर्वी वेदवाक्याचा आधार देऊन 'इति श्रुतिः' म्हटले की ते विधेय

जवळ जवळ सिद्धच झाले अशी आपल्या प्राचीन सनातनी ग्रंथकारांची निश्चिती असे. पण जोशीबुवांकारख्या अर्वाचीन सनातनीब्रुव ग्रंथकाराचा असा एक समज झालेला दिसतो की, कोणत्याही विधेयास कुठल्या तरी एका इंग्लिश ग्रंथातील आधार दिला नि ‘इति अमुक साहेब’ असे म्हटले की, लगेच ते विधेय विवादाच्या कक्षेबाहेर जेऊन स्वयंसिद्धत्वाच्या—axiomatic truth च्या—पदवीस पोहोचते. ‘धर्मजिज्ञास्यमानानां प्रमाणं परम श्रुतिः’ असा पूर्वीचा समज. ‘वेदोक्त’ हे पूर्वीचार्यांचे परमप्रमाण, तसे या अर्वाचार्यांचे परमप्रमाण म्हणजे ‘साहेबोक्त’!

सनातन परंपरेच्या शास्त्रांचा ‘न वदेत् यावनीं भाषां प्राणैः कंठगैतरपि’ हा बाणा; आर्यांनी म्लेंच्छ भाषा बोलू नये, ही शास्त्राची आज्ञा; सनातनीपणाची प्रतिज्ञा; पण येता जाता मनुभगवान म्हणतात ते खरे कां, ह्यासह अमुक साहेब तसेच म्हणतो म्हणून, असे सांगताना एकसारखा म्लेंच्छवाक्याचा आधार वेदवाक्यांनासुद्धा बहुधा देत सुटणाऱ्या श्री जोश्यांना स्वतःस सनातनी म्हणवून घेता येते ! ‘वचनात्प्रवृत्तिः वचनान्निवृत्तिः’ म्हणून गर्जणारे, शास्त्रातील ह्या वचनास मात्र धाब्यावर बसवून श्री जोश्यांच्या ‘साहेबोक्त’ची व्याख्याने प्रत्यक्ष शंकराचार्यांच्याही अध्यक्षतेखाली करविण्यात सनातनपणच समजतात!

आमच्या ‘गाय’ लेखावर जो त्यांनी उलट लेख गोरक्षणात दिला आहे, त्याच्या आरंभीही त्यांनी एका युरोपीय ग्रंथकाराचे इंग्लिश वाक्य असेच ठोकून दिले आहे. ते वाक्य असेः ‘Perhaps Asia was profounder than Europe for it kept at arm’s length this science that seems to kill whatever it touches!’— The meaning of Life by William Durunt. हे वाक्य लिहितांना डयुरंटसाहेब पेंगत असले पाहिजेत. काय म्हणे ‘जे विज्ञान, जे जे स्पर्शते ते मारते, त्या विज्ञानास हाताच्या अंतरावर दूर ठेवण्यात आशियाने मोठा शहाणपणा केला!’ ज्या विज्ञानाने देवी, प्लेग, कॉलरा, क्षय ह्यांचे जंतू शोधून त्यावर जवळ जवळ रामबाण औषधे नि लसींचे उपाय काढून ‘क्ष’ किरणे, क्लोरोफॉर्म, कृत्रिम श्वास प्रभृती अनेक साधने प्रकल्पून, उपयोजून मृत्यूच्या तावडीतून लक्षावधी जीवांस सोडविले; प्रसववेदनेसारख्या वेदनांपासून स्त्रीची सुटका ज्याने केली; आगनाव, आगगाटी, तार, विनतार, विमाने ह्यांही समुद्र – भूमी – नभ यांजवरील मनुष्याची शक्ती अमोघ करीत मृत्युचे प्रांतच्या प्रांत त्याच्या हातून सोडवून मानवी साम्राज्यास जोडले; क्वेट्टासारख्या ठिकाणी भूकंप होताच साऱ्या मनुष्यजातीचे साहाय्य एका दिवसाच्या आत तिथे एकवटता येऊन ढिगाखालची शेकडो माणसे मरता मरता वाचविता येऊ लागली; ते ैविक्षीन म्हणे जे जे स्पर्शते ते ते मारतेसे दिसते! लाक्षणिक वा शब्दशः कोणत्याही अर्थी असे एकांगी विधान करणारा आणि ते एखाद्या परमप्रमाणासारखे आधार म्हणून लेखावर देणारा, हे दोघे कोणीही असले तरी त्यायोगे त्या विधानातील झिंगलेला बेतालपणा सावरला जाणार नाही. जुने ‘इति वेदोक्त’ हा जसा ्नुलंघ्य पुरावा नव्हे, तसेच ह्या नव्या ‘साहेबोक्त’ लाही ते साहेबोक्त आहे येवढयासाठी भीक घालण्याचे कारण नाही. पुन्हा एक कोणी साहेब विज्ञानास हिणविणारे असले, तर शतावधी वैज्ञानिक—नव्हे, जवळ जवळ आजचा सारा युरोप—विज्ञानाचा पुजारी नि पुरोहित आहे! अतकेच काय, पण वेळी अवेळी उगीच पाचपन्नास रसायन, गणित, गर्भ, समाज, अर्थ, अनुवंश प्रभृती विज्ञानांची नावे धेऊन वेदांचेदेखील समर्थन विज्ञानाने करऊ पाहण्याची खोड जर कोणास लागली असेल, तर ती या वाक्यास अनुसरून

विज्ञान कुचकामी आहे असे भासविणाऱ्या या 'समाजशास्त्रज्ञ श्री गो.म.जोशी, बी. ए. (ऑनर्स)' ह्यांनाच होय!

दुसरी गंमत ही की, डयुरंटसाहेबाच्या या विज्ञानाविषयीच्या मताचा हाया गायीच्या लेखाशी काय संबंध? विज्ञानाविषयी डयुरंट जरी असे म्हणाले, तरी गाईचे मलमूत्र खाण्याने 'यत्वगस्थिगतं पापं देहे तिष्ठति मामके। प्राशनात्पंचगव्यस्य दहत्याग्निरिवेंधनम्' हा मंत्र म्हणत ते पशूचे मलमूत्र खातात, पितात काय? का जर्मन रणतरींच्या दाराशी शत्रुने बांधलेली गाय मरेल म्हणून शत्रुच्या रणतरीवर तोफा न डागता ते जर्मन सैन्याला इंग्लंडच्या किनाऱ्यावर बेखटक उतरू देत आहेत? का गाईची पूजा केल्याने परलोकी मोक्ष म्ळतो, म्हणून विश्वासत आहेत? अशा अर्थी डयुरंटचे एखादे वाक्य या लेखावर उतरून घेतले असते तर जोशीबुवांना असंबद्धता म्हणजे काय हे कळते इतके तरी दिसून येते! गाईला देवता मानून जे वेडेचार चालू आहेत त्यांच्या समर्थनार्थ जोशीबुवांनी ड्युरंटचे हे विज्ञानविषयक वाक्य न देता कोणत्या तरी इंग्लिश वाक्यावाचून लेखाचा 'हरिःओम् ' होतच नाही योवढ्यासाठी ज्योतिषशास्त्रातले 'सूर्याभोवती पृथ्वी फिरते नि चंद्र हा उपग्रह आहे ' आसे वाक्य त्या लेखावर दिले आसते तरी काम भागतेच की!

तिसरी गंमत अशी की, जर गाईला इहपरलोकी मोक्ष देणारी देवता मानण्याच्या समर्थनार्थ हे वाक्य ड्युरंटने लिहिले नि जोशीमहाशयांनीलेखावर आधार म्हणून दिले असेल, तर आमच्या कोणत्याही कोटिक्रमाप्रमाणे प्रमाणशीर तर नव्हेच पण गोभक्तीचा अत्यंत अत्याचारी निषेधसुद्धा त्याच वाक्याने होत आहे. हे एखाद्या नवशिक्या लेखकाच्यादेखील ध्यानात आले असते! पण हे पडले 'समाजशास्त्रज्ञ श्री गो.म.जोशी, बी. ए. (ऑनर्स).'

त्यांच्या झिंगलेल्या उत्सुकतेत त्यांस एवढे कळले की ड्युरंटच्या 'आशियाने विज्ञानास दूर ठेवले हे मोठे शहाणपणाचे केले,' या वाक्याचा संबंध आशियाच्या गाईसंबंधाच्या वर्तनाचे समर्थन करण्याशी असेल, तर ते वाक्य गोपूजेहूनही गोहत्येचेच शतपटीने अधिक समर्थन करते ! ! कारण जर आशियापैकी हिंदुस्थानने गोपूजा आजही वेडेचाराइतकी पाळली आहे, आशिया शहाणा आहे, म्हणून गोपूजेचे वेडेचार शहाणपणाचे आहेत, असा भाव श्री जोशी या वाक्याने दाखवू इच्छित असतील, तर त्याच्याच अगदी उलट असा भावही त्याच कोटिक्रम पद्धतीने त्या वाक्याने कसा समर्थिला जातो ते पाहा. कारण या आशियातच देवाच्या नावे देवास प्रसादिण्यासाठी हजारो गाईंच्या कत्तली उडविणे पुण्य असे सांगणारे धर्महीही या आशिया खंडातच भरभराटले आहेत.

ज्यू लोकांचा पैगंबरामागून पैगंबर गोपूजेस जो सारखा निंदीत आला, तो आशियातच. मोसेस पैगंबराने त्याच्या ज्यू लोकांना जेव्हा (Golden calf) सुवर्णवत्सास पूजिताना धरले तेव्हा त्याने ती मूर्तीफोडून टाकली आणि जो जगाचा अनन्य देव जेव्होव्हा त्याने आपणांस सोडून पशू पूजणाऱ्या त्या लोकांना भयंकर शाप दिले. त्या लोकांनी शेवटी गाय मारून त्या देवाला गाईचाच बळी दिला! मुसलमानी धर्माविषयी तर बोलावयास नको. प्रत्येक ईदच्या दिवशी मनुष्यास अत्यंत उपयुक्त अशा या बिचाऱ्या शेकडो गाईंचे तांडे मिरवणुका काढून सपासप कापून काढण्याच्या राक्षसी

अत्याचारानेच ‘देव’ प्रसादतो असे मानणाऱ्या ज्या लाखो मुसलमानांस आपण पाहतो ते आशियातीलच आहेत की! एवढा साधुशील जीसस पण त्यानेही गोहत्या निषेधिली नसून कोट्यावधी ख्रिस्ती कसाईखाने जगभर चालू असता त्याने एका शब्दानेही अप्रसन्नता अद्याप व्यक्तविली नाही. हे गोघातक मुसलमानी, ख्रिस्ती, ज्यू धर्म नि त्यांचे कोट्यानुकोटी अनुयायी आशियाचे. आणि हा आशिया ड्युरंट म्हणतात मोठा शहाणा (Profound) ! अर्थात त्या आशियाने चालविलेली ही गोहत्याही त्याच्या Profondity चेच, गहन अध्यात्मशीलतेचेच द्योतक होय! असाही त्या वाक्याचा अर्थ श्री जोशी यांचाच कर्कपद्धती स्वीकारता निघतो! आणि ते वाक्य जोशीबुवा गोपूजेचे समर्थन ‘इति साहेबोक्त’ म्हणून परमप्रमाणाप्रमाणे उतरून घेतात! कुठे ते भोळेभाबडे पण सरळ उत्तरणारे कार्यकर्ते लोकसेवक चौंडेबुवा आणि कुठे हे दंभावडंबरी पण वदतोव्याघाती उत्त देणारे निकामी ‘समाजशास्त्रज्ञ श्री गो.म.जोशी, बी. ए. (ऑनर्स)’ ! !

श्री जोशी यांच्या लेखावर परमप्रमाण म्हणून दिलेल्या ‘साहेबोक्ता’ ची जशी ही गयाळ व्संगती तशीच त्यांच्या साऱ्या लिखाणाची, ‘गाईला देवता वा माता उपमेपुरते म्हणणे एक वेळ चालेल, पण अक्षरशः ते सत्य मानणे नि त्या पशूची पूजा आमंत्रिणे, ही एक वेडगळपणाची चाल आहे, असे प्रतिपादणे म्हणजे हिंदू तेवढे बुद्धिमांद्य झालेले गाढव, मूर्ख, दुधखूळे इत्यादि प्रकारची कोशातली सारी विशेषणे लावून घेण्यास पात्र आहेत असेच प्रत्पादणे होय.’ असा जोश्यांचा आक्षेप. हिंदू समाजातील एक चाल वेडसरपणाची आहे असे म्हणणे आणि हिंदू समाज वेडगळच आहे असे म्हणणे, ह्यातील फरकही श्री जोशी ह्यांना कळत नाहीसे दिसते. पुण्यात विसंगत भारूड लिहिणारे ‘समाजशास्त्रज्ञ श्री गो.म.जोशी, बी. ए. (ऑनर्स)’ हे प्रत्वादी भयंकर मावाचे एक नामांकित लेखक आहेत असे म्हटले, म्हणजे पुणे हेच एक विसंगत भारूड आहे असे ठरते की काय? कोणत्याही राष्ट्रात काही चाली धर्मभोळ्या नि वेडगळ असतात, पण तेवढ्याने ते राष्ट्रच्या राष्ट्र धर्मभोळे वा वेडगळ ठरत नाही. त्या सर्वच चालीरीतींची छाननी होऊन मग त्यांचा एकंदर आढावा जसा निघेल तसे त्या राष्ट्राच्या वर्तनाचे लक्षण सांगता येईल. पुन्हा गोपूजेविषयीसुद्धा हे ध्यानात ठेवले पाहिजे की, गाईला अक्षरशः देवता न मानणारे आर्यसमाजी, ब्रह्मोसमाजी वा आमच्यासारखे शेकडो सुधारणावादी लोकही हिंदूच आहेत. हिमालयावरही काही कुजलेली डबकी आहेत, म्हणून हिमालय हाच एक कुजलेले डबके होत नाही. राजवाड्याची एक खिडकी खिळखिळी झाली आहे हे शिल्पज्ञाने दाखविल्यास, राजवाडाच खिळखिळा झाला म्हणून जर कोणी अर्धवट ओरडू लागला तर तो त्या अर्धवटाचा दोष होय, त्या शिल्पज्ञाचा नव्हे!

मालाकार चिपळूणकरांसारखे आपणही चुरचुकूत लिहावे, असा श्री जोशी यांस मोह पडलासा दिसतो. चुरचुरीतपणाचे हत्यार मालाकारांच्या शस्त्रागारातून चोरले तरी ते वापरावयास मालाकारांची भक्कम मूठ हवी! शिवाजीची तलवार शकाराने चालविली तर स्वतःचीच मान छाटली जाण्याचा संभव अधिक ! तीच दुर्दशा श्री जोशी ह्यांच्या लेखाची खालील वाक्यामुळे झाली आहे. ते लिहितात, “ गाईला माता मानणारे भाबडेदेखील तिच्या आचळास तोंड लावून पुऊ लागत नाहीत; आमच्या पुण्याकडे तरी तसे होत नाही, पण रत्नागिरीस एखादा गोभक्त असल्यास न कळे!” जोशीबुवास इतके कळेना की, रत्नागिरीस किंवा कुठेही जरी आचळास तोंड लावून जूध पुणारा गोभक्त आढळला, तरी तो

गोभक्तसंप्रदायातील ‘धेनुर्यस्य महामाता’ या गोतावळ्यातील जोशीबुवांचाच भाऊबंद असणार! तो ‘गाय केवळ एक उपयुक्त पशू, माता नव्हे, देवता तर नव्हेच नव्हे!’ या ब्रीदाचा कोणाही असणे शक्य नाही! दुसरे असे की, पुण्याकडे काय किंवा कुठेही काय, गाईला माता म्हणून आचळ तोंडाने जरी एक वेळ कोणी पिऊ लागला, तरी तेदेखील कमी ओंगळवाणे ठरविणारी एक खोड पुण्याकडच्याच नव्हे तर यच्चयावत गोभक्त संप्रदायास आहे. आईलाही नाही तो मान गाईला देऊन लिचे गोमय नि गोमूत्र आपले ‘पाप’ क्षालनार्थ ते पिताता, हेखरे काय? तो स्वाद श्री जोशीबुवांसारख्या ‘सनातन’ महाशयांनीही घेतलेला असेलच! नसल्यास त्यांनी लिहिलेल्या ह्या भरमसाट लेखाच्या पापाच्या क्षालनार्थ तरी एकदा घ्यावा!

‘माझेच ध्येय खरे असे सांगत सुटणे हा बौद्धिक उन्माद आहे ’ असे जोशीबुवा सर्वांस बजावतात. परंतु ही गोष्ट ह्यापूर्वीच सर्वांच्या प्रत्ययास स्वतः जोशीबुवांनीच आपले ते प्रचंड भारूड – ते ‘हिंदूंचे समाजरचनाशास्त्र’—ज्या दिवशी प्रसिद्धिले त्या दिवशीच आलेली आहे! यापुढे, माझेच ध्येय खरे हे सांगणारा बौद्धिक उन्माद असतो कसा? —कुणीही विचारो—त्या जोशीबुवांच्या भारूडाकडे बोट दाखविले की काम भागण्यासारखं आहे!

शेवटी मागचा पुढचा काही एक संबंध नसता एक वाक्य आठवत होते—तेही साहेबोक्त!—म्हणून कुटेतरी घुसडायचेच म्हणून जोशीबुवा म्हणतात, “Nature entertains no preferences between men and fleas!” ओणि त्याचे भाषांतर आपणच करून देतात की, “निसर्ग बॅरिस्टर नि घुंगरुटी यांच्यात फरक करीत नाही.” ज्याअर्थी men यांचे भाषांतर त्यांनी केवळ ‘बॅरिस्टर’ या शब्दाने करून मनुष्यात बॅरिस्टरांचीच काय ती गणना केली आहे, त्या अर्थी उरलेले ‘समाजशास्त्रज्ञ श्री गो.म.जोशी, बी. ए. (ऑनर्स)’ यांची गणना उरलेला वर्ण जो घुंगरुटी त्यातच ते करतात हे उघड आहे. ते ठीकही आहे.

इतर टीकाकारांपैकी काहींचे आक्षेप विचार करण्यासारखे आहेत. पुष्कळांनी विचारले आहे की, जर गाईस माता वा देवता म्हणणे चूक तर राष्ट्रास वा भूमीस माता का म्हणता? त्याचे उत्तर असे की, गाईस माता वा देवता उपमेपुरते म्हणणे आणि ते अक्षरशः सत्य मानणे यात फरक नाही काय? शिवाजीमहाराजांस पुरूषसिंह म्हणून म्हणणे, उपमेच्या आलंकारिक अर्थी म्हणणे हे आक्षेपार्ह नाहीच नाही, पण ते जर अक्षरशः सत्य मानून कुणी सिंहासारखे आयाळ, पंजे नि शेपटी असलेला असा महाराजांचा पुतळा घडवू लागला, तर ती आपण विडंबना मानू. अमेरिकेत गाईस ‘The mother of prosperity’ म्हणून काही लेखकांनी संबोधिले आहे तेही आलंकारिक अर्थी ठीकच आहे. पण म्हणून त्या गाईत तीस कोटी देव राहतात, मेल्यानंतर ती आम्हांस गोलोक नावाच्या अत्युच्च स्वर्गास पोहोचविते, तिचे मलमूत्र सेविल्याने आमचे ‘पाप’ क्षालिले जाते, तिला मारण्याचा प्रसंग आला तर राष्ट्रीय लढाई हरू देऊ पण गोहत्येचे पाप जोडणार नाही प्रभृती बाभळट प्रकार जर कुणी अमेरिकेत करू लागला, तर त्यासही धर्मवेड्यातच काढावे लागेल!

Cow is the mother of prosperity हे आलंकारिकपणे म्हणणे काय नि Necessity is the mother of invention म्हणणे काय सारखेच.  पण अडचण ही उपायांची जननी, आवश्यकता ही प्रकल्पाची माता होय, असे अक्षरशःच जर कोणी सत्य मानू लागला, विनतारीसारखा प्रकल्प निघताच माता आवश्यकता बाळंतीण झाली म्हणून एक मातीची मूर्ती आणून निजवून शातिपाठास भट बोलावू लागला, तर त्यास वेड्यात काढावयास नको काय?

तीच गोष्ट राष्ट्रमातेची.  तिच्या दुधाची उपमा देऊन गंगायमुनांचे पाणी प्या.  पण जर राष्ट्रात वाहणाऱ्या गटारांचे पाणी मातृप्रेमाने पिऊ निघाला नि पंचगव्याचा म्हणतात तसा मंत्र म्हणून. 'यत्वगस्थिगतं पापं देहे तिष्ठति मामके'  ते या राष्ट्रदेवीच्या तीर्थाने नष्ट होवो.  वंदे मातरम् म्हणून ते गटारपाणी पिऊ लागला, तर त्या राष्ट्रमातेच्या सुपुत्रासही वेड्यांच्या रुग्णालयात धाडावे लागेल नव्हे काय ?

गाईस माता वा देवता असे अलंकाराने म्हणणे नि तसे अक्षरशः मानणे यातील फरक गेल्या महिन्यांतील एका घटनेनेच स्पष्ट कसा होतो तो पाहा.  मुंबईला कांदेवाडी क्षेत्रावर एक गाय अशी आढळली की, ती आजवर न विता थोडेबहुत दूध देत आली आहे. झाले. या तिच्या विशेषामुळेच ती कामधेनू म्हणून गोरविली जाऊन आचार्यपीठाच्या आज्ञेने एका उदार शेटजींनी तिच्यासाठी मंदिर बांधले!  आणि अशा कामधेनूचे दूध देवासच योग्य म्हणून ते माणसांना न देता देवास वा यज्ञातच काय ते वापरावे म्हणून व्यवस्था झाली.  गोठ्यात रात नि रानात दिवस काढण्यातच जिला अधिक आनंद व्हावा, त्या गाईला त्या मंदिरात आता देवता म्हणून स्थापिली आहे नि तिचे जे दूध माणसांच्या तोंडात पडत होते ते ती देवता होताच आगीत ओतले जाणार!   ती पशू होती तेव्हा जितकी कामाची होती त्याहूनही कामधेनू होताच ती अधिक निकामी होऊन बसली.  त्या गाईला मंदिरात स्थापणाऱ्या गोभक्तांच्या सद्-भावनेविषयी नि उदारतेविषयी आदर बाळगूनही त्यांस असे नको का सुचवायला की, पशूला मंदिरात देव म्हणून स्थापता तरी पशूचा देव न होता मंदिराचा मात्र गोठा होतो!   ती गाय वीतच नसेल तर ती साध्या गाईहून श्रेष्ठ अशी  'कामधेनू' अधिक निकामी आहे; कारण गोवंशाची वाढ न करणारी ती वांझोटी जात होय.  न विता दूध देणे च काय देवत्वाची व्याख्या?   दूध देणारे  बैल सापडतात.  शेपूट असलेली माणसे अंदमान-जावाकडे तुरळक जन्मतात, त्यांना हनुमान समजून देवळात का पुजायचे?   शेपूट असणे हा काय हनुमापणा?   अशा गाईची पाठवण तिच्या लैंगिक नि गर्भाशयिक विशेषांचे ज्ञान व्हावे म्हणून चिकित्सालयात व्हावी, देवालयात नव्हे, हिंदूंची अनेक अनाथ अर्भके परधर्मीयांच्या जबड्यातून सोडवून पाळण्यासाठी, त्या मंदिरात एक अनाथालय उघडावे आणि त्या गाईचे दूध आगीत न ओतता त्या अनाथालयातील एक-दोन अर्भकांच्या पोषणार्थ द्यावे.  कामास येईल ती कामधेनू.

एक एकान्तिक उदाहरण घेऊ.  हिंदू राष्ट्राच्या सैनिक शक्तिचे मर्मच असा एखादा दुर्ग वा प्रत्यक्ष राजधानी शत्रुने वेढली.  अन्न संपले.  तरीही टिकाव धरल्यास शत्रुवर बाहेरून दुसरे हिंदू सैन्य चढून येऊन त्याचा फडशा पाडण्याचा संभव. अशा प्रसंगी युद्धास निरुपयोगी ते पशू मारून खाण्यावाचून उपाय नसला, तर तो दुर्ग वा राजधानी हिंदू शत्रुच्या हाती पडू देण्यापेक्षा आणि तशी

राष्ट्रहत्या करण्यापेक्षा वेढ्यातील अवश्य तितक्या गाई मारून खाणे, ती गोहत्या करणे, हाच खरा हिंदू धर्म होय. असे प्रसंग काल्पनिक नव्हेत; इतिहासात घडले आहेत. हिंदू-शिखांचा शूर सेनानी हरिसिंग नलवा काबूलपर्यंत पठाणांस पायाखाली तुडवीत गेला. त्यास महाराजा रणजितसिंगाच्या मुख्य सैन्यापासून लांबलेला पाहून एका स्थानात पठाण सैन्याने कोंडला. पठाणांच्या शेतघरातून शिरून लोक धान्य बळाने नेतातसे पाहून मौलवींनी पठाणांस युक्ती सांगितली की, साऱ्या धान्यावर गाईच्या रक्ताचे थेंबसडे शिंपडून ठेवा; म्हणजे हिंदू ते धान्य नेणारच नाहीत! त्यामुळे जेव्हा ते धान्य पाडाव केले तेव्हा हिंदू सैनिक खाईनात! हे पाहताच हिंदू वीर हरिसिंग नलवा पुढे झाला. काही रानडुकरे कापून आणविली, मुसलमान ांस निषिद्ध अशा त्या रानडुकरांचे रक्त त्या धान्यांच्या ढिगांवर मंत्रित जल शिंपडावे तसे शिंपडले, 'खा आता सारे अन्न! धान्य शुद्ध झाले! ! सत् श्रीअकाल!' अशी शिखांची रणगर्जना करून ते अन्न सगळ्यांआधी त्या सेनापतीने खाल्ले! मागोमाग साऱ्या हिंदू सैनिकांनी तेच केले. डुकरांच्या रक्ताने पठाणांच्या धान्यांची सारी कोठारे भिजून गेल्यामुळे उलट तेच 'तोबा! तोबा!' करीत भुके मरू लागले. सहाय्य येताच हरिसिंग नलव्याने त्यांची नुसती कत्तल उडविली! याला म्हणतात गोरक्षण, खरा हिंदू धर्म! नाहीतर गाई माराव्या लागतील म्हणून त्यांच्या कळपाआडून पुढे येणाऱ्या मुसलमान शत्रुंना न मारता रण सोडून लढाई हरणारे ते गयाळ हिंदू पाहा!

त्या वेळी गाईचे रक्तही खाल्ले म्हणून काय वीर हरिसिंग नलवा 'गोरक्षक हिंदू नव्हता?' कोणत्याही गाईचे मलमूत्र पिण्यातच गोभक्तीचा कळस झाला असे मानणाऱ्या शामळू गयाळापेक्षाही त्याचे गोरक्षणाचे ब्रीद कसे कडकडीत होते ते पाहा. पठाणांसारख्या कडव्या हिंदू शत्रूंना तो जेव्हा सरसहा कापीत चालला तेव्हा त्या वेळा जो जो पठाण जीवदान मागे त्यास वीर हरिसिंगाने जी कोणती अट घातली ती ही की, त्या गोघ्न पठाणाने हात जोडून म्हणावे, 'मी गाय झालो! हिंदू वीर गोवध करीत नाहीत; मला जीवदान द्या!' असे म्हणून जाया पठाणांनी अक्षरशः दाती तृण धरले, तोंडात गवत धरून 'गाय झालो, वाचवा!' म्हटले, तेवढेच पठाण जिवंत राहिले! वीर हरिसिंग लनव्याचे नाव घेऊन पठाणी आया अजूनही आपल्या लेकरांस भिववितात. 'सो जाव! हरिसिंग आया!' असे ऐकताच पठाणांची मुले थरकापत निजताता. इतका त्या गोरक्षक हिंदूंचा दरारा त्या गोघ्न अहिंदूंस बसलेला आहे!

असा गोरक्षक हिंदू हवा! ते खरे गोरक्षण की जे राष्ट्ररक्षणाचे हत्यार होते. स्वतः गाय होऊन दाती तृण धरून साऱ्या जगापुढे गयावया करीत ज्याचे राष्ट्र हिंडत आहे, तो हिंदू केवळ गाईचे गोमूत्र, गोमय पिण्यापुरताच जगला काय नि मेला काय सारखाच! 'तो गोरक्षक नव्हे, गयाळ.' स्वतःच गाय होऊन सिंहाच्या तावडीतून कुणी सोडवील काय म्हणून अन्य रक्षकाची अपेक्षा करणारा! जो हिंदू राष्ट्रावर आक्रमण करणाऱ्या आततताई आपत्तींनाच दाती तृण धरावयास लावतो, हिंदू शत्रुंना गाय करून सोडतो, तोच हिंदू खरा गोरक्षक! जे राष्ट्ररक्षण तेच गोरक्षण! !

आमच्या गोरक्षणविषयक लेखांवर गोपूजक पंथाकडूनच नव्हे तर निःपक्षपातीपणाची भूमिका स्वतःकडे घेणाऱ्या काही 'मध्यस्थ' मंडळींकडूनही 'सावरकरांचे गोविषयक लेख विचारार्ह

आहेत असे समजले तरीही त्यांच्या हातून पावित्र्यविडंबनाचा दोष घडत आहे हे मात्र निषेधार्ह होय.’ या आक्षेपासंबंधी आम्ही इतकेच म्हणतो की पावित्र्य कोणाचे? गाईचे की देव-देवता-महर्षींचे? गाईविषयी म्हणाल तर आमच्या प्रत्येक लेखात गाईला गायच म्हटलेले आहे. तिला बेडकी वा बारगुडा म्हणून त्या बिचारीचे आम्ही केव्हाही विडंबन केलेले नाही. इतका उपयुक्त असलेला हा माणसाळू, मायाळू, दुधाळू पशू प्रेमपूर्वक पालनीय होय असे गाईच्या वास्तविक गुणांचे गोडवेही गायलेले आहेत. पण गाईला जसे आम्ही गायच म्हणतो तसेच देवालाही देवच म्हणतो. प्रभुत्वाचा, पावित्र्याचा, पूजनीयतेचा परमोच्च आदर्श म्हणजे देव. अशा दिव्यत्वाचा बोधक म्हणूनच देव शब्द आपण राखून ठेवलेला आहे. तसेच देवता आणि महर्षी ह्या शब्दांच्या त्या त्या प्रमाणातील पावित्र्यासंबंधी म्हटले पाहिजे. अर्थात, काही झाले तरी त्या देव-देवता-महर्षींचे पावित्र्य हे पशूच्या पावित्र्यापेक्षा तरी हीनतर नाही ना? मग तुम्ही जेव्हा पशूला देव म्हणता, त्या एकाच नव्हे तर तेहतीस कोटी देवांना, देवतांना नि महर्षींनाही त्या गाईच्या अंगात कोंबून तिची तशी चित्रे काढता, विकता, गंधफुले वाहून पुजता, तेव्हा खरे पावित्र्यविडंबन कोण करतो बरे? पशूला देव-देवता-महर्षींच्याही डोक्यावर चढवून मिरवत नेणारे तुम्ही, का पशूला ‘पशू म्हणा नि देवास देव !’ असे तुम्हाला विनवणारे आम्ही ! खरोखर ज्यांनी पावित्र्याचे परमोच्च आदर्श जे देव-देवता-महर्षी त्यांना गोठ्यातील गाईच्या गदळ शेपटीच्या रोमारोमांतून डांबून टाकणारी अशी चित्रे काढली, त्या पशूच्या ‘मध्ये देवगणास्सर्वे लोमकूपे महर्शयः।। अपाने तु मरुद्-देवी योनौ च वरूणः स्थितः।।’ असे रुपक म्हटले तरीही घाणरेडेच असणारे श्लोक रचले, त्या श्लोकांना अक्षरशः खरे मानून गाईच्या पूजा बांधल्या, आणि ‘मूत्रे गंगा ! !’ असा मंत्रघोष करीत जे गोमूत्राची आचमने जे पीत सुटले नि त्यांनीच देव-देवता-महर्षींचे पावित्र्य विडंबन केले ! आणि आजही धर्मकृत्य म्हणून ते अक्षम्य पावित्र्यविडंबन तेच करीत आहेत. आम्ही जर काही करीत असू तर पावित्र्यविडंबन नव्हे तर त्या बुद्धिभ्रष्ट पावित्र्यविडंबनाचे विडंबन !— पावित्र्यप्रस्थापन ! !

*—महाराष्ट्र शारदा, जुलै १९३५*

५. हा गाभारा की गोठा**?**

आम्ही आमच्या गाईवरील एका निबंधात 'गाय म्हणजे एक उपयुक्त पशू. माता नव्हे, देवता तर नव्हेच नव्हे' असे स्पष्टपणे सांगितल्यामुळे अनेक गोभक्त असंतुष्ट झाले नि त्या प्रकरणी गेल्या महिनाभर वाक्पीठ, व्यासपीठ, मुद्रापीठ (Platform, Pulpit, Press) अनुकूल-प्रतिकूल चर्चेने दुमदुमून गेले आहे.

गोभक्त जे प्रामाणिक, त्यांची गोष्ट राहो; पण ज्यांना जन्मात कधी गाईचे शेपूट डोळ्यास लावून स्वतःस पवित्रिले नाही, गाईची देवता म्हणून तर राहोच पण देवाचीदेखील देव म्हणून पूजा करणे सोडलेले आहे, ते अप्रामाणिक गोभक्तदेखील लोकप्रियतेचा एक सवंग सवदा पदरी पाडून घेण्यासाठी आम्हास विचारीत आहेत की, 'गाईला माता वा देवता म्हटले म्हणून काय झाले? तो अमका अमेरिकनदेखील गाईस " Thou mother of prosperity! " म्हणून संबोधतो; भूमाता म्हणून तुम्हीही 'वंदे मातरम्' गाता; पतितपावनात दगडांच्या मूर्ती देव म्हणून स्थापताच की नाही?'

त्या प्रामाणिक आणि अप्रामाणिक गोभक्तामस आमची अशी विनंति आहे की, गाईस उपयुक्त म्हणून माता असे, किंवा देवता असेदेखील, केवळ उपमेपुरते म्हणणे निराळे, आणि त्या पशूस माताच नव्हे तर महामाता म्हणून मानणे निराळे. भूमाता म्हणून म्हणता म्हणता जर कोणी त्या भूमीची धूळ पाण्यात कालवून ते भूमातेचे दूध वा तिर्थ म्हणून पिऊ लागला तर त्या भक्तासही निषेधावेच लागेल. भूमातेचे तीर्थच प्यायचे तर ते तिच्यावर वाहणाऱ्या गंगायमुनांसारख्या नद्यांचे सोज्वळ पाणी प्यावे. पण ते सोडून भूरूक्ताच्या भरात जर कोणू त्याच भूमीवर वाहणाऱ्या नाकझऱ्यादिक गटारांचे पाणी पंचगव्यासारखे पवित्र म्हणून पिऊ लागला आणि पंचगव्याचा मंत्र म्हणू लागला की, 'हे गटारपाण्या! यत्वगस्थिगतं पापं देहे तिष्ठति मामके—ते सारे तुझ्या प्राशनाने जळून राख होवो! वंदे मातरम्! वंदे मातरम्!' तर त्या भूमातेच्या भक्तास हे गोभक्तदेखील उपहासू लागतील की नाही. Cow is the mother of prosperity म्हणणे काय नि Necessity is the mother of invention म्हणणे काय सारखेच. एक बोलण्याची ढब! पण (necessity) आवश्यकता ही प्रकल्पाची (invention) माता माहणजे खरोखरीच माता आहे असे समजून कोणताही एखादा बिनतारी (Wireless) सारखा प्रकल्प निघू लागताच 'माता आवश्यकता बाळंतीण होत आहे!' या भावनेने बाज घालून, सुईम बोलावून शांतिपाठ जर कोणी म्हणू लागले, तर त्या उपमेपुरते म्हणण्यात नि तसे अक्षरशः 'मानण्यात' जो फरक, तोच गोदेवी वा गोमाता म्हणून आलंकारिकपणे बोलता बोलता तिचे गोमय नि गोमूत्रही खाऊपिऊ लागून त्यायोगे ह्या लोकीचेच नव्हे परलोकीचेही 'पाप धुतले जाते असे मानण्यात आहे!'

पतितपावनादी मंदीरात देवाची 'मूर्ती ' स्थापणे काय, नि खोलीत वडिलांचे छायाचित्र लावणे काय, लाक्षणिक अर्थ समजण्याइतकी विवेक असणारे सारखेच समंजसपणाचे कृत्य मानणार! वडिलांचे छायाचित्र दाखविताना इतकेदेखील आपण सहज म्हणतो की, 'हे आमचे वडील!' तसेच

भावार्थ समजण्याचा विवेक असेल तर गाईसारख्या अत्यंत वत्सल, दुधाळ, सुरेख नि माणसाळू पशूला वर्णिताना कोणी म्हटले, ‘एक देवताच आहे ती!’ म्हणून वडिलांच्या छायाचित्रास म्हणता म्हणता जर कोणी ते छायाचित्र फाडताच ‘वडील वारले’ म्हणून धायधाय रडू लागला, नि चिता रचून तिरडीची बांधाबांध करू लागला, तर ते कृत्य जसे भक्ती नसून भ्रम समजले पाहिजे, तसेच बोलण्याच्या ढबीपुरते गाईस देवता म्हणता म्हणता, गाईचे कळप पुढे घालून देशशत्रू हिंदू सैन्यावर चालून आले असता त्या गाई मरतील यास्तव धर्मशत्रूंवर तलवार न चालविता त्यांस स्वराज्यात घुसू देण्याचे, गोहत्या टळावी म्हणून राष्ट्रहत्या होऊ देण्याचे कृत्यही भक्ती नसून भ्रमच होय! पशूला जी खरोखरच देवता मानू लागली, त्या भक्तीने माणसाला प्रसंगी असे पशूहूनही निर्बुद्ध करून सोडावे यात काय आश्चर्य आहे?

अशा आमच्या कोटिक्रमावर काही विद्वान असे विचारतात की, अहो आपणा हिंदूंच्या मागच्या इतिहासात असा भाबडेपणा क्वचित घडला असेल, आहेही, पण आता त्याचे काय? ‘आज गाईला खरोखरच देवता मानून पूजील असा वेडा आहे कोण?’

‘तुम्ही स्वतः!’ हेच उत्तर!

कारण ज्या विद्वानाला, आपल्या आजच्या हिंदू समाजातही एका गोभक्तीच्याच नव्हे तर अशा अनेक प्रकारच्या धर्मभोळेपणाच्या महारोगाने लक्षावधी लोकांस पछाडलेले आहे अतकेही माहीत नाही आणि तरीही जो स्वतःस समाजशास्त्री समजतो तोही त्याच धर्मभोळेपणाचे हे रोगाणू आपल्या लोकांच्या बुद्धीस आजही कसे कुरतडीत आहेत हे पुन्हा एकदा स्वच्छ दिसावे, बरेच डोळे मिटणाऱ्या वरीलसारख्या असमंजस समाजशास्त्र्यांनाही नाकारता येऊ नये इतके ते धडधडीतपणे सिद्ध व्हावे, म्हणून हा पाहा, अगदी या महिन्या पंधरा दिवसांतच घडलेल्या खालील घटनेचा ‘क्ष’ किरण आम्ही त्या प्रश्नावर पाडीत आहोत.

मुंबई गोरक्षक मंडळीची कांदिवली येथील क्षेत्रावर (फार्मवर) गीर जातीच्या गाईची वीण सुधारण्याचे कार्य चाललेले आहे. त्यात एक गाय अशी आढळली की, ती आजूनपर्यंत व्यालेली नसताही जेव्हा पाहिजे तेव्हा अर्ध्या शेरापासून पाऊण शेरापर्यंत दूध देते नि ते दूध ४८ तासांपर्यंत बिघडत नाही. ही बातमी देऊन ‘गोरक्षण’ पत्र पुढे म्हणते की—

वरील माहिती गोस्वामी १०८ श्री गोकुळनाथजी महाराज यांच्या कानी पडताच त्यांनी आज्ञापिले की, अशा दैविक गाईचे दूध मनुष्याने न वापरता देवांना अर्पावे किंवा मंदिर बांधून तिचे सदोदित पूजन व्हावे!

गोस्वामीजींच्या इच्छेनुरूप काही श्रीमंत शेटजींनी एक कामधेनूमंदिर बांधून त्यात त्या कामधेनूची स्थापना करण्यात आली. उद्-घाटन समारंभ गेल्या रामनवमीस १२-४-१९ ३५ रोजी झाला.

गाईस एक उपयुक्त पशू मानण्यात नि तिला माता वा देवता मानण्यात केवढा फरक आहे तो ह्या एका उदाहरणावरून स्पष्ट होतो. अमेरिकेत अशी विण्याआधी धूध देणारी गाय असती तर तिची पाठवण वैज्ञानिक चिकित्सालयात होती, देवमंदिरात नव्हे. तिची ज्या गाईबैलांपासून वीण झाली त्यांची माहिती शक्य तर मिळविण्याची नि त्या विणीत हा गुण अनुवंशाने येतो की नाही ते पाहण्याची, गाईला दूध येण्याचा कोणता सृष्टिनियम आहे, कोणते वैज्ञानिक कारण आहे इत्यादि सुचेल त्या प्रकारे त्याची ते लोक चिकित्सा करते. वेळी ती मेल्यावर तरी तिचे गर्भाशय प्रभृती अवयव परीक्षून त्यांच्या घटनेत काही विशेष फरक आढळतो की काय, त्याचीही फोड केली जाती. जो चमत्कार तो नियमाच्या चौकटीत बसविण्याची त्यांची प्रवृत्ती. तर आमची त्याला एकदम दैविक बनवून हळदकुंकू वाहण्याची! घरात घेंगड्या निघाल्या तरी मान त्याला चमत्कार नि वहा हळदकुंकू; संध्याकाळी बेडकी घरात घुसली की मान तिला लक्ष्मी नि वहा हळदकुंकू!

चमत्कारच म्हणाल तर गवत खाणाऱ्या गाईला गाभण राहताच दूध यावे हेही काय कमी अद्-भूत आश्चर्य आहे! पण ते नित्याच्या परिचयाचे झाले, नि गाभण न राहता दूध यावे हे कधी फारसे आढळले नाही इतकाच काय तो फरक, म्हणून दुसरा अपवाद वाटला. पण वस्तुतः प्रत्येक अपवाद हा नियम नि चमत्कार ही साधी घटना आहे. विज्ञान त्यांची चिकित्सालयात छाननी करून त्या अपवादाचाच नियम करून सोडते. वेडे भोळेपण मंदिरे बांधून उन्हाळ्या, ज्वालामुखी प्रभृती साध्या घटनांचेही चमत्कार करून सोडते; ज्योतिर्लिंगे, राजापूरची गंगा प्रभृतींच्या देवता बनवून, त्यावर माहात्म्यांच्या पोथ्या रचून, त्या नवसास पावतात असे समजते; त्यांची पूजा चालू होते!

त्याच आमच्या प्रवृत्तीने ह्या गाभण न राहता दूध देणाऱ्या गाईची देवता बवनून तिला देऊळदेखील बांधून दिले! मनुष्याला तिचे जे दूध उपयोगी पडे ते देखील आता न पडता ते आगीत ओतायचे, यज्ञात खर्चायचे! त्यापेक्षा त्या दैविक दुधाचा उपयोग ज्या दीन अर्भकांना दूध मिळत नाही अशांना ते पाजण्याकडे केला असता तर ते कृत्य आगीत ओतण्यापेक्षा किंवा देवाच्या नैवेद्यास—म्हणजेच कोण्यातरी लठ्ठभटजींच्या पोटात—ढकलण्यापेक्षा त्या गाईच्या दयाळू कामधेनूपणास अधिक साजेसे नि देवास अधिक मानवेसे झाले नसते काय? थोडेबहुत दूध देऊन का होईना, पँ ती माणसांस ते पाजीत होती, कोवरच ती गाय कामधेनू होती. पण तिला हजारो रूपयांचे मंदिर, त्यात पंचपक्वान्नांचा नैवेद्य! इकडे झोपडीत वरून पाणी खालून ओल येत असलेल्या भुईवर दीमदरिद्री कुटुंबे कोंबून पडताहेत! नाचण्याची आंबील पोटभर मिळत नाही! ज्या गाईला रानावनांत भटकण्यात नि बांधावरील हिरवळ रवंथण्यात खरी मौज वाटावी, तिला मंदिरात कोंबल्याने नि पक्वानांच्या पेंढ्या खाव्या लागल्याने तिला स्वतःलादेखील कोंडवाड्यात घातल्यासारखे वाटत असेल! ही म्हणे गोभक्ती! मनुष्याला जिचे दूध द्यायचे ते आगीत ओतायचे नि उलट तिच्यावरच मनुष्याच्या निढळाच्या घामाने मिळालेले हजारो रूपये खर्चायचे!

पण काही केले तरी गाभाऱ्यात पशू बाधला की पशूचा देव होत नाही तर गाभाऱ्याचा गोठा होतो! जिच्या दुधाचा थेंबही मनुष्यास उपयोगी पडत नाही तर उलट जिच्या चरितार्थाचा नि स्तोमाचा बोजा सांभाळण्यासाठी मनुष्यास हजारो रूपयांचा खर्च सोसावा लागतो, अशा या निकाम्या धेनूपेक्षा राष्ट्राच्या दृष्टीने कोणत्याही कुंभारवाड्यातील आणा दोन आण्यांच्या वैरणीवारी रात्रंदिवस मनुष्याच्या कामाचा बोजा वाहणारी बिचारी गाढवीच खरी कामधेनू ठरते! !

आपल्या आजपर्यंतच्या अवलोकनात न आलेल्या नि म्हणूनच ‘विलक्षण’—आपण बांधलेल्या सामान्य लक्षणाच्या व्याख्येत सोडून असलेले ते विलक्षण—असे वाटणाऱ्या गोष्टी मनुष्यास प्रत्यही आढळतात. सृष्टीचे वैचित्र्य अगाध, मनुष्याचे अवलोकन उथळ! न विता दूध देणारी गायच काय, पण दूध देणारे बैलही मधून मधून आढळतात! पुरूषालासुद्धा अत्युत्कट वात्सल्याने दुधाचा पान्हा स्तनी फुटल्याचे विश्वासार्ह दाखले घडलेले आहेत. पुरूषाच्या पोटात गर्भाशय सापडतात. प्रथम स्त्रीदेह असलेल्या महिला हळूहळू पुरूषपणा पावतात. पण म्हणून ताया दूध देणाऱ्या बैलास वा स्त्रीत्व असून पुढे पुरूष होणाऱ्या स्त्रीस देव वा देवी मानून त्यांची देवळे का बांधायची? त्यांची मनुष्याने पूजा करण्यासारखे त्या लिंगपालटीच्या केवळ दैहिक सृष्टिक्रमानुसार घडणाऱ्या फरकाने कोणते देवपण, थोरपण त्या स्त्रीत वा बैलात आले? तीच स्थिती या गाईची. उलच जर ती वेळीच व्याली नसेल वा वीत नसेल तर, विऊन अनेक वासरे देऊन आमच्या गोवृषांची खिल्लारे वाढविणाऱ्या आणि तरीही भरपूर दूध देणाऱ्या आपल्या नेहमीच्या गाईहून ही अर्धवांझोटी गाय उपयुक्ततेच्या दृष्टीने उलट हीनतर समजली पाहिजे. अंदमानप्रभृती काही प्रदेशी थोडीतरी शेपूट असलेली माणसे अजून प्रसंगी जन्मतात, जगतात म्हणून काय त्यास हनुमानाचा अवतार समजून देवळांतून पूजाअर्चा करायची? शेपटीवाचून हनुमानाचा त्यांच्यात जोवर कोणताही गुण प्रकटत नाही, तोवर त्यास मनुष्याच्या नि पशूंच्या मधला दुवा असे समजले पाहिजे. मनुष्याच्या नि देवाच्या मधला नव्हे ! मनुष्यासारखे तोंड नि पशूसारखे शेपूट असणे ही काही देवाची व्याख्या नव्हे ! तीच स्थिती या गायीची. न गाभण राहता जिच्या सडांतून दूध येते, ती देवी अशी का देवीची व्याख्या आहे ? बिगरयत्तेतील मुलाइतकीदेखील बुद्धी ज्या पशूत नाही त्याला केवळ गाभण न राहता दूध येते म्हणून मनुष्याहून अत्यंत श्रेष्ठ अशी देवी मानणे म्हणजे देवपणाचाच नव्हे तर माणुसकीचाही असह्य उपमर्द करणे होय !

आमच्या कांदिवलीत गोरक्षक बंधूंच्या सदिच्छेविषयी वा ज्यांनी ते मंदिर बांधले त्यांच्या औदार्याविषयी आदरच वाटतो. दानामध्ये वा भक्तीमध्ये पात्रापात्रविवेक असावा आणि राष्ट्रास प्रत्यक्ष उपयोगी ते कृत्य धार्मिक समजावे, इतकेच आमचे सांगणे. त्या दानशूर मंदिरनिर्मात्यास अशी विनंती आहे की, त्यांनी त्या गाईस गाभाऱ्यातून काढून परत गोठ्यात धाडावे. रानावनातील हिरवा चारा नि ओढ्याचे पाणी यथेच्छ पिऊ द्यावे आणि त्या मंदिरात टापटिपीच्या नीट खोल्या पाडून त्यात, उदाहरणार्थ सुचवायचे तर, हिंदू अनाथ महिलांचा एक आश्रम उघडावा. ‘श्रद्धानंद हिंदू अनाथ महिलाश्रमा’ सारखी हिंदू राष्ट्राच्या हितास अतेयंत अवश्य असणारी संस्था, स्वतःला घर नाही, अर्भकांच्या रक्षणार्थ दमडी नाही, म्हणून ज्या मुंबईस दारोदार भीक मागत आहे ते, त्याच मुंबईस

एका पशूला एक मंदिर नि पंचपक्वान्नांचे नैवेद्य आरतीधूपारतीसह अर्पिले जावे ही केवढी विवेकशून्यता आहे बरे ! आता तरी ते मंदिर त्या ‘श्रद्धानंद अनाथाश्रमा’ च्या चालकांस देऊन टाकावे आणि अहिंदूंच्या जाळ्यात गवसणाऱ्या आपल्या हिंदूंच्या पोटची अनाथ लेकरे सोडवून ती पाळण्याकडे तो दानधर्म व्ययावा! तो आजचा खरा धर्माचार! एका दुधाळ पशूस देवता म्हणून पुजणे नि तिचे गोड दूध भुकलेल्या पोटच्या लेकरांच्या तोंडी न ओतता आगीत ओतणे हे निव्वळ वेडेचार होत!

## १.६ ही झाली भाबडी गोभक्ती; आता ही पाहा दांभिक उंदीरभक्ती

प्लेगच्या संकटातून मनुष्यजातीचा बचाव करण्यासाठी आमच्या हिंदू-मुसलमानी देवलसी संस्कृतीने अनुष्ठाने, यज्ञ, जप, नवस, बोकड मारणे, कोंबडा कापणे, ताईत, गंडे, कुरबानी, निमाज, प्रार्थना प्रभृती नाना उपाय करून पाहिले; पण ह्या ‘देवलसी’ औषधालयांतील एकाही लसीने प्लेगचा केसही वाकडा झाला नाही. पण तिकडे युरोपच्या ‘विज्ञानलसी’ संस्कृतीने मात्र अशी एक लस शोधून काढली की, जिच्यापुढे प्लेगसारखा भयंकर कोगही दाती तृण धरू लागला. जिथे लाखो लोक पटापट प्लेगला बळी पडायचे, तिथे ती लस टोचताच शेकडा पंचाहत्तर तरी सुखरूप राहतात, प्लेगने त्यांच्यावर दात धरला तरी त्याची त्यास डसण्याची छाती होत नाही. पुन्हा ती लस सोवळ्यानेच वापरावी वा ओवळ्याने निमाज पढून की न पढून, या तिथीला की त्या वाराला, आस्तिकाने की नास्तिकाने, भटास बोलावून वा मुल्लास वा पाद्र्यास अशा कोणत्याही भाकड थोतांडाची अटबीट न ठेवता! देवाला नमस्कारून टोचून घ्या वा देवाला धिक्कारून, लसीच्या गुणधर्माने लेशमात्र फरक नाही! सृष्टिनियम तो; प्रत्यक्ष प्रयोगार्ह, प्रत्यक्षनिष्ठ, प्रत्यक्षसिद्ध, पोथीसिद्ध नव्हे!

प्लेग अकस्मात उद्-भवलाच तर ती लस टोचण्याचा जवळ जवळ रामबाण उपाय शोधून काढून ते विज्ञान स्वस्थ बसले नाही, तर प्लेग उद्-भवणेही शक्य तो दुर्घटविण्यासाठी त्याने आणखी एक अमोघ उपाय काढला—उंदीर मारून टाकणे! प्लेगप्रकरणी उंदरांचा नायनाट ज्या प्रमाणात होईल त्या प्रमाणात माणसांचा नायनाट होणे थांबू लागले. गेल्या दहा –वीस वर्षांत पहिल्या दहा वर्षांत प्लेगने जसे मारले तसे लक्षावधी माणूस मारले न जाता वरील दोन उपायांनी लक्षावधी माणसांचे जीव वाचले. सर्व मनुष्य जातीस आनंद झाला.

महात्मा गांधींनी बोरसद तालुक्यातील बेहरा गावी अलीकडेच एक भाषण दिले. त्या ते म्हणाले की, “ या बोरसद तालुक्यात काही दिवसांपूर्वी प्लेगने कहर उडवून दिला होता. तो रोग हटविण्यासाठी जे उपाय तुम्ही योजलेत त्यात उंदरास मारण्याचा एक उपाय होता. शेकडो उंदीर तुम्ही त्यासाठी मारलेत. पण मी विचारतो की, तुमचा जीव जगावा म्हणून उमदरांचा जीव घेण्यास तुम्हांस काय अधिकार आहे? ”

पण सृष्टी उलट विचारते की, माझे नियमन कसे नि कोणत्या नियमानुसार व्हावे ते सृष्टिकर्त्यासदेखील सांगू पाहणारे तुम्ही कोण? माझाच एक नियम आहे, जीवो जीवस्य जीवनम्! आणि तो नियम इतका दुर्लघ्य आहे की, त्याला जीवदयेवर व्याख्याने झोडू निघालेले आढ्यताखोर अहिंसेचे आचार्यही अपवाद नाहीत! त्यांचा जीव जगवायचा प्रश्न आला की, तेही इतर जीवांची सरसहा कत्तल करूनच जगण्यास सोडीत नाहीत.

काय म्हणता, पुरावा हवा? अहो, उंदरास मारण्याचा मनुष्याला काय अधिकार आहे हे विचारणाऱ्या त्याच अहिंसक वाक्याच्या प्रत्येक आघातासरशी गांधीजींच्या जिभेच्या फटकाऱ्याखाली लाखो सूक्ष्म जीवाणू मरत होते आणि त्यांच्या श्वासोच्छ्-वासासरशी लाख लाख जंतूंचे मुडदे पडत होते! स्वतःला श्वासिता यावे म्हणून या लाखो जीवांची कत्तल करण्याचा जो गांधीजींना अधिकार, तोच स्वतः जगता यावे म्हणून लाखो माणसांना लाखो उंदीर मारण्याचा अधिकार!

त्याच्याही पुढे जाऊव माहात्मिक आवेशाची नशा उपभोगीत गांधीजींनी ठासून सांगितले की, “ उंदरांना माणसाइतकाच जगण्याचा हक्क आहे!” अहो, पण माणसांनाही उंदरांइतका तरी जगण्याचा हक्क आहे, हे उंदरांच्या प्रत्यक्ष शंकराचार्यांनादेखील नाकारता यावयाचे नाही!

मग ज्या परिस्थितीत एक तर उंदीर तरी मरतो, नाहीतर माणूस तरी मरतो असा पोच सृष्टी घालते, तिथे उंदरांच्या जगण्याच्या हक्कासाठी माणसांनीच आपला जगण्याचा हक्क सोडावा असे तरी कोणत्या तोंडाने सांगणार तुम्ही?

या अडचणीसाठीच गांधीजी त्यांच्यापुरते पुढे सांगतात की, “ निदान माझ्यासारखा अहिंसक तरी उंदरास मारण्यापेक्षा स्वतःच मरेल.” तथास्तु! तथास्तु!

ज्याला आपला जीव उंदराइतकाच मूल्याचा वाटतो, त्याने शक्य तितक्या झटपट तसेच करावे. आमची ना नाही!

पण आम्हाला माणूस आणि उंदीर, बाजीराव नि बरगुडा, शिवाजी नि शेणकिडा सारखा वाटत नाही. सृषटीतही अशी समतेची लवलेश सूचना सापडत नाही.

पुन्हा, उंदरासाठी अहिंसेच्या नावे गांधीजी म्हणताता तसे ते स्वतः जरी मेले तरी फरक काय झाला? उंदराचा जीव वाचला तर गांधीजींचा जीव गेला. कोणाची तरी जीवहिंसा झालीच!

जीवाजीवातच नव्हे, तर माणसामाणसांतही जगण्यामरण्याचा विचार तारतम्याने करावा लागतो ही गोष्ट प्रत्यक्ष गांधीजीही, निदान त्यांच्या स्वतःवर बेतली म्हणजे, चांगले जाणून णसताता. मी उंदरातरिता मरेन, मा मोठा सत्यवादी आहे, मी मोठा अहिंसक आहे, तुम्ही सारे

हिंसक! प्रभृती वाक्ये भोळ्याभाबड्या किंवा दीनदुबळ्या लोकांवर छाप पाडण्याच्या कामी गांधीजींच्या कितीही उपयोगी पडत असली, तथापि ते स्वतःच्या अंगावर बोतताच अनेक वेळा सारा दिखाऊ वेदान्त गुंडाळून कसे बाजूस ठेवतात, हे अशा प्रसंगी स्पष्टपणे न सांगणे म्हणजे उंदीर मरावा म्हणून माणूस मरू देणाऱ्या भाबडेपणाचा रोग राष्ट्रात फैलावण्यास हातभार लावण्यासारखेच होणारे आहे. असली शीकवण किती अव्यवहारी आहे याचा, 'मी ती स्वतः अगदी काटेकोरपणे आचारतो' असे शपथेवर सांगणारेच कशी आचरू शकत नाहीत हे दाखविण्यापेक्षा आणखी निर्विवाद पुरावा तो थोडक्यात कोणता देता येणार? तसा एक दाखला हा पाहा.

उंदीरभक्तीच्या या नव्या धर्मपंथाप्रमाणे जर जीव तेवढा समान आहे आणि म्हणूनच उंदरांना जगण्याचा माणसाइतकाच जर अधिकार आहे, तर शरारात होणाऱ्या रोगांच्या कोणत्याही रोगाणूंनाही जगण्याचा अधिकार माणसांउंदरांइतका असलाच पाहिजे. गांधीजींना उंदरात अपेंडिसायटिस नावाचा असाच एक भयंकर रोग झाला, तेव्हा हे रोगाणू, हे जीव त्यांच्या रक्तमांसावर यथेच्छ ताव मारीत नि आण्ही दुधावर जगतो तसे घावातील पुवावर जगत असत. त्या बापड्या चिमुकल्या जीवांची वसाहतच्या वसाहत गांधीजींच्या शरीरात, ऑस्ट्रेलिया ऍंग्लोसॅक्सनांची वसाहत भरभराटली तशी, भरभराटत होती; त्यांचे जीव सुखाने नांदत होते. पण त्यायोगे महात्माजींचा जीव संकटात पडताच त्यांनी शस्त्रवैद्य बोलावून ती रोगाणूंची वसाहतच्या वसाहत कत्तल केली! 'उंदीर मारून मी जगण्यापेक्षा मी स्वत-च

मरेन' म्हणून आपली शेखी मिरवणाऱ्यांनी स्वतःच्या जीवासाठी ते लाखो जीव कां कत्तल केले? गांधीजींइतकाच त्या रोगपिंडांनाही जगण्याचा अधिकार होता!

परंतु त्याहीपलीकडे जाऊन अशा थोतांडास कोणत्यातरी एका अलौकिक सिद्धाउसारखे समजून जेव्हा त्याचा राष्ट्रास प्रकट उपदेश होऊ लागतो तेव्हा असे हसडून खडसून विचारणे सार्वजनिक कर्तव्य आहे की, " महात्माजी, आपण जर असे अगदी एकांतिक अहिंसावादी आहात, तर आपणच लिहिल्याप्रमाणे जर्मन लोकांस मारण्यासाठी सशस्त्र सैनिकांची भरती करण्याच्या कामी थकून ताप येईतो आपण वणवण का हिंडलात? केवश अहिंसेच्या प्रश्नापुरते बोलायचे तर काय उंदरांनाच तेवढा जीव असतो नि जर्मनांना नसतो?"

फार काय, गांधीजींच्या बागेत एकदा माकडांनी फार उपद्रव दिला नि सत्याच्या नावे त्यांस हात जोडले तरी ती माकडे गांधीजींच्या बागेतील फळफळावळे खाणे सोजीनात. तेव्हा गांधीजींनी त्या माकडांची शक्य तितकी, थोडी का होईना, पण हिंसा करून मारविण्यास प्रकटपणे नि तसे करणे अपरिहार्य असे सांगूनसवरून कंबर कसली होती! मग काय, गांधीजींच्या बागेतल्या केळ्यांपेक्षा प्लेगमध्ये मरणाऱ्या त्या हजारो शेतकऱ्यांचे जीव कमी मोलाचे होते? केळ्यांच्या रक्षणासाठी माकडांची हिंसा करणे अपरिहार्य म्हणून वैध; माणसांच्या जीवांस वाचविण्यासाठी उंदिरांची हिंसा अपरिहार्य असताही निषेधार्ह! पण युक्तिवादाला टिकेल तर तो 'आतला आवाज' कसला!

शांतता, सत्य, अहिंसा यांच्या देवालयात पूजा करण्याचा मक्ता एकट्या गांधीजींस मिळालेला नाही. प्राणपणाने आम्हीही त्याच देवतांची पूजा तितक्याच एकनिष्ठेने करीत आलो आहोत आणि जेव्हा जेव्हा त्या तत्वास प्रत्यक्ष आचरण्याचा प्रसंग येतो तेव्हा तेव्हा गांधीजींनाही त्यांच्या पोकळ नि भाकड व्याख्या बाजूस सारून त्या सद्-गुणांच्या भरीव नि सत्यसृष्टीला धरून असणाऱ्या आमच्या व्याख्यांप्रमाणेच त्यांचा वर्ताव करावा लागतो.

पण उंदीर नि माणसे दोघेही वाचविण्याची जी आणखी एक अजब युक्ती त्यांनी सुचविली आहे ती तर आजपर्यंतच्या अशा त्यांच्या क्लृप्त्यांसच भाकडपणातही मागे टाकणारी आहे.

ते म्हणतात, “ उंदीर मारण्यापेक्षा, उंदरांची उपजच बंद करावी! हेच व्रतास सुसंगत आहे!”

पण जर उंदरांना माणसांप्रमाणेच जगायचा हक्क आहे, तर त्यांस माणसांप्रमाणेच प्रजननाचा नि वंशविस्ताराचाही हक्क आहेच! मग तो हिरावणारे तुम्ही कोण? काही उंदीर मारणे जर हिंसा तर त्यांचा आमूलाग्र निर्वंश करणे, जातची जात उच्छेदणे ही शतपटीने इधुक भयंकर हिंसा नव्हे काय? माणुसकीच्याच मूल्यमापनाने जर उंदिरकी मापायची तर कोणताही स्वराष्ट्राभिमानी उंदीर असेच म्हणणार की, ‘एक वेळ आमच्यातले दहा-पाच हजार उंदीर वीर ठार झाले तरी चालतील, पण आम्ही आमची उंदीर जातच्या जात निर्वंश होऊ देणार नाही! आम्हांपैकी क्वचित प्रसंगी सांगूनसवरून थोडेसे उंदीर ठार करणारा माणूस जर राक्षस होय, तर आमची जातच्या जात जन्मतःच असा केसाने गळा कापून, न कळता ठार करणारा शकुनी महाराक्षस समजला पाहिजे!’

आमच्या माणसांना संततीचे सुख जसे अत्यंत हवेसे, आमच्या महिलांना वात्सल्याचा पान्हा जसा उत्कट आनंद देतो, तसेच उंदरांनाही आपल्या चिल्यापिल्यांच्या वत्सलतेची माधुरी चाखण्याची हौस असणारच. सारी सृष्टी ज्या प्रजननाच्या लालसेने विमोहित, त्याच लालसेने उंदीरही व्याकुळ असणारच. मग त्यास ह्या वत्सलतेच्या आस्वादास आचविणे, ती जातच्या जात खच्ची करून त्यांचे निःसंतान करणे ही तेवढी हिंसा होय की, जेवढी एखादे राष्ट्रच्या राष्ट्र पूर्वीचे विजेते खच्ची करीत तेव्हा त्यांच्या हातून घडे !

आणि पुन्हा, उंदिरांची उपजतच बंद करायची कशी? प्रत्येक उंदराउंदरीस हिटतरच्या खच्चीकरण कार्यालयात धाडून? का कर्व्यांच्या संततिनियामक व्याख्यानांस ऐकवून? कां संततिनियामक साधने पुरवून?

*–मनोहर, जुलै १९३५*

## ६ .जगातील यच्चयावत युद्धे अशक्य करून टाकणारा अलौकिक शास्त्रीय शोध !

घ्या ! तुमच्या अमेरिकेची एवढी घमेंड हवी कशाला ! काय म्हणे आगगाडी, तारायंत्र, विनतार, विमान, ध्वनिलेख, ध्वनिक्षेप (ब्रॉडकास्ट) प्रभृती प्रकल्प (inventions) नि शोध युरोप-अमेरिकेने लावले ! त्या थोड्याशा उथळ प्रकल्पासरशी काय ते पाश्चिमात्य लोक फुगून गेले ! जणू काय त्यांनाच असे शोध लावता येतात आणि आम्हा भारतीयांस मुळीच लावता येत नाहीत ! मोडले शेवटी त्यांच्या त्या घमेंडीचे कंबरडेच ! कारण आमच्या कामकोटीच्या शंकराचार्यांनी गेल्या महिन्यात युरोप-अमेरिकेला त्यांच्या बापजन्मीही कधी सुचला नाही असा एक अलौकीक शोध लावला आहे !

भारतीयांनीही अगदी या पडत्या काळातही काही वैज्ञानिक शोध लावले होते. भिसे, बोस यांनी युरोपिअन लोकांतही बोलबाला व्हावा असे काही यांत्रिक प्रकल्प नि वैज्ञानिक शोध लावले खरे; पण ते इतके अलौकिक नव्हते की ज्यायोगे युरोपियन तर काय, पण एकंदर मागचीपुढची मानवी बुद्धीच चकित होऊन जावी! ब्रह्मदेवाचा गर्व उतरण्यासाठी प्रतिसृष्टी निर्मितो म्हणून प्रतिज्ञापून विश्वामित्राने ब्रह्मदेवी माणसाची प्रतिसृष्टी म्हणून माकड, ब्रह्मदेवी घोड्याचा प्रतिस्पर्धी म्हणून गाढव इत्यादि पदार्थ निर्मून पूर्वी एकदा जी तोडीसतोड उडवून दिल्याचे पुराणे सांगतात, तेव्हापासून आजवर साऱ्या जगाची आगगाडी एकदम कळ दाबताच या रुळावरची त्या रुळावर नेणारा असा अद्-भुत शोध कोणी लावला नव्हता! आमच्या कामकोटीच्या शंकराचार्यांनी तसला अपूर्व शोध लावून आम्हा भारतीयांचे नाव पुन्हा उजळले! युरोपचे नाकच कापले!

आणि त्या प्रकल्पाचा विषय तरी किती गहन! एखादा सटरफटर विमानाचा प्रकल्प नव्हे तो, मनुष्य म्हणे युरोपात उडू लागला त्यात रे काय? कावळादेखील उडत होताच की! काय म्हणे बोलपटांचा शोध! आचरटपणा वाढविलात; दुसरे काय केलेत! अतिदर्शनयंत्र काढले—television काढले! घार नाही का मैलमैल उंचीवरून भूमीवरचा किडा पाहत! असले शोध पैशापासरी पडले आहेत! पण जो शोध माणसाला तर काय पण देवांनाही कधी लावता आला नाही असा शोध लावावा तर तो आमच्या कामकोटींच्या शंकराचार्यांनीच! देवांनादेखील जी थांबविता आली नाहीत ती युद्धेच मुळी बंद पाडण्याचा, केवळ अशक्य करून टाकण्याचा तो शोध शेवटी आम्ही भारतीयांनी गेल्या महिन्यात लावला!

तो अत्यद्-भुत शोध पाटणा येथील प्रवचनात श्रीमच्छंकराचार्य (कामकोटी) ह्यांनी परमकृपाळूपणे आपल्या शिष्यगणांस उपदेळिताना प्रकटविला की, जर मनुष्यांस युद्धे अशक्य करून सोडायची असतील, देवांनाही साधले नाही ते साधायचे असेल, तर—आहे! त्या अतिदुर्घट साध्यासही सांधणारा उपाय आहे. केवळ एक नियम सर्व मनुष्यांनी पाळला पाहिजे. तो हा की—

‘पक्व फळे नि गायीचे दूध हे अन्न जगातील सर्व मनुष्यांनी सेवावे. या अन्नामुळे सत्वगुण वाढेल. सत्वगुण वाढताच युद्ध करण्याची मनुष्याची प्रवृत्तीच नाहीशी होईल.’ प्रवृत्तीच नाहीशी झाली की, युद्धच काय, पण युद्ध हा शब्दसुद्धा मानवी कोशातूनच नव्हे तर मनांतूनही नामशेष होईल हे निर्विवादच आहे.

घ्या म्हणावे आता त्या युरोपियनांना ! आम्हा हिंदू लोकांस निःशस्त्र करून ठेवलेत काय ! आणि तिकडे आपण मात्र लाखो मशिनगन्स, तोफा, टॉर्पेडो, चलखता सशस्त्र मोटारी, विमाने, स्फोटक दारूची नि बॉम्बची लक्षावधी भयंकर कोठारेच्या कोठारे जय्यत ठेवलीत नि येताजाता बायोनेटीकडे बोट दाखवून आम्हास भिववीत होतात काय ? काढला उपाय बघा आम्हीही त्यावर ! तुमची युद्ध करण्याची प्रवृत्तीच मारून टाकतो आता ! पक्व फळे नि गायीचे दूध तुम्हास खायला लावले की, जिरलीच तुमची रग ! त्या दारूच्या, बॉम्बच्या नि विषारी धुरांच्या बळावर माजला होतात नाही ? अरे, पण तुमचे हे सारे स्फोटक नि मारक शोध उभारलेले असणार ह्या टुक्कार रसायनाच्या अधिष्ठानावरच काय ते; पण आमचा हा शोध उभारलेला आहे त्या भक्कम ईश्वराच्या अधिष्ठानावर ! ‘परंतु तेथे ईश्वराचे ! अधिष्ठान पाहिजे ! सत्वगुण पाहिजे !’ हे विसरलात तुम्ही ! !

यावर कुणी युरोपियन विचारील की, पक्व फळे नि गायीचे दूध हे युरोपियनांस खाणे तुम्ही भाग कसे पाडणार की ज्यायोगे युद्ध करण्याची प्रवृत्तीच लुळी व्हावी ? मागे एकदा मांजरांच्या युद्ध करण्याच्या प्रवृत्तीपासून उंदीर जातीस बचावण्यासाठी उंदिरांतील एका विचारी पुरूषाने जेव्हा अशीच एक बिनतोड युक्ती काढली होती की, घंटा बांधा त्या मांजराच्या गळ्यात, तेव्हासुद्धा एका संशयात्म्या उंदराने अशीच शंका काढून त्याचा हुरूपमोड केला होता की, ‘घंटा बांधावी हे खरे, पण ती कशी ? कोणी ?’ तो प्रश्न उंदरांना जरी अजून सोजविता आला नाही, तरी पक्व फळे नि गायीचे दूध भांडकुदळ माणसांना खाणे भाग कसे पाडावयाचे हा प्रश्न आम्हा भारतीयांना तरी सहज सोडविता येणार आहे, हे ह्या शोधाची चेष्टा करणाऱ्या युरोपियनांनी खूप समजून असावे ! पक्व फळे नि गायीचे दूध हे त्यांनी आपण होऊन न खाता, जरी त्यांच्या त्या प्रचंड तोफांच्या रणतरींसह एक लाख बायोनेटे घेऊन हिंदुस्थानावर चढाई केली, तरी आमच्या किनाऱ्यावर पाऊल ठेवताच आम्ही रबराच्या प्रचंड नळ्यांतून गाईच्या दुधाचा त्यांच्या तोंडावर णसा नुसता धुवांधार पाऊस पाडू की, त्यांच्या नाकातोंडात श्वास घेता घेता ते हंडेच्या हंडे घुसलेच पाहिजेत आणि पक्व फळांची अशी सारखी गोलंदाजी चालवू की, तोंड मटन खायला जरी उघडले तरी आमची पक्व फळे त्यांच्या तोंडात पडलीच पाहिजेत! मग बघू या त्यांच्यात सत्वगुण कसा संचारत नाही! युद्धाची प्रवृत्ती नाहीशी होऊन ते साष्टांग नमस्कार घालू लागतील, नमस्कार! !

पक्व फळे नि गायीचे दूध हे जर मनुष्यमात्र सेवील तर सत्वगुणांचा अपरंपार उत्कर्ष होऊन मनुष्याची युद्ध करण्याची प्रवृत्तीच बंद पडेल. ह्या जगातील युद्धे आमूलात थांबविण्याच्या वरील अत्यद्-भुत शोधासंबंधी दोन-चार आणखी शंका काही संशयात्मे काढण्यास सोडणार नाहीत हे आम्ही जाणून आहोत. कारण आजकाल मनुष्याची धर्मप्रवृत्ती नि श्रद्धा हे दोन सद्-गुण नाहीसे होत चाललेले आहेत. त्या शंकास निर्दाळण्यास कामकोटीचे शंकराचार्य समर्थच आहेत म्हणा; पण तशा

संशयात्म्यांस कसे निरूत्तर करावे हे जर आमच्यासारख्या समस्त श्रद्धाळू शिष्यवर्गासही समजले तर आम्ही त्या संशयात्म्यांची तोंडे परस्परच बंद पाडू. त्यासाठी आम्ही त्या शंका थोडक्यात सांगत आहोत. आचार्य कृपाळू होऊन त्यांची उत्तरे कशी द्यावी ते आम्हाला प्रसिद्धपणे सांगतील अशी आशा आहे.

गायीचे दूध नि पक्व फळे ही दोन्हीही अन्ने सत्वगुणी असली तरी त्यातल्या त्यात भांडखोर प्रवृत्ती गाईच्या दुधापेक्षाही पक्व फळात कमी असली पाहिजे हे उघड आहे. कारण गाईच्या हृदयाच्या सात्विक गयाळपणाचा गुण तिच्या दुधात उतरतो तसाच शिंगांच्या अणकुचीदार मारकटपणाचा दोषही त्या गाईच्या दुधात उतरत असावासे वाटणे क्षम्य आहे. एवढ्याचसाठी बैल अगदी पहिल्या दिवसापासून निव्वळ गाईच्याच सात्विक दुधावर वाढत असताही मोठा मारकुटा प्राणी म्हणून वेदांतदेखील संकीर्तलेला आहे. तेव्हा मनुष्य अगदी उपजल्या दिवसापासून जरी आईच्या दुधाचा थेंबही पिऊ न देता गाईच्याच सडावर पोसला गेला तरीही त्याच्यात निदान बैलाइतका तरी शिंगाळ मारकेपणा येणारच! सात्विक देवता जी गाय ती गायच जर लाथा झाडते, फुस्कारते आणि उपद्रव होताच शक्य तो शिमगावर घेण्यास सोडीत नाही, तर बैलाची गोष्टच नको! बोलून चालून बैलच तो!

बरे गाईच्या दुधाचा सात्विक परिणाम बैलावर जरी न झाला तरी माणसावर होईलच असे म्हणावे तर अगदी गाईच्या दूध-दही-लोणी-तुपावरच परिपुष्ट झालेले गोकुळीचे भगवान बालकृष्णही मारकुटेपणात राक्षसांचेही बालवयातच काळ झालेले होते. आम्ही आठरा अक्षौहिणी मारविणाऱ्या भारतीय युद्धाचा तो मूर्तिमंत रणगंभीर रणोत्सव जो सुदर्शनधारी प्रौढ श्रीकृष्ण त्याची कथा उल्लेखीत नाही. कारण युद्धाची ती अदम्य झुंजार प्रवृत्ती प्रौढ श्रीकृष्णात ते मोठेपणी क्षत्रियास उक्त ते मांस नि मद्य सेवू लागल्यापासूनच आली असे म्हणता येईल. श्रीकृष्ण मांस, मद्य सेवीत हे भारतात स्पष्टच वर्णिले आहे. पण आम्ही बालकृष्णापुरतेच बोलतो आहोत. बाळकृष्ण तरी दही, दूध, लोणीच आकंठ सेवीत ; पण धर राक्षस की चुरड ही त्यांची पराक्रमी प्रवृत्ती त्या गाईच्या दुधाच्या चरवीत बुडाल्याचे केव्हाही आढळले नाही. गोकुळीच्या गाईंच्या दुधात रवी घुसळताच दुर्धर्ष पराक्रमाचेच लोणी निघे—गयाळ, मवाळ नि आततायीची खोडकी जिरविणाऱ्या युद्धाची प्रवृत्तीसुद्धा नष्टविणाऱ्या मुर्दाड सात्विकपणाचे नव्हे. त्या गाईच्या दुधावरच वाढले म्हणून बालकृष्ण राक्षसांचे कंबरडे मोडण्याइतके झुंझार नि बलवान झाले, असे गोरक्षकच अट्टहासाने प्रतिपादितात ! इतके झुंझार की, ओठावरील त्या गाईचे दूध सुकते न सुकते तोच मथुरेला जाऊन बळेबळे भांडण काढून कंसाचे डोके भर रंगणात छाटून काढावे ! रक्ताचा पाऊस पाडून उन्मत्त वृषभासारख्या डुरकाळ्या फोडीत रंगणात दंड थोपटीत उभे ठाकावे ! गाईच्या दुधाने जो अंगी येतो, तो सत्वगुण असा असतो—युद्धाची प्रवृत्तीच मारून टाकणारा नसतो !

हों, क्वचित असे असण्याचा संभव आहे की, त्या देवपालित, प्रभुलालित गोकुळीच्या तुंद गाईंचे दूध आजच्या या पांजरपोळी मरतुकड्या गाईंच्या दुधाइतके गयाळ सात्विकपणास पोषक नसावे ! माहणून गोकुळीच्या गाईंच्या दुधाने बाळकृष्ण जरी मारकुटे झाले तरी ह्या पांजरपोळी

गाईच्या दुधाचे सेवन केले असता आपल्या अंगी मात्र मारखाऊ सात्विकपणा ओतप्रोत मुसमुसून युद्धाची प्रवृत्तीच नाहीशी होईल !

गाईला शिंगे असल्यामुळे तिच्या दुधात थोडातरी मारकुटेपणा, युद्धाची प्रवृत्ती असणे अपरिहार्य असे मानले, तरीदेखील आचार्यांनी दुसरे अन्न जे सात्विक गुणाचा प्रकर्ष करणारे म्हणून सांगितले आहे त्याविषयी मात्र काहीच शंका घेण्याचे कारण नाही. वृक्षांना शिंगे नाहीत, गाईसारख्या लाथा झाडण्याची खोडही त्यांस नाही, तेव्हा वृक्षांच्या पक्व फळांत सात्विक गुण अगदी निर्भेळ असा सापडणे अनिवार्यच आहे. तेव्हा पक्व फळे खाल्ल्याने मनुष्यांत सात्विक गुण उत्कर्षून त्याची समरांगणातील युद्धाचीच नव्हे, तर नुसत्या स्वयंपाकघरातील बोचकारण्याची फार काय, खेळकर नाक खाजविण्याचीसुद्धा प्रवृत्तीच मारली जाईल हे अगदी खरे आहे. त्याला तसा प्रयोग यशस्वी झाल्याचा प्रत्यक्ष वैज्ञानिक पुरावाही आहे—माकडांचा ! ती बिचारी माकडजात इतकी सात्विक नि युद्धाची प्रवृत्तीसुद्धा लेशमात्र ज्यांच्यात आढळत नाही अशी कां झाली? माकडाने असेच कोणास चिडविण्याकरिता नाक खाजविले, किंवा अयोध्या-त्र्यंबकेश्वर प्रभृती हजारो माकडे असलेल्या क्षेत्रांत बायाबापड्या दर्शनास येताच त्यांचे कुंकवाचे करंडेच पळीव, वेडीवाकडी तोंडे करून भेडसाव, मुलास पळवून ने, चिडविताच खाड्-किनी डस, आपसांत दगड उचलून, झाडांच्या फांद्या घेऊन मारामाऱ्या कर, दुकानावर अकस्मात झडप घालून फुटाणे लूट, निजलेल्यांच्या पागोट्यांचे सोगे ओढीत झाडावर चढवून खिदिखिदी हास—असे कोणतेही खोडकर चाळे, प्राणघेत्या झोंब्या, रक्ताळ बोचकारे काढताना माकडांस कोणी कधीतरी पाहिले आहे काय? ओरांगओट्यांग, चिंपान्झी, बेबून प्रभृती प्रचंड वानर-माकडांच्या लढाया सैन्येच्या सैन्ये जमवून निबीड अरण्यात चालतात म्हणून प्रवासी म्हणतात तेही खोटे असलेच पाहिजे. माकडांत हा जो सत्व गुणाचा प्रकर्ष झालेला आहे, तो निःसंशय या एकाच गोष्टीने असणार की, माकडे-वानर यांचा आहार जवळ जवळ सर्वस्वी पक्व फळांचाच असतो. त्यांची जन्माचीच एकादशी शुद्ध नि अक्षरशः फलाहारच—फराळ! म्हणूनच ती सात्विक झाली, युद्धाची प्रवृत्तीच त्यांच्यात उरली नाही! होय ना? यास्तव हे मनुष्या, पक्व फळे नि गायीचे दूध तू सेव, की तुझ्यात सत्व उगवेल ! सत्वाचा हंगाम उगवला की युद्धाची प्रवृत्तीच नष्टेल ! युद्धाची प्रवृत्तीच नष्टली की जगातून युद्ध नामशेष झालेच पाहिजे ! सशस्त्र लोकांची रग जिरविण्यास निःशस्त्र लोकांस हा अत्युद्-भुत शोध म्हणजे केवळ संजीवनीच सापडली ! केवळ पक्व फळे नि गायीचे दूध स्वतः खाल्ले नि दुसऱ्यास खावविले की आटोपले ! !

हा झाला युद्धे नाहिशी करण्याचा अद्-भुत उपाय !

आता भूकंप नाहीसा करण्याचा तितकाच अद्-भुत उपाय ऐका !

कामकोटी शंकराचार्यांनी युद्धाच्या आपत्तीपासून मनुष्यजातीस वरील उपाय शोधला न शोधला तोच भूकंपापासूनही मनुष्यास वाचविण्याचाएक अद्-भुत उपाय महात्मा गांधींनी शोधून काढला आहे.

भूकंपाच्या सगळ्याच विषयाचा त्यांनी फार खोल अभ्यास केलेला दिसतो. युरोप-अमेरिकेतही भूकंप विषयाचा पुष्कळ वैज्ञानिक अभ्यास करीत आहेत. साधारणतः भूकंपाचे नक्की भविष्य ग्रहणाइतके अचूक जरी अजून विज्ञानास सांगता आले नाही तरी भूकंपाचे सूक्ष्म धक्के आगाऊ दूरवर कळविणारी यंत्रे बरीच कार्यक्षम अशी निघाली आहेत. आज ना उद्या ग्रहणाचे नियम जसे आगाऊ आणि नक्की गणिताच्या पकडीत मनुष्याने पकडले आहेत तसेच भूकंपाचे पकडून ठेवता येतील. त्यांची कारणे, वेळा गती, स्थाने निश्चितपणे वर्तविता येतील, असा वैज्ञानिक जगात विश्वास वाटत आहे. आणि प्रत्येक भूकंप होताच तिथे जाऊन मागच्या भूकंपाच्या तारखांशी, स्थानांशी, ग्रहवेधांशी, भूगर्भाशी, गतीशी त्याचे सादृश्यासादृश्य तुळून जुळून सामान्य नियम असे काय काय बोधता येतात ते अवलोकिले जाते. आकाशातील ग्रहोपग्रहांच्या स्थितिगतींचे अवलोकन करता करता जसे सूर्यचंद्र-ग्रहगती ग्रहणांचे नियम सापडले तशाच प्रक्रियेने भूगर्भाचेही हृद्-गत मनुष्यास कळून ज्वालामुखी नि भूकंप ह्यांसारख्या अद्याप मनुष्याच्या ज्ञानाच्या आटोक्यात न आलेल्या उत्पातांचीही नाडी मनुष्यास गवसेल अशा अपेक्षेत आकडेमोडी जडवादी भौतिक वैज्ञानिक जो प्रयोगावर प्रयोग करण्यात धडपडत आहेत तोच—

गांधीजींनी केवळ सत्वगुणसंपन्न अंतःस्फूर्तीच्या बळे तो सारा प्रश्न चुटकीसरसा सोडवून टाकला ! आता भूकंपाविषयी तरी ‘तज्ज्ञात्वा नेह भूयोऽन्यद् ज्ञातव्यमवशिष्यते!’ त्या प्रकरणी जे काय सांगण्यासारखे ते गांधीजींनी सर्व सांगून टाकले आहे.

ती गांधीप्रणीत भूकंपविद्या थोडक्यात अशीः

(१)भूकंप कां होतात? देव रागावतो म्हणून.

(२)देव कां रागावतो? मनुष्य पाप करतो म्हणून.

(३)कोणाच्या पापाने कुठे भूकंप होतो? अस्पृश्यांना गुरूवायूरचे देऊळ मद्रास प्रांतामध्ये उघडले नाही तर बिहार प्रांतात भूकंप होतो. देवच नाही म्हणावयाचे महापाप रशियात वा हिमालयीन चुक्यांचे पाप वर्ध्याला केले तर क्वेट्ट्याला भूकंप होतो! ! इतर सांगोपांग टाचणे नि कोष्टके श्रद्धाळू शिष्य जसजसे प्रश्नतील तसतसे प्रसिद्धिले जाईल.

(४)भूकंपावर रामबाण उपाय कोणता? प्रार्थना!

पाहिलेत ना सत्वगुणाचा उदय माणसात होऊ लागला की त्याला चराचर सृष्ृटीची सारी गौप्ये अंतःस्फूर्तीच्या एका चमकेत कशी स्पष्टपणे प्रतीत होतात! किती समंजस हा कार्यकारण भाव! किती सात्विक हे ज्ञान! उगीच काही कामकोटी च्या शंकराचार्यांनी म्हटले की, पक्व फळे नि गायीचे दूध खाल्ले की सत्वगुणाचा उदय अंतःकरणात झालाच पाहिजे ! पक्व फळे नि गायीचे नसले तरी बकरीचे दूध गांधीजी उगीच सेवीत नाहीत ! सृष्टीची भौगोलिक हृद्-गते इतकी अचूक जाणविणारा प्रकाशाशील सत्वगुण अन्यथा कसला प्रकटणार !

भूकंपविद्येची ही गौप्ये अचूक आहेत हे तरी कशावरून, अशी कुशंका जर कुणास येईल, तर त्या सत्वगुणाच्या स्वयंप्रकाशी प्रज्ञेच्या बळावर इतर साधुपुरूषांनी सृष्टीची अशीच आणखी काही गौप्ये जी आजवर सांगितली आहेत ती पडताळून पाहावीत, म्हणजे ती कुशंका निरस्त झाल्यावाचून केव्हाही राहणार नाही. वरील भूकंप प्रकरणातील शोधांच्या तोडीसतोड देणारे हे खालील सात्विक शोध पाहाः

(१) आकाशात पावसाच्या भरात गडगडते कां ? देवांची सासू तिच्या प्रचंड जात्यात हरबरे भरडते आहे म्हणून.

(२) महामारीची साथ कां आली ? मरीआईला कोंबडी दिली नाही म्हणून.

(३) प्लेग ह्या वर्षी गावात कां आला ? बहिरोबाला गेल्या वर्षी बारा बोकडांचे बळी दिले नाहीत म्हणून.

(४) समुद्र खारट कां ? अगस्ती ऋषीने त्यांत लघुशंका केली म्हणून.

(५ ) देवाने चंद्र कां उत्पन्न केला ? मुसलमानांना निमाजाच्या नि रोजच्या वेळा कळाव्यात म्हणून.

(६ ) पंचगव्य प्रत्यही कां प्यावे ? ते सर्वरोगप्रतिबंधक आहे म्हणून.

(७ ) पंचगव्य सर्वरोगप्रतिबंधक आहे याला आधार काय ? वैद्यकशास्त्रावरील अत्यंत प्रमाणभूत नि प्रयोगसिद्ध ग्रंथ जो गुरूचरित्र त्यात सांगितले आहे म्हणून.

(८ ) सारे युरोप, आशिया, अमेरिका, हिंदी मुसलमान, ख्रिश्चन ते रोगप्रतिहारक पंचगव्य जन्मात कधीही पीत नसता रोगाने पटापट मरत कां नाहीत ? पंचगव्यावर त्यांची श्रद्धा नाही म्हणून.

(९ ) हिंदू लोक जन्मभर पंचगव्य पीत असताही देवी, महामारी, प्लेग, क्षय प्रभृती रोगांस युरोपियनांपेक्षाही अत्यंत अधिक प्रमाणात बळी कां पडतात ? पंचगव्य हे रोगप्रतिबंधक आहे असे गुरूचरित्रात सांगितले असताही जन्मभर पिता पिता एखाद्या दिवशी तरी पंचगव्य पिण्याला विसरतात म्हणून.

परंतु वरील सर्व शोधांवर कडी करणारा नि युरोपच्या प्रकल्पक शक्तीचे (Inventive Geniusचे) रेकॉर्डच मोडून टाकणारा शोध जर कोणाचा असेल तर तो श्री चौंडेबुवांचा होय. प्रत्येक फुटकळ फुटकळ अरिष्टावर वा रोगावर काय तो एकेक उपाय आजपर्यंतच्या संशोधकांनी नि प्रकल्पकांनी काढला. कोणी प्लेगवर, कोणी देवीवर, कामकोटीच्या शंकराचार्यांनी जुद्धाचे एक अरिष्ट नामशेष करणारा, महात्माजींनी भूकंपाचे अरिष्ट नामशेषविणारा; पण झाडूच्या एका झपाट्यासरशी सारेच्या सारे जळमट जसे आपण झाडून टाकतो तशी ती दुर्दैवी भारतावरची सारींच्या सारी अरिष्टे एका पटक्यासरशी लंबी करून टाकण्याचा अत्यद्-भुत शोध साधुशील श्री. चौंडेबुवांनी लावला! गोरक्षक—नव्हे, चुकलो! (मनुष्याने रक्षावी अशी गो म्हणजे कोणी दुबळा पशू आहे असा त्याचा अर्थ होऊन त्या गोदेवीची विटंबना होते; यास्तव मनुष्याने जिची सेवा करावी अशा त्या गोदेवतेचे—)

गोसोवक चौंडेबुवा ह्यांनी अगदी अलीकडेच प्रतिज्ञेवर उद्-बोधिले आहे की, तर आम्ही भारतीय लोक त्रयोदशाक्षरी दिव्य मंत्राच्या, सगळे मिळून का होईना, पण एक कोटी जपाची संख्या भरून देऊ तरSS—तर काय? अहो, सर्वारिष्टशांती होईल. सारीच्या सारी अरिष्टे अकस्मात नाहीशी होतील. प्लेगने पिसूदेखील मरेनाशी होईल. भूगर्भातील पंचभूतांची सारी अव्यवस्था नि ढकलाढकली नाहीशी होऊन भूकंप असा होणार नाही. गेल्या दोन्ही भूकंपातील पडलेली लाखो घरे, देवळे पुन्हा आपली आपण होऊन उभारलेली दिसतील. शेतकरी ऋणापासून, साखरेचे कारखाने जकातीपासून, मिठागरे करांपासून, माणसे ढेकणांपासून नि गायी गोचिडांपासून मुक्त होतील. ज्वालामुखी थंड होतील, चुलीवाचून दुधे साय येईतो तापतील. कोणी आजारी पडणार नाही, कोणी मरणार नाही. दुष्काळ, दारिद्र्य, पारतंत्र्य, पांजरपोळ—अरिष्ट तितुके नष्टे. केवळ बसल्या बसल्या ‘श्रीराम जयराम जयजयराम’ हा त्रयोदशाक्षरी मंत्र एक कोटी संख्या सगळ्यांनी मिळून जपला की झाले! त्या जपास मोजण्यासाठी माळादेखील श्री. चौंडेमहाराज चहूकडे पुरवीत आहेत!

खरोखर, आजच्या साऱ्या प्रकल्पात नि संशोधनात या चौंडेबुवांच्या शोधाने उच्चांक (रेकॉर्ड) पटकाविला आहे! आजपर्यंत संशोधनाच्या चढाओढीत युरोपने केलेला रेकॉर्ड,--पटकावलेला उच्चांक—मोडून टाकला !

## १.७ उच्चांक म्हणजे रेकॉर्ड

ओघातच आले यास्तव या ‘उच्चांक’ शब्दाचे बारसे इथेच साजरे करू. भाषाशुद्धीच्या आंदोलनाने महाराष्ट्रापुरती तरी शिक्षित जनतेची प्रवृत्तीच पुष्कळ अंशी बदलून टाकून लिखित भाषेत तरी शक्यतो अनावश्यक परकी शब्द निदान यापुढे येऊ द्यावयाचा नाही, असा पुष्कळ जणांचा निश्चय होत आहे, ही समाधानाची गोष्ट आहे. या विषयाचा ऊहापोह सारखा चालू ठेवून नवे नवे शब्द सुचवीत राहिले पाहिजे. जे गुणांनी टिकतील ते जगतील, या हेतूने आम्ही मधून मधून या विभागात तसा प्रघात चालू ठेवणार आहोत. आज ओघानेच आलेला हा उच्चांक शब्दच चर्चेला घेऊ.

अमक्याने पोहण्यात आजपर्यंतचा रेकॉर्ड मोडला, कुणी धावण्यात रेकॉर्ड पटकाविला, असे प्रयोग वृत्तपत्रांतून नि बोलण्यांतून प्रत्यही येऊ लागले आहेत. या वेळीच नवीन स्वकीय तदर्थक शब्द प्रचारला तर तो तोंडी बसेल, नाहीतर पाच-पंचवीस वर्षांत हा ‘रेकॉर्ड’ शब्दमराठीत तर काय, पण संबंध हिंदुस्थानातील भाषांत रेकॉर्डला स्वकीय शब्द रूढ नाही ! पण आपम काढला नि रूढविला तर सगळे घेतील. हुतात्मा, जुळारी (compositor), विश्वस्त (trusty), स्तंभ (column), अद्ययावत, बोलपट, विधिमंडळ असे कितीतरी शब्द गेल्या सहासात वर्षात मराठीत आम्ही रूढविताच हिंदुस्थानभर फैलावले. रेकॉर्डच्या प्रतिशब्दाची ही उणीव सर्वांस तशीच भासत आहे. म्हणून रेकॉर्डला, प्रवीणतेतील जास्तीतजास्त अंक या अर्थी, ‘उच्चांक’ हा शब्द आम्ही सुचवीत आहोत.

कोणताही शब्द कितीही बोधक असला तरी रूढविल्यावाचून कानास नि मनास चपखल भासत नाही. उलट टाकाऊ अर्धवट अर्थाचा शब्ददेखील एखाद्या अर्थी वापरीत गेले, रूढविला की समर्पक वाटू लागतो. रेकॉर्ड हा इंग्रजी शब्दच घ्या. किती गोंधळ्या आहे पाहा ! रेकॉर्ड म्हणजे नोंदीचे दफ्तर ; रेकॉर्ड म्हणजे ध्वनिलेखाची तबकडी—जसे बालगंधर्वाचे रेकॉर्ड म्हणजे त्यांच्या गाण्याची फोनो प्लेट ; रेकॉर्ड म्हणजे प्रवीणतेतील पहिला क्रमांक. असे तीन भिन्न अर्थ. रेकॉर्ड मोडले म्हणजे ती फोनो प्लेट फुटली की रेकॉर्ड ऑफिसातील फळी कोसळली की पहिला क्रमांक छिनावला गेला ? पण रूढीने संदर्भाप्रमाणे अर्थ चटकन ध्यानात येतो इतकेच. तसेच वरील अर्थी रेकॉर्डचा ‘उच्चांक’ शब्द राखून ठेवून त्याच अर्थी वापरीत गेलो की, तोही त्या अर्थी अगदी चपखल बसू लागेल, अगदी तोच भाव व्यक्तवील.

## १.८ कायदा म्हणजे निर्बंध

या अंकापुरता दुसरा शब्द जो आम्ही वाचकांपुढे प्रामुख्याने धरू इच्छितो तो ‘निर्बंध’ हा होय! निर्बंध म्हणजे कायदा. ही अगदी आम्हास लाजिरवाणी गोष्ट आहे नव्हे की काय की, आपल्या कोणत्याही हिंदू भाषासंघात—बंगाली ते तामीळपर्यंत— ‘कायदा’ (law) ह्या समाजाच्या अस्तित्वाचा पायाच असलेल्या पदार्थांस स्वकीय शब्द उरला नाही ! जणू काय मुसलमान हिंदुस्थानात येईतो आम्हा हिंदूंस कायदा असा पदार्थच माहित नव्हता, केवळ रानटी कळप काय ते या देशात वावरत ! सगळ्या मनुष्य जातीतील आज उपलब्ध असा आद्य नि महत्तम धर्मकार (Law giver) जे मनू भगवान ते ज्या भारतीयांचे धर्मकार (Law giver), त्यांच्यातच Law ला स्वतःचा शब्ददेखील उरू नये ! ही लज्जेची जाणीव कायदा शब्द उच्चारताच मनात सुरीसारखी बोचली पाहिजे. यास्तव कायदा (Law) ह्या परकी शब्दाच्या ठायी ‘निर्बंध’ हाच शब्द वापरावा. गेली चार-एक वर्षे कित्येक लेखक नि संस्था तो वापरीत आहेत. कायदा या शब्दाचे जे धेडगुजरी समास आज ऐकताच वीट आणतात त्यापेक्षा ह्या निर्बंध शब्दांची —रूपे नि समास किती हृद्य लागतात ते पाहाः

कायदा— निर्बंध

कायदेपंडित— निर्बंधपंडित

कायदेशीर—नैर्बंधिक

बेकायदेशीर—अनैर्बंधिक

कायदेशास्त्र— निर्बंधशास्त्र

कायदेविभाग— निर्बंधविभाग

*—मनोहर मासिक, ऑगस्ट १९३५*

७ . उच्चांकांची साथ

आमचे मित्र बॅ. खाजगीवाले यांनी लंडनपर्यंतच्या मोटारप्रवासाच्या त्वरेत जागतिक उच्चांक पटकावला, रेकॉर्ड केले. त्या वेळेपासून कित्येक प्रकरणी जो तो हिंदी स्पर्धाळू जगाचे जुने उच्चांक मोडून नवे उच्चांक प्रस्थापीत आहे, जगावर ताण करीत आहे !

त्यातही एक विशेष गोष्ट ही की, धावणे, लढणे, जिंकणे, शोधणे (discover), कल्पिणे (invent) प्रभृती ज्या ज्या विषयांना उच्चांक पटकाविण्यासाठी जग निवडते त्याच त्या जुन्या पुराण्या विषयांत आमचे स्पर्धाळू चढाओढ करण्याची गतानुगतिकता दाखवित नाहीत; तर आमच्या विशिष्ट आर्य संस्कृतीस शोभतील अशी पराक्रमाची क्षेत्रेदेखील नवीनवीच निवडीत आहेत! जगावर ताण करण्याचे विषय निवडण्यातदेखील उच्चांक पटकावीत आहेत! आमच्या ह्या गर्वोक्तीला कुणी युरोपियनाने स्वराष्ट्राभिमानाची पोकळ वल्गना म्हणू नये, यासाठी आम्ही वरील विधानांना समर्थविणारी काही उदाहरणेच खाली देतो. युरोपचे एकमेकांवर ताण करण्याचे नेहमीचे टाकाऊ विषय म्हणजे विमानोड्डाणे, ध्रुवसमुद्रोल्लंघने, दिग्-विजय, विषारी वायू शोधणे, दूरध्वनी, दूरदर्शनी, (टेलीफोन, टेलिव्हिजन) बिनतारी प्रभृती यंत्रे उद्-भविणे अशा ठराविक पद्-धतीचे असतात. पण आमच्या स्पर्धाळूंनी उच्चांक पटकावण्याच्या विषयांच्या निवडणूकीतच कसा उच्चांक पटकावण्याचा धडाका उडविला आहे पहा. युरोप निवडते त्या सोप्या विषयांना तुच्छवून किती दुर्घट क्षेत्रेच स्पर्धेसाठी आमच्या वीरांनी निवडली आहेत बघा!

एका वीराने गोस्तुती हाच अतिदुर्घट विषय स्पर्धेसाठी निवडला. गोरक्षण पत्राच्या प्रमुख मुखपृष्ठावरच धेनूचे, तेहतीस कोटी देवांच्या रेटारेटीने पंढरीच्या यात्रेस निघालेल्या तिसऱ्या वर्गाच्या डब्यास लाजविणारे, एक सुशोभित चित्र छापून त्यावर मोठमोठे मथळे दिले आहेत.

‘विश्वाची अनभिषिक्त राज्ञी ! जगज्जननी! आदिदेवता! श्रीं गोमाता! विश्वाचे कल्याण करो! !’

कोणास वाटेल, आम्ही गोस्तुतीचे हे काल्पनिक विडंबन करीत आहो! तो आक्षेप येऊ नये म्हणून त्या गोमातेचा नि रोमहर्षक गोरूपधारी मुखपृष्ठाचा तिथी तारखेसह पत्ता देतो. नाही तर रामायण ही इजिप्तमधली कथा आहे असा शोध लावणारा कोणी भावी जाडा ऐतिहासिक ही गोगीता नि गोचित्र लोहयुगीन अमेरिकेच्या जंगलातील कोण्या रेड इंडियनाच्या अर्थशून्य छाछूंतले वाङमयचौर्य होय, असा तर्क लढवू लागायचा! यास्तव स्पष्ट सांगून ठेवतो की, ‘गोरक्षण’ मासिकाच्या शके १८ ५ ७ व्या वर्षाच्या आषाढ वद्य १ बुधवार ह्या शुभमुहूर्ती दि. १७ जुलै १९ ३५ ला निघालेल्या अंकात हे गोचित्र नि ही गोगीता प्रकटली आहे, अगदी या विसाव्या शतकातला तो एक अपूर्व शोध आहे—छाछू नव्हे!

पवित्र गाय ही बैलाची काय जननी मानली जाई. पुढे असा शोध लागला की, ती हिंदूंचीच जननी आहे. आता त्याही शोधास मागे टाकणारा हा शोध लागला आहे की, ती अवघ्या ‘जगायी जननी’ आहे! ‘जगज्जननी’ आहे! !

प्रथम गाय ही बैलाची राज्ञी होती. पुढे काही गोशाळांतील गोठ्यांची राज्ञी झाली. आता तिचे हे साम्राज्य वाढता वाढता ‘श्रीमती गोमाता’ ‘विश्वाची अनभिषिक्त राज्ञी’ झाल्याची ही ताजी तार आली आहे! ती गोमाता अजून अनभिषिक्तच कां राहिली आहे, एवढे काय ते कळले नाही. क्वचित् गायीला वेदोक्ताचा अधिकार आहे किंवा नाही याचा वाद शिवछत्रपतींच्या राज्याभिषेकाच्या वेळी खो घालणाऱ्या कोणा पैठणच्या पंडितांनी काढला असल्याचा तो ठिकठिकाणी जिरवून त्या गोमातेचा वेदोक्त राज्याभिषेक पार पाडणारा गागाभट्ट गोरक्षण वृत्तपत्राच्या कार्यालयात अजून सापडला नसेल. तसा कोणीतरी लवकरच सापडो आणि अजून अनभिषिक्तच राहिलेली ती श्रीमती गोमाता’ ‘विश्वाची अनभिषिक्त सम्राज्ञी’ ही एक-दोन अंकातच होवो; हीच ‘विश्वा’ची उत्कट इच्छा केव्हाही असणारच!

ह्या गोपुराणात वर्णिल्याप्रमाणे श्रीमती गोमाता ही सूर्य, चंद्र, तारे, पृथ्वी, वायू, विषू प्रभृती यच्चयावत जगाची ‘जगज्जननी’ नि यच्चयावत देवांची ‘आदिदेवता’ आहे असे आम्ही सनातनी लोकच काय ते म्हणत नसून ह्या गोगीतेला केवळ ‘वेदोक्ता’चाच आधार आहे असे नसून ‘साहेबोक्त’ ही तेच म्हणत आहे, हे सिद्ध करण्यासाठी अमेरिकेतील कोण्यातरी फाटक्यातुटक्या साहेबाचा कुठला तरी पण इंग्लिश भाषेतील उतारा मात्र आता ‘गोरक्षण’ मासिकाच्या येत्याच अंकात प्रसिद्ध होणे आवश्यक आहे! पण ते अवघड कृत्य करू धजल्यास जो एकच पंडितप्रवर काय तो करू धजेल, तो पंडितप्रवर म्हणजे आपले समाजशास्त्रज्ञ श्रीयुत गो.म.जोशी, बी. ए. (ऑनर्स) ! ! गोठ्यात बांधलेल्या गाईला ‘हे जगज्जननी! हे आदिदेवते! हे विश्वाची अनभिषिक्त राज्ञी ! श्रीमती गोमाते !’ असे संबोधिणारा कोणीतरी साहेब अफाट अमेरिकेत श्री गो.म.जोश्यांसारख्या समाजशास्त्रज्ञास सापडलाच पाहिजे. सारी अमेरिका धुंडाळण्यास वेळ नसलाच तर श्री. जोशीमहाशयांनी अमेरिकेतील दोन-चार प्रतिष्ठीत भ्रमिष्टालये (lunatic asylums) तेवढी जरी धुंडाळली तरी काम भागेल.

गाय ही ‘जगज्जननी’ आहे हा शोध असा लागल्यामुळे अनेक अद्याप अज्ञात गूढे उकलणे आता अगदी सोपे झाले. सूर्य, चंद्र, पृथ्वी ह्यांचा पिता ‘कावळा’ होय असे उत्तर ध्रुवाकडील काही आदी मानवजाती ( ज्यांना उर्मट लोक रानटी किंवा अडाणी जाती म्हणतात.) त्यांच्या धर्मकथांतून सांगितलेले आहे. अर्थात जगाचा पिता ‘कावळा’ हा शोध लागलेला होता. पण सूर्य, चंद्र, पृथ्वी यांची जननी कोण हे गूढ काही अद्याप सुटले नव्हते. ते आता ह्या ‘गोरक्षणा’ च्या अंकाने निर्विवादपणे सोडविले आहे. जगत्पिता जसा ‘कावळा’ तशीच जगज्जननी जगन्माता ‘गाय’! सूर्य, चंद्र, पृथ्वी सारी त्या गायीच्या पोटी जन्मलेली गाईची वासरे होत. तिच्या दुधावर ती वाढली. गोदुग्धाचा महिमाच तसा आहे! चंद्र इतका सात्विक, थंड, शीतल, शांत कां, तेही आता स्पष्ट झाले. तो गाईचे दूध त्या जननीचे, गोमातेचे धारोष्ण दूध नियमाने पोटभर पीत असला पाहिजे. सूर्यही गाईचेच वासरू; मग तितका सात्विक शीतळपणा कां नाही त्याच्या अंगात? अशी कडकी कां? म्हणून जर कोणी पाखंड बाष्कळपणे शंकेल, तर त्याचे तोंड कोणताही धेनुदास तत्काळ बंद करील की, ‘तो देष

गाईच्या दुधाचा नाही!  सूर्य, जिच्या पोटी जन्मला, त्या गाईचे दूध पिणे सोडून हळूहळू चहा पिण्यास सोकावला आणि त्या दुष्ट चहाच्या व्यसनामुळेसूर्याच्या अंगात अशी कडकी, जळजळ नि हाडीताप मुरला!’ केतूने मधून मधून ग्रासण्याइतका सूर्य दुर्बल जो झाला तोही याचमुळे.  ज्या दिवशी त्या अमृताचा एक बिंदू केतूच्या तोंडात पडला नि तो बळावला त्याच दिवशी जर सूर्य चहा न पिता गायीचे दूध प्याला असता तर तो केतूला हार जाता ना, हे उघड आहे.  कारण अमृत झाले तरी साऱ्या ‘जगाची जननी’ जी ‘आदिदेवता’ गोमाता तिच्या गोरसापेक्षा अधिक सत्वस्थ असणे शक्यच नाही!

गाय ही जगज्जननी आदिदेवता आहे ही महासत्ये कळण्याइतकी बुद्धी एकदा सत्वशुद्ध झाली की, वरील गूढे उकलण्याइतकी ती कुशाग्रही झालीच पाहिजे! !

आम्हीही आमच्या धेनुदासवर्गाने जगाशी स्पर्धा करण्यासाठी अगदी अपूर्व आणि आमच्या सनातनपणास साजेल असे हे गयाळपणाचे क्षेत्र निवडून गाय ही जगज्जननी नि आदिदेवता आहे, हा अत्युद्-भुत शोध लावला नि गयाळपणात ‘उच्चांक’ पटकावला, गयाळपणाचे ‘रेकॉर्ड’ केले, याविषयी ‘गोरक्षण’ वृत्तपत्रास मनःपूर्वक अभिनंदितो.

आणि आमच्या गोठ्यात खुंट्याशी बांधून ठेवलेल्या ह्या गाईस त्या ‘गोरक्षण’ पत्रातील गोगीतेच्या शेवटच्या मंत्रास अनुसरून प्रार्थितो की, ‘हे विश्वाची अनभिषिक्त राज्ञी !  विश्वाचे कल्याण कर ! एक दोन त्वर्य (urgent) गाऱ्हाणी तर आजच्या आज दुरवीव.  पहिले गाऱ्हाणे हे की, ही बिचारी पृथ्वी सारखी युगोयुगे गरगर फिरत आहे, तिला भोवळ येईल !  यास्तव तिला आमच्या मानवांवर त्याचा काही अनिष्ट परिणाम होवू न देता, गिरणीकामगार संघाच्या मागणीप्रमाणे प्रत्यही एक तास स्वस्थ बसून वुसावा घेण्यासाठी सुटी द्यावी आणि दुसरे गाऱ्हाणे हे की, ध्रुवाला, पृथ्वीच्या उलट, जी एकाच जागी युगोयुगे डांबून ठेवण्याची आमच्यासारखी स्थलबंदीची शिक्षा झालेली आहे, ती रद्दवून मरणाच्या आधी एकदा तरी निदान चारी धामाची यात्रा करून घेण्याची अनुज्ञा द्यावी !  हे माठ्या गोठ्यात बैलासह खुंट्याशी बांधून टाकलेले गाई, तू विश्वाची अनभिषिक्त सम्राज्ञी आहेस ! विश्वाचे कल्याण कर !  तुला ह्या गवताच्या नि कडब्याच्या पेंड्या मी प्रत्यही पोटभर खावयास देईन ! !’

गाय ही जगज्जननी नि आदिदेवता होय हा शोध लावून गयाळपणात ‘गोरक्षण’ पत्राने जसा जागतिक उच्चांक पटकावला, तसाच दुसऱ्या एका तितक्याच अपूर्व क्षेत्रात दुसरा एक जागतिक उच्चांक पटकैवण्यासाठी नारायणमहाराज केडगावकर यांनीही कंबर कसली आहे.  जगात आजवर पुष्कळ सत्यनारायण झाले ; पण एका बैठकीस चौरंगीस चौरंग भिडवून दोन हजार सत्यनारायण एकसमयावच्छेदे साजरे करण्याची धमक कोणाही मायेच्या पूताने आजवर दाखविली नव्हती !  तो विक्रम नारायणमहाराज हे करून सत्यनारायणीय उच्चांक पटकावणार आहेत !

ही बातमी ऐकताच सारी अमेरिका नि युरोप गर्भगळीत व्हावे यात काय आश्चर्य ! सत्यनारायणाच्या पोथीत एकेका सत्यनारायणासरशी एकेका राजाने आपले गेलेले एकेक राज्य परत

जिंकले अशा कथा आहेत. सत्यनारायणाचा हा प्रताप माहित असलेल्या युरोप-अमेरिकेला एका सत्यनारायणाने एक राज्य या दराने दोन हजार सत्यनारायणांनी किती, हेच त्रैराशिक सहज सुचले आणि आता आपल्या राष्ट्राचे होणार तरी काय, केडगावकर किती राज्ये जिंकणार, म्हणून ते थरकापू लागले !

वेडे बिचारे युरोपियन ! जडवादी राज्याचे भुकेले ! त्यांना काय माहित की, आम्ही या अशा राज्याराष्ट्रांसारख्या तुच्छ नि आचरट गोष्टींचे लालसू नाही ! पूर्व युगातील गोष्टी पोथीत दिल्या आहेत, त्या वेळी आमच्या लोकांना तसे सकाम सत्यनारायण करण्याची खोड असे. पण त्या सकाम भक्तीचाच विकास नि उदात्तीकरण (Sublimation) होऊन आमची आजची भक्ती पूर्ण निष्काम, अगदी निकम्मी झालेली आहे ! काहीतरी लाभ व्हावा अशी तुच्छ सकाम बुद्धीने आम्ही हे सत्यनारायण मुळातच करीत नाही. हे पाच-पन्नास हजार रूपये जर काही लाभासाठीच आम्हास खर्चायचे असते तर आम्ही ते त्या डॉ. मुंजांच्या ज्या सैनिक विद्यालयास इंग्रजांच्या सरसेनापतीनेसुद्धा ‘हूं, करीतच आहात ; करा !’ असे सांगितले, त्याला नसती का एवढी मोठी रक्कम दिली ? किंवा ज्या आमच्या हिंदू अर्भकांना कोणी पाळीना म्हणूनच परधर्मीयाच्या खईत ढकलावे लागते, त्या अनाथ लेकरांना वाचवून हिंदू धर्माच्या दृष्टीनेही एक अत्यंत धार्मिक नि परोपकारी कृत्य करण्यासाठी त्या रकमेत एक अनाथालय आम्हास स्थापता आले नसते का ? पण त्या प्रकारचे धर्मकृत्य करण्यात मोठे व्यंग हे असते की, तीही जरी ईश्वरभक्तीच असते तरी ती सकाम होते. तशा धर्मकृत्याने पुण्य लागते. पण राष्ट्रास त्या योगे जो प्रत्यक्ष लाभही होतो, ते पाप टाळता येत नाही ! याचसाठी आम्ही दमडीचादेखील राष्ट्रीय वा ऐहिक लाभ असा ज्या धर्मकृत्याने साधणे अशक्य आहे आणि म्हणूनच जे अगदी निष्काम, अगदी पूर्णपणे निकम्मी, अशी भक्ती केल्याने पुण्य आमच्या पदरी पाडू शकते असे हे दोन हजार सत्यनारायणांचे धर्मकृत्य शोधून काढलेले आहे. ह्या महान व्रताची मूळ प्रतिज्ञाच अशी करावी लागते, मुख्य संकल्पच असा सोडावा लागतो की, ‘हे पाच-पन्नास हजार रूपये मी अगदी निष्काम नि निकम्म्या कृत्यांतच देवाच्या नावे खर्चीन; दोन हजार अनाथ हिंदू लेकरांच्या हृदयातही नारायणाची भावना मला ठेवता येईल, त्या अर्भकांना संतोषविण्यातच नारायणाचा संतोष मानता येईल. नरांतच नारायणाची अभिव्यक्ती, प्राणप्रतिष्ठा अत्यधिक उत्कटत्वाने संभवते हे भगवद्-वचनही मला स्मरते, पण तरीही मी ते कृत्य, उपयुक्त असल्यामुळेच टाकाऊ समजून, तांब्याच्या निर्जीव अशा दोन हजार गडव्यांनाच देवाचे प्रतिक मानणार, नि त्या गडव्यांनाच नारायण म्हणून पुजणार, फुले, नैवेद्य अर्पिणार! !’ जी कामास येईल ती भक्ती कसली! ती सकाम, हिणकस! जी अगदी निष्काम, अगदी निकम्मी, ती भक्ती खरी! !

गयाळ गोरक्षणकरांनी जसा तो एक जागतिक उच्चांक पटकावला; दमडीचादेखील लाभ ज्यायोगे साधणारा नसल्यामुळे जे सर्वस्वी निष्काम, अगदी पूर्णपणे निकम्मी आहे, असे दोन हजार सत्यनारायणांचे धर्मकृत्य शोधून काढण्यात जसा नारायणमहाराजांनी हा दुसरा जागतिक उच्चांक पटकावला; तसाच मुंबईचे चांभार पुढारी श्री देवरूखकर यांनीही धर्माच्या सत्यस्वरूपाची व्याखअया करण्याच्या कार्यी तिसरा एक उच्चांक पटकाविला आहे! उच्चांक पटकावण्याची हिंदुस्थानात सध्या एक साथच आली आहे!

वेद मानील तो वैदिक धर्म, कुराण म्हणेल तो मुसलमान धर्म, बायबलात आहे तो ख्रिश्चन धर्म अशा अनेक विचित्र नि बुद्धिहीन व्याख्या आजवर धर्म शब्दाच्या झाल्या. पण बुद्धीला वेदांतले वा कुराणातले वा बायबलातले काही पटले नाही. प्रत्यक्षाने धडधडीत खोटे पडणारे विधान ह्या पुस्तकांमध्ये सापडले तरी तोही धर्म मानायचा काय? या अडचणीमुळे धर्माच्या वरील व्याख्या फोल ठरत. पण आता देवरूखकरांनी धर्माची अशी एक सुटसुटीत, बुद्धीला ग्राह्य, प्रयोगक्षम व्याख्या केली आहे की, ती अगदी एखाद्या बाजारभावासारखी रूपये-आणे-पैत रोखठोक मोजून घ्यावी द्यावी!

मोक्ष-मुक्ती, स्वर्ग-नरक, द्वैताद्वैत, फार काय देव आहे की नाही, अशा कठीण नि शुष्क सालपटांत नि कवचांत धर्माचा गीर आजवर बंद झालेला असल्यामुळे तो सालपटे नि कवचे सोलण्यात नि फोडण्यातच मनुष्य बेजार होई; धर्माचा जो सरस गीर तो हाती येण्याच्या आधीच मनुष्य मरून जाई. पण देवरूखकरांनी केलेल्या धर्माच्या व्याख्येची ही गंमत आहे की, तिच्या मंत्रोच्चारासरशी मोक्ष-मुक्ती, देव-देवतांच्या शुष्क नरोट्या, सवच्या नि सालपटे झटकन आपोआप गळून धर्माचे खोबरे तेवढेच हाती येते, खरोखरच देवरूखकरांनी धर्माचे आगदी खोबरे केले!

त्यांनी मुंबईस एका व्याख्यानात सांगितले की, “हिंदू धर्मास मी सोडणार; मुसलमानी, ख्रिस्ती वा कोणताही दुसरा धर्म स्वीकारण्याच्या आधी मी मुख्यतः हे पाहीन की, त्या धर्मात गेल्याने आम्हास आज मिळाले आहे, त्याहून शेकडा अधिक प्रतिनिधित्व, शेकडा अधिक मते विधिमंडळात मिळतात की नाही? ज्या धर्मामुळे विधिमंडळात अधिक मतदारी आम्हास मिळेल, तो धर्म मी स्वीकारणार! ”

म्हणजे देवरूखकरांस जो शेकडा अधिक मतदारी देईल तो धर्म, तो स्वीकारणीय धर्म, खरा धर्म!

वा रे वा! धर्माची कशी काटेकोर व्याख्या, कशी बावन्नकशी कसोटी शोधून काढली आहे ही! जो मुक्ती देईल तो, जो देव दाखवील तो, जो आत्मविकास करील तो, कुराणात वा पुराणात आहे तो, अशा गौडबंगाली छा-छूंच्या व्याख्यांमुळे धर्म म्हणजे नक्की काय हे एकासही कळत नव्हते. कारण आत्मा काय, मुक्ती काय, देव काय, हेच कळणे कठीण! त्या व्याख्या, कसोटी, ती धर्म मोजायची मापेच जर धुक्याची घडलेली तर धर्म तोलून, तासून, पारखून आजवर घेताच येत नसे यात काय आश्चर्य!

पण आता ती अडचण संपली. अगदी अंकगणितीय काटेकोरपणे, अगदी दरसाल दरशेकड्याच्या कसोशीने आता धर्म पारखून घेता येईल. तुझा धर्म किती पैशा पासरी बोल, असे आता रोखठोक विचारता येते! खरा धर्म कोणता? तर देवरूखकरांस शेकडा अधिक मतदारी देईल तो! अधिकांत अधिक शेकडा मतदारी बौद्ध होऊन मिळेल तर बुद्ध धर्म खरा; ख्रिश्चन होऊन मिळेल

तर ख्रिश्चन धर्म खरा; मुसलमान होऊन मतदारी शेकडा अधिक मिळेल तर मुसलमानी धर्म खरा ! ! !

बघू या आता देवरूखकरमहाशयांनी पुकारलेल्या या लिलावात कोण अधिक बोलतो ते—बुद्ध की जीजस, की महंमद !

धर्माचे निश्चित सत्यस्वरूप ठरविण्याच्या आजपर्यंतच्या साऱ्या प्रयत्नांवर ताण करून देवरूखकरांनी जागतिक उच्चांक पटकावला खरा !

पण एक गोष्ट मात्र त्यांच्या धर्मनिर्णयाच्या या युगांतरकारी व्याख्यानात जरा घोटाळ्याची वाटते. ‘ज्यात आम्हास अधिक प्रतिनिधित्व, विधिमंडळात अधिक मतदारी मिळेल, तो धर्म मी स्वीकारीन,’ अशी महनीय नि महोदर घोषणा केल्यानंतर ते जे लगेच म्हणाले म्हणतात की, ‘मी सध्या कुराण नि बायबल आणून अभ्यासीत आहे’ त्या वाक्याचा अर्थ काय? का त्यांच्या व्याख्यानाचे पआतिवृत्त छापण्यात ते वाक्य त्यांच्या तोंडी चुकीन घातले गेले?

‘माझा धर्म स्वीकारताच मुंबई विधिमंडळात किंवा अमक्या तमक्या जिल्हाबोर्डात अमुक शेकडा मतदारी मिळेल,’ असे कुराणात वा बायबलात कुठेतरी सांगितलेले असलेच पाहिजे असा का दिवरूखकरांचा समज आहे? कोणता धर्म स्वीकारला असता मुंबई विधिमंडळात शेकडा अधिक मतदारी मिळते, याची माहिती त्यांना बिचारा महंमद वा मनू वा जीजस कशी पुरविणार ? ती त्यांनी कुराणाच्या पत्यावर न मागविता गव्हर्मेंट हाऊस, बॉम्बे (पोलिटिकल डिपार्टमेंट) या पत्यावर मागवावी !

पण ज्या अर्थी देवरूखकर प्रभृती मंडळींनी बायबल-कुराणांची एकेक प्रत आणविलीच आहे, त्या अर्थी त्यांनी ती समग्र वाचावी हेच ईष्ट. कारण हिंदू धर्माप्रमाणे आमच्या मुसलमानी धर्मात वा ख्रिस्ती धर्मात विषमता अशी नाहीच, आमचा धर्म सर्व माणसे समसमान मानतो, असे जो तो मौलवी नि मिशनरी जे गर्जत राहिला आहे, ते किती सत्य आहे, ते तरी त्यांना कळून चुकेल ! दुसरे तिसरे प्रश्न सोडले तरी त्यांनी गुलामगिरीची प्रथा त्या धर्मांनी संमतिली आहे की नाही येवढे जरी पाहून ठेवले तरी मानव समतेचा टेंभा त्या धर्मांनाही मिरविण्याचा किती हक्क आहे हे स्पष्ट होईल ! मुसलमानी धर्माप्रमाणे एकाच नव्हे तर हजारो माणसांना, गुलाम म्हणून भर बाजारात वांगी विकावि तशी, मुसलमान बादशाह, अमीर, मौलवी तर काय, पण प्रत्येक प्रतिष्ठित घरधनी विकत देऊ-घेऊ शकतो. मुस्लिम सेनापतींनी जिंकलेल्या लढायांतील सारे पाडाव केलेले लोक त्यांचे गुलाम म्हणून त्यांना धर्माज्ञेप्रमाणेच धरून नेण्यास प्रत्यवाय नाही. आणि त्याप्रमाणे आफ्रिका, एशिया, युरोपमधील हजारो बिनमुसलमानी म्हणजेच ‘काफर’ स्त्रिया-पुरूष, बाल-बालिका मुसलमानांनी गुलाम करून विकलेल्या आहेत, राबविलेल्या आहेत, ह्याची मुसलमानी इतिहासातील पान नि पान साक्ष देत आहे. जी माणसे गुलाम म्हणून पाडाव झाली, ती धर्मशासनाप्रमाणेच त्यांच्या धन्याची ‘मत्ता’—जसे पशू तशी मत्ता—होई. पुरूष गुलामाला बायकोचा हक्क नसे, स्त्री गुलामाला नवऱ्याचा

हक्क नसे. म्हणजे त्यांना कौटुंबिक जीवनाची स्वतंत्रता नसे. त्यांची मुले त्यांच्या धन्याची मत्ता, जशी आपल्या गोठ्यातील गाईंची वासरे आपली मत्ता असते, त्या गाईबैलांची नसते. गुलामाच्या हव्या त्या मुलास धन्याने घरच्या कोंबजीच्या पिलासारखे विकावे, राबवावे, देऊन टाकावे. गुलामांना घर, दार, पैसा स्वतंत्रपणे ठेवण्याचा हक्क नसे. थोडक्यात म्हणजे ती नैर्बंधिकदृष्ट्या (legally as such) माणसेच राहत नसत ! अशा रीतीने लक्षावधी स्त्री-पुरूषांच्या समानतेच्या तर सोडाच, पण माणुसकीच्या हक्कांसही नाकारणारी ही गुलामगिरीची प्रथा मुसलमानी वा ख्रिस्ती धर्मांत सरसहा संमतिलेली आहे ! त्यातही या दोन शतकांत ती दुष्ट प्रथा जी बंद पाडली ती ख्रिस्त्यांनी पाडली ; मुसलमानी धर्मात नव्हे ! मुसलमानी राष्ट्रांना गुलामगिरी बंद करणे भाग पाडावे लागले ! हा इतिहास शाळाशाळांतील क्रमिक पुस्तकेदेखील घोकीत आहेत ; इतकी ही गोष्ट निर्विवाद आहे. आणि ह्या एका उदाहरणावरूनसुद्धा मुसलमानी वा ख्रिस्ती धर्म वा धर्मशासन सर्व माणसांना समान मानते, विषमतेचा त्यांना स्पर्शसुद्धा झालेला नाही, ही घमेंड किती खोटी आहे हे उघड होणारे आहे ?

तेव्हा देवरूखकरांनी सर्व मनुष्यमात्राची समता, धर्मभोळेपणापासून संपूर्ण अलिप्तता, धर्णपुस्तकांच्या पुराणांची वांगी प्रत्यक्ष व्यवहारात खाता येतात ही आशा कोणत्याही हेतूने महंमद वा जीजस वाचावयाची तसदी न घेतली तरी चालेल. धर्म म्हटला की घरोघर मातीच्या चुली ! जिकडे तिकडे पुराणाची वांगी पुराणात, कुराणाची कुराणांत ! ख्रिश्चन-कॅथॅलिकांनी ख्रिश्चन-प्रोटेस्टंटांच्याच उडविलेल्या भयंकर कत्तली नि केलेला धर्मोन्मादी अमानुष संहार नि हालहाल वाचा, नि मग समतेच्या, सहिष्णुतेच्या गोष्टी बोला !

तेव्हा श्री. देवरूखकरांनी समतेच्या कसोटीवर खरा धर्म कोणता ते ठरविण्याचा वेडा नाद सोडून देऊन त्यांच्यापुरती त्यांनी जी फक्कड व्याख्या शोधून काढलेली आहे आणि धर्मशास्त्रीय शोधात जागतिक उच्चांक पटकावला आहे, तीच त्यांनी उचलून धरावी. खरा धर्म कोणता ? स्वीकारणीय धर्म कोणता ! तर जो देवरूखकरांस अधिक मतदारी मुंबई विधिमंडळात मिळवून देईल तो ? आज मुसलमानांस ती मिळते, तर व्हा मुसलमान ! उद्या हिंदूंचा दिवस आला, त्यांना अधिक मतदारी मिळाली, व्हा पुन्हा हिंदू ! हा खाक्या खरा ! !

—*किर्लोस्कर मासिक, १९३६*

८ . धार्मिक छा-छूचा कार्यकारणभाव

मानव जातीवर येणाऱ्या उत्पात-अपघातादिक संकटांपासून बचाव करण्याचे उपाय शोधण्यासाठी अज्ञानाच्या धार्मिक छा-छूची वाट सोडून विज्ञानाच्या कार्यकारणभावांची वाट चोखाळू लागताच त्यांना मनुष्यावर कोसळणाऱ्या एकेका अरिष्टावर कधीही न फसणारा असा एकेक अमोघ उपाय कसा सापडू लागतो पाहा!

## १.९ पाण्यात बुडणारी नौयाने

आजवर महासागरात किंवा नद्यांमध्ये लहानमोठ्या नौका, तारवे, प्रचंड बाष्पनौका बुडून कोट्यावधी माणसे पाण्यात तडफडत मेली असतील! समुद्रदेवतेला प्रसादण्यासाठी नारळ फेकफेकून मचवे हाकारतात; पण तरीही तारू एकदा का फुटले की प्रार्थनांचे पर्वताएवढे बोळे जरी त्यात कोंबले तरी ते भोक बुजत नाही, हा अनुभव मनुष्यास आज हजारो वर्षे सारखा येत आहे. समुद्रात तारवे बुडण्याचे बंद करणारा उपाय अज्ञानाच्या धर्मिक छा-छूत सापडला नाही तो नाहीच! परंतु ती झालेली दिशाभूल मुधारून समुद्रात तारवे बुडतात त्याची सृष्टीशास्त्रीय क्रणे शोधण्यासाठी विज्ञानाची खरी दिशा धरताच तो उपाय मनुष्याच्या आटोक्यात आला.

नौविद्येत हे आश्चर्यकारक परिवर्तन करणारा शोध अमेरिकेतील विदरस्पूनसाहेबांनी लावला असल्याचे अधिकृत वृत्त अलीकडेच प्रसिद्ध झाले आहे. त्यांच्या युक्तीप्रमाणे तारवे नि आगनावा बांधल्या गेल्या तर पाण्यात त्या बुडू शकणार नाहीत, असे त्यांनी प्रयोग दाखवून सिद्ध केल्याचे कळते. त्यांनी तारवांच्या एका खोलीत खाली एक मोठे भोक पाडले. त्यातून समुद्राचे पाणी सों सों करीत आत घुसू लागताच त्यांच्या नव्या वायुयंत्राच्या साहाय्ये त्यांनी इतका वायु आत भरला की, त्या दाबासरशी ते सारे पाणी परत समुद्रात खाली दडपले गेले. भोक तळाशी तसेच्या तसे असता पोलादि पत्र्यासारखा तो वायुचा दाब त्या भोकाचे तोंड बंद करून राहिला होता. त्यावरील दाबामुळे पाण्याचा बिंदूही भोकातून वर येऊ शकेना. अशा प्रकारे जल नि वायू यांची परस्पर झुंज लावून दिल्यामुळे एखाद्या भगदाडासरशी मोठमोठे तारवे नि आगनावा दिसता दिसता समुद्रात बुडण्याचे भय नाहीसे झाले! ही युक्ती जर पूर्णपणे यशस्वी ठरली तर कोट्यावधी रूपयांची मत्ता, वित्त नि प्राण वाचवीत राहण्याचे श्रेय विदरस्पून यांनी सततचे संपादिल्यासारखेच होआल! ज्या विज्ञानाने समुद्राच्या तळाचा ठाव घेऊन तेथील संपत्ती वर आणली, समुद्राच्या तळाशी प्रवास करणाऱ्या पाणबुड्या शोधून काढल्या, आगनावा बनविल्या, ते विज्ञान हजारो प्रवाशांनी गजबजलेल्या टिटॅनिकेसारख्या महानौकांना सहजासहजी गट्ट करण्याची समुद्राची खोडही आज ना उद्या मोडू शकेल. धार्मिक छा-छूने मात्र त्यांपैकी ऐकही गोष्ट साध्य होणे शक्य झाले नाही, कधीही होणार नाही. वेद, कुराण, पुराण वाचा किंवा वाचू नका, तारवाला भगदाड पडून समूद्र आत घुसला की, भट, पाद्री, काजी प्रभृती त्यांच्या वेद-कुराण-

बायबलांच्या प्रतींसह पाण्यात बुडणार. पण भगदाडांनीसुद्धा पाण्याचे तारवे न बुडण्याची वैज्ञानिक क्लुप्ती सापडली की जन्मात प्रार्थना, निमाज न पढणारे ‘नास्तिक’ही तरणार! हा ठाम सिद्धान्त!

असाच एकदा केसाळपणा नि काळेपणा घालविण्याचा उपाय कोणी लवकर काढील का? ब्रह्मी, चिनी, जपानी प्रभृती मंगोलियन लोकांची त्वचा सुवर्णपीत असते. विशोभित केसाळपणा तिच्यावर मुळीच नसतो नि तरीही जे केस सुशोभित ते त्यांच्या मस्तकावर विपुल असतात. तेव्हा केसाळपणा घेलविण्याची सोय निसर्गात आहे हे सिद्धच आहे. ती सोय कशी साधता येते तो कार्यकारणभाव आजून मनुष्यास कळला नाही अतकेच. वास्तविक पाहता युरोपियन स्त्री-पुरूषांच्या त्वचेचे मार्दव, शोभा नि लावण्य केसाळपणाने फार उणावलेले असते. त्यांचे लक्ष हा विशेभित केसाळपणा घालविण्याची युक्ती शोधण्यात पूर्वीच वेधावयास हवे होते. गोरेपणाची गोष्ट थोडी निराळी. कारण थंड वायुमानामुळे युरोपीय रंग उपजत गोरा. त्यामुळे काळा रंग घालविण्याचा प्रश्न आहे. उष्ण वायुमानामुळे ज्यांचा रंग हळूहळू काळा पडत आहे त्या हिंदुस्थानादिक देशांचा. पण आमचे ते देश अजूनही धार्मिक छा-छूंच्या अज्ञानयुगातच गुरफटलेले, सृष्टीवर मनुष्यास शक्य ती ती सत्ता गाजविण्याचे सामर्थ्य देणारे विज्ञानयुग जेव्हा हिंदुस्थानात उगवेल, तेव्हा कोणी हिंदी वैज्ञानिक आमची सगळी मुले गोरीपानच हटकून कशी निपजतील याचा अमोघ उपाय खाडकन शोधून काढील, यात आम्हास फारसा संशय वाटत नाही. कारण सृष्टीत तशी सोय आहे हे प्रत्यक्ष दिसत आहे.

सृष्टीघटकांचे वैज्ञानिक कार्यकारणभाव शोधीत युरोप कसकसे प्रगत नि प्रज्ञ बनत चालले आहे हे काही ताजे दाखले देऊन आम्ही वर जसे दाखविले, तसेच सृष्टिघटनांचे धार्मिक छा-छूतले अज्ञानिक कार्यकारणभाव शोधित आम्ही कसे अधिकाधिक पढतमूर्ख बनत चाललो आहोत ह्याचेही त्याच गेल्या वर्षातले काही दाखले खाली देत आहोत.

## १.१० धार्मिक छा-छूचा कार्यकारणभाव

बिहारमध्ये भूकंप कां झाला? ब्राह्मम, क्षत्रिय, वैश्यादिक लोक, भंगी धेड, डोम यांना शिवत नाहीत म्हणून! क्वेट्ट्याला भूकंपाने एका रात्रीत वीस हजार माणसे मुलाबाळांसह जिवंत पुरून का ठार केली? मनुष्यांच्या ‘पापा’मुळे देव ‘रागावला’ म्हणून! कोणत्या मनुष्यांनी असे कोणते भयंकर पाप केले त्याचा नक्की निर्णय वर्ध्याच्या प्रार्थनामंदिरातील भजनानंतर ऐकू येणारा ‘आतला आवाज’ लवकरच सांगणार आहे! दाभोळे येथे महारवाड्यात भयंकर अशी पटकीची साथ कां उद्-भवली? भूकंपाचा वरील धार्मिक कार्यकारणभाव जितक्या निःशंक धिटाईने वर्ध्याच्या मगनवाडीतील संताने सांगितला तितक्याच निर्णायक स्पष्टपणे दाभोळच्या महारवाड्यातील संतिणीने त्या पटकीच्या साथीचा कार्यकारणभावही सांगितला की, ‘मरीआईचे गेल्या तीन वर्षांचे तीन रेडे तुम्ही अजून बळी दिले नाहीत म्हणून! म्हणून पटकीची साथ आली!’ पटापट माणसे मरणाऱ्या ह्या पटकीवर लस टोचून घेऊ, औषधे पिऊ, का काय उपचार करू? देवऋषीण म्हणाली, ‘देवाला गाह्राणे घाला! टोच

वा औषधपाणी करी नका. शेणाचे तीन पट्टे मी घराभोवती ओढत्ये. त्या पटकीच्या ‘बा’च्याने बी ते ओलांडून घरात येववणार नाही !’

वरील प्रश्नोत्तरे काही चेष्टेचा विषय नाहीत बरे! ती त्या त्या प्रसंगीची एक अत्यंत गंभीर शास्त्रज्ञा आहे! एखाद्या गुरूत्वाकर्षणाच्या सिद्धान्तासारखी ती ती वाक्ये त्या त्या धार्मिक तज्ञांनी निःशंक गांभीर्याने उच्चारली आणि त्यांना वेदवाक्यांप्रमाणे विश्वासणाऱ्यांची संख्या आजही हजारांनी मोजता येईल! ही धार्मिक छा-छू चेष्टा असती तर तिला कोणी कवडीचेही मूल्य दिले नसते. पण ती चेष्टा नाही; ती आज लाखो भोळसटांची प्रामाणिक निष्ठा आहे! ही धार्मिक छा-छू इतकी गंभीर आहे म्हणूनच तर इतकी भयंकर वाटते. तिचे गांभीर्य हेच राष्ट्राच्या बुद्धिभ्रंशाचे मापन ठरते !

## १.११ विडी नि ब्रह्म ह्यांचा कार्यकारणसंबंध

तुम्ही सारा वेदवेदान्त, शांकरभाष्य वाचून, विवंचून पालथे घातले असाल ! फार ग़फार तर तुम्हाला ब्रह्म नि माया यांचा संबंध कळला असेल ! पण जगात आजवर कोणाला तरी ब्रह्म नि विडी यांचा संबंध कळला आहे का ? प्रतिज्ञेवर सांगता येईल की, नाही कळला ! मग ऐका तर. असे निगूढ तत्व गुरूकृपेवाचून कसले कळणार ? ण्हणून प्रथम समित्पाणिर्गुरूमेवाभिगच्छेत् ! यास्तव वऱ्हाडात एक जिज्ञासू श्रीमत् परमहंस तुकडोजीबुवा यांच्या चरणदर्शनार्थ जाऊन अलिकडेच विनविते झाले की, ‘महाराज ! आपण ब्रह्मज्ञानी, कवी परमहंस. आपले हजारो शिष्य. आपण एक मोठा यज्ञ करविलात. हजारो लोकांना अन्नदान दिलेत. अशा आपल्यासारख्या थोर ब्रह्मज्ञान्याने सतत विड्या प्याव्या हे कसे काय ? विडी फार प्यायल्याचा देहावर फार वाईट परिणाम होतो असे म्हणतात !’ या प्रश्नास ऐकून श्रीमत् परमहंस तुकडोजीबुवा ते गूढ कसे उकलवून दाखविते झाले म्हणता ? ते अमरावतीच्या ‘उदय’ पत्रात त्याच्या बातमीदाराने वर्णिलेल्या माहितीवरून सांगू या. महाराज तुकडोजीबुवा अगदी पहिल्या प्रतीचे विडीपिऊ आहेत. भक्तगण विडीमागून विडी चेतवून देण्यात अव्याहत गुंतलेले असतात. कारंजाच्या फवाऱ्याप्रमाणे त्यांच्या मुखातून सतत धुराचा अखंड लोट वाहत असतो. प्रस्तुत बातमीदाराने श्री. नानाराव अमृतकरांच्या बंगल्यावर वरील प्रकारचे प्रश्न विचारले. महाराज तुकडोजीबुवा म्हणाले, ‘अहो विडीचा देहावर वाईट परिणाम होणार तर होवो ! देहाचे काय ? बोलून चालून तो नीशिवंत ! देह पडला तर पडो ; काय चिंता !’ बातमीदार म्हणाला, ‘सत्याकरिता, धर्माकरिता देह पडला तर पडो असे म्हणणे योग्य ठरेल ; पण विडी पिण्यापायी देह पडो, असे म्हणणे योग्य कसे ? उद्या दारुडाही तसेच म्हणेल !’ त्यावर महाराज तुकडोजीबुवा म्हणाले, ‘तुम्ही विडी विडी म्हणजे काय समजता ! ब्रह्मज्ञानाचा प्रवाह तोच विडीचा धूर ! विडीचा धूर ब्रह्मज्ञान घेऊन बाहेर पडतो ! तो अवतीभोवती वाहतो तसे ब्रह्मज्ञान फैलावतो ! ऐका, भजन !’—

‘बिडी में क्या मजा है।

तुमको खबर नहीं।।

नाभी से ऊठ पावे।

ब्रह्मांड घूम पावे।।

ठरठरके दम लगावे।

तुमको खबर नहीं।।'

बातमीदार म्हणतो, 'बुवांचे हे भजन ऐकणाऱ्या अनेक भाबड्या भक्तांना सहजच वाटते, विडीच्या ह्या धुरामध्ये ब्रह्मज्ञानाचा काही गूढ अर्क असेलही रसरसलेला ! नाही कोणी म्हणावे ? त्यांना त्यातही दैवीपणा दिसतो !' त्यावर आमचे इतकेच म्हणणे की, परोपकारात जो पुरूष रत आहे तो विडी पितो म्हणूनच काही असत्पुरूष होत नाही. जोवर कोणी दुसऱ्याच्या विड्या चोरीत नाही किंवा दुसऱ्याच्या तोंडात त्यांचा धूर बळे बळे कोंबीत नाही, तोवर ती एक तुच्छ वैयक्तिक हौस म्हणूनच दुर्लक्षिणे युक्त. पण स्वतःच्या विडी पिण्यासारख्या लहानमोठ्या व्यसनांचे समर्थन ब्रह्मज्ञानाच्या बातांनी करण्यास ज्या लोकांत मोठमोठे महंत धजतात आणि त्यांच्या त्या धूर्त वा मूर्ख शब्दांतही 'दैवी गूढ' भक्तजन शोधीत बसतात, त्या लोकांची बुद्धी, विवेक नि सृष्टिनिरीक्षणशक्ती धार्मिक छा-छूच्या अफूने किती मूर्छिलेली असते ते मात्र लक्षात घेतलेच पाहिजे. ब्रह्मज्ञान्यांच्या विडीचा धूर म्हणे ब्रह्मज्ञान घेऊन पोटाबाहेर पडतो ! वा रे ब्रह्मज्ञान ! वा रे ब्रह्मज्ञान्यांचे सृष्टीज्ञान !

## १.१२ सौभाग्यकांक्षिणी कुमारी कालवडीचे लग्न

धार्मिक छा-छूंच्या कार्यकारणभावाचा आणखी एक ताजा दाखला म्हणून शिक्षितांनी गजबजलेल्या भर उमरावती नगरात घडलेला एका कालवडीचा—एका गो-हीचा—हा लग्नसमारंभ पाहा ! कोणी मिस सेयोने ही बातमी सांगितली असती तर आम्ही तिला आमच्या समाजाची टर करण्यासाठी तिने ती बनावट गोष्ट रचली असली पाहिजे, इतके का आम्ही दुधखुळे आहोत, असे म्हणून चांगली फटकारली असती. पण डॉ. कृ दा. वऱ्हाडदेशपांडे यांच्यासारख्या एका स्वाभिमानी स्वधर्मबंधूनेच ती सहीसह प्रसिद्धिली असल्यामुळे ती नाकारताच येत नाही. ती घटना अशीः अमरावतीतील एका घराण्यात भूतबाधा होत असल्याचा संशय आला. त्यावर काय उपाय योजावा ते ठरविण्यासाठी शास्त्रीमंडळीस पाचारले. धर्मसिंधू, निर्णयसिंधू प्रभृती त्रिकालज्ञ सनातन ज्ञानाच्या विश्वकोशांना चाळून-पाखडून निर्णय देण्यात आला की, या भूतबाधेला एक नंदिकेश्वरच काय ते टाळू शकतील. नंदिकेश्वरास प्रसादविले पाहिजे. त्यांचा उपाय पाहता एक तदर्थक व्रत सापडले. ते हे की, शंकरभगवानांचा नंदी अजून कुवार, त्यामुळे असंतुष्ट. तेव्हा त्याचे पर्तीक कल्पून जर कोण्या वृषाला वरस्थानी योजले नि कालवडीला वधूस्थानी आणि त्यांचे यथाविधी लग्न लावले, तर नंदिकेश्वर प्रसन्न होतात आणि त्या विशिष्ट विधीच्या पुण्याने अशा प्रकारची भूते पळून जातात. ह्या निर्णयानुरूप एक 'सुंदर, खाशी, सुबक, ठेंगणी' गो-ही नि तिला एक 'तरूण, कुलीन गोऱ्हा' असा वर पसंत करण्यात आला. ह्या गोऱ्हामध्ये नंदीची प्राणप्रतिष्ठा होऊन त्या 'नंदीरूपिणे वृषाय' लग्नमंडपात मिरवत आणले. लग्नाच्या आमंत्रणपत्रिका सर्वत्र वाटल्या होत्या. त्याप्रमाणे त्या

बुद्ध्या उभारलेल्या मोठ्या मंडपात पाहुणेमंडळींचा थाट जमला. सीमांतपूजन प्रभृती विधि यथासांग मंत्रघोषासह उरकण्यात आले. गोरजमुहूर्त साधून ती नरमादी लग्नासाठी मंडपात आणली गेली ! आपापल्या शिंगांनी नि शेपटांनी सुशोभित अशी ती वधूवरे मुंडावळी बांधून वरमाला घेऊन उभी असता ‘सावधान शुभ लग्न !’ अशी द्विजांनी चेतावणी दिली आणि मंगलाष्टकांच्या शेवटच्या चरणासरशी वाद्यांचा कडकडाट होत्साता तो विवाह संपादिला गेला ! ! भटांना दक्षिणा दिल्या. वरवधूपक्षांना अहेर झाले. भोजनाच्या पंगती झडल्या. तो जावई नंदी नि ती सौभाग्यवती कालवड गोरक्षण कार्यालयातील गोठ्यात मधुमीलनाचे सुख सध्या लुटीत आहेत ! त्या गोठ्यात गाद्यागिरद्या अंथरलेले पलंगही त्यांना पुरविले आहेत किंवा नाहीत तेवढी माहितीही डॉक्टरमहाशयांनी प्रसिद्धिली असती तर बरे झाले असते !

महारादिक आमच्या स्वधर्मबंधूंच्या मानवी वरवधूंची लग्ने लावण्यास जे भट आपले सोवळे विटाळेल म्हणून जात नाहीत आणि जे मंत्र त्यांची पवित्रता बाटेल म्हणून म्हणत नाहीत, ते भट त्या बैलाच्या लग्नाला गेले, त्या पशूच्या अंगावर शालीपितांबरांसह हात फिरविते झाले, ते संस्कृत मंत्र म्हणते झाले ; आणि हे सारे एक धार्मिक गंभीर संस्कार म्हणून ! आमच्या धर्माचे विडंबन आमचा कट्टर धर्मशत्रुदेखील यापेक्षा अधिक आचरटपणे काय करू शकेल ? धार्मिक छा-छूचे हे अज्ञानयुग संपून हिंदुस्थानात विज्ञानयुग कधी उगवेल ?

*–मनोहर, मार्च १९३६*

## ९ . पुन्हा एकदा गायः हानिकारक धर्मभावना

महाराष्ट्र-शारदेत आम्ही गाय हा निबंध लिहिल्यापासून गोरक्षण कोणत्या दृष्टीने केल्यास राष्ट्राच्या हितास पोषक होईल याची पूर्वी कधीही झाली नव्हती इतक्या कसोशीने नि उत्कटपणे चर्चा चालू झाली.

परंतु गाईविषयी त्या पहिल्या लेखापासून आम्ही जे दहा-पाच लेख लिहिलेत्या सर्वांमध्ये आमचा मुख्य हेतू गोरक्षण संस्थांची सुधारणा किंवा त्यांच्या सुधारणेमुळे राष्ट्राचे धन किती कवड्या वाढू शकेल इतकाच काय तो नव्हता. आपल्या अनेक ‘धर्मिक’ छापाच्या समजुती, श्रद्धा, आचार, व्रतवैकल्ये. रूढी ह्यांच्या मपळाशी पूर्ी केव्हातरी काहीतरी लोकहितास उपयुक्त असा हेतू असला पाहिजे; परमतु हजारो वर्षांमध्ये जगात ज्या उलाढाली झाल्या, त्यामुळे आपल्या हिंदू राष्ट्राच्या परिस्थितीत जे बदल झाले, मनुष्याच्या ज्ञानविज्ञानात युरोप-अमेरिकेसारख्या प्रत्यक्षनिष्ठ नि प्रयोगशील बुद्धिवाद्यांच्या यत्नातही गेल्या दोनशे वर्षांत जी आश्चर्यकारक वाढ झाली, त्या उलाढालींनी बदललेल्या परिस्थितीला तोंड देण्यासाठी त्या वाढत्या विज्ञानाच्या कसोटीवर त्या आमच्या धार्मिक छापाच्या रूढींना नि भावनांना पुन्हा एकदा तासून घासून घेण्याचे, त्यांची बोथट झालेली धार पुन्हा एकदा तीक्ष्ण नि पाणीदार करण्याचे काम गेल्या दीड हजार वर्षांमध्ये तरी म्हणण्यासारखे असे झालेच नाही.

सगळ्या हानिकारक ‘धर्मभावना’ जर कोणती असेल, तर ती ह्या पुरातन आचारांना वा रूढींना वा समजुतींना आजच्या वाढत्या ज्ञानाची नि मिळविलेल्या अनुभवाची कसोटी लावताच कामा नये, ही भ्याड भावना होय! त्या साऱ्या पाच हजार वर्षापूर्वीच्या रूढी नि आचार आहेत. ‘एष धर्मः सनातनः!’ ह्यापुढे कितीही हानिकारक छरत गेल्या तरी त्या बदलताच कामा नयेत, त्यांना कसोटी लावणे हाच अधर्म! कारण त्या प्रत्येक आचारावर नि रूढीवर स्मृतींचा नि श्रुतींचा एकच ठरावीक छाप पडलेलाः ‘एष धर्मः सनातनः!’

त्यातही जर कोण्या अगदी सुधारकी शास्त्र्याने कसोटी लावण्यास अनुज्ञापिलेच तर ती कसोटी म्हणजे एकच—श्रुतीत वा स्मृतीत वा पुराणात कोणत्या तरी पोथीत तो धर्म सांगितला आहे ना? मग त्यामुळे प्रत्यक्ष व्यवहारात लोकांच्या उद्धाराला त्या आचारामुळे खीळ बसली करीही तो ‘एष धर्मः सनातनः!’

या आपल्या भाबडट वृत्तीमुळे आपले सर्व आचार, रुढी, भावना हे ‘धार्मिक’ आचारकांड आपल्या जुन्या तीर्थाप्रमाणे शतकोशतके उपसा नसल्यामुळे सडून कुजून चालले आहेत. आरोग्यासाठी, स्वच्छ स्नानापानासाठी ज्या नद्या, तळी कुंडे हितकारक म्हणून पवित्र मानली ती उपसून वारंवार स्वच्छ न ठेवल्यामुळे आज तेच जलाशय क्षेत्रोक्षेत्री घाणीची नि रेगांची डबकी होऊन पडले आहेत; तसेच हे अनेक आचार, रूढी, समजुती ‘एष धर्मः सनातनः!’ची पाटी त्यांच्यावर मारल्यामुळे त्यांना

उजाळा देणे, उपसा करणे हेच पाप ठरविल्यामुळे आज भाबडटपणाची डबकी होऊन पडली आहेत, आमचे धार्मिक जीवन त्यांच्यामुळे कलुषित नि रोगट झाले आहे.

ही स्थिती आपल्याच आचारकांडाची झाली आहे असे मात्र मुळीच नाही. ख्रिश्चन, पारशी, ज्यू, मुसलमान धर्माचा छाप ज्यावर पडतो तो तो आचार वा रूढी अपरिवर्तनीय होय, ही खुजट नि कुजट धर्मभोळी समजूत सर्व पोथीनिष्ठ धर्मांतून अशीच हानिकारक ठरलेली आहे! पुराणात काय, किराणात काय. वेदात काय, अवेस्तात काय, त्या काळी त्यांना लोकहितकारक नि त्यांच्या परिस्थितीत उपयुक्त वाटलेले आचार, समजुती नि किरकोळीतील किरकोळ गोष्टीदेखील—दाढी, शेंडी, केस यांच्या लांबीरूंदीपर्यंत—एकाच छापाखाली ढकललेल्या आढळतात ‘एष धर्मः सनातनः!’ परिस्थिती बदलताच हे धर्मच अधर्म ठरण्याचा, लोकांच्या धारणाच उलट मारण्यासही कारणीभूत होण्याचा संभव आहे, ह्या अत्यंत महत्वाच्या सत्याविषयी त्या साऱ्या धर्मग्रंथांतून दुर्लक्ष झालेले आढळते.

ही धार्मिक प्रवृत्ती म्हणजेच धर्मभोळेपणा आणि ती प्रवृत्ती दुसऱ्यावर बळाने लादण्याचा यत्न म्हणजेच धर्मवेडेपणा. जोवर लोकांतील ही धर्मभोळी नि धर्मवेडी प्रवृत्ती उच्चाटली गेली नाही, तोवर ते ते लोक प्रगत होत नाहीत, त्यांचे ज्ञान वाढत नाही, नि त्या धर्मग्रंथांच्या वेळी असलेल्या परिस्थितीच्या उलट परिस्थितीत त्यांचे ते ‘सनातन धर्म’च त्यांच्या नाशास कारणीभूत झाल्यावाचून सहसा राहत नाहीत. जे लोक हे सत्य ओळखून आपले जुने नि सद्यःपरिस्थितीत नडणारे आचार झटपट पालटून आजच्या ज्ञानविज्ञानपरिस्थितीला जुळणारे नवे आचार अवलंबतात, ते प्रगतिशील ठरून त्या स्थितीशील धर्मभोळ्या वा धर्मवेड्या समाजांवर मात करतात.

## १.१३ नव्या देवतेची मूर्ती

या कारणामुळेच युरोपने गेल्या दोनशे वर्षांत मुसलमानांवर नि हिंदूंवर मात केली. दोनशे वर्षांपर्यंत युरोपही बायबलच्या दोन पुठ्ठ्यांच्या आत असेच अडकून कोंबून कुजून राहिले होते. पण अकस्मात एक स्फोट झाला. फ्रेंच राज्यक्रांतीचा नव्हे, तर फ्रेंच बुद्धीक्रांतीचा ! फ्रेंच राज्यक्रांती त्या बुद्धीक्रांतीचा एक अध्याय, एक अपरिहार्य परिणाम ! फ्रेंच राज्यक्रांतिकारकांनी अक्षरशः अनेक जुन्या देवता नाकारून नवी देवता घडली नि प्यारिसच्या रस्त्यातून मिरविली—बुद्धीची ! “The Goddess of Reason”ची ! ह्या स्फोटासरशी युरोप बायबलच्या बंदीतून बाहेर फेकले गेले. त्याने साऱ्या ‘एष धर्मः सनातनः !’ना विज्ञानाचे, बुद्धीचे, सद्यस्थितीच्या कसोटीस लावले आणि युरोप वैभवाच्या झेपलिनमध्ये आकाशात उंच उंच भरारू लागले. युरोपने विज्ञानाच्या नव्या नव्या शस्त्रास्त्रांनी हिंदूंवर मात केली. आज साराच मुस्लिम देश युरोपच्या टाचेखाली आहे ! तुर्काने तेवढे युरोपचे ते विज्ञान उचलले, ते धर्मभोळेपण नि धर्मवेडेपण सोडले म्हणून तुर्क तरी बचावला !

आपल्या हिंदू राष्ट्रासही आजच्या विज्ञानयुगाशी टक्कर देऊन जर जगणे असेल, तरणे असेल, तर आपणही आता या ‘एष धर्मः सनातनः !’च्या धर्मभाबडट नि आचरट म्हणजे निरर्थक आचाराचे स्तोम माजविणारी ती प्रवृत्ती सोडून आपला पाच हजार वर्षांपूर्वी घडलेला वा जडलेला प्रत्येक आचार, प्रत्येक रूढी, प्रत्येक श्रद्धा आजच्या विज्ञानाच्या प्रत्यक्षावगम्य कसोटीवर तासून, घासून परीक्षून जी टिकेल तीच ठेवल्यावाचून, न टिकेल ती टाकल्यावाचून ह्या नवीन परिस्थितीशी झुंजण्यास अवश्य ती नवी शस्त्रे परजल्यावाचून गत्यंतर नाही, अशी आमची बालंबाल निश्चिती पटल्यामुळे, आम्ही त्या धर्मभोळ्या प्रवृत्तीस विरोधिण्यास सज्जलो आहो. आमचा लढा त्या हानिकारक प्रवृत्तीशी आहे.

## १.१४ धर्मभोळेपणाचा पूर

त्या धर्मभाळ्या प्रवृत्तीचे एक उदाहरणच काय ते म्हणून आम्ही आमच्या गोपूजक गयाळपणास निवडले. नाहीतर ती बिचारी गाय आमचे काय खात होती? मुठभर गवत नि थोडेसे ओखटपाणी! !

धर्मभोळेया भाबडेपणापायी आमची तारतम्य बुद्धी किती पंदू झाली आहे ते चवाठ्यावर आणण्याच्या कामी आम्ही निवडलेले हे गायप्रकरण अपेक्षेपेक्षाही अधिक परिणामकारक ठरत असल्यामुळे आम्ही त्या विषयाची चर्चा आणखी एक वर्षभर तरी तशीच करीत राहणार आहोत. कारण गायीसारख्या एका पशूला मनुष्याचीच नव्हे तर देवांचीही देवता बनवून सोडणाऱ्या आमच्या ह्या गोपूजक धर्मभोळेपणाच्या समर्थनार्थ अग्निहोत्रमंदिरापासून पांजरपोळापर्यंत जी खळबळ उडून गेली आहे, तीमुळे पाऊस पडताच नदी, नाले, ओहोळ जसे तुडुंब भरून वाहू लागतात तसे धर्मभोळेपणाच्या नद्या-ओहोळांना महान पूर आला आहे आणि ते जो जो फुगून वाहत आहेत तो तो राष्ट्रीय मनाच्या तळाशी दडलेल्या भ्रामक समजुतींची नि कुजलेल्या कल्पनांची सारी खळमळसुद्धा वर येऊन वाहून चालली आहे. एकदा तो पूर ओसरला नि खळमळ वाहून गेली म्हणजे धर्मनिष्ठेचे जीवन स्वच्छ होऊन तारतम्य बुद्धीच्या पात्रात वाहू लागेल.

आपला प्रत्येक जुना आचार, रूढी नि समजूत आजच्या विज्ञानाच्या कसोटीवर कशी पारखून घ्यावी आणि आजच्या परिस्थितीशी टक्कर देण्याची क्षमता येईल असे कोणते नवे आचार नि रूढी चालू कराव्या त्याचे दिग्दर्शन करण्यास, त्याचा एक वस्तुपाठ देण्यास, ह् गोरक्षणवाद उपयोगी पडल्यावाचून राहणार नाही.

यासाठीच तो वाद पुढे चालवून महाराष्ट्र-शारदेत आमचे मागचे लेख आल्यानंतर त्यांना उत्तर म्हणून गोरक्षणादी संस्थांच्या नि वृत्तपत्रांच्याकडून जे जे भाराभर कोटिक्रम पुढे आले त्यांतील दोनचार विधेये—आजवर विचारात न घेतलेली—चर्चिण्यासारखी या लेखात चर्चिली आहेत.

## १.१५ अमेरिकेत गोमाहात्म्याविषयी आमच्या भ्रामक कल्पना*!*

गाईसारख्या एका पशूला अक्षरशः नि वस्तुतःच देवता समजण्याच्या आमच्या मूर्खरणाचे समर्थन करताना बहुतेक गोपूजक एकसारखे सांगत सुटतात की, ‘अहो, आम्हीच नव्हे, तर ते अमेरिकनांसारखे लोकदेखील गाईस माता म्हणतात, देवता म्हणतात.  गोप्रस्थ अमेरिकेत आम्हाहूनही अधिक प्रमाणात वाढत आहे.  गाय ही अमेरिकेसारख्या आगदी अद्ययावत विज्ञानाचे आगर असलेल्या राष्ट्रातदेखील देवता मानली जाते म्हणून गाय ही देवता आहे!  माता आहे! !’

ह्याच्या पुराव्यासाठी अमेरिकन लेखकांची ‘Cow is the mother of prosparity’,  ‘Cow is the foster mother of the human race!’,  ‘Cow feeds our nation’ प्रभृती अनेक वाक्ये वरचेवर छापली जातात.  अमेरिकन नटीचे लावण्य ती गायीचे दूध पुते म्हणूनच टिकते, अमका अमेरिकन गायीचे दूध हे अत्युत्तम अन्न आहे असे म्हणतो इत्यादी निधानेही वारंवार इतक्या बेछूटपणे केली जातात की, त्यायोगे आमच्या इकडे वाढलेल्या गाईच्या स्तोमाप्रमाणे अमेरिकेतही गोपूजा सरसहा चालू असावी, असा एक लोकभ्रम सहजगत्या चहूकडे फैलावत जावा.  बहुतेक गोसेवक, धेनुदास, गोभूषण प्रभृती भोळसट मंडळींची तशी समजूत खरोखरीच झालेलीही आहे, हे त्यांच्यातील अनेक प्रचारक-प्रचारिकांची जी कथा-कीर्तने, संभाषणे ऐकू येतात त्यावरून दिसून येते.

## १.१६  गोभक्षक अमेरिका

आता, अमेरिका आमच्या गोपूजेच्या अर्थीच गोपूजक आहे.  आम्ही गाईस ज्या अर्थी देवता मानतो त्याच अर्थी ते अमेरिकनही गाईला वस्तुतःच देवता मानतात.  आम्ही ज्या अर्थी तिला माता मानतो, त्याच अर्थी अमेरिकन लोक सरसहा गाईला वस्तुतःच माता मानतात, ह्या समजुती किती खोट्या आहेत हे दाखविण्याच्या आधी अमेरिकेतील वा युरोपातील कोणत्याही गावच्या बाजारात नुसता फेरफटका करताच तुम्हास काय दृश्य द्सेल तेवढे काय ते पाहून येऊ.

प्रत्येक गावात भर बाजारात आळीत ज्या ज्या दुकानापुढे सकाळी अगदी दाटी उडालेली दिसेल ते ते दुकान बहुधा मांसविक्याचेच असणार.  आपल्या इकडे भाजीची दुकाने जशी अगदी निःसंकोचपणे प्रत्येक मोठ्या आळीत एखादे आणि बाजारातून अनेक हारीने मांडेलली असतात तशी तिकडे मांसाची दुकाने ठिकठिकाणी मांडलेली असतात.  त्या मांसाच्या दुकानांतून मुख्य मांस म्हणजे गाईचेच ठेवलेले असते;  ते अगदी उघडपणे, वर्गवारीने.  ही तंगडी, हा खांद्याचा तुकडा, हे काळीज, इतकेच नव्हे तर दुकानाचा शृंगार म्हणून एक दोन तरी मारलेली संबंध गाईची वासरे माना कापलेली किंवा कापलेल्या माना अर्धवट लोंबलेली अशी दुकानावरून टांगलेली असतात.  ख्रिसमसमध्ये तर अशा म्रलेल्या गाईच्या वासरांच्या धडांचे एक भीषण प्रदर्शन प्रत्येक हाटाहाटांतून, वाटेवाटेने लटकत ठेवलेले असते.  ती ‘शोभा’ अधिक आकर्षक करण्यासाठी नि ते मांस अगदी ताजे दिसून गिह्राइकांच्या तोंडास पाणीच सुटावे म्हणून शिंगांसह लोंबकळणाऱ्या गाईच्या लहानमोठ्या डोक्यांच्या वर रक्त शिंपतात, गाईंच्या जिभा त्यांना मारताना जशा तोंडातून खाली लोंबतात तशाच्या तशा जिभा लोंबत असलेली रक्ताळ मुंडकी परोपरीने टांगून त्याभोवती कागदाच्या फुलांची

निरनिराळी आरास केलेली असते. तीच गोष्ट बकऱ्यांच्या मांसाची, धडांची, मुंडक्यांची. हे दृश्य आपल्यास जितके राक्षसी वाटते तितकेच ते युरोपियनांना अगदी साहजिक नि सभ्यपणाचे वाटते. त्या दुकानासमोर लहान मुलामुलींना घेऊन आईबाप, नौकरचाकर, तरूणतरूणी, सभ्य गृहिणी, भटाभिक्षुकांच्या (Priestच्या) देवदासी बाया अशा सर्व वर्गांच्या गिऱ्हाईकांची दाटी झालेली असून ‘मला मांसाचा खांदा दे’, ‘आई, गाईच्या चार जिभा आणखी घे’, ‘ह्या वासरांचे मांस नको ते पाहू दुसरे धड’, असे सारखे आवाज येत असतात. थोडक्यात म्हणजे, आपण जितक्या निःसंकोचपणे किराणा वा भाजीच्या दुकानात दाटी करून दुधभोपळे, वांगी, फणस, कलिंगडे संबंधीची सबंध वा फाकी कापकापून रसगळत्या ताज्या स्थितीत हाटातून (बाजारातून) घरी आणतो, तितक्याच निःसंकोचपणे गोमांसाचे ताजे रक्ताळ भाग तिकडील हाटाहाटांतून शेकडो स्त्रीपुरूष सकाळ-संध्याकाळ विकत घेतांना आढळतात. पुढे जेवतांना आपल्याकडे जसा भात हे एक मुख्यान्न, तसे सकाळ-संध्याकाळ अमेरिकेतील खाणावळीतून, कुटुंबातून घरोघर शिजविलेले गोमांस हे एक मुख्यान्न वाढले जाते. त्यांच्या प्रार्थना टेबलावर गोमांसाच्या शिजविलेल्या तंगड्या, खांदे, जिभांच्या ढिगांस रचून म्हटल्या जातात नि देवाला तो गोमांसाचा नैवेद्य समर्पिण्यात येतो. पंगतीतून आग्रहाने गोमांस वाढण्यात येते. आईबाप, मुलेमुली निःसंकोचपणे आपण भात खातो तसे प्रत्यही ते एक मुख्यान्न म्हणून सारे युरोपियन, अमेरिकन लोक गोमांस खातात. आपल्या इकडे गोमांस खाणारे हिंदू जसे केवळ अपवाद; तसेच गोमांस न खाणारे युरोपियन-अमेरिकन केवळ अपवाद; हजारी बहादेखील आढळणार नाहीत !

## १.१७ वरदान कोणत्या अर्थी ?

अशा या युरोपियन-अमेरिकन लोकांमध्ये गाईची भक्ती, आमच्या गोभक्तीच्या अर्थी वाढत आहे. ते अमेरिकनही गोभक्त होत आहेत, ते अमेरिकनही ‘Cow is the Mother of Prosperity’ म्हणून म्हणतात बघा, असे जेव्हा आमची भाबडी गोसेवक मंडळी सांगतात आणि अमेरिकेच्या लेखकांची तशी वाक्ये वाचून आमच्यासारखे तेही गयाळ, गोदेव, गोपूजक झालेले आहेत असे समजतात, तेव्हा त्यांची किती हास्यास्पद दिशाभूल होत असली पाहिजे बरे?

अमेरिकन लेखकांताल दोन-चार लेखकांचे उतारे ही गोरक्षक मंडळी येताजाता छापतात की, तो फलाणा लेखक म्हणतो, ‘Cow is the foster mother of human race.’

पण कोणत्या अर्थी? ‘आमच्या राष्ट्राची गाय ही अन्नदात्री आहे’, असे अमेरिकन जेव्हा म्हणतो, तेव्हा ती भरपूर दूध देते म्हणूनच काय ते नव्हे! तर त्या स्तुतीचे कारण स्वतः अमेरिकन लोक काय सांगतात ते ऐकाः

‘Truly the cow is one of the greatest blessings of the human race because her flesh and that of her progeny feeds the nation with its most stable meat! ’

'गाय ही मनुष्य जातीला लाभलेले एक महान वरदान होय! कारण की गाईंचे नि तिच्या वासरांचे मांस हेच आमच्या राष्ट्राचे मुख्य मांसान्न होय! ! !'

आता आले का ध्यानात की, मांसखाऊ अमेरिकन राष्ट्रात कोणत्या अर्थी गाईचे माहात्म्य मानले जाते ते? ती दूध देते तोवर तिच्या दुधावर, आटते तेव्हा तिच्या गोमांसावर यथेच्छ ताव मारता येतो, म्हणून अमेरिका गाईचा प्रतिपाल करते, गोधनाची जोपासना करते! पण अमेरिकेसारखे गोमांसखाऊ लोक गाईस राष्ट्राची अन्नपूर्णा का म्हणतात, ती कारणे सांगणारी वरीलसारखी वाक्ये अमेरिकेच्या मासिकांतून हजारो प्रसंगी छापली जात णसता, ही आमची भाबडी गोसेवक मंडळी वाचली न वाचली करतात, ती वाक्ये आमच्या गयाळ वाङ्-मयातून छापीत नाहीत, आणि लोकांत असा गैरसमज फैलावू पाहतात की, 'अहो, ते अमेरिकनांसारखे प्रगत लोकही गाईस अन्नपूर्णा, राष्ट्रमाता म्हणून गौरवितात; अगदी आमच्यासारखे ते गोभक्त आहेत; गाईला अगदी आमच्यासारखे ते पुजतात, तिला देवी मानतात! !'

अमेरिकेची गोभक्ती म्हणजे रक्ताळ गोमांस पोट भरून खाल्ल्यानंतर आलेली ढेकर होय! तिच्या दाखल्याने आम्हा गोमांसनिवृत्त हिंदूंच्या गोभक्तीस समर्थू पाहणे म्हणजे वैद्याच्या शस्त्रास कसायाच्या सुऱ्याची उपमा देणे होय!

अमेरिकेने अमुक केले म्हणजे ते बरोबर असलेच पाहिजे असे समजणे हीच मुळी चिकी. अमेरिका गोमांस खाते, म्हणूनच काय ते आम्हीही खावे किंवा खाऊ नये, असा त्या दोन गोष्टींचा निर्णायक संबंध मुळीच नाही; परंतु आमची गयाळ गोभक्ती नि अमेरिकेची गो-खाऊ गोभक्ती यांत आकाशपाताळाचे अंतर आहे, विरोध आहे, हे सत्य आमच्या भाबड्या गोसेवक बंधूंच्या ध्यानी आणण्यासाठीच वरील वस्तुस्थिती जशी आहे तशी सांगावी लागली.

## १.१८ नट्या पंचगव्य पितात?

आमच्या गयाळ गोपूजनात नि अमेरिकेच्या गोखाऊ गोरक्षणात केवढा भेद आहे ते खालील काही प्रश्नांवरून भाबडेपणाच्याही ध्यानात आल्यावाचून राहणार नाही.

(१)अमेरिकेत गाय 'परलोकी' गोलोक नावाचा अत्युच्च स्वर्ग देणारी देवता आहे असे सांगणारी पुराणे, धर्मग्रंथ म्हणून सन्मानिली जातात का?

(२) अमेरिकन नट्यांपैकी काहींनी गोदुग्धाची स्तुती कोली. ठीक! त्यांना ते मानवते, इतकेच त्यायोगे सिद्ध होते. परंतु आमच्या स्त्रियांप्रमाणे त्या नट्या गोमूत्रही नित्य नेमाने पितात

काय? आणि गोमूत्र पिणे हे 'पुण्यकर्म' म्हणजे जो 'धार्मिक विधी' परलेकी श्रेयस्कर तो अशा भावनेने गाईचे पंचगव्य 'मंत्रपूर्वक' पितात काय? किंवा गाईच्या खुरांची वा शेपटांची रांगोळीने १०८ चित्रे काढून प्रत्यही सोवळ्याने त्यांची पूजाधूपदीपनैवेद्यादी त्या नट्या करतात काय? आणि अशी 'गोपद्मांची' व्रते चातुर्मासात केल्याने मुले होतात वा अशा कोणत्याही नवसास ती गायदेवता पावते वा त्या व्रताने 'देव' परलोकी सद्-गती देतो अशी भावना धरून 'गोपूजा' करतात काय? गोग्रास व्रते धरून नऊ-दहा गुळाचे कानवले करून गाईस चारावे नि एक काय तो गाईचा 'प्रसाद' म्हणून स्वतेॆ-खावा, अशी व्रते 'धर्मविधी' म्हणून अमेरिकेतल्या शेकडो स्त्रिया आचरतात काय?

(३) स्वतःच्या धर्माचे, माणसासारखे मनुष्य त्यांना 'अस्पृश्य' समजून तशा 'जाती'तल्या माणसाची सावली पडताच वा स्पर्श होताच आपण 'विटाळलो' असे अमेरिकन लोक समजतात काय? आणि माणसाच्या स्पर्शाचा वा सावलीचा तसा 'विटाळ' गाईसारख्या पशूला शिवून वा तिची शेपटी डोळ्यावरून फिरवून जातो नि मनुष्य 'शुद्ध' होतो, असे शेकडो अमेरिकन गोभक्त स्त्रीपुरूष मानतात काय?

(४) कोण्या गाईला गोठ्यात न बांधता, ती खूप दूध देते किंवा व्याल्यावाचून दूध देते म्हणून तिचे एक देऊळ उभारून त्या देवळात देवी म्हणून बांधतात की काय? आणि तिचे दूध 'पवित्र' म्हणून आगीतच ओतावे; माणसासारख्या हीन प्राण्याने न पिता देवांनीच प्यावे; त्या गाईची 'धर्मविधी' समजून 'पूजा' व्हावी; अशा 'धर्माज्ञा' अमेरिकेतील धर्मगुरूंनी सोडल्या आहेत काय? की जशी गेल्या वर्षीच वैष्णव गुरूंनी सोडली आणि त्या गोमंदिराचे उद्-घाटन गोसेवक मंडळींनी मोठ्या धुमधडाक्यात मुंबईकडे केले?

(५) रत्नागिरीच्या पतितपावन मंदिराच्या उद्-घाटनीय समारंभी साधुशील चौंडेमहाराजांनी पशुयोनीत जन्मलेल्या गायीची पूजा भक्तिभावे 'देवता' म्हणून करविली; पण 'स्नान करूनसुद्धा कोणताही अस्पृश्य देवाच्या गाभाऱ्यात जाऊन देवपूजा करण्याइतका पवित्र होणेच शक्य नाही, तो जातीचाच अस्पृश्य' असे ठासून सांगितले, 'केसरी'त पत्र लिहिले ! तशा प्रकारचा पशुयोनीस मनुष्ययोनीहून श्रेष्ठ मानणारा शास्त्रोक्त गयाळपणा अमेरिकेतील किती महाराजांत आढळतो ?

(६) अमेरिकेच्या परशत्रू गाईंच्या कळपाच्या गोलांना ढालीसारखे पुढे करून त्यांच्या आड चालत येत असता, हत्यार चालवावे तर गाई मरतात, गोवध हे जन्मोजन्म नरकात ढकलणारे 'पाप' अशा भयाने हत्यारे टाकून देऊन राष्ट्रशत्रूस राष्ट्रात बिनधोक शिरू दिले, राष्ट्रवध करू दिला, पण गोवध केला नाही, अशा लढाया अमेरिका कधी लढली आहे काय? आम्ही ते शौर्य गाजविले आहे!

## १.१९ गाय माता कोणाची ?

(७) आपल्या राष्ट्रास ऊपयुक्त म्हणूनच आपल्या गाई अवध्य. पण शत्रुचा सैन्यास मांसाचा नि दुधाचा पुरवठा करणारे शत्रूचे गोधनही आपले शत्रूच. त्या शत्रूच्या दाणावैरणीप्रमाणेच त्या गाईही मारल्या पाहिजेत असे न मानता, शत्रूच्या किल्ल्यातील गाई मरतील म्हणूनच शत्रूच्या किल्ल्यावर भडिमार करण्यास अमेरिकन सैन्याने कितीदा नाकारले ? किंवा अमेरिकन सैन्य वेढ्यात भुके मरू लागले असताही अडगळ झालेल्या निकामी गाईला मारून त्या मांसास खाऊन लढा झुंजविण्याचे, प्रसंगी गोमांस खाण्याचे अमेरिकन सैन्याने कितीदा नाकारले? स्वतः ते सैन्य, ती माणसे उपाशी मारविली, पण गाई मरू दिल्या नाहीत, असे प्रसंग अमेरिकेच्या इतिहासात किती आहेत ?

(८) अमेरिकनांनी आपल्या राष्ट्रीयत्वाची अशी व्याख्या कधी केली आहे काय कि, ‘धेनुर्यस्य महामाता सोह्यमेरिकनः स्मृतः’! जशी आमच्या गयाळ मंडळींनी हिंदूत्वाची व्याख्या केली, ‘धेनुर्यस्य महामाता स वै हिंदुरिती स्मृतः’ !

वरील काही प्रश्नांवरून तरी आमच्या गयाळ गोभक्तीत आणि अमेरिकेच्या गवाहारी गोभक्तीत केवढा फरक आहे ते स्पष्ट होईल का ? मेल्यानंतर आत्मा जेव्हा परलोकी जातो तेव्हा वैतरणी नदी तरतांना गाईच्या शेपटास धरावे लागते आणि त्या आधाराआधाराने ती गाय आत्म्यास परलोकी वैतरणी नदीतून तारून स्वर्गी सुखरूप पोहोचविते, असे अमेरिका मानीत नाही – आम्ही मानतो !

आमच्या गाईवरील लेखांना उत्तर देण्यासाठी म्हणून जे भारेचे भारे लिखाण गयाळ मंडळींनी गेल्या वर्षी लिहिले आहे, त्यात बहुतेक भाग ‘पहा, ती अमेरिकाही गाईस माता म्हणते, तिच्या दुधाची स्तुतीकरते, आमच्यासारखीच अमेरिका ही गोभक्त आहे, म्हणून आमची गोभक्ती निर्दोष !’ ह्याच घाऊक विधेयांच्या पुनरूक्तीने भरलेले आहे. यासाठी अमेरिकेची गोभक्ती म्हणजे काय हे आम्ही या लेखात एकदाचे उलगडून सागितले आहे.

अन् जरी गाईला अगदी आमच्या गयाळ धेनुदासी संप्रदायाप्रमाणेच अक्षरशः देवता—मनुष्याहून श्रेष्ठ, परलोकी गोलोक स्वर्ग देणारी देवता-म्हणूनही कोण्या अमेरिकनाने मानण्यास आरंभिले, तरीही तशी गोभक्ती बरोबर ठरणार नाही, भाबडीच ठरणार. कारण अमेरिकनांत जे जे मानले जाते ते ते तेवढ्यासाठी बरोबर ठरलेच पाहिजे, असे ‘साहेबोक्तम्’ चे प्रमाण आम्ही स्वतः सिद्ध मानीत नाही. अमेरिकेतही भ्रमिष्टालये (lunatic asylums) ही थोडीफार असतातच!

तेव्हा आता यापुढे कोण्याही गयाळजीने अमेरिकेच्या लोकांचे गायीच्या दुधाविषयी, विणीविषयी वा जोपासनेविषयी भाराभर उतारे देण्यात आमच्या टिकेचे उत्तर सापडेल अशी आशा बाळगू नये. अमेरिकेचे गोरक्षण विषयक सारे धोरण ‘गाय हा एक उपयुक्त पशू होय’ ह्या आमच्या मुख्य विधानाचेच समर्थक आहे. तिचे दूध, तिची वीण आणि शेवटी गोमांस ही राष्ट्रास उपयुक्त आहेत हेच अमेरिकेचे म्हणणे-अन् तेच आमचे! परंतु गोमांसाहारी अमेरिका गायीला पारलौकिकदृष्ट्या ‘देवता’

मानीत नाही. गोवध ‘पाप’ समजत नाही. गोपूजा धार्मिक विधी समजत नाही. आम्हीही तसे समजू नये हेच प्रतिपादितो.

## १.२० अहो! पण शिवाजी महाराजही स्वतःला ‘गोब्राह्मणप्रतिपालक’ म्हणवीत!

हे आणखी एक ठराविक पालुपद आम्हाला उत्तर म्हणून लिहिलेल्या लेखात पुन्हा पुन्हा झोळले जाते आणि त्याविषयी काही प्रत्युत्तरणाची संधी आम्हास गेल्या लेखातून सापडली नाही. यासाठी आमच्या गयाळ मित्रांना या पालुपदाविषयी इतकेच सांगणे की महाराज जे ब्रीद मिरवीत, ते ‘गोब्राह्मणप्रतिपालका’ चेच होते; गोदास वा धेनुदासपणाचे नव्हते. गाय हे आपल्या कृषीप्रधान राष्ट्राचे महत्वाचे धन आहे. गाय हा एक उपयुक्त पशू या दृष्टीने गोरक्षण, गोप्रतिपालन हे आमचे एक राष्ट्रीय कर्तव्य आहेच आहे. पण शत्रु पक्षाकडील गायी मारणे हे ‘पाप’ समजून, गाय ही वस्तूच अवध्य यासाठी तशा शत्रुच्या गायी मारू नयेत म्हणून हत्यार टाकून राष्ट्राचा घात करण्या इतकी महाराजांची गोभक्ती बोकाळती तर तीही राष्ट्रद्रोहीच ठरती! पण त्या महापुरूषाने पितृभक्तीदेखील राष्ट्रभक्तीच्या खालीच गणली, तिथे गोभक्तीची कथा काय? आणि तीच गोष्ट ‘ब्राह्मण’ प्रतिपालनाविषयी. काही ब्राह्मण अधिकाऱ्यांनी कोषरक्षणी वा करसंग्रही ढिलाई केली की लगेच महाराजांची दटावणी जाई की, ‘ब्राह्मण झालेत म्हणून क्षमा होईल की काय ? राज्य कार्यी अळंटाळं होताच ब्राह्मण असलात तरी कडक शासन होईल ! वेळीच शुद्धीवर यावे !’ अशा आशयाची पत्रे उपलब्ध आहेत !

पण याही पुढे जाऊन असे स्पष्ट सांगणे भाग आहे की, महाराजांच्या काय किंवा कोणाही थोर पूर्वजांच्या काय, ज्या भावना वा शास्त्रे वा साधने असतील ती त्यांच्या काळापुरती त्यांना लागू होती. त्यांना योग्य वाटली, म्हणूनच काय ती आजच्या काळालाही योग्य वाटलीच पाहिजेत, असे म्हणणे म्हणजे पूर्वजांच्या मरणानंतर पृथ्वीने फिरायचे नि काळाच्या घड्याळांनी चालायचे सोडून दिले, असे म्हणण्यासारखे मूर्खपणाचे आहे. महाराजांच्या परिस्थितीत ज्या ब्रीदाचा नि शास्त्रांचा नि शस्त्रांचा उपयोग, ती त्यांनी वापरली. राष्ट्र राखले; बस्स. त्यांचे कर्तव्य त्यांनी केले. आमचे कर्तव्य आमच्या परिस्थितीत राष्ट्र राखावयास अवश्य ते जुने नि नवे साधन हाती घेणे हेच होय. ग्रहणे चंद्रसूर्यांना राहू-केतू खातात म्हणून घडतात; असे शिवाजी मानीत, म्हणून प्रत्यक्ष ज्ञानाला नाकारून आजही शाळांतून ग्रहणांची ती कारण शिकवायची की काय? महारात बैलगाडीत बसत म्हणून आज आगगाडीत बसायचे नाही की पोलादी शिरस्त्राण, हाती वाघनखे—मग तुम्ही डोक्यास कानटोप्या नि हाती जपमाळा का धरल्यात? देश-काल-पात्राच्या तारतम्यानेच ना? हे गयाळ मंडळीस कळत नाही! महाराजांच्या गोब्राह्मणप्रतिपालनाच्या ब्रीदाप्रमाणेच आणखी म्लेंच्छहननासारख्या असणाऱ्या काही ब्रीदांविषयी या मंडळीत गोष्ट काढून बघा. ते नाव घेताच पाहा कसे थरकापतात! ‘अरे बापरे !’ म्हणूनच कानावर हात ठेवतात नि म्हणतात, ‘अहो! काही काळवेळ तर बघाल! शिवाजीची परिस्थिती कुठे! आपले कर्तव्य म्हणजे ‘श्रीराम जयराम जय जय राम! ! !’ एक कोटी वेळा हा मंत्रजप, एक कोटी वेळ पंचगव्य—आणि पांजरपोळ! !’

## १.२१ तीच गोष्ट परमपूज्य पंडित मालवीयजींच्या ‘मानबिंदू’ विषयी! !

पुण्यास पंडितजी म्हणाले, ‘गाईचे दूध अत्यंत हितकर! म्हणून ती मातेपेक्षाही थोर! हिंदुसंस्कृतीचा गाय हा मानबिंदू आहे! ! !’ असे पंडित मालवीय म्हणाले बरे का! म्हणून आम्हाला ताज्या ‘गो-रक्षणा’च्या अंकात त्याचे संपादक बजावतात. देवाच्या नैवेद्याचे दूध वंदून प्यावे, तसेच पंडित मालवीयांसारख्या ऋषितुल्य वृद्धांचा शब्द सादर ऐकावा, पण ते नैवेद्याचे दूध जिभेला लावताच जर नासलेले लागले तर जसे वंदूनच पण टाकून द्यावे हाच धर्म, तसेच पुरातन पुरूषांचे शब्दही अद्ययावत सत्याच्या कसोटीला लावताच जर अतथ्य ठरले तर सादरच पण निषेधावे हेच कर्तव्य. गाय राष्ट्रास दूध देते म्हणूनच माता, मातेहून थोर, तर दुधाइतकेच महत्वाचे अन्न जे तांदूळ नि गहू त्या तांदूळाचे पोते पित्याहून मोठे का ठरू नये ? दूध देते ; बस्स, येवढेच गाईचे महत्व. बाकी सर्व गोस्तोम शुद्ध बावळटपणा. गाय ही हिंदू राष्ट्राचा दुग्घबिंदू ! मानबिंदू नव्हेच नव्हे! भक्ताचा देव, त्याचा भक्तिबिंदू भक्ताहून महत्तर हवा, तसाच राष्ट्राचा मानबिंदू, ज्यायोगे राष्ट्राचा अत्युत्तम पराक्रम, तेज, आकांक्षा, दुर्घट करून सोडील, माणसांचे अतिमानुष करून सोडील असा महत्तम हवा ! वाटेल त्याने पिळावी, वाटेल त्याने खावी अशी ही गाय आमच्या आजच्या दुर्बळतेचा मानबिंदू आहेच आहे, अगदी यथोचित प्रतीक आहे ! पण ह्या हिंदू राष्ट्राचा उद्याचा तरी तसला भुक्कड मानबिंदू राहता कामा नये.

लेखनमर्यादा संपली तरीही नागपूरच्या ‘महाराष्ट्र’ पत्रात गोसेवक श्री. सरंजामे यांचा अत्यद्-भुत शोध जो अलीकडेच प्रसिद्ध झाला आहे तो वाचकांना नुसता कळवून तरी ठेवलाच पाहिजे. वाचकहो, लोकमान्यांसारखा कुलदीपक सुपुत्र ज्यायोगे हटकून होतो अशी दिव्यौषधी श्री. सरंजामे यांनी शोधून काढली आहे याचा तुम्हास अजून पत्ताच नाही का? अहो, काय सांगावे, आनुवंशशास्त्रात, सुजननविद्येत, Eugenics मध्ये असा अद्-भूत शोध जर युरोपमध्ये लागला, तर जगभर त्याचा डिंडिम गाजता. आम्हा भारतीयांच्या गुणांचे आजकाल चीज होत नाही हेच खरे! लोकमान्य टिळकांच्या केळकरांसारख्या चरित्रकारालाही जे रहस्य उलगडले नाही, ते ‘जगज्जननी’ ‘आदिदेवता’ जी गोमाता तिने सरंजामे यांना गेल्या दोन महिन्यांपूर्वि सांगून टाकले! ते वृत्त त्यांच्याच शब्दांत सांगणे उचित.

‘त्रिकालज्ञानी अशा आमच्या स्मृतिकारांनी गोमूत्र नि गोमय यांचे जे महत्व सांगितले ते विज्ञानशास्त्रानेही खरे कसे ठरते ते कोणी सांगू लागला तर सावरकर ते अक्षम्य ठरवितात! पोथीतल्या गोष्टी सावरकरांना मान्य नाहीत! पण आजच्या या युगातही...लोकमान्यांसारखा सुपुत्र होण्यासाठीसुद्धा गोसेवेचे कारण मुळाशी आहे हे त्यांच्या चरित्रभागात नमूद आहे. लोकमान्यांसारख्या अलौकिक पुरूषाला जन्म देणाऱ्या त्या थोर मातेने नित्यनियम म्हणून पंचगव्य प्राशन केले ते गोमाता नि देवता ह्याच भावनेनेकेले असले पाहिजे हे उघड आहे. धार्मिक लोक गाईस

माता नि देवता आलंकारिक भाषेने म्हणत नाहीत. ते अक्षरशः तिला तसे मानतात आणि तसे मानण्यात कोणतीच अडचण नाही, लाज तर मुळीच नाही! ’

का? आमच्या ‘त्रिकालज्ञानी’ स्मृतिकारांचे गोमूत्र-गोमयाचे माहात्म्य ‘विज्ञानशास्त्रा’ च्या या अत्यद्-भूत शोधाने निर्विवादपणे सरंजामे यांनी सिद्ध करून दाखविले की नाही ? या उताऱ्यातील प्रत्येक शब्द गयाळ वेदातील सूक्तासारखा मंत्रमय आहे खराच ! विज्ञानाचा पुरावा द्यावा तर असा ! लोकमान्यांची माता पंचगव्य पीत असे आणि त्या साध्वीच्या पोटी लोकमान्यांसारखा सुपुत्र निपजला. अर्थात पंचगव्य हेच त्या अलौकिक पुत्रप्राप्तीचे दिव्यौषध ! !

कार्यकारण भाव जाणण्याची बुद्धीची क्षमता धर्मभोळेपणाने कशी पंगु होते ह्याचे या वरील गयाळ कोटिक्रमाहून दुसरे उदाहरण काय द्यावे ? लोकमान्यांची माता, पंचगव्याप्रमाणे मीठ, मोहरी, मसाला, भात, वरण, पाणी, भाज्या प्रभृती कितीतरी पदार्थ लहानपणापासून सेवन करीत नव्हत्याच असे काहीएक गमक अजून सापडले नाही. मग त्या पदार्थांपैकी पंचगव्यसेवनानेच असा अलौकिक पुत्र झाला आहे हे कसे सिद्ध झाले ? सरंजाम्यासारख्या गोमयानंदांना ते पंचगव्य प्राशनाचे फळ वाटते. लवणानंदासारख्या मीठ खाण्याचा अभिमान्यांना मीठ खाल्ले म्हणून लोकमान्यांसारखा पुत्र झाला असे त्याच न्यायाने का वाटू नये ? वॉशिंगटन, नेपोलियन, लेनीन, डार्विन यांच्या मातांपैकी कित्येक प्रायशः गोमांस सेवीत नि कित्येक प्रसंगी मद्य ही पीत ! मग गोमांस खाल्ल्याने अलौकिक पुत्र जन्मतात असे ‘त्रिकालज्ञानी’ नियम कां बांधता येऊ नयेत ? पण गाईसारख्या एका पशूस अक्षरशः देवता मानण्याइतकी ज्यांची भावना ‘धार्मिक’ त्यांची बुद्धीही पंचगव्य पिण्याने अलौकिक पुत्र होतो असे विश्वसण्याइतकी पंगु झाली नसती तरच नवल ! !

*—महाराष्ट्र, मार्च १९३६*

१ ०. ही भूतदया की भूतबाधा**?**

## १.२२ जी मानवी हितास पोषक तीच खरी भूतदया

मनुष्यसमाजाचे स्थैर्य नि प्रगती, सुखसमाधान नि शोभा, ज्या काही अत्युदार भावनांवर अवलंबतात त्यांच्यात दया मुख्य होय. मुलाला जशी आई तशीच समाजाला दया. तिच्या दुधावर तो जगतो! तिच्याच ममतेच्या मांडीवर वाढतो.

अहिंसा हीही तिच्या धात्वर्थी दयेचाच एक पोटभेद आहे. व्यापक अर्थी, अहिंसा हीच निष्क्रीय दया. पण तरीदेखील दया हीच श्रेषेठ. कारण अहिंसा फार तर चांगल्या दाईसारखी बळेच कोणास दुखविणार नाही. पण दया ही आईसारखी दुःख पाहताच द्रवेल, दुखणाइताची शुश्रुषा त्यापायी स्वतः दुखणाईत झाली तरी ममतेने करीतच राहील. यासाठीच संतसज्जनांनी म्हटले आहे, ‘दया धर्म का मूल है! !’

## १.२३ मनुष्यदया नि भूतदया

मनुष्याने मनुष्यावर दया करावी हा माणुसकीचाच धर्म आहे. दया ही मनुष्याची एक अत्युदार अशी नैसर्गिक प्रवृत्ती आहे; अत्युदार अशासाठी की, देशकालपात्रविवेकाने त्या भावनेचा मदुपयोग मनुष्य करीत गेला तर मानवी समाजाचे त्यात कल्याणच आहे. परंतु मनुष्याची दयाशीलता ही मनुष्यापुरतीच मर्यादित मसते. दुःखी मनुष्य तळमळताना पाहून, लेकरू पाळण्यातून पडताना पाहूनमनुष्य जसा जयेने द्रवतो, त्याची समवेदना जागून त्या दुःखिताचे दुःख त्याला निवारावेसे वाटते, तसेच त्याच समवेदनेच्या जाणिवेसरशी मनुष्येतर प्राण्यातील एखादी पाळीव गाय खड्ड्यात पडून दुखावली तर तिचीसुद्धा मनुष्याला सहजीच कीव आल्यावाचून बगूधा राहत नाही. पक्ष्याच्या घरट्यातून अपघाताने धप्पदिशी खाली पडलेले साळुंकीचे वा पोपटाचे चिमुकले पिलू चिवचिव करू लागताच त्याला चटकन उचलून पाणी पाजून सुरक्षित उबेत ठेवल्यावाचून मनुष्याला चैन पडत नाही.

मनुष्य दयेची व्याप्ती याच प्रक्रियेने वाढत जाऊन प्रथम मनुष्याला उपयुक्त त्या त्या प्राण्यांविषयी वाटणाऱ्या दयेत—प्राणिदयेत—परिणत होते. हिंदूंना गाईविषयी ममत्व वाटू लागले. अरबांना उंटाविषयी विशेष ममता वाटू लागली. ज्यू लोकांच्या धर्मग्रंथातून त्यांचे प्राचीनतम पूर्वजशेळ्यामेंढ्यांना कसे जीव की प्राण करीत ते पानोपानी ग्रंथिलेले आहेच. जे मांसाहारी असत तेदेखील ह्या उपयुक्त प्राण्यांना मारताना मनातल्या मनात त्या क्रुरतेला लाजत. आपल्याला जसा प्राण प्रिय, दुखापतीने आपण जसे विव्हळतो, तसेच ह्या प्राण्यांनाही त्यांचा प्राण प्रिय असल्याने ते मरणास भितात, दुखापतीने दीन होऊन गयावया करतात, विव्हळतात, ही समवेदना मांसाहारी

लोकांच्या मनाला बोचल्यावाचून राहत नाही. भयाने, लोभाने, क्रोधाने कितीही दाबून चाकली गेली तरी, प्राणिदयेची ही भावना मांसाहारी मनुष्यांतही ह्या वा त्या प्रमाणात असतेच असते. म्हणूनच मृगया करणाऱ्या मृगयूलादेखील गोळी लागून पडलेल्या नि मरणाचे आचके देणाऱ्या वाघालासुद्धा पाहून त्याची काहीतरी कीव येते. ते काळ्याभोर, चंचल नि प्रेमळ नयनांचे मनोहर हरिण त्याच्यामागे लागलेल्या पारध्याच्या तीक्ष्ण बाणांनी विंधिले जाताच जेव्हा धाडकन खाली पडते आणि त्याच्या त्या कमळासारख्या डोळ्यातून पडणारी टिपे जीवनाची याचना करीत गळू लागतात, तेव्हा त्या प्रत्येक पारध्याचे मन त्याला आतल्या आत टोचल्यावाचून सहसा राहत नाही की— 'न खलु न खलु बाणस्सन्निपात्योऽयमस्मिन्। मृदुनि मृगशरीरे तूलराशाविवाग्निः।। व्क बत हरिणकानां जीवितं चातिलोलम। व्क च निशितनिपाता वज्रसारा शरास्ते।'

बुद्ध भगवान बुद्धतत्वप्राप्तीपूर्वी कारूण्यात राजपुत्र गौतम याच भूमिकेत जेव्हा होते, तेव्हा तेही क्षत्रियोचित मृगयेत भाग घेत; पण देवदत्ताच्या बाणाने व्याकूळ होऊन एक पक्षी राजपुत्र गौतमाच्या पायापाशी एकदा तडफडत पडला असता त्याच्या त्या प्राणांतिक वेदना पाहून गौतमांना इतकी दया आली की त्यांच्या स्वतःच्या डोळ्यातूनही टिपे गळू लागली. त्यांनी आपल्या हाताने शुश्रृषा करून त्या पक्ष्याला ह्या दुखापतीतून वाचविले. जो पराक्रमी पुरूष पुढे गुरू गोविंदसिंगाच्या पश्चात शिखांचे धुरीणत्व घेऊन पंजाबात मुसलमानांना कर्दनकाळासारखा भासला, तो वीर बंदा त्याच्या पूर्वाश्रमी एक साधू होता. त्याला ती उपरती होण्याचे कारण ही हेच झाले. तो मृगयेत अत्यंत निष्णात असे. धनुर्धरांत त्याचा हात धरणारा वीर विरळा. पण मृगया करता करता एके दिवशी त्याच्या शराने एक हरिणी मारली गेली. जवळ जाऊन पाहतो तो ती गर्भवती ! त्या शराने विद्ध, विव्हळत, ती रक्त ओकत आहे आणि त्या असह्य घावासरशी विकलगात्र मृगीचा गर्भ फाटून दोन सुंदर पाडसे फट्कन बाहेर पडून तडफडत आहेत ! ! त्या करून दृश्यासरशी त्या मृगयू माधवदासाला दयेचा इतका अनावर उद्रेक आला की, त्याने पुन्हा धनुष्य म्हणून हाती धरावयाचे नाही, मृगया नि जीवहत्या म्हणून करावयाची नाही, असा निर्धार करून वैष्णव साधूची दीक्षा घेतली आणि मृगयू माधवदास निरामिष साधू झाला.

ही जशी व्यक्तींची ऐतिहासिक एक दोन उदाहरणे वानगीसाठी दाखविली, तशीच ज्या धर्मपंथांनी मृगया वा मांसाशन वा प्राणीहिंसा आमूलाग्र सोडली नाही, त्यांनीदेखील मारण्या मारण्याच्या पद्धतीतही त्यातल्या त्यात कमी क्रूर पद्धत स्वीकारावी म्हणून जे निर्बंध घातलेले आढळतात, तेही ह्या चोरट्या दयेचेच पुरावे होत. उदाहरणापुरते मुसलमानांच्या नि आपल्या हिंदूतील शीखांच्या प्राण्यांना मारण्याच्या पद्धतीत माजलेला वाद पाहा. मुसलमानांत मांसाशनास्तव पशुवध करताना सुरी खसाखस करवतीसारखी चालवितात. त्यायोगे कापल्या जाणाऱ्या पशूला ज्या अधिक वेदना भोगाव्या लागतात तितक्या तरी टाळाव्या या हेतूने शिखांत एका झटक्यासरशीच पशूला मारले पाहिजे असा धर्म नियम घालून दिला. त्या नियमावरून धार्मिक छाप पडल्यामुळे धर्मछापाच्या रूढीत जी 'पापपुण्या'ची वृत्ती बळावते तशी बळावून कोणताही पशू तसा झटक्यासरशी जर न मारला गेला तर त्याचे मांस खाणे पाप होय, अशी निष्ठा प्रचलली. पहिल्या मुसलमानी पद्धतीस 'हलाल' म्हणतात; दुसऱ्या एका घावासरशी मारण्याच्या पद्धतीस 'झटका' म्हणतात.

अर्थात धर्मछाप अतिरेकाच्या नेहमीच्या प्रभावाने मुसलमान  ‘झटका’मांस कधीही, उपाशी मरू लागला तरी, खाणार नाही.  ‘हलाल’ मांस खाणे शीख निषिद्ध मानतात.  या मतभेदामुळे पंजाबात दोन्ही समाजांचे कसाईखाने स्वतंत्र असतात, इतकेच नव्हे तर ते शेजारी शेजारी असेल, तर एकमेकांच्या धर्मभावना दुखावतात म्हणून अनेक वार भांडणेही होतात!   या भांडणातील धर्मवेडाची बाजू सोडली, तर या लेखापुरती जी मुख्य गोष्ट उल्लेखार्ह आहे, ती ही की, प्राणीवध करतांनाही मनुष्याच्या मनात त्या प्राण्याच्या दुखापतीसरशी दयेचा काहीना काहीतरी उद्रेक होतोच होतो. मनुष्य दया जशी उपजत, तशीच मनुष्याच्या मनात त्याच समवेदनेच्या बळे, सहानुभूतीच्या स्वाभाविक प्रवृत्तीमुळे, प्राणिदयाही उपजल्यावाचून राहत नाही.

ह्या भावनेने ज्यांची दयाशीलतेची कक्षा यच्चयावत प्राणिमात्रात सामावण्याइतकी व्यापक झाली, त्यांनी सर्व सद्-गुणांमध्ये भूतदयेली अत्युच्च स्थान दिले.  मनुष्यदयेची व्याप्ती प्रथम मर्यादित प्राणिदयेत होऊन शेवटी अत्यंत कोवळ्या नि सात्विक सत्पुरूषांच्या मनात तिची परिणती व्याघ्रसिंहादिक हिंस्त्र पशूंवरही दया करणाऱ्या भूतदयेत झाली.

जर आपण  ‘निर्वैरः सर्वभूतेषु’ झालो आणि  ‘दया सर्वषू भूतेषु’ करू लागलो, तर व्याघ्रसिंहादिक हिंस्त्र पशूही आपले वैर सोडून देतील, आपण साधू झालो तर तेही साधू होतील, नाही कशावरून ?—अशी असंभव आशाही त्यांनी धरली !  तसे होणार होतेच, अशी हमीसुद्धा दिली!  आणि भूतदयेस व्यवहारविण्याचा कृतसंकल्प करून तो प्रत्यक्ष प्रयोग आपल्यापुरता तरी अनेक सत्पुरूषांनी आजवर करून पाहिला.  या वा त्या प्रमाणात भूतदयेचा महनीय धर्म स्वतः शक्यतो आचरणारे हे सत्पुरूष जगातील बहुतेक प्रगत समाजात मधून मधून निघाले; परंतू भूतदया हे नुसते तात्विक ब्रीदच काय ते न मानता ती आपल्या प्रतिक्षणाच्या व्यवहारात आचरून दाखविण्याच्या कार्यात हिंदू राष्ट्राने अभिनमदनीय, अत्युदार पण अयशस्वी असा जो महनीय प्रयोग केला तो केवळ अतुलनीय होय!   दुसऱ्याचा प्राण घेऊन आपल्या पोटाची खळगी भरणाची त्यांना इतकी शिसारी येऊ लागली की लक्षावधी लोकांच्या जातीच्या जाती निवृत्तमांस झाल्या!   शतके नव्हे सहस्त्रके आपल्या भोगविलासाचा त्याग करून असहनीय बंधने स्वतःवर लादून घेऊन भूतदयेच्या ब्रीदास त्यांनी अद्याप संभाळले आहे!   या प्रश्नांची मतमतांतरे चर्चिताना मनुस्मृतीतच म्हटले आहेः

योऽहिंसकानि भूतानि हिनस्त्यात्मसुखेच्छया ।  स जीवश्च मृतश्चैव न कश्चित्सुखमेघते ।। (अहिंसक प्राण्यांना मारू नका!   त्याच्याही पुढे जाऊन सांगतात—) यो बन्धनवधक्लेशान्प्राणिनां न चिकीर्षति ।  स सर्वस्य हितप्रेप्सुः सुखमत्युन्तमश्रनुते ।।  नाकृत्वा प्राणिनां हिंसा मांसमुत्पद्यते क्वचित् ।  नच प्राणिवधः स्वर्ग्यस्तस्मान्मांसं विवर्जयेत् ।।  समुत्पत्तिं च मांसस्य वधबन्धौ च देहिनाम् ।  प्रसमीक्ष्य निवर्तेत सर्वमांसस्य भक्षणात् ।।  अनुमन्ता विशसिता निहन्ता क्रयविक्रयी । संस्कर्ता चोपहर्ता च खादकश्चेति घातकाः ।।  स्वमांसं परमांसेन यो वर्धयितुमिच्छति ।  अनभ्यचर्च्य पितृन्देवांस्ततोऽन्यो नास्त्यपुण्यकृत् ।।  (मनु. अ. ५ )

प्राणिमात्रास दुःख नकोसे, जीव प्यारा; जसा आपल्याला! हे स्मरून प्राणिमात्रास दुखवू नकोस, त्यांच्या जीवाला क्लेश होईल असे करू नकोस, उलट त्यांचे दुःख निवारण्यास्तव स्वतःचा बळी द्यावा लागला तरी चिंता नाही ! या दयाममतेपायी भयंकर दुष्काळातही त्यांनी मांस वा मस्त्य खाल्ले नाही. पिंजऱ्यात पाळलेले पोपट सोडून दिले, तुकारामाप्रमाणे पाखरांना शेते खाऊ दिली, मृगया वर्ज्य मानली, यज्ञात बळी द्यावयास चालविलेले कोकरू लंगडतेसे पाहून ते बुद्धासारखे गहिवरले, त्या कोकराला स्वतःच्या लेकरासारखे कडेवर घेऊन चालले, यज्ञात पशुवधाच्या ठायी घृतपशूचा वा पिष्ट पशूचा विकल्प कल्पिला, गायीची सेवा देवाच्या सेवेसारखी पवित्र मानली, मुंग्यांच्या वारूळावर जाऊन पीठ नि साखर पेरली, सापालादेखील वर्षातून नागपंचमीचा एक दिवस का होईना, पण जातिवैर विसरून विश्वबंधुत्वाने नाते स्मरून दूध पाजीत आले, आणि कित्येक तर स्वतःला डसणाऱ्या सापालासुद्धा मारू न देता जिवंत जाऊ देत आले ! ! ढेकूण, पिसवा ह्यांनासुद्धा न चिरडता दूर नेऊन सोडले, कीडामुंगी मरेल म्हणून पाहीन पाहून जन्मभर पाय टाकले, निकम्मी गाईचेच नव्हेत तर कुत्र्यांचेही शेकडो पांजरपोळ घातले, कुत्र्यांच्या पिलांना पोटभर दूध मिळत नसल्यास धर्मार्थ पांजरपोळांमध्ये लेकरांना लावावे तसे त्या कुत्र्यांना दुधाचे ऊकाडे लावले, त्याच्याही पुढे जाऊन सूक्ष्म प्राण्याचेही दुःख निवारण्यासाठी निदान, त्यांची हत्या तरी घडू नये म्हणून, पाणीसुद्धा तापवून पिऊ लागले—की त्यायोगे पाण्यातले जीवजंतू जिवंतपणे खाऊन टाकल्याची राक्षसी क्रूरता हातून घडू नये ! दिवसा अन्नावर घोंघावणारे जूवजंतू दिसतात तसे रात्री दिसत नाहीत, चुकून अन्नाबरोबर पोटात जातील, या भये रात्री असे जेवायचे नाही, असे कडक आचार सहस्त्रावधी लोकांनी जन्मभर पाळले ! श्वासासह अनेक सूक्ष्म जंतू आत खेचले जाऊन मरतात असे तर्कून नाकावर फडकी बांधून ठेवली की, त्यायोगे बाहेरच्या अनेक जंतूंचे जीव श्वासासरशी आत खेचले जाऊन गुदमरून मरू नयेत ! तितकी तरी हिंसा टाळावी ! ! !

मृगया निषिद्ध; अवघा दाक्षिणात्य ब्राह्मण, जैन, वैष्णव प्रभृती जातिपंथानुयायांच्या लक्षावधी लोकांनी शतकोंशतके मांसमत्स्यांचा आहार सर्वस्वी वर्ज्य केलेला आहे! दुसऱ्याच्याच मांसारक्तावर आपले मांसरक्त वाढविण्याची चटक ही राक्षसकी की माणुसकी? त्याची आवश्यकता तरी काय? जर ‘स्वच्छंदफलजातेन शाकेनापि प्रपूयते। तस्य दग्धोदरस्यार्थे कः कुर्यात्पातकं महत्’ ! ! बिचाऱ्या पाखरांचे पंख कांद्याच्या पाचोळ्यासारखे उखड; सुंदर हरिणांचे देह वांग्यासारखे भाजून भाजून चिरून चिरून त्यांत मसाला भर; पायाने दाबून धरून प्राणासाठी केविलवाणे ओरडणाऱ्या कोंबड्यांची मान कचाकच काप; आणि तो भयंकर रक्तबंबाळ खाटिकखाना! ते प्राणान्तिक वेदनांचे हंबरडे! ! हर हर ! कच्चे नृमांस खाणाऱ्या च्या पिशाच्चांपेक्षा ही क्रूरता काय कमी आहे? त्यापेक्षा ही शुद्ध, सरस हिरवीगार, ताजीताजी शाकभाजी; ही सुरंग, सुमधुर फळफळावळ; ही नाना प्रकारची स्वादू, सात्विक धान्ये; त्यावर काय पोट भरता येत नाही ? मग ते मांसाहाराचे पैशाचिक पाप कां करा ? शाकाहार, धान्याहार, फळाहार—किती हिंसाशून्य माणुसकीस साजेसा ! साधुजीवनास तोच योग्य !

पण इतक्यात अत्यंत कोमल मनाची दया डोळ्यांत टिपे आणून म्हणू लागली, धान्याहार ? शाकाहार ? हे पाहा, त्या धान्यभाजीपाल्यासाठी शेतकरी नांगर चालविताहेत तिकडे ! नांगराच्या फाळासरशी कीडमुंगी, जीवजंतूंची भूभागी वसलेली नगरेच्या नगरे उन्मळून कोसळत आहेत. त्यांच्या वसाहतीची नादिरशाही कत्तल चालली आहे ! लाखो जीव तुमच्या या शेतीपायी ठायीठायी जिवास मुकताहेत! आणि तुम्ही म्हणता धान्याहार, शाकाहार हा सात्विक, अहिंसक नि साधुशील म्हणून! ! तो संहाराचा खाटिकखाना जितका हिंसक, तितकीच ही धान्याहाराची वा शाकाहाराची शेती! मोठ्या स्थून जीवाला जीव जितका प्रिय, तितकाच सूक्ष्म जीवाला जीव प्रिय! तेव्हा खाटिकखाना तेवढा निषेधूनच चालणार नाही, तर दयाशील साधुसंतांनी 'हिंसाप्रायां पराधीनां कृषि यत्नेन वर्जयेत् ।।' म्हणून मृगया जशी निषिद्ध, मांसाशन सर्वस्वी वर्ज्य, तशी हिंसा संपूर्णपणे टाळणे तर धान्याहार, शाकाहार, कृषी ही पंचमयच ठरली ! ! तरीही दयाशीलतेचा, अहिंसक बुद्ध्याचरणाचा हा मननीय नि सदिच्छ प्रयोग करणारे शतावधी सत्पुरूष कचरले नाहीत. कृषी नसला तरीही आपोआप उगवणारी नानाविध वनस्पतींची नि फळवृक्षांची काननेच्या कानने निदान ह्या भारतभूत तरी काय थोडी आहेत ? आम्ही केवळ वनस्पती नि फळे खाऊन राहू पण भूतदयेच्या ब्रीदाचा बाणा कलंकू देणार नाही ! त्या सत्पुरूषांचा हा निश्चय कोणत्याही प्रकारचा गर्विष्ठ अभिनिवेश नव्हता. त्यांचे कोमल अंतःकरण जीवमात्राच्या दुःखाने द्रवेच मुळी तसे !

पण मानवी मनाच्या क्रूरतेला जशी सीमा नाही, तशीच त्याच्या कोमलतेलाही सीमा नाही ! केवळ स्वच्छंदपणे उगवणाऱ्या वनस्पती नि येणारी फळे खाऊ म्हटले तरी हात धुऊन पाठीस लागलेली हिंसा विकट हास्य करून उपहासू लागली की, 'वनस्पती नि फळे ? पण ज्या सूक्ष्म विचाराची वाट तू चोखाळीत आलास, त्याच सूक्ष्म विचाराला विचार की वनस्पतीलाही प्राण नाही की काय ? सुखदुःख, भावना नाहीत की काय ? प्रत्येक स्त्रीकेसर नि पुंकेसर कामेच्छेने संयुक्त होण्यास कामीकामिनीप्रमाणेच लंपटलेला असतो ! त्यांना लागलेले फळ हे त्यांचे अपत्यच आहे ! त्या प्रत्येक फळातील प्रत्येक बी पुन्हा उगवून येण्यासाठी, वाढण्यासाठी, प्रकाशवायुजल यांची रूची चाखण्यासाठी, भूमीत रुजून उगविण्यासाठी उत्सुकलेले असणारच ! प्रत्येक वृक्षलता सजीव, प्रत्येक फळातील प्रत्येक बी एकेक गर्भ आहे ! असे जे फळ तू खाणार त्यांतील प्रत्येक बीजामागे एकेका भ्रूणहत्येचे पातक तुला लागणार !'

बिचारी भूतदया ! पुन्हा द्रवली ! वरील सूक्ष्म विवेक वर दिला आहे त्याहून कितीतरी विस्ताराने हे विवेचन त्या सत्पुरूषांनी, विशेषतः आपल्या जैन धर्मबंधूंच्या आचार्यांनी, आपल्या प्राचीन ग्रंथातून केलेले आहे. इतकेच नव्हे, तर शेवटी त्यांनी त्यांतल्या त्यात कोणती फळे खाल्ली असता ही बीजहिंसा त्यांतल्या त्यात न्यून घडते, ती कोष्टकेदेखील दिली आहेत ! उगाहरणार्थ, वांगे अतिनिषिद्ध, कारण शतावधी बीज हिंसिल्याचे पाप ! आंबा त्याहून न्यून निषिद्ध, कारण त्यात एकाच कोयाची, एकाच बीजाची हिंसा घडणार !

पण तरीदेखील हिंसा ही टाळता येणे अशक्य ; ते अशक्यच ठरणार ! फार काय, अगदी एकबीजी फळाहारदेखील जरी टाळला, आहार असा जरी केलाच नाही नुसता वारा पिऊन जरी कोणी

महातपस्वी राहिला, तरीद्खील भूतदयेचे ध्येय संपूर्णपणे आटरणे त्यास अशक्यच होणार ! कारण नुसता वारा प्याले, तरी वाऱ्यातून असंख्य सूक्ष्मातिसूक्ष्म जीवजंतू पोटात शिरून जठरानलात भस्म होणार !

अन् मनुष्याचे जीवन हेच अशा प्रकारे सर्वथैव हिंसामय आहे असे पाहून भूतदयेसाठी त्याचाच नाश केला, काहीच न खाता-पिता, आपणांसच उपाशी मारले, तरीदेखील हिंसा टळणार नाही ! कारण आत्मघात म्हणजेही प्राणघात ! हिंसा ! पाप ! ! आणि जर मनुष्यमात्राने हाच धर्म पाळला तर मनुष्यजातच्या जात हिंसिल्याचेच महत्तम पातक पदरी पडणार !

इतर ध्येयासाठी मनुष्य स्वतःचा बळी देऊन तरी एक वेळ त्या ध्येयाचा विजय संपादू शकेल ; पण अहिंसेच्या, भूतदयेच्या ध्येयाविषयी सर्वांत कठीण नि सर्वांत दुस्तर अडचण हीच असते की, त्या ध्येयाच्या विजयार्थ स्वतःचा बळी देणे म्हणजेच त्या ध्येयाच्या सर्वस्वी उलट जाणे, त्या ध्येयाचा संपूर्ण पराजय करणे, त्या अहिंसा ध्येयाचीच हिंसा करणे ठरते ! हिंसा घडू नये आणि जगणे तर हिंसेवाचून जगताच येत नाही; म्हणून मनुष्य स्वतः मेला, किंवा मनुष्यजातच्या जात जरी काही न खाता न पिता हुतात्म्याचे मरण मरती झाली, तरी तीही हिंसाच असल्याने त्यायोगे जे चाळावयाचे तेच पाप अचूकपणे पदरी पडते ! जगावे तरी हिंसा ! मरावे तरी हिंसा ! !

अशक्य ! अशक्य ! ! अशक्य ! ! !

असा हा भूतदयेस वा अहिंसेस सर्वतोपरी आचरण्याचा आपल्या हिंदू राष्ट्राने प्राणपणाने केलेला प्रयोग सर्वस्वी अव्यवहार्य ठरला. त्या दैवी सद्-गुणाचा शक्यतो अवलंब करण्यासाठी त्यांनी जो त्याग केला, जे क्लेश सोसले, जी तपस्या आचरली, ती माणुसकी सर्वथैव भूषणभूतच गणली जाईल. त्यांनी जगात कोणत्याही राष्ट्राने सोसले नाहीत असे कष्ट सोसले, अशी चिकाटी दाखविली. त्यांच्या सद्-हेतूचा करावा तितका गौरव थोडाच आहे; आणि त्या णहनीय प्रयोगात त्यांना आलेले अपयश हेही सर्वस्वीच आहे. कारण दयाशीलतेला मनुष्य कोठपर्यंत आचरू शकतो, भूतदया सर्वथैव शक्य आहे की नाही, हा प्रश्न त्यांनी एकदाचा निकालात काढला. कोणत्याही प्रयोगाची असिद्धी हीही एक सिद्धीच असते. मृगजळाच्या शतवार पाठीस लागून हरिणे फसतात म्हणूनच महणूनच मृगजळ फसवे आहे हे ज्ञान झाले. आकाश पर्वतावर टेकले आहेसे वाटते ते खरेच तसे आहे की काय हे पाहण्यासाठी पर्वतामागून पर्वत चढून कैलासाच्या शिखरावर चढले तरी आकाश पुन्हा आपले उंचच्या उंचच आहे असे दिसले, ते प्रयोग अयशस्वी झाले, म्हणूनच आकाश हाती येत नाही हे ठरविण्याचा प्रयोग यशस्वी झाला. तसोच निरपवाद भूतदयोच्या वा अहिंसेच्या मृगजळापाठी धावता धावता ते मृगजळच ठरले. जगावे तरी हिंसा ! टालावे तर पायीपायी शतावधी जीव मरतात ! बसावे तरी बसल्याखाली शतावधी सूक्ष्म जंतू चिरडून जातात ! श्वासोच्छवास करावा तरी जीवजंतू मरतात ! नाकास फडके बांधले तरी त्यातूनही आत जाणारे अतिसूक्ष्म जंतू मरतात, आणि देहातून बाहेर पडू पाहणारे जंतू श्वास रोधिल्याने आतल्या आत तडफडून मरतात ! मुळी नाकतोंड शिवूनच टाकले, तर मनुष्यच मरतो ! पाणी थंड प्यायले तर जीवजंतू पोटात जाऊन मरतात, उकळून प्यायले तर

जिवंत उकळले जाऊन मरतात ! हात हलविला तर शतावधी जीवजंतूंचे मुडदे पडणार ! नुसती डोळ्याची पापणी हलविली तरी ‘पक्ष्मणोऽपि निपातेन येषां स्यात्स्कंधपर्ययः’ असे अतिसूक्ष्म जीव मारले जातात, घायाळ होतात ! सूक्ष्म जीवजंतूंची गोष्ट सोडली, तरी मांस खावे तर स्थूल जीवांची हत्या ! धान्य खावे तर शेतातील लक्षावधी कीडमुंग्यांची, उंदीर-घुशींची, साप-सुरवंटांची हत्या ! झाडपाला, फळे खावी तर वनस्पतीही जीवच ! ! काहीच न प्यावे, न खावे तर मनुष्य जातच्या जात ठार ! मशकासाठी मनुष्याचा वध, बागुरड्यासाठी ब्रह्महत्या, सापासाठी साधूचा घात ! ! रोगाणूही जीवच—अर्थात औषधालये म्हणजेच कसाईखाने ! ! जंताची पूड घेतली तर जंत—म्हणजेच अगदी आपल्या पोटी आलेले जंतू—मरणार. न घेतली तर मनुष्यच मरणार ! क्षयावर औषध घेतले तर क्षयजंतू क्षयाने रोडावणार. त्यांना असह्य दुःख होणार; न घेतले तर त्या स्पर्शजन्य साथीने शतावधी माणसे मरणार ! नारूवर दया करावी तर मनुष्याला असह्य दुःखात पिचावे लागणार. मनुष्यावर दया करावी तर नारूचा किडा रक्त, पू न मिळून उपाशी मरणार ! मांजराच्या हातून उंदीर सोडवावा तर मांजरास दुखविले जाणार, न सोडवावा तर उंदराचा गळा घोटला जाणार ! घरात शिरलेल्या बुभुक्षित वाघावर दया करावी तर कोवळ्या लेकरांचे कंठ कडाकड फोडले जाणार, लेकरास वाचवावयास जावे तर वाघाचा कंठनाल कापावा लागणार ! कच्चे धान्य फाकावे तर माणसे पोट फुगून मरणार, ते दळावे, कांडावे, रांधावे तर त्या त्या कृत्यांत वातावरणीय शतावधी जंतू कुटले, दळले, जाळले जाणार ! एवढ्यासाठी दयाशील स्मृतिकारांनी पाच हत्यांच्या ‘पंचसूनादोषपरिहारार्थम्’ वैश्वदेव करावा म्हणून आज्ञापिले; पण त्या पाची हत्यांत जितके जीवजंतू मारले गेले असतील तितके त्या वैश्वदेवाच्या प्रदीर्घ कुंडात पुन्हा ते जिवंत जाळले जातात त्यांचे काय ? अशक्य ! अशक्य ! सर्वांगपूर्ण, यथावत भूतदया ‘दया सर्वेषु भूतेषु’ आचरणे मनुष्याला अशक्य आहे. त्या वाटेच्या प्रत्येक पावलावर नि वर्तुळावर दुर्लंघ्य अडसर सृष्टीनेच लावला आहे की, ‘जीवो जीवस्य जीवनम् !’ मनूने सृष्टिनियमांचे सार ज्या एका सुरेख श्लोकात ग्रथिले आहे तोच या महनीय प्रयोगात सिद्धिलेला सिद्धान्त की —

*चरानामचरा भक्ष्या दंष्ट्रिणामप्यदंष्ट्रिणः ।*
*सहस्तानामहस्ताश्च शूराणां चैव भीरवः ।।*

## १.२४ दांभिक शब्दच्छल

परंतु शतकोशतकांच्या प्रयोगाने सिद्धिलेला हा सिद्धान्त डोळ्यांआड करून पुन्हा आपले ‘मी अहिंसेस वा भूतदयेस सर्वथैव आचरू शकतो. सर्व मनुष्यांनो, तुम्ही तसा तो धर्म आचरा’ असा हटवादी उपदेश कोणी कितीही सदिच्छेने जरी करू लागला, तरी तो दांभिक शब्दच्छलाच्या खड्ड्यात पडल्यावाचून राहत नाही ! बौद्धांनी पळवाट काढली की दुसऱ्याने मारलेले मांस खाण्यास हरकत नाही. नसेल ! पण ती काही यथार्थ अहिंसा नव्हे ! अनुमन्ता हा जसा विशसिता तसाच एक घातक, हे मनूने स्पष्टच सांगितले आहे. चोरीचे द्रव्य लाटणे हीही चोरीच. जैनात राज्यकर्ते झाले, लढाया केल्या, शेकडो सैनिक मारले ; पण ती म्हणे हत्या नाही ! कां ? तर ‘मन्युस्तन्मन्युर्हति’

हे म्हणणे शोभते ! खरी गोष्ट हीच की, त्याच्या अपराधासाठी मी सापाला मारले ! ! यथावत अहिंसा वा सर्वेषु भूतदया आचरणे मला अशक्य झाले ! घरच्या साखर-गुळांच्या डब्यातून झालेल्या मुंग्यांना चुलीवर चटके देऊन मारायचे नि मग चिमूटभर साखर घेऊन वारूळांतील मुंग्यांना चारायची ! भूतदया आहे ही, पण ती निरपवाद नव्हेच नव्हे !

महात्मा गांधींचीच अगदी चालू गोष्ट घ्या !

मुळातच जे असाध्य ते साध्य आहे, अशा सदिच्छ अभिनिवेशाने कायावाचामनसा अहिंसेचे निरपवाद आचरण करा. मी करतोच आहे, अशा बाण्यापायी त्या सत्पुरूषालासुद्धा किती शब्दच्छल नि विसंगत वर्तन करावे लागले ते दोन-तीन उदाहरणांनीदेखील स्पष्टिता येते. दूध पिणेसुद्धा हिंसा. कारण रक्ताचे दूध बनते! म्हणून त्यानी एकदा दूध वर्जिले. पण पुढे देह स्वास्थ्यास्तव दूध आवश्यक झाले. तेव्हा गाईचे दूध तेवढे वर्ज्य, बकरीचे चालेल, म्हणून ते सेविण्यास आरंभिले ! पण बकरीचे दूध काय रक्ताचे नसते? बकरीचे दूध काय निर्भेळ गंगोदकापासून बनते ? साप डसतो तरी त्याला मारू नये, सोडून द्यावे, म्हणून सारखे उपदेशिले; पण पिसाळलेल्या कुत्र्यांनी प्रळय मांडला तेव्हा त्यांना मारावे, महत्ती हिंसा टाळण्यासाठी लघुहिंसा करावी, असे फर्मान सोडून पिसाळलेली कुत्री मारविली ! मग त्याच कारणासाठी साप कां मारू नये ? हा निव्वळ शब्दच्छल आणि त्याला दर्भाचा दुर्गंध ! ! प्लेग हटविण्यासाठी लोकांनी उंदीर मारले तर त्यांची निंदा केली ! उंदिरालाही जीव नाही का ? म्हणून ढुढ्ढाचार्यी थाटात प्रश्न केले; पण साप कां मारू नये, हे सांगताना साप उंदरांना खातात म्हणून शेतीस उपकारक, हे कारण झाले ? उंदीर सापाकडून मारविणे ही काय हत्या नव्हे ? चोरी करण्यासाठी चोरांना नोकर ठेवणे हा काय सावाचा धंदा ? त्यांच्या केळ्याच्या बागेवर माकडांची धाड पडली, ती गीतेच्या उपदेशाने काही जाईना. तेव्हा ‘कमीत कमी हिंसेत’ माकडांना कसे मारता येईल याचे उपाय शोधले; हा शिखांचा ‘झटका’च नव्हे काय ? पूर्णपणे अहिंसक ब्रीदाला ते मुळीच धरून नाही. प्लेग पसरू नये म्हणूनसुद्धा उंदीर मारणे पाप, असा गांधीजींसारखा वाह्यात उपदेश देणारा जर कोणी गावातून मलेरिया हटविण्यासाठी डबक्यातील डासांची कत्तल करण्यासाठी त्यांच्याचसारखा निघाला, तर डांसदेखील त्याला पुसण्यास सोडणार नाही की ‘आता कोठे गेला आहे राधासुता तुझा धर्म ?’

गांधीजींना एकदा अपेंडिसाईटिस झाला, तेव्हा त्यांच्या देहातील रक्तावर त्या रोगाणूंची वसाहत आनंदाने नांदू लागली. पण पुढे त्यावर शस्त्रक्रिया करवून त्यांची ह्यांनी कत्तल उडविण्यास सोडले नाही. स्वतःचा एक जीव वाचविण्यासाठी त्या शतावधी जीवांचा नाश केला ! तो कां ? जीवाजीवात तुलना करायची, हिंसाधर्म निरपेक्षपणे न आचरता सापेक्षतःच आचरणे अवश्य, हेच ना त्याचे समर्थन ? आता या वर्षी गांधीजींना मलेरिया झाला तेव्हा रूग्णालयात जाऊन त्यावर औषध घेऊन ते रोगजंतू मारून त्यांनी स्वतःचे आरोग्य राखलेच की नाही ? गुरवायूरच्या देवालयप्रवेशासारख्या अनेक प्रसंगी काही जणांच्या भावना इतक्या दुखावल्या की, त्यांनी महात्माजींच्च भस्मासुरी मंत्र उलटा मारून अन्नसत्याग्रह केले. ‘गांधीजींना मला भेटू द्या, नाहीतर मी दाराशी उपाशी मरतो,’ म्हणून एकजण गांधीजींच्या नि मराच्या दाराशी बसला. पण अशा

प्रत्येक साध्या प्रश्नीदेखील गांधीजींनी साफ उत्तरे दिली की, 'तुम्ही वाटेल तितके जण मरणी मेलेत तरी चिंता नाही. मी माझी चळवळ सोडणार नाही. नुसती भेट देण्यावारी जरी तुझा जीव वाचत असेल, तरी तो वाचविणार नाही ! वाटेल तर भेट देईन, नाही तर नाही.' आणि त्या पायी त्या अन्नसत्याग्रहींच्या जीवांना अतोनात क्लेश नि उपासमार सोसावी लागली ! ही काय निरपवाद भूतदया ? निरपेक्ष अहिंसा ? एक गाईचे वासरू दुःसाध्य दुखण्याने तडफडू लागले; त्या दुःखाची दया येऊन गांधीजींनी त्याला गोळी घालून ठार करविले ! हीदया असो वा नसो, पण निरपेक्ष भूतदया, निरपवाद अहिंसा नव्हेच नव्हे ! असलीच तर तुलनात्मक अहिंसा, सापेक्ष भूतदया असेल !

## १.२५ तर मग शक्य त्या तौलनिक भूतदयेची, सापेक्ष अहिंसेची कसोटी कोणती ?

मनुष्याला शक्य नि इष्ट अशा भूतदयेची आजवरची कसोटी म्हणजे ज्याचे त्याचे धर्मग्रंथ समजली जाई. आपल्या धर्मग्रंथापलीकडे इतर धर्मग्रंथांचे ज्ञान किंवा बहुतेक प्रकरणी अस्तित्वसुद्धा जेव्हा निरनिराळ्या राष्ट्रांना माहित नव्हते, तेव्हा आपल्यापुरता आपला धर्मग्रंथकसाबसा बरा वाटत होता. पण आता सर्व धर्मांच्या तुलनात्मक ज्ञानाच्या या युगात त्यांच्यातील विसंगती इतकी स्पष्ट झाली आहे की, त्याची ह्या प्रकरणातील कसोटी अगदी कुचकामी नि हास्यास्पद ठरावी. ह्या ग्रंथांच्या आधारे मुसलमान डुक्कर खाणार नाहीत, गाय खातील; ख्रिश्चन गाय नि डुक्कर दोन्ही खातील; बौद्ध मेलेले वा मारलेले डुक्कर खातील, मारणार नाहीत; जैन, वैष्णव यांपैकी काहीच खाणार नाहीत ! ! नुसती ब्राह्मणांचीच गोष्ट घेतली, तरी बंगाली ब्राह्मण मासे खातील, मांस, कोंबडी खाणार नाहीत, कनोजी मांस खातील, मासे कोंबडी खाणार नाहीत; दाक्षिणात्य मीमांसक यज्ञातील मांस खातील; इतर ब्राह्मण मांस, मासे, कोंबडी यज्ञीय-अयज्ञीय काहीही खाणार नाहीत, पण कॉडलिव्हरच्या बाचल्यांचा मात्र फन्ना पाडतील! ज्यू लोकांचा, मुसलमानांचा नि हिंदूतील स्मार्तांचा, जैनांचा असे धर्मग्रंथ एकत्र करून त्यातील खाद्याखाद्य पदार्थांच्या तालिका (table) एकासमोर एक ठेवल्या की, या प्रकरणी त्यांच्यात निर्बुद्ध विसंगती ओतप्रोत भरलेली आहे आणि एकाच देवाची ती त्रिकालाबाधित नि सार्वदेशिक आज्ञा कशी होऊच शकत नाही ते तत्काल ध्यानात येईल. धर्मग्रंथांची कसोटी एकंदर भूतदयेच्या प्रकरणी अशीच निकम्मी नि टाकाऊ असल्यामुळे मनुष्याने भूतदया वा अहिंसा किती, कशी नि कठोर आचरावी, याची त्यातल्या त्यात अधिक बुद्धिग्राह्य नि स्पष्ट अशी कसोटी एकच एक उरते. ती म्हणजे ऐहिक मानवी हितास जी पोषक तितकीच भूतदया आचरणीय, इष्ट ! त्या पलीकडे भूतमात्रांवर दया करण्याची मनुष्यास जी सोय नाही, मनुष्याच्या हितास अवश्य तेव्हा तेव्हा जी हिंसा केलीच पाहिजे, तिचा दोष मनुष्यावर नाही ! तो दोष असलाच तर सृष्टीचा, निसर्गाचा. इच्छा असलीच तर प्रभूची ! या मनुष्यहिताच्या कसोटीने वरील धार्मिक विसंगतता नि वैचारिक गांधीगोंधळ पुष्कळ अंशी टाळता येतो. साप-विंचू प्रभृती प्राणी मिळेल तेथे निःशंकपणे मारावे ! काहीजण नांगी कापून विंचू सोडतात ! पण असली दया म्हणजे भूतदया नसून भूतबाधा असते. कारण नांगी कापलेला विंचू जरी पुन्हा डसला नाही, तरी नांगीवाल्या विंचवाची वीण वाढविण्याचे काही सोडीत नाही ! हिंस्त्र पशूंची मृगया अवश्य करावी. उपयुक्त पशू संरक्षावे. मोर, नाना सुरंग सुरेख पिसांचे पक्षी रानात राखावे. उपद्रव न होईल अशा बेताने हत्तीसारखे शोभिवंत नि माणसाळू

प्राणी वधू नयेत; मनुष्यास उपद्रवू लागले तर बेशक ठार मारावे. घोडा, उंट, गाय बैल, शेळ्या, मेंढ्या, कुत्रे मनुष्यास अत्यंत उपयुक्त; असे सर्व पशू ममतेने पाळावे; त्यांना निष्कारण क्रूरपणे वागवू नये. पण मनुष्यास उपद्रवू लागले तर लगेच गोळी घालावी. आहाराविषयी आपल्या लोकांनी तर स्वतःवर घातलेले भूतदयेचे प्रतिबंध इतके त्रासदायक आहेत की, त्यापायी सहस्त्रावधी मनुष्ये मारल्याचे महापाप नि मनुष्यहत्येचा अपराध आपण सारखा करीत आलो आहोत, हे आपल्या ध्यानातही येत नाही ! कोणत्याही दुष्काळाची गोष्ट घ्या. असलेले अन्न न खाता ज्या भूतदयेपायी लाखो मनुष्ये दुष्काळात उपवास काढतात, ती भूतदया का भूतबाधा !

समुद्रकाठच्या विस्तीर्ण दक्षिण भारतात दोहो बाजूंना असलेले लक्षावधी ब्राह्मण, वैष्णव आणि जैन प्रभृती निरामिष लोकांना मत्स्याहाराची किती चांगली सोय आहे ! दोन-तीन वर्षांच्या दुष्काळानेही समुद्र काही आटत नाही. अशा कठीण प्रसंगी तरी या जातींतील दुष्काळग्रस्तांच्या उपजीविकेस मत्स्याहाराचे कितीतरी साहाय्य मिळेल ! माशांचे प्राण वाचविण्यासाठी आपल्या मुलामाणसांचे प्राण अन्न अन्न करीत तडफडू देण्यात भूतदया ती काय साधली ? मत्स्यांचे प्राण तेवढे दयेस पात्र नि स्वतःच्या मुलालेकरांचे प्राण काय केरकचरा आहेत ? तीच गोष्ट कोंबडी, ससे, पक्षी प्रभृती प्राण्यांची. मांसाहार, शाकाहार हा सुकाळात ज्यांच्या त्यांच्या रूचीचा नि प्रकृतीचा प्रश्न असावा; पण दुष्काळात वा अडचणीत पचेल ते ते अवश्य खावे! कोणते मांस खाद्य ते धर्मग्रंथांच्या टिपणीत न पाहता वैद्यकाच्या कोष्टकात पाहावे. वैद्यकदृष्ट्या कोणास डुकराचे मांस हितावह असेल, तर त्याला तेच धर्म्य. मनुस्मृतीत तर वराहाचे मांस खाण्याचा ब्राह्मणांनादेखील जवळ जवळ आग्रहच केला आहे. जे डुक्कर खात नाहीत त्यांचे म्हणणे असतेकी, डुक्कर घाण खाते यासाठी ते धर्मतः निषिद्ध मांस ! पण गाय ही मांस खाते ! आणि सगळ्यात सर्वभक्षक जात कोणती असेल तर ती म्हणजे मासे ! गदळ घाण जलप्रवाहात टाकावयाचा अवकाश की, ख्रिसमस केकच्या पक्वान्नावर नाताळात युरोपियन जसे लालसेने तुटून पडतात, तसे मासे त्यावर बुभुक्षेने तुटून पडतात ! मग मासे वा गाय धार्मिक खाद्य म्हणून खाणाऱ्यांनी रानडुकरांच्या मांसालाच तेवढे नाक का मुरडावे ? पोथीत आहे म्हणून; दुसरे काय ? तोच विवेक गाईसही लागू. गाय, बैल, म्हैस हे दूध नि शेतीकाम या दृष्टीने मनुष्याच्या अत्यंत उपयोगी, माणसाळू असे पाळीव पशू. त्यांना शक्य त्या दयेने पाळावे. पण तरीही ज्या परिस्थितीत त्यांच्यावर दया केल्याने मनुष्याच्या दिवावर बेतते, त्या परिस्थितीत काही ती दया उक्त ठरणार नाही. राष्ट्रशत्रुचे सैन्य गाईंच्या गोलाआड दडले तर गाईंचा कळप कापून शत्रूंशी गाठ घेतली पाहिजे. परकीय विपक्षाच्या देशातील गाई, गाई म्हणून काही रमणीय नव्हेत ! त्यांच्या दुधावर आमचे शत्रू वाढतात—आम्ही नव्हे ! हिंदुस्थानात दुभत्या गाई वा कामसू बैल खाण्यासाठी मारणे एकंदरीत कमी लाभदायक, म्हणून साधारणतः वर्ज्य ; पण इंग्लंड-अमेरिकेत तरी गोमांस हे आम्हाससुद्धा इतर कोणत्याही मांसासारखे खाण्यास काहीच हरकत नाही. जो विवेक, मांसाशनाच्या प्रकरणी, तोच भूतदयेच्या सर्व प्रकरणी लागू पडतो. प्लेगासाठी उंदीर मारावे की माणसे मरू द्यावी ; बहुबीज वांगे खाणे पाप, का एकबीजी आंबा ; शेती करणे हिंसा की बागाईत करणे हिंसा ; दिवसा खाणे भूतदया की रात्री ; इत्यादि सर्व वाद नि कुत्र्यांचे पांजरपोळ घालणे, सापांना दुधाचे उकाडे लावणे, कोल्ह्यांसाठी काकड्यांचे मळे पाणविणे, ढेकणांना उपास पडू नयेत म्हणून मुलांच्या पाळण्यात नि मोठ्यांच्या पलंगात त्यांची लागवड करणे—ह्या साऱ्या गोष्टी भूतदयेच्या नसून भूतबाधेच्या होत ! भूदयेचा परिणाम नसून भूतबाधेचा खेळ आहे !

माणसांवर दया करून जर भूतमात्रांवरही दया करता आली असती, तर ती अवश्य केली असती.  ते अशक्य असले तरीही माणसाच्या हितास घातक असणाऱ्या प्राण्याचा नाश करतानासुद्धा मनाला काहीतरी दुःख होतेच होते ; दयेची मळमळ बाधतेच बाधते.  पण स्वतःच्या लेकराला रोगापासून वाचविण्यासाठी जेव्हा शस्त्रक्रिया करावी लागते, तेव्हा कासावीस होणाऱ्या आईच्या हृदयाची ती दशा जशी अप्रयोजक म्हणून दाबून टाकून लेकरावर शस्त्रक्रिया करावीच लागते, तशीच भूतदयेची ही दुर्बलता, ही मळमळ मनुष्यहितार्थ दडपून टाकलीच पाहिजे.  आज आपल्या इकडे अशा प्रकारची मनुष्यहितघातक भूतदया दाखविणाऱ्यांविषयी एक प्रकारची पूज्यबुद्धी उत्पन्न होते, तो जसा काही एक अलौकिक सद्-गुण समजला जातो, साधुत्वाचे लक्षण समजले जाते.  पण वास्तविक पाहता ती एक नृशंस व्याधी आहे.  ती भूतदया नसून भूतबाधा आहे !  मनुष्यघातक अपराध आहे ! मानसिक दुर्बलता आहे !  जी मनुष्यास घातक, ती दया ‘दया सर्वेषु भूतेषु’ होईल तरी कशी ? कारण सर्व भूतांत मनुष्यही आलाच !   सृष्टीच्या आम्हास सर्वस्वी असुधारणीय असलेल्या व्यवस्थेशी नसती घासाघास करण्यापायी ‘इदं च नास्ति परं च न लभ्यते’ अशी फजिती करून घेण्यापेक्षा मनुष्याने जे साध्य तितके तरी साधावे हेच उत्तम.  जी मनुष्याच्या हितास पोषक वा निदान अविरोधी तितकीच भूतदया पाळणे एवढेच काय ते त्याचे कर्तव्य, तोच याविषयीचा खरा सृष्टिविहित मानवधर्म ! !

*—किर्लोस्कर, डिसेंबर १९३६*

११. तत्काल बहिष्कार्य असे काही परकी शब्द

*विपश्चित्संमतस्यास्य किं स्यादज्ञाविडंबनैः ।*

*रोचते किं क्रमेलाय मधुरं कदलीफलम् ।। १ ।।*

(रधुनाथ पंडितकृत ‘राज्यव्यवहारकोश’)

भाषाशुद्धीची तात्विक चर्चा, अनावश्यक त्या त्या जुन्या वा परकीय शब्दांचे स्वभाषेतून शक्यतो उच्चाटन करावे की नाही, याची अवश्य तितकी भवति न भवति आता झालेली आहे. महाराष्ट्र साहित्य संमेलनामध्ये जळगावला ‘उर्दु जुने शब्द स्वभाषेत जे घुसले आहेत ते काढूच नयेत’ अशा अर्थाच्या एका ठरावात असलेला विक्षिप्त तेवढा भाग गाळावा अशी उपसूचना घसघशीत बहूमताने जी या वर्षी संमत झाली तीच भाषाशुद्धीच्या चळवळीच्या प्रस्तुत प्रगतीचे उत्कृष्ट मापन नि प्रबळ पुरावा होय.

सामाजिक, राजकीय वा वाङ्मयीन, कोणतीही सुधारणा ण्हटली की, प्रथमतः तिचा काही तात्विक खल अवश्यच असतो. परंतु तिचे खरे यश ती व्यवहारून दाखविण्यावरच अवलंबते. ती इष्ट की अनिष्ट, शक्य की अशक्य, ते नुसत्या शाब्दिक चर्चेनेच काय ते सिद्धिणे बहुधा दुर्घटच असणार. परंतु ती ज्या नेटाने आचरणात आणून सोडली जाते त्या प्रमाणात तिचे सुपरिणाम नि सुसाध्यता प्रत्यक्षपणेच प्रत्ययास येत चालल्याने पूर्वीच्या विरोधकांमध्ये जे प्रामाणिक असतात तेच तिचे समर्थक होतात, आणि जे अप्रामाणिक असतात त्यांचीही तोंडे बंद पडल्यावाचून राहत नाहीत.

यास्तव आम्ही प्रथमपासून एकीकडे चर्चेचा धडाका चालू ठेवीत असताही तिच्यावर न थांबता किंवा शाब्दिक संमतीच्या ठरावांची वा असंभव एकवाक्यतेची वाट पाहत न बसता, दुसरीकडे आमच्या लेखांतून, भाषणांतून नि प्रत्यहीच्या संभाषणांतून उर्दू, इंग्रजी प्रभृती जुन्या वा नव्या परशब्दांना प्रत्यक्षपणे बहिष्कारण्याचाही शक्यतो प्रयत्न करीत चाललो, ती भाषेची सुधारणा लगोलग व्यवहारीतही चालली. आमच्याप्रमाणेच श्री आठवले प्रभृती अनैक भाषाशुद्धीच्या अभिमान्यांनी ती सुधारणा आचरून दाखविण्याचा यथाशक्ती उपक्रम चालविला. त्यामुळेच ती चळवळ आज इतकी बळावलेली आहे. त्यातही प्राध्यापक माधवराव पटवर्धन यांनी तर आता साहित्य संमेलनाचे आपले भाषणही अनावश्यक परकीय शब्दांचा स्पर्शही न झालेल्या शुद्ध मराठीतच लिहिले आहे ! साहित्य संमेलनाच्या अध्यक्षीय भाषणामध्ये भाषाशुद्धीच्या दृष्टीने अकलंकित अशा मराठी भाषेतील पहिले भाषण करण्याचा मान प्राध्यापक पटवर्धनांनीच पटकावला हे त्यांचे वैशिष्ट्य चिरस्मरणीय होय ! भाषाशुद्धीची सुधारणा नुसत्या तात्विक चर्चेच्या दलदलीतच रूपत न ठेवता ती आपल्यापुरती तरी आचरणात आणून सोडण्याच्या त्यांच्या ब्रीदाविषयी आम्ही प्राध्यापक माधवराव पटवर्धनांचे मनःपूर्वक अभिनंदन करतो. सुधारणा नुसती सुचवून दाखविणारे बहूत; ती करून दाखविणारेच अल्प ! कोणतीही सुधारणा जी यशस्वी होते ती मुख्यत्वे ह्या करून दाखविणाऱ्यांच्याच बळावर होय ! !

ह्यासाठीच भाषाशुद्धीचा जो अनुयायी नि अभिमानी वर्ग महाराष्ट्रात गेल्या सात-आठ वर्षांच्या नेटाच्या चळवळीमुळे उत्पन्न झालेला आहे नि सारखा वाढत आहे, त्यास आमचे असे सांगणे आहे की, आता त्यांनी भाषाशुद्धी करावी की न करावी याचे चर्वितचरण करण्यात फारसा वेळ न दवडता, त्यांना ज्या प्रमाणात ती पटली आहे, त्या प्रमाणात ती व्यवहारून टाकण्यावरच मुख्य भर द्यावा. अनावश्यक परकी शब्द, जुने वा नवे, मी माझ्या संभाषण-भाषण-लिखाणातून नाही तर नाहीच वापरणार, असे बिरूद बांधून ते ते परशब्द सारखे बहिष्कारीत चलावे, तदर्थक आपले जिने विलुप्त नि नवे उद्-भावित असे स्वकीय शब्द रूढावले जातीलच जातील आणि त्याच प्रमाणात सध्या बोकाळलेले तेते परशब्द भाषेतून लोपू लागतीलच. नुसत्या तात्विक चर्चेने हे कार्य केव्हाही साधणार नाही यास्तवच ह्या लेखात आम्ही भाषाशुद्धी पटलेल्यांनाच काय ते मुख्यत्वेकरून संबोधिणार आहोत आणि त्यांच्या अडचणी कशा टाळता येतील, त्यांनी आपले श्रेय कोणत्या निश्चित स्वरूपात पुढे ठेवले पाहिजे, कोणकोणते परशब्द अगदी तत्काल बहिष्करून तदर्थी कोणत्या प्रकारे कोणत्या कसोटीने स्वकीय शब्द उपायोजिले पाहिजेत तेच काय ते मुख्यतः दिग्दर्शिणार आहोत.

## १.२६ भाषाशुद्धीची कसोटी

भाषाशुद्धीचे मुख्य सूत्र काय तेच मुळी लक्षात न घेतल्यामुळे किंवा लक्षात न आल्यामुळे तिचे बहुतेक विरोधक उगीचच्या उगीच साप साप म्हणून भुई बडवीत सुटतात आणि भरमसाट परशब्द वापरण्याच्या स्वतःच्या गबाळपणाचा अतिरेक झाकण्यासाठी आक्रंदू लागतात. 'अहो, कोणताही परकीय शब्द असा वापरायचाच नाही असे म्हणणे हा शुद्धिवाद्यांचा निव्वळ अतिरेक आहे ! त्यायोगे छटा व्यक्तविता येत नाहीत, भाषाशब्ददारिद्र्य वाढते !' त्या शंकेने व्याकुळलेल्या मंडळींस आम्ही पुन्हा सांगतो की, आपण भाषाशुद्धीची मूळ प्रतिज्ञा, मी परशब्दांना जी कसोटी लावू इच्छितो ती कसोटी आपण एकदा पाठ करून टाका, म्हणजे आपल्या आक्षेपातील शेकडा नव्वद आक्षेप आपोआप निरस्त होतील ! आपल्यात जे प्रामाणिक आक्षेपक आहेत तेच तिचे समर्थक बनतील ! कारण स्वभाषेचा अभिमान त्यांनाही आहेच आहे ! स्वकीय शब्द मारले जाऊन त्यांच्या ठाई विदेशी बाजारबुणग्यांचा धुमाकूळ माजावा अशी काही त्यांची इच्छाच असणे शक्य नाही. त्यांच्या शंकानिरसनासाठी भाषेशुद्धीच्या प्रत्येक अभिमान्याने भाषाशुद्धीची मुख्य प्रतिज्ञा नि कसोटी मुखोद्-गत करून ठेवली पाहिजे. भाषाशुद्धीच्या प्रचारकांना स्वतःसही आपल्या ध्येयाची नि धोरणाची सुस्पष्ट कल्पना येण्यासाठी ह्या प्रतिज्ञेची रूपरेखा अवगत असलीच पाहिजे. भाषाशुद्धीची ती प्रतिज्ञा नि कसोटी थोडक्यात अशीः

(१) आपल्या स्वभाषेत ज्या अर्थाचे शब्द होते, आहेत किंवा उद्-भविणे सुसाध्य आहे, त्या अर्थाचे जे परकीय शब्द, ते रूढावलेले असले तरीही बहिष्कारावे आमि आपले ते तदर्थक शब्दच प्रचलवावे. जसेः शिवाय (वाचून), हल्ली (सध्या).

(२) परंतु ज्या वस्तु आपणात पूर्वी नव्हत्याच आणि ज्यांना आपले शब्द उद्-भविणे दुर्घट अशा परशब्दांना वापरण्यास हरकत नाही. जसेः गुलाब, जिलबी, कोट, सदरा, बूट इत्यादि.

(३) या कटाक्षाचा असाही अर्थ नाही की, ह्या उर्दू, इंग्रजी प्रभृती परभाषाच शिकू नयेत वा त्यांच्यातील ग्राह्य तेही घेऊच नये. परभाषेत जे जे वाक्प्रचार, वृत्त, घाटणी, विचार सुरेख किंवा आमच्याहून अधिक चांगले, ते ते आम्हीही आत्मसात करण्यास सोडणार नाही.

वरील कसोटी इतकी स्पष्ट आहे की, परकी शब्द ‘अनावश्यक’ कोणते ते बहुधा बिनचूकपणे भाषाशुद्धीच्या प्रचारकांना ठरविता यावे नि ‘झाडून सारे परकी शब्द स्वभाषेतून हुसकून देण्याचा अतिरेक भाषाशुद्धीवादी करू पाहतात’ असा कांगावा करण्यास कोणासही निमित्त सापडू नये.

भाषाशुद्धीच्या अनुयायांना दुसरी अडचण जी पदोपदी पडतेसे आमच्याकडे येणाऱ्या पत्रांवरून दिसते, ती ही की, या कसोटी प्रमाणे कोणते शब्द तत्काल बहिष्कारावे त्याची एक टिपणी त्यांच्यापुढे नसते, खरे पाहता आम्ही सहा-सात वर्षांपूर्वी प्रसिद्धिलेल्या ‘भाषाशुद्धी’ या पुस्तिकेच्या शेवटी एक चालचलाऊ टिपणी छापलेली आहे. पण तरीही आजच्या आज जे जे परकीय शब्द आपल्या लिखाणातून नि भाषणातून छटेची वा अर्थाची कोणतीही अडचण न येता सहजासहजी बहिष्कारिता येतील, त्यांची दिग्दर्शनापुरती एक लहान टिपणी खाली देत आहोत. प्रत्येक शब्दापुढे त्याची थोडीशी विशिष्ट चर्चाही जोडीत आहोत.

खाली दिलेल्या टिपणीतील परशब्द तरी यापुढे आपल्या संभाषणात वा लिखाणात मी आजपासून नाही तर नाहीच वापरणार, तदर्थक स्वकीय शब्दच वापरीन, असा अगदी निर्धार आजपासून भाषाशुद्धीच्या अभिमान्यांनी करावा. या वर्षापुरता ह्याविषयीचा हाच कार्यक्रम ! आपण हे शब्द वापरणे सोडले आणि तदर्थक शब्द पुन्हा प्रचलवीत राहिलो की, ते परशब्द पुष्कळ प्रमाणात विलुप्त झालेच पाहिजेत, तदर्थक स्वकीय शब्द पुनरूज्जीवित नि पुष्कळ प्रमाणात रूढ झालेच पाहिजेत, इतकी भाषाशुद्धीवाद्यांची संख्या आजही वाढलेली आहे. पण त्यांनी आता नुसता तात्त्विक काथ्याकूट करीत न बसता आपल्या लिखाणात वा भाषणात हे इतके निवडक परशब्द तरी कधीही न वापरण्याचे प्रत्यक्ष कार्य करू लागले पाहिजे. भाषाशुद्धीनिदान ह्या प्रमाणात तरी व्यवहारून टाकली पाहिजे. खाली दिलेले स्वकीय प्रतिशब्द केवळ दिग्दर्शक समजावेत. कोणी दुसरे योजले तरी चालेल. स्वकीय प्रतिशब्द असावेत येवढाच आग्रह.

आजच्या आज बहिष्कारिता येण्यासारख्या अगदी अनावश्यक अशा परशब्दांची दिग्दर्शक टिपणी

शिवाय, खेरीज — विना, वाचून त्यातून, त्याविना (हे दोन्ही विदेशी शब्द बायकामुलांच्या तोंडीदेखील रूळलेले. कोणतेही पुस्तक घ्या. पानोपानी ‘शिवाय’ बोकाळलेला. रूचिपालट म्हणूनसुद्धा ‘विना’ इत्यादि स्वकीय पर्याय येणार नाहीत ! तदर्थक स्वकीय शब्द या दोन्ही परकीय शब्दांनी ठार केले! यात ‘छटे’चाही लवलेश प्रश्न नाही. केवळ विकृत सवय, खोड! हे दोन्ही शब्द अगदी तत्काल बहिष्कार्य.)

हल्ली — सध्या, अलिकडे, आजकाल. (हा शब्दही बायकामुलांतसुद्धा बोकाळलेला. लक्षपूर्वक पाहावे, ग्रंथातही तीच गोष्ट. स्वकीय ‘सध्या’ विलोपत चाललेला ! यास्तव हा ‘हल्ली’ परकीय शब्दही तत्काल बहिष्कार्य.)

जरूर, जरूरी — अवश्य, आवश्यकता इत्यादि (वरील शब्दांविषयीची सर्व कारणे या विदेशी शब्दांसही लागू पडतात. यास्तव तसाच तत्काल बहिष्कार्य.)

दिलगिरी, दिलगीर — खेद, दुःखी, विषण्ण. (वर्तमानपत्रांना कोणी मेले, काही चुकले की, दिलगिरी प्रदर्शविण्याची खोडच लागलेली. खेद, तोटा नि दुःख वाटते हे प्रयोग सुचतच नाहीत ! हे दोन्ही शब्द अगदी अनावश्यक अतएव बहिष्कार्य!)

कायम — नित्याचा, स्थिर, निश्चित. ( हे प्रतिशब्द योजताना कसेसेच वाचेल, तर खालील टीप पहावी.)

कायमनिधी — स्थिरनिधी. ( हा अशुद्ध धेडगुजरी शब्द सवयीने इतका रूळला आहे की, त्याचा स्वकीय शब्दपर्याय स्थिरनिधी हाच शब्द अशुद्ध नि हास्यास्पद वाटावा ! मुसलमान जसा बंगल्यात बसला तर भटालासुद्धा विटाळ वाटत नाही, पण हिंदू महार येताच विटाळ होतो, प्रथम प्रथम सुधारकालाही कसेसेच वाटते ! — तसेच हे! !)

अखेर — शेवट, अंत. (हा अखेर शब्द आगदी अनावश्यक नाही का बरे !)

अव्वलपासून अखेरपर्यंत — अथपासून इतीपर्यंत, आदीपासून अंतापर्यंत. (छटेच्या लटपटीतसुद्धा ह्या परकीय प्रयोगाचे समर्थन करणे अशक्य आहे.)

अगर — अथवा, जर. (हा परशब्द पूर्वी फारच रूढ असे; सुदैवाने अलीकडे विलोपत चालला आहे. अगदी अनावश्यक, तत्काल बहिष्कार्य.)

अस्मान — आकाश, नभ. (खालील टीप पाहा.)

जमीनअस्मानाचे अंतर — आकाशपाताळाचे अंतर. (अस्मान शब्द पूर्वी फार प्रचलित असे. आता तो तुरळक येतो, त्याची आता थोड्या सावधपणासरशी हकालपट्टी करता येईल.)

जमीनजुमला — शेतीवाडी. (जमीनजुमल्यात जर कोणास छटेचा भास होईल, तर त्याने पक्के समजावे की, ही रूढीची खोड ! शेतीवाडी वापरा, की त्यातही छटा येईल.)

उमेदवार — इच्छूक, स्पर्धालू.

सेकण्डहॅण्ड — आडहाती, आडगिऱ्हाइकी.

जबाबदारी, जबाबदार — उत्तरदायी, उत्तरदायित्व, दायित्व. (हिंदी-बंगालीत ‘उत्तरदायित्व’, ‘दायित्व’ हे शब्द अगदी रूढावलेले आहेत. आम्ही तेच मराठीत आणून योजीत आलो आणि आताशी ते बरेच रूळत चालले आहेत. आता सर्वांनी तेच वापरावे की, अगदी सवयीचे होतील.)

प्रुफ् स — उपमुद्रिते. (आम्ही नवीन पाडला.)

कम्पॉझिटर — जुळारी. (आम्ही योजलेला हा शब्द झपाट्याने फैलावत आहे.)

कॉलम, रकाना — स्तंभ. (हा स्वकीय शब्द आम्ही काढल्यापासून इतक्या झटकन रूढावत गेला की, मराठीतून आता हिंदी प्रभृती अनेक भाषांत तो शिरला आहे.)

Martyr (ऊर्दू) शहीद — हुतात्मा. (अंदमानात हा शब्द पुष्कळ वापरू लागलो. त्यासरशी तो मराठीतच काय पण बोलता बोलता आज हिंदी, बंगाली, पंजाबी ते तामील, तेलगूपर्यंत प्रचलला आहे ! ! काय सर्व हिंदी भाषा-संघात Martyr वा ऊर्दू शहीद ह्या विदेशी शब्दांना स्वकीय प्रतीशब्द असा नव्हताच ? त्या Martyr वा शहीद यापेक्षा हुतात्मा, हौतात्म्य या शब्दातला ध्वनी अधिक व्यापक, सूचक नि अत्युदार आहे.)

अरब समुद्र — पश्चिम समुद्र. (हे आपले पुरातन नाव. आपल्या भूगोलातील मानहानिकारक परकी नावे शक्यतो पालटून टाकण्याची प्रथा पाडली पाहिजे.)

सर्क्युलर — परिपत्र.

सर्चलाइट — शोध-ज्योत.

फाउंटनपेन — अखंड टाक, झरणी.

मोनोटाइप, लिनोटाइप — एकटंकक, पंक्ति-टंकक.  (ते दोन्ही इंग्रजी शब्द अजून लोकांत रूळले नाहीत, तोच हे स्वकीय शब्द रूळवावे.)

टाइपरायटर — टंकलेखन.

पॅरिग्राफ — छेदक.  (हा शब्दही आम्ही काढल्यापासून मराठीत रूळत चालला आहे.)

मुष्कील — कठीण, दुर्घट, अडटण, दुरापास्त.

मदत, मदतनीस — साहाय्य, सहाय्यक.  ( अगदी अनावश्यक असताही अगदी घरीदारी, तोंडी खिळलेला हा परशब्द बायकामुलांच्या बोलण्याकडे लक्ष देताच आढळेल की, ‘मदत’ शब्द जर शंभरदा आला, तर ‘साहाय्य’ एकदासुद्धा येत नाही.  खेडवळांच्या तोंडीही ‘मदत’ फार !  ‘साहाय्य’ विरळा ! )

रिपोर्ट, रिपोर्टर — प्रतिवृत्त, प्रतिवेदक.  (चाणाक्याच्या अर्थशास्त्रातही रिपोर्टरला प्रतिवेदकच म्हटलेले आहे.  हे शब्द आम्ही योजू लागल्यापासून रूळले जात आहेत.)

मेहेरबानी — कृपा.  ( हा परकी शब्द खेडवळांपर्यंत रूळलेला.  त्याने स्वकीय ‘कृपा’ शब्द बोलीतून नाहीसा करीत आणला आहे !  अगदी अनावश्यक, यास्तवच त्वरित बहिष्कार्य.)

मेहेरबान — महाशय, कृपावंत.  (अर्जातून ह्याच परशब्द नियमाने येतो.  परंतू हिंदू सभेच्या वतीने होणाऱ्या आणि इतर सरकारी अर्जांतूनही रत्नागिरीकडे ‘कृपावंत’ हा स्वकीय शब्द आता लिहिला जातो.)

नंबर — क्रमांक.  (हा सुरेख शब्द आमच्या वडील बंधूंनी काढला.  आम्ही प्रचलविला.  हिंदी-पंजाबीपर्यंत आज रूढावत चालला आहे.)

खास अंक — विशेषांक.  (क्रमांक जसा मराठीत झटपट रूळावला, तसाच नियतकालिकांनी हा विशेषांक शब्द तत्काळ रूजविला पाहिजे.  हा शब्द आधीपासूनच परिचित आहे; पण तरीही खोड सुटत नाही !   बहुतेक संपादक ‘खास अंक’ म्हणतात !   किर्लोस्कर मासिकांनी ‘विशेषांक’ वापरण्याचा जसा निर्धार केला आहे, तसाच सारेजण करतील, तर हा एक अनावश्यक परशब्द ‘खास अंक’ लवकरच नाहीसा होईल.  यापुढे सर्वांनी ‘विशेष अंक’ असेच लिहावे, बोलावे.)

अंदाज पत्रक, बजेट — व्ययसंकल्प, अर्थसंकल्प.

कायदेकौन्सिल, असेंब्ली — विधिमंडळ, विधिसमिती. (हिंदी, बंगाली, ‘धारासभा’ ‘व्यवस्थापिका सभा’, हे शब्द बहुतेक वृत्तपत्रे वापरतात. आम्ही आपल्या मराठीस अनुकूल असा विधिमंडळ शब्द काढला. तो कित्येक संपादक वापरतात. नामदार व्यंकटराव सुर्वे तोच विधिमंडळ शब्द मुंबई विधिमंडळातही आज सहा-सात वर्षे वापरीत आहेत. पण तरीही ‘केसरी’ सारखी काही पत्रे, ‘कायदे-कौन्सिल’ हा धेडगुजरी शब्दच हट्टाने कवटाळीत आहेत. स्वकीय शब्दच वापरण्याचा अतिरेकी अभिनिवेश एक वेळ क्षम्य मानता येईल; पण परशब्द नि तोही ‘कायदे-कौन्सिल’सारखा अगदी ओंगळ, पण तोच वापरीन, हा दुराग्रह निव्वळ लज्जास्पद नाही का ? विधिमंडळ नको असेल, तर दुसरा स्वकीय शब्द तुम्ही योजा! हिंदीत रूढावलेला ‘धारासभा’, बंगालीतील ‘व्यवस्थापिका परिषद’ म्हणा ! पण खरे पाहता मराठीत रूळत चाललेला विधिमंडळ, विधिसमिती हाच सुरेख ! )

लायक — योग्य, कार्यक्षम. (खालील टीप पाहा.)

नालायक — अयोग्य. टाकाऊ. (हे दोन्ही परशब्द अगदी अनावश्यक असताही गावगन्ना बोकाळलेले ! ब्राह्मण स्त्रीयांच्या तोंडालाही ‘लायक’ गोड लागतो ! योग्य शब्दाचा घास घेतला की ठसकाच लागतो ! !

सदर, सदरहू — वरील, उपर्युक्त, प्रस्तुत.

सिनेमा टॉकी — बोलपट. (चित्रपट, बोलपट हे शब्द सुदैवाने चहूकडे रूढावले आहेत. पण जर का ‘टॉकी’ ही वस्तू इकडे येताच आम्ही ‘बोलपट’ ‘केसरी’त सुचविला नसता आणि पाच-सहा वर्षे तशीच जाती, तर तो ‘टॉकी’च लोकांच्या तोंडी रूळून काढता काढवला नसता. पण बोलपट लगोलग प्रचलविल्याने आता साऱ्या छटाबिटा त्याच्याच कच्छपी लागल्या आहेत! स्वकीय शब्द वापरू लागले की, छटाबिटा झटसाऱ्या त्यालाही चिकटतात, हे आमचे म्हणणेच या उदाहरणावरून सिद्ध होत नाही का ?

सिनेमा-हाऊस — पटगृह, चित्रपटगृह.

सिनेरिओ — पटकथा.

फिल्म — चित्रावली.

तहहयात — आजीव, यावज्जीव, आमरण, आजन्म. (हा शब्द पूर्वी फारच बोकाळलेला असे. पण त्यावरील आमच्या सतत टीकेने तो आता मृत्युपंथास लागला आहे. वाटेल तितके स्वकीय प्रतिशब्द

असताही हा परशब्द प्रत्येक संस्थेत शंभर वर्षे सारखा धुडगूस घालीत होता. यावरूनच भाषाशुद्धीचा सतत पहारा आपल्या वाङ-मयावर असणे किती आवश्यक आहे, हे दिसून येईल !)

शिफारस — अनुरोध. (हिंदी-बंगालीत ‘शिफारस’ या परशब्दाला अगदी नियमाने अनुरोध हाच शब्द रूढ आहे. आपण मराठीत तोच योजावा.)

सर्टिफिकेट — प्रमाणपत्र, दाखला किंवा प्रशस्तिपत्र (प्रमाणपत्र हा शब्द आम्ही पाडला. दुसरे पूर्वीचेच आहेत. तिन्ही मिळून भिन्न भिन्न असे सारे अर्थ व्यक्त होतात.)

पेण्टर — रंगकार, चित्रकार. (खेड्यापाड्यांतही ‘पेंटर’ घुसत आहे. त्याहून रंगकार किती सोपा, स्कीय. पण गबाळपणामुळे हे परशब्द आम्ही नागरिक प्रथम वापरतो नि मग ते गावगन्ना निवडुंगासारखे फैलावत जातात.)

वॉचमेकर — घड्याळजी. (वरील टीप पाहा. रत्नागिरीस हा स्कीय प्रतिशब्द आता प्रचलत आहे.)

कोरम — गणसंख्या, गण. (नुसता ‘गण’ इतका शब्दच वापरणे पुरे. आम्ही हा शब्द ‘भाषाशुद्धी’च्या पुस्तकात सुचवून वापरू लागताच मराठीत आज पुष्कळ फैलावत चालला आहे.)

ट्रस्ट — निक्षेप. (खालील टीप पाहा.)

ट्रस्टी — विश्वस्त. (हे शब्द ही आम्ही काढून वापरू लागल्यापासून मराठीस चांगलेच मानवल्यासारखे दिसतात.)

ट्रस्ट-डीड — निक्षेपपत्र. (वरील टीप पाहा.)

मोनापोली — एकस्व. (नवीन शब्द)

पेटंट — निजस्व, रामबाण. (नवीन शब्द. या शोधाचे निजस्व मी माझ्या नावे नोंदविले आहे.)

फोनोग्राफ — ध्वनिलेख.

लाऊड स्पिकर — ध्वनिक्षेप. (प्रचलित आहे.)

फक्त — केवळ, नुसता, मात्र. (हा परशब्द अगदी अनावश्यक, पण घरीदारी बोकाळलेला; अगदी तत्काळ बहिष्कार्य.)

कॅलेंडर— कालदर्श, मितिपट. (प्रतिवर्षी नवी कॅलेंडर्स छापतांना यापुढे सर्वांनी कालदर्श वा मितिपट हा शब्द त्यावर आवश्य छापावा. म्हणजेच एक-दोन वर्षात या सुरेख स्वकीय शब्दाची भर स्वभाषेत पडेल.)

इमारत, बिल्डिंग— घर, गृह, बांधकाम, भवन, आलय इत्यादि. (हे दोन्ही परशब्द किती अनावश्यक आणि तरीही किती बोकाळलेले! ज्याच्या त्याच्या तोंडी! घर बांधले रे बांधले, की झाली ती बिल्डिंग! ! भवन, निकेतन प्रभृती दहा तरी सुरेख शब्द घरी असून घराच्या नावासाठी दुसऱ्याच्या दारी भीक मागण्यावाचून वास्तुशांती अशी करायचीच नाही असा लतकोडगेपणा आजकाल चालू आहे! माहन बिल्डिंग, विश्राम बिल्डिंग अशा शब्दांच्या ठायी मोहनालय, विश्राम भवन ही नावे काय शोभत नाहीत? नुसते बांधणीविषयी बोलावयाचे तर शाळेची इमारत न म्हणता शाळागृह किंवा शाळागृहाचे बांधकाम म्हणावे.)

उमर — वय. (हा परशब्द मरू घातला आहे. अगदी त्याज्य.)

मरहूम — मृत, विगत, परलोकवासी. (वरील टीप पाहा.)

बद्दल — विषयी, संबंधी. (हा परशब्दही ‘शिवाय, हल्ली’ यांच्या सारखा तोंडी नि लिखाणात इतका बोकाळलेला असतो. एकेका पानांत, वेदांतासारख्या अगदी गंभीर ग्रंथातही ‘बद्दल’ दहादा येईल, पण ‘विषयी’ वा ‘संबंधी’ अगदी विरळा! हा परशब्द तत्काळ बहिष्कार्य! )

बाबत — गोष्ट, विषय, प्रकरण. (वरील टीपच लागू.)

खुलासा — उलगडा, विवरण, स्पष्टीकरण. (वरील टीपच लागू.)

जखम — घाव, दुखापत (या दोन्ही परशब्दांविषयी वरचीच टीप)

जखमी — घायाळ, आहत. (हे परशब्द ज्यांच्या त्यांच्या तोंडी इतके रूढावले आहेत की, तदर्थक स्कीय शब्द लेखनातही दहा वेळांतून एक वेळसुद्धा येत नाहीत. हवे त्याने पारखून पाहावे आजचे लिखाण वा बोली.)

मेजवानी — जेवणावळ, भोजन. (ब्राह्मण सभेने टिळकांना मेजवानी दिली असे म्हणणे शाकभाजीपाल्याला सागुती म्हणण्याइतकेच विसंगत आहे! कारण मेजवानी म्हणजे टेबलावरचे

जेवण!  पण रूढी हा अपप्रयोग पटकन गिळते.  आणि भोजन वा जेवणावळ ह्या सुसंगत स्वकीय शब्दांनाच हसते!  भोजन दिले, पंगत दिली, असेच प्रयोग करावे, की तेही रूढ होतील.)

सोकॉल्ड — तथाकथित.

अर्जंट — त्वर्य.

नजर — दृष्टी, दृष्ट.  (अगदी अनावश्यक पण बायकापोरांच्यासुद्धा तोंडी बसलेला हा परशब्द तत्काळ बहिष्कार्य.)

मालक — धनी, स्वामी.  (वरील टीपच लागू.)

मालकी — स्वामित्व.  (वरील टीपच लागू.)

खात्री — निश्चिती, प्रत्यय.  (आम्ही ‘निश्चिती पटली’ हा प्रयोग करू लागल्यापासून मराठीत तो रूळू लागला आहे.  खात्री हा परशब्द अगदी पावलोपावली येतो.  प्रतिशब्द म्हणून तरी एक स्वकीय शब्द भाषेत प्रटलवावा.)

हजर — उपस्थित, विद्यमान.  (उपस्थित हा शब्द हिंदी-बंगालीतरूढ होता, तो आम्ही मराठीत योजू लागलो.  प्रथम पुष्कळ टीका झाली; पण आता मराठीत तो उपस्थित शब्दच रूळत असून ‘हजर’ मागे पडत आहे.)

गैरहजर, हजेरी — अनुपस्थित, उपस्थिती.  (वरील टीपच लागू.)

तयार — सज्ज, सिद्ध.  (तयार या परशब्दाने स्वकीय ‘सज्ज, सिद्ध’ हे शब्दच परकीय करून सोडले!  तेच नवखे करून सोडले!)

पूर्वतयारी — पूर्वव्यवस्था, पूर्वसिद्धता.  (पूर्वतयारी हा धेडगुजरी शब्द अगदी संभावित वाङ्मयातही खपतो.  त्याची खंत कोणासही वाटत नाही!  पण त्याच्या ठायी पूर्वव्यवस्था वा पूर्वसिद्धता हा शुद्ध स्वकीय शब्द योजला की, तोच विलक्षण नि अतिरेकी म्हणून त्या शिष्टांना वाटतो!  खोड, दुसरे काय! !

खातर — साठी.  (जसे पैशाखातर = पैशासाठी, धर्माखातर = धर्मार्थ, धर्मास्तव.)

खुद्द — प्रत्यक्ष, स्वयं, स्वतः. (वरील टीप पाहा)

जाहिरात — प्रासिद्धक. (नवीन घडलेला हा शब्द रूळत आहे. हिंदी-बंगालीत ‘विज्ञापन’ हा शब्द जाहिरात या अर्थी सर्व वृत्तपत्रे वापरतात. आमची पत्रे प्रासिद्धके हा शब्द जाहिरातीच्या ठायी वापरतील तर त्वरीत रूढावेल.)

जाहीरपणे, जाहीर — पर्कटपणे, प्रकट.

इरादा — हेतू, बेत.

मार्फत — द्वारा, हस्ते, विद्यमाने. (अगदी अनावश्यक परशब्द. पण लेखी-तोंडी उगीचच घर करून बसलेला.)

खलास — समाप्त, संपूर्ण. (वरील टीपच लागू.)

सबब — यासाठी, यास्तव, निमित्त.

सध्या स्थलाभावी इतके शब्द दिग्दर्शनार्थ पुरे आहेत. भाषाशुद्धिवाद्यांनी आपल्यापुढे या शब्दांची टिपणी नेहमी ठेवावी आणि आपले कोणतेही पत्र, निबंध वा इतर लिखाण संपताच ते ह्या दृष्टीने पुन्हा एकदा वाचावे. सवयीमुळे मरील परशब्द त्यात पडलेला दिसताच तो खोडून वरील टिरणीतील वा दुसरा कोणता पटेल तो स्कीय शब्द योजावा. शंभर जणांनी जरी आपल्या लेखात हे परशब्द बहिष्कारून तदर्थक स्कीय शब्द एक वर्षभर वापरले, बोलीत आणले, तरीदेखील ते स्वकीय शब्द भाषेत आज आहेत त्याहून शतपटीने अधिकपणे रूळले गेलेच पाहिजेत, ते परशब्द मागे पडलेच पाहिजेत. पण ‘केल्याने होत आहे रे । आधी केलेचि पाहिजे ।।’

आता शेवटी एक परशब्द तेवढा दाखवावयाचा आम्ही हेतुतःच मागे ठेवला आहे. कारण ह्या वरील सर्व परकीय शब्दांपेक्षा त्या परशब्दाचे आपल्या भाषेतील अस्तित्व नि डोईजडपणा आपल्या भाषेला अत्यंत लज्जास्पद झालेला आहे!

## १.२७तो अत्यंत लज्जास्पद परशब्द म्हणजे ‘कायदा’ (निर्बंध)*! !*

पहा, मराठीतच काय, पण काश्मीर ते रामेश्वर नि द्वारका ते कामरूपपर्यंत आपल्या सर्व हिंदू भाषासंघात ‘कायद्या’ला स्वकीय असा प्रतिशब्द उरला नाही. जगातील अत्यंत प्राचीनातील प्राचीन नि त्या काळातील श्रेष्ठांतील श्रेष्ठ स्मृती-मनुस्मृती-ज्या राष्ट्राने रचली, ‘first codified law as such’ ज्या

राष्ट्राने रोम्युलस, लायकरगस, जस्टिनियनांच्या शतकोशतके आधी ग्रथिला, त्या आम्हा हिंदूंच्या राष्ट्रभाषांतील एकाही भाषेत आज ‘law, कायदा’ या दोन्ही परकी शब्दावाचून स्वकीय असा ‘कायद्या’ला शब्द ठरला नाही! चंद्रगुप्ताची साम्राज्ये चालविणाऱ्यांच्या नि चाणक्याची अर्थशास्त्रे रचणाऱ्यांच्या वंशज्यांना समाजाची मूलभित्तीच ज्या भावावर उभी तो ‘कायद्या’चा भाव व्यक्तविण्यास परशब्दांविना स्वकीय शब्द असा ठरला नाही! ! आज जर मंगळावरील एखादा पर्यटक आला तर तो आजच्या अवस्थेवरून असाच सिद्धांत बांधील की, हिंदू समाजात मुसलमान येण्यापूर्वी ‘कायदा’ असा नव्हताच. तो भाव व्यक्तविणारा शब्दसुद्धा त्यांच्या स्वतःच्या भाषेत नाही-जसा अंदमानी बुशिटो प्रभृती रानटी टोळ्यांच्या ! !

परंतु हे शल्य आम्ही ‘कायद्या’ला स्वकीय प्रतिशब्द नसल्याविषयी सारखी ओरड करूतो तोणाच्याच मनाला बोचावे तसे बोचले नाही ! ! कायदेकौन्सिल कायदेपंडित, कायदेशास्त्र, कायदेतज्ज्ञ, कायदेशीर (!) असे अत्यंत भुक्कड, कर्णकटू नि आचरट शब्द यच्चयावत हिंदू जनता पंडित-अपंडितसुद्धा वापरीत आली, निःसंकोचपणे आजही वापरीत आहे!

या लेखात ‘कायदा, Law’ ह्या शब्दाविषयी किंवा त्यांना जो स्वकीय प्रतिशब्द आम्ही सुचवीत आहो त्याविषयी विशेष विवरण करण्यास स्थल उरले नाही. पण ते आमच्या ‘भाषाशुद्धी’ या पुस्तिकेत वाचकांनी एकदा तरी अवश्य पाहावे.

या लेखापुरते थोडक्यात इतकेच सांगतो की, आता एकंदरीत ‘कायद्या’ला ‘निर्बंध’ हाच स्वकीय शब्द योजावा. तो निर्बंध शब्द दुसऱ्या अर्थी न योजता ‘कायदा’ याच अर्थी राखून ठेवावा. अडथळा या अर्थी प्रतिबंध शब्द योजावा. कायदेशीर-नैर्बंधिक, बेकायदेशीर-अनैर्बंधिक, निर्बंधाविरूद्ध. ह्या निर्बंध शब्दापासून घडणारे निर्बंधशास्त्र, निर्बंधपंडित, निर्बंधतज्ज्ञ, निर्बंधशील प्रभृती शब्द वरील कायदेपंडित, कायदेतज्ज्ञ पर्भृती आचरट शब्दांहून किती सुसंगत, शुद्ध नि श्रुतिसुस्वर आहेत पाहा.

## १.२८ नागपूरचे एक पत्र

सुदैवाने उर्दू-इंग्रजीने ग्रासलेली सारीची सारी स्मार्त परिभाषा, नैर्बंधिक शब्दावली उज्जीविण्याचे यत्न सध्या काही ठिकाणी होऊ लागले आहेत. आम्हास अलीकडे नागपूरच्या दोघा प्रसिद्ध वकिलांचे—श्री. चांदूरकर, बी. ए., एल. एल. बी. आणि श्री काळीकर, बी. ए., एल. एल. बी.— यांचे पत्र आले आहे. त्यात ते लिहितातः

“आपली मराठी भाषाशुद्धी करण्याची आस्था नि यत्न सुविख्यात नि प्रशंसनीय आहेत. आपल्या कार्यास साहाय्यभूत होण्याची संधी आम्हासही लाभत आहे. नागपूरास एक ‘न्यायबोध’ नामक कायद्याचे (क्षमस्व!) मासिक मराठीत आम्ही काढीत आहोत. इकडे उर्दूच्या घनदाट छायेमुळे कायदेविषयक मराठी परिभाषा नाही. ती ह्या मासिकाद्वारा निर्माण करू इच्छितो...‘मनोहर’ मासिकात

आपल्या ‘काळेपाणी’ कादंबरीत रफिउद्दिनच्या खटल्यात आपण वापरलेली भाषा समर्पक नि मनोवेधक आहे. सबब विनंती की, इंग्रजी शब्दांना मराठी प्रतिशब्द नि्रमाम करून एक शब्दसूची धाडावी.” इत्यादी इत्यादी.

वरील वकीलद्वयांच्या या प्रयत्नास्तव आम्ही त्यांचे आभारी आहोत. त्यांच्या ‘न्यायबोधा’च्या प्रसिद्धकात छापले आहे की, ‘वाचकांच्या कायदीय शंकांचे समाधान करण्यास मदत होईल.’ वरील वाक्यात ‘कायदीय’ अशासारख्या विक्षिप्त शब्दांचा प्रयोग निरूपायाने कसा करावा लागतो तेही स्पष्टच होईल. या प्रकरणी चिपळूणचे साहित्यिक श्री बर्वे वकील यांचेही अशीच शब्दसूची धाडण्याविषयी पत्र आले होते. अशा प्रयत्नांना साहाय्यभूत होतील अशा दोनचार सूचना ह्या लेखात प्रकटपणे केल्या असता त्यांचा अशा विचारांच्या अनेक गृहस्थांना सार्वजनिकपणे उपयोग होईल, यास्तव त्या तेवढ्या सूचना करून हा लेख संपवू.

(१) कायद्याला निर्बंध हाच शब्द योजून मासिकाचे नाव ‘निर्बंधबोध’ असे ठेवावे. आमच्या ‘भाषाशुद्धी’ पुस्तिकेतील ‘निर्बंध’ शब्दाचे विवरण एकदा तरी वाचावे.

(२) निर्बंधपरिभाषा (Legal terminology) पुष्कळ श्रमाने एकत्रित करणारा आणि जुन्या स्मार्त परिभाषेतील आज लागू ते शब्द घेऊन त्यांना नवीन स्वकीय शब्दांची जोड देणारा असा मोठा ग्रंथ म्हटला म्हणजे श्रीमंत सयाजीराव महाराजांनी प्रसिद्धिलेला ‘श्रीसयाजी शासनशब्द-कल्पतरू’ हाच होय. ह्या नवीन ग्रंथात सर्व राजकीय नि नैर्बंधिक परिभाषेतील शतावधी शब्दांचे बंगाली, हिंदी, मराठी नि संस्कृत भाषेतील स्वकीय प्रतिशब्द देऊन त्यासहच मूळ इंग्रजी शब्दही जोडलेले आहेत. त्यातही त्या ‘शासनशब्द-कल्पतरू’ ग्रंथाप्रमाणे त्या राज्यात ती नैर्बंधिक स्वकीय परिभाषा सरकारीरित्या शक्यतो वापरण्याचा उपक्रम झालेला आहे. ह्यात दिलेल्या शब्दांपैकी काही स्थली आधिक ग्रहणीय असे शब्द काढता येतील, येतातही. पण ते ते किरकोळ अपवाद सोडले असता इतर सर्व स्थळी ह्या थोर ग्रंथाचा फार उपयोग होणारा आहे. भाषाशुद्धीच्या कार्यास तर तो ग्रंथ अत्यंत साहाय्यभूत झालेला आहे.

(३) हिंदी नैर्बंधिक परिभाषा म्हणजेच उर्दू! ही लज्जास्पद स्थिती पालटण्यासाठी तिकडेही चळवळ चालू झाली आहे. तिचे स्वरूप समजण्यास श्री श्यामकुमार वकील महाशय, आगरा ह्यांनी नवीनच प्रसिद्धिलेले ‘स्मृतिमंदिरप्रवेशक’ (मूल्य १।। रू. आगरा नगर, संयुक्तप्रांत) हे पुस्तक फार अभ्यासनीय आहे. त्यात अनेक इंग्लिश, उर्दू अशा कायद्यातील परशब्दांना स्वकीय शब्द विचारपूर्वक योजिलेले आहेत.

*—किर्लोस्कर, जानेवारी १९३७*

१२ . धर्मभोळेपणाचा कळस

‘स्वराज्य’ पत्रात काही दिवसांपूर्वी अंमळनेरच्या बातमीदाराने खालील वाचनीय वृत्त दिलेले आहे. आशा घटना वरचेवर घडतात; पण लोकांना सवयीमुळे त्यांत विशेष असे काहीच वाटत नाही. इतकेच नव्हे, तर धर्मभोळेपणा किती हास्यास्पद—नव्हे—घातक असतो, हे जर कोणी दाखवून देण्यासाठी तशा घटनांचे उदाहरण दिले तर कित्येक रूढिपूजक मंडळी ‘छट हे काहीतरीच सांगता! हि अतिशयोक्ति आहे तुमची! असे कधी घडतच नाही!’ अशी सोयिस्कर विसराळूपणे वेळ मारून नेऊ पाहतात. एवढ्यासाठी नावागावासह ती बातमी येथे सांगत आहोत.

अंमळनेर येथील कोर्ट रस्त्यावर नवीन टाउनप्लॅनिंग क्षेत्रात पिंपळाच्या एका झाडाचा रहदारीस अडथळा होत असल्यामुळे म्युनिसिपालिटीने त्याचा लिलाव केला. पिंपळाचे झाड असल्याने कोणी हिंदू ते लिलावात घेईना. एका मुसलमानाने दोन-तीन रूपयांना ते विकत घेतले. पण ते तोडले जाण्याच्या आधीच एका ब्राह्मणाची वृद्ध बाई विहिरीवरून पाणी आणीत असता त्याची एक फांदी त्या बाईच्या डोक्यावर पडून ती मूर्च्छा येऊन पडली. खाटेवरून तिला घरी आणल्यावर तिचे प्राणोत्क्रमण झाले!

ज्या अर्थी ते पिंपळाचे झाड ‘पवित्र’ म्हणून तोडले असता ‘पाप’ लागते किंवा ‘भूतबाधा’ होते या धर्मछाप समजुतीमुळे अंमळनेरसारख्या नगरात कोणीही हिंदू ते विकत घेऊन तोडावयास सिद्ध होईना, त्या अर्थी ह्या धर्मभोळेपणाच्या प्लेगाने किती प्रबळपणे समाजातील फार मोठ्या भागास आजही पछाडून टाकलेले आहे, ते उघड होते. ‘हो, आता कोण उरले आहे इतके धर्मभोळे! नसते प्रश्नच गृहीत धरून उगीच काथ्याकूट कशाला करता? ’ अशा ढसराईवारी चालू धर्मभोळेपणावर जे पांघरूण घालू इच्छितात, अप्रिय विषय टाळू पाहतात, त्यांची ती ढसराई तिती अतथ्य नि आंधळी असते त्याचे हे उघड प्रत्यंतर आहे! रत्नागिरीस गेल्या वर्षीच एक अशी गोष्ट घडली. एक वडाचे झाड अगदी मोडकळीस येऊन लवले होते. ते वेळीच तोडा नाहीतर अपघात होईल, म्हणून धन्यास पुष्कळ सागितले. पण वड-पिंपळ तोडावा कसा ह्या भीतीने त्या देवलसी धन्याने अळंटळं चालविली. शेवटी ते जुनाट झाड एकदाचे अकस्मात कडकड करीत कोसळले, ते थेट मंदिरावरच! त्या मंदिराचा एक भाग त्याखाली पडला. तिथे कोणी माणूस योगायोगाने नव्हते, नाहीतर माणूसही मरायचेच! पण माणूस मेले नाही तरी मंदीर कोसळलेच! पुन्हा वड तोडण्याचे ‘पाप’ टाळले तर मंदिर जाणूनबुजून पाडून घेण्याचे पाप माथी आले! आणि धार्मिकदृष्ट्या तर तेच पाप मोठे! आर्थीकदृष्ट्याही दस रूपडीचे ते वडाचे मोडकळीस आलेल झाड वाचविण्यापायी शेदोनशे रूपयांचे बांधकाम पाडून घेणे हा दुधखुळेपणाच झाला!

वड-पिंपळ तोडणे हे पाप आहे, ती झाडे जागृत दैवते आहेत, त्यावर महापुरूष राहतात इत्यादी भाबडच धर्मभावनांना उराशी धरण्यानेच आपण आपल्या ‘धर्मा’ची केवढी विटंबना करतो, तेसुद्धा ह्या आंधळ्या धर्मभोळेपणास दिसत नाही! वड-पिंपळ तोडणे हे हिंदू पाप मानतात! हिंदूने वड-पिंपळ तोडला तर त्याच्यावरील ‘महापुरूष’ हिंदू तोडणाराच्या मानगुटीस बसतो! ते झाड, दैवत हिंदूला

भेडसावते! पण मुसलमान-ख्रिश्चनांना भेडसावीत नाही! त्यांचा केसही वाकडा करीत नाही! असा दुहेरी लज्जास्पद विश्वास बाळगणे म्हणजे आपल्या धर्माची असह्य विटंबना नाही काय? हिंदूंची अशीच धर्मसमजूत आहे, ही गोष्ट नाकारता येत नाही. कारण वड-पिंपळाचे जे झाड तोडावयास ते भितात, तेच झाड तोडण्यास हेतुतः मुसलमानास तोडावयास सांगतात. त्या झाडांची खांडके उडविणाऱ्या मुसलमान-इंग्रजाला काहीएक होत नाही, हे ते प्रत्यक्ष पाहतात. म्हणजे वड-पिंपळातले हे हिंदू दैवत इतके भ्याड आहे की, ते मुसलमान-इंग्रजांपुढे शेपूट घालते! भित्यापाठीच काय तो लागणारा ब्रह्मराक्षस! त्याला भजणाऱ्यांच्या मानगुटीस बसणारा आणि भंगणाऱ्याचे पाय चाटणारा भ्याड! बायकोचा बाजीराव नि चावडीचा मारखाऊ, असा आमचा हा वड-पिंपळ देव आहे असे मानणे, म्हणजे आपल्या देवाची निव्वळ टवाळी करणे नव्हे काय? स्वधर्माची असली पायमल्ली करणारी ‘धर्मभावना’ हीच अधर्मभावना नव्हे काय? हिंदूंचा देव नृसिंहासारखा हवा! आपल्या भक्ताचे—प्रल्हादाचे—कोणी वाकडे करू पाहताच हिरण्यकश्यपूच्या उदरास विदीर्ण करणारा जो देव तो हिंदूंचा देव एक वेळ शोभेल! कुठे तो भक्तरक्षक नि अभक्तनाशक नृसिंहदेव, नि कुठे हा मुसलमान-इंग्रजांच्या कुऱ्हाडीखाली बकऱ्यासारखी आपली मानगुटी बें बें करीत देणारा, पण हिंदूने एक पर्दक्षिणा कमी घालताच वा एखादी डहाळी तोडताच त्याची मानगुटी गुर्रर करून मुरगळू धावणारा भक्तघातक भ्याड वडदेव! पिंपळदेव!

त्या अंमळनेरच्या पिंपळाला तोडण्यासाठी मुसलमान त्यावर चढून कुऱ्हाडीचे घाव घालीत होते. पण त्या पिंपळदेवाने त्यांच्या पायाला एक चिमटासुद्धा घेतला नाही. पण त्या पिंपळाला नित्य पूजा-प्रदक्षिणा करणाऱ्या बिचाऱ्या वृद्धब्रह्मणीच्या डोक्यावर मात्र फांदी हाणून तिला ठार केले! हा का हिंदूंचा देव, की हिंदुद्वेषी राक्षस?

जर वड-पिंपळ तोडण्याच्या ‘पापा’ने देव हिंदूंना दंडितो तर तेच पाप करणाऱ्या मुस्लिम-ख्रिश्चनांना तो कसा दंडित नाही? असे विचारताच कित्येक चांगले शास्त्रीपंडितही असे गंभीरपणे सांगतात की, ‘अहो, भाव तसा देव! हिंदू पिंपळ तोडणे पाप ही भावना बाळगतो म्हणून त्याला भूत बाधते! मुसलमान-इंग्रज तसे मानीत नाहीत म्हणून त्यांना पाप लागत नाही. भूत त्यांना बाधत नाही. आमचा धर्म आम्हाला, त्यांचा धर्म त्यांना!’ आमि हेच त्यातल्या त्यात खरे, पण पंडितांच्या अभिप्रेतार्थाच्या अगदी उलट अर्थी! कारण पिंपळ दैवत आहे असे मानले नाही की, जर पाप लागत नाही, ते भूत बाधत नाही, तर मग ही भूतबाधा नि पाप टाळण्याचा उच्चम मार्ग म्हणजे ती खुळचट धर्मभावना सोडणे, ते भूत न मानणे, हाच नव्हे काय? मुसलमानांप्रमाणेच आम्हीही वड-पिंपळ हे निव्वळ एक झाड आहे, देव नाही, भूत नाही, असेच मानावे, की मग वड-पिंपळ वाटेल तेव्हा तोडताही एईल नि भूतबाधा होण्याची वा पाप लागण्याची भीतीही उरणार नाही! प्रथम दोरीला साप म्हणून जाणूनबुजून समजा का, नि मग तिला पाहताच साप आल्याच्या हबक्याने खुळ्यासारखे मरा का?

गाय, वड, पिंपळ प्रभृती ह्या सारख्या पशुवृक्षांना मनुष्यावर निग्रहानुग्रह करणाऱ्या देवता आहेत असे मानणे हा निव्वळ खुळचटपणा आहे हीच गोष्ट खरी. बैलगाय ही पशू; वड, पिंपळ, तुळस ही झाडे; जसे निवडुंगाचे, शेवरीचे, पळसाचे. कावळ्याच्या विष्ठेतून जरी त्याचे बीज उकिरड्यात पडले तरी उकिरड्यात ते उगवते. उपटले की उपटू देते, कुऱ्हाड हाणली की तुटते, चुलीत घातले की सर्पण

होते. वड, पिंपळ, तुळस ही झाडे ्नुष्यांना उपयुक्त म्हणूनच काय ती रक्षणीय, विशेषतः आपल्या उष्ण देशात ह्या छायादायी विस्तीर्ण वृक्षांचा उपयोग अधिक. अर्थात उलटपक्षी जेव्हा त्यांचा उपद्रव होऊ लागतो तेव्हा कोणत्याही इतर झाडासारखेच त्यांना तोडून टाकणे हाच खरा धर्म. एक यःकश्चित पिंपळाचे झाड जगविण्यासाठी त्याच्या कोसळणाऱ्या फांद्यांखाली आपल्या वृद्ध मातास मुले लेकरे मरू द्यावयाची! ही देवस्की की निव्वळ राक्षस्की! वड-पिंपळ तोडण्याने भूतबीत काही एक बाधत नाही, हे अज्ञ समाजाला पटविण्यासाठी जिथे जिथे अशा उपद्रवी जागी वा परिस्थितीत वड-पिंपळ असतील, तेथे तेथ त्यांचा लिलाव पुकारला जाताच स्थानिक हिंदू सभांनी किंवा सुधारक हिंदूंनी तो हेतुतः विकत घ्यावा आणि कचाकच कुऱ्हाड घालून तोडून टाकावा, म्हणजे हिंदू समाजाला पटेल की, वड-पिंपळ ख्रिश्चन-मुसलमानांचे जसे काही वाकडे करू शकत नाही, तसेच हिंदूंचेही काही करू शकत नाही, माणसासारखा राग, लोभ, शाप, वरदान यांची जाणीव नि शक्ति त्या जड वस्तुस कुठली असणार! माणसाचा जीव जात असला तरी रानडुकराचे रूचकर मांस खाऊच नये, हा जसा मुसलमानांचा भाबडेपणा, तसाच मुलांमाणसांचा त्याच्या अवजड पडक्या फांद्या कोसळून चुराडा उडत असला तरी वड-पिंपळ तोडूच नये, हा हिंदूंचा खुळचटपणा! आंब्या-फणसांसारखी रसाळ झाडे आपण सोयीप्रमाणे तोडतो, जाळतो; कारण सुदैवाने त्यावर धर्मभोळेपणाचा ‘पोथीछाप’ मारला गेला नाही! पण वड-पिंपळावर एका अज्ञानयुगात तो धर्मछाप पोथीने मारला म्हणून त्या प्रकरणी विवेकाचे डोळे असे आंधळे झाले . धर्मछाप एखाद्या भावनेवर पडला की, ती आंधळी होते आणि तिच्या प्रकरणी मनुष्य पज्ञाहत झालाच म्हणून समजावे! मग तो हिंदू असो, मुस्लिम असो वा ख्रिश्चन वा यहुदी! तिथे बुद्धिविजय संपून भक्तिविजयाचा अध्याय लागलाच म्हणून समजावे!

भक्तिविजयाचीच गोष्ट निघाली म्हणून आणखी एक गमतीची बातमी सांगू. लंडनच्या मेलने आलेली ही बातमी नोव्हेंबरच्या ‘पंजाबी’त छापलेली आहे. ती अशीः

‘पोस्ट ऑफिसच्या मुख्य केंद्राकडे जवळ जवळ ५ ० ० ० पत्रे असलेली एक थैलीच्या थैली धाडण्यात आली आहे. ही थैली समुद्रामध्ये कित्येक महिने भिजत पडलेली होती. ‘बीओडिसीआ’ नावाचे वायुयान इंग्लिश खाडीत गडप झाले होते त्यावर असलेली ही पत्रांची थैलीही समुद्रात बुडाली. पुढे योगायोगाने तीच तेवढी त्या सिंधुतळी गेलेल्या वायुयानाच्या अडगळूतून बाहेर पडून समुद्रात महिनोगणती बुडत, भिजत, तरत शेवटी तिची काहीएक नासधूस न होता स्वतः सागराने त्या थैलीला केण्ट जिल्ह्यातील डिमचर्च या गावच्या तटावर आणून टाकले! ती अवजड अगडबंब थैली पाणी पिऊन पिऊन नुसती फुगून गेली होती. समुद्राच्या चिकट पाण्यात लोणच्यासारखी सारी पत्रे मुरून मुरून लगदा झालेला होता. पण एकदा ती रास हाती येताच ‘मृतपत्र’ विभागाच्या कामगारांनी पत्रांच्या पाण्याने फुगलेल्या राशीच्या राशी शुष्कीकरण यंत्रावर घालून कोरड्या केल्या. तेव्हा त्यातून पाण्याच्या धारा सारख्या गळत होत्या. मग अनेक हस्तकांनी ती पत्रे उलटली, पुन्हा कुशलपणे प्रत्येकी इतकी अलगद सुकविली की, ती लिहिली तशीच सुवाच्च व्हावी. त्यात शेकडो पत्रे हिंदुस्थान नि ऑस्ट्रेलिया इतकी दूरवरची! पण ती आता ज्याची त्याला वाटण्यात येत आहेत!’

ही गोष्ट घडली तशीच साध्या लौकिक भाषेत सांगितली तरी आश्चर्यकारक वाटते; पण कशी घडली ते समजते. पण जर का तीच गोष्ट तुकारामाच्या काळी घडली असती तर ती या साध्या ‘टपालविजय’ ग्रंथातून काढून एखाद्या ‘भक्तिविजय’ ग्रंथात ढकलली गेली असती! तिच्या ह्या लौकिक रूपाचे त्या भक्तिविजयी भाषेत कसले अलौकिकीकरण झाले आसते. ती गंमत पाहावयाची असेल, तर संत तुकारामाच्या इंद्रायणीत बुडविलेल्या वह्यांच्या याहूनही साध्या गोष्टीची अत्यद् भुत भक्तिविजयी कथा कशी बनली ते आठवा!

संत तुकारामाच्या अबंगांच्या वह्या त्या काळच्या काही सनातनी कर्मठांनी इंद्रायणीच्या डोहात बुडवाव्या म्हणून आज्ञा सोडली. त्याप्रमाणे त्या वह्यांना एक दगड बांधून ते बोचके इंद्रायणीच्या डोहात बुडविले! ते तळाशी गेले; पण तो दगड बांधलेली बंधने निसटून किंवा पाणी पिऊन ते कागद फुगल्यानंतर तसेच्यातसे ए एक-दोन दिवसानंतर वर आले. बाहेर काढून लगोलग सुकविल्यानंतर आतील अभंग पुन्हा वाचता येऊ लागले. त्या वाणीछाप वह्याच असल्यामुळे त्यांच्यावरील शिवलेल्या जाड पुठ्ठ्यांच्या वेषटनामुळे आतील पानांचे रक्षण अधिकच सोपे झाले असावे. परंतु ही लौकिक भाषा सोडून तीच गोष्ट त्या संतांच्या नि त्या काळच्या भाविक नि दैविक भाषेत सांगितली जाताच तिची किती अलौकिक अशी एक रसाळ कथा बनली आहे ती पाहा! समत तुकाराम विठ्ठलापुढे धरणे धरतात, विठ्ठलास संकट पडते. स्वयमेव त्या वह्या उचलून वर आणतात, तुकोबांना दृष्टान्त होतात, त्यांच्या भक्तीचा तो अत्यद् भुत विजय ठरतो!

तशा भाविक दृष्टीने पाहिले असता, ही भर समुद्रात एका पक्क्या पोलादी नभोयानात घालून तळाशी बुडविलेल्या पत्रांची रास महिनोगणती समुद्रात लोपून शतावधी मैलांवर इंग्लंडच्या तीरास लागावी आणि त्यातील पत्रे अलगद सुकविली जाऊन ऑस्ट्रेलियाच्या खंडांतरावरील घरोघर जायाची त्यास बिनचूक वाटली जावी, हा चमत्कार त्या लहानशा इंद्रायणीच्या डोहातील पोथ्या तरण्यापेक्षा अधिक आश्चर्याचा आहे; पण त्यातही जर का त्या अगडबंब थैलीत एखाद्या ख्रिस्ती, मुस्लिम वा हिंदू, पाद्री, अवलिया, साधूची एखादी पोथी असती ना, तर—

—तर काय? आमच्या रत्नागिरीकडे अगदी साध्या गोष्टी घडल्या तरी त्या ‘श्रीं’च्या वा कलिपुरूषाच्या चमत्कारात रंगविणारे एक भाबडे बुवा आहेत. साधी मडक्यांची उतरंड त्यांच्या भक्तांच्या घरात उंदरांनी जरी गडगडविली, तरी ती उंदरांच्या उड्यांनी गडगडली असे न सांगता ते सांगतील, ‘श्रींनी तुला ती साक्ष पटविली!’ ‘कलिपुरूषाचा खेळ तुझ्या घरात चालू झाला! बघ सावध हो, नि सहभोजनांत बसणे सोड! ! ’ त्यांच्या परिभाषेत ही इंग्लिश मेलची लौकिक घटना काहीशी अशी सांगता येती, —जर का त्या मेलमध्ये आमच्या इकडील पैशापासरी झालेल्या एखाद्या ब्रह्मांडनायकाची एखादी पोथी असती तर ! हीच लौकिक घटना भक्तिविजयाच्या कोण्या नव्या अध्यायात अशा अलौकिक भाषेत कथिली जातीः

‘अखिल ब्रह्मांडनायक अमुक महाराजांनी जगदुद्धारार्थ अमुक ग्रंथ लिहून तो नभोयानात धाडला आहे. तो जर प्रकाशला गेला तर माझ्या कलिराज्याविरूद्ध दैवी सेनेची मोठी उठावणी होईल,

अशी भिती पडून कलिपुरूषाने तत्काळ फूSS करून ते नभोयान समुद्रात पाडले, तळाशी घातले! ही बातमी ‘श्रीं’च्या राजसभेत कळताच ‘श्रीं’नी वरूणाला बोलावून सांगितले, ‘आण! ती माझी पोथी भर समुद्रातून पाण्याच्या थेंबानेदेखील ओली होऊ न देता आत्ताच्या आत्ता इथं आण!’ त्यासरशी वरूणाने समुद्रास आज्ञापिले की, ‘काढ ती दैवी पोथी वर! जर अळंटळं करशील तर सेतू बांधतांना शिळा तरेना तेव्हा रामाने जसा तुला बाण मारला तसा मीही मारीन!’ ‘नका नका! बाण मारू नका, वरूणराज! पोथी शोधून मी ती कोरडीच्या कोरडी त्या अखिल ब्रह्मांडनायक अमुक महाराजांच्या पत्त्यावर लगोलग नेऊन देतो!’ असे म्हणून समुद्र स्वतः झटपट टपालवाल्या शिपायाचे रूप धरता झाला—जसा विठ्ठल दामाजीचा दंड भरण्यासाठी महाराचे रूप धरता झाला! समुद्राने पटकन तो टपाली गणवेशाचा खाकी मांडचोळणा पायात घातलेला, खाकी फेचा डोक्यास घातलेला, पट्टा कटीला ती पोथी आत टाकलेली, टपालथैली पाठीवर टाकलेली, असे रूप घेऊन तत्काळ त्या अमुक महाराजांच्या देवडीवर उभ्या असलेल्या पत्रकार्याध्यक्ष भक्ताच्या हातात ते पोथीचे पार्सल दिले! भर समुद्रात राहून कोरडेच्या कोरडे पार्सल! भक्त उघडून पाहतो तो ती जगदुद्धारक पोथी आत! निःसंशय हा टपालवाला देवच असला पाहिजे म्हणून भक्त, जो त्याला पुन्हा पाहावयाला जातो तो टपालवाला देखता देखता विरघळून त्याची एक मोठी लाट झाली नि ती आकाशात उठून लोशत समुद्रात घुसली! आपल्या मूळ रूपात तो मायावी टपालवाला समुद्रात देखता देखता विलीनला! कलिपुरूषही घाबऱ्या घाबऱ्या किर्लोस्कर कार्यालयाच्या आश्रयास पळून गेला! ’

‘गोरक्षण’ पत्र हे अनेक दृष्टींनी संग्रहार्ह आहे असे आम्हास वाटते. पैकी पहिला महत्वाचा उपयोग म्हणजे अज्ञानयुगात असते तरी कसे ते या विज्ञानयुगात वावरणाऱ्यांनादेखील त्याची ही वानगी पाहून चटकन ध्यानात येते. सृष्टीच्या भौगर्भिक प्राक्शिलायुग नवशिलायुग (Paleolihtic, Neolihtic) प्रभृती युगांतील अनेक विचित्र प्राणी आज नामशेष! त्यांची कल्पना यावयास त्या प्राण्यांचे अस्थिशेष (Fossils) जसे संग्रहालयातून ठेवलेले उपयोगी पडतात तशाच अज्ञानयुगातील वैचारिक क्षेत्रातील अडाणी भावभावना असतात तरी कशा, ते या गोरक्षण कार्यालयातील संग्रहालयात सहज पाहता येते. ‘गोरक्षण’ पत्र हा अज्ञानयुगाचा एक संग्रहणीय अस्थिशेष (Fossils) आहे. ते गाईला जगज्जननी, विश्ववंद्या, आदिदेवी मानते, समजते. साऱ्या भारतवर्षातील दुष्काळ एका कोपऱ्यात यज्ञ केला की हचविता येईल ही त्याची निष्ठा आहे आणि ‘श्रीराम जयराम जय जय राम’ हा मंत्र कोटी वेळा म्हटला, तर दुष्काळच काय, पण प्लेग, पटकी, बेकारी, दास्य, दारिद्र्य, ढेकूण पिसवा—सर्वारिष्टशांति होते, ही तर त्यांची प्रतिज्ञाच आहे!

आणखीही एक उपयोग ह्या पत्राचा सहजगत्या होत आहे. तो म्हणजे आमच्या मतांच्या गयाळवर्गातही प्रचार! कारण आताशी ह्या ‘गोरक्षण’ पत्रात आमच्या अनेक जुन्या-नव्या लेखांतील सूत्रमय वाक्ये निवडून ती छापण्यात येतात. त्या विषयी सूचना इतकीच की, ती वाक्ये शक्य तो आमच्याच भाषेत जशीच्या तशी दिली जावी. त्यात पंचगव्याचे शिंतोडे मधून मधून उडालेले असतात तशी गदळ करून देऊ नये. आमची वाक्ये देताना अर्थातच त्या स्तंभावर ‘विषबींदू’ असा मथळा जो गोरक्षणकार देतात त्याविषयी आमचे काहीच म्हणणे नाही. उलट तेही नकळत त्या पत्राकडूनच औचित्य घडत आहे. कारण ती वाक्ये आहेतच विषबींदू. प्लेग, पटकी नि भाबडेपणा ह्या रोगांवर

रामबाण उपाय म्हणजे ते ते प्रतिबंधक विषच रोगाच्या अंगात टोचणे! असे यथाप्रमाण वीषच अमृत असते. गयाळ रोगांच्या अंगात ते विष टोचण्याचे जे सत्कृत्य 'गोरक्षण' पत्र करीत आहे, त्यायोगे 'श्रीराम जयराम जय जय राम' मंत्राच्या कोटी कोटी जपाचे पुण्य त्यांना खचित लाभेल.

तेव्हा आमच्या ऊताऱ्यांना 'विषधारा' वा 'विषबींदू' जे म्हणण्यात येते ते यथार्थच आहे. गोरक्षण संप्रदायाच्या भाकडपणाच्या बुद्धीभ्रंश रोगावर ते उतारेच खरे 'उतारे' आहेत. परंतु त्या 'विषधारा' स्तंभाला लागूनच जो 'दुग्धधारां'चा स्तंभ त्या पत्रात दिलेला असतो, त्याविषयी मात्र गोरक्षणकरांनी अधिक काळजी घ्यावी. कारण त्यातील दुधातच अनेक वेळा गयाळपणाच्या गोंधळात असले विषबींदू पडलेले असतात की, ते दूध पंचगव्यातसुद्धा घालून प्याले जाता गोपूजक संप्रदायाच्या प्रकृतीस प्राणांतिक अपाय झाल्यावाचून राहणार नाही!

उदाहरणार्थ, गेल्या महिन्यातील एक दोन अंकच पाहा. त्या 'दुग्धधारां'त गांधीजींच्या शेळीच्या दुधाच्या धाराच फार. त्यात गांधीजींचे एकच वचन दुग्धबिंदू म्हणून दिले आहेः

'तुमच्या देवळात शिरलेली व्यक्ती मूर्ती भ्रष्ट करील असे तुम्हास वाटते, यावरून तुमची देवाविषयीची कल्पना अगदी दुबळी असली पाहिजे! उलट देवच त्या व्यक्तींना पवित्र करण्यास समर्थ आहे असे तुम्हास कां वाटत नाही? '

आता हा 'दुग्धबिंदू' नसून 'विषबींदू' आहे हे काय सांगावयास हवे? साधुशील चौंडेमहाराजांच्या पोटात तरी ढवळल्यावाचून राहणार नाही! गांधीजींनी हे सांगण्यापूर्वी अनेक वर्षाआधी पतितपावन मंदिराच्या गाभाऱ्यात स्वच्छ अस्पृश्यदेखील शिरताना पाहून जेव्हा चौंडेमहाराजांना उन्मळून आले, तेव्हा बॅ. सावरकरांनी त्यांना हेच सांगितले की, 'बुवा! जो पतितपावन तो पतिताच्या स्पर्शाने पतित होईल की पतितालाच पावन करील? पुन्हा तो अस्पृश्य अगदी निर्मळ आहे बघा अंगीवेशी!' पण चौंडेमहाराजांना ते पटले नाही. 'वरची स्वच्छता असेल, पण पिंड अस्पृश्याचा ना?' असा त्यांचा आक्षेप! मागे तुकोबा म्हणाले, 'जरी तो ब्राह्मण झाला धर्मभ्रष्ट। तुका म्हणे श्रेष्ठ, तिही लोकी।।' तसाच चौंडेबुवांचा दंडक दिसला 'जरी तो अस्पृश्य झाला धर्मनिष्ठ। चौंडे म्हणे भ्रष्ट तिही लोकी।।'

पण जर निदान आता तरी ती मळमळ बंद होऊन चौंडेमहाराजांची प्रकृती मंदिरप्रवेशास अनुकूल होण्याइतकी सुधारली असेल तर आम्हास आनंदच वाटेल. तशा प्रामाणिक, प्रांजळ नि कषटाळू धर्मसेवकाची मळमळी प्रकृती निकोप व्हावी यासाठी तर किर्लोस्कर औषधालयातून धर्मभोळ्या बुद्धीभ्रंशावरील रामबाण विषारी लस सहस्त्रावधी रोग्यांना टोचण्यात येत आहे! सुदैवाने आजकाल बहुतेक अग्निहोत्रांतून, गोपूजनांलयातून, वेडगावांतून, भक्तिविजयाचा पाठ होत नसेल इतका किर्लोस्करी मासिकांचा अखंड पाठ चाललेला आहे. त्यामुळे आज ना उद्या त्यांची प्रकृती कळत नकळत पण सुधारल्यावाचून राहणार नाही. आता औषध थोडेसे प्रखरच आहे; ते कडवटही बरेचसे; तेव्हा रोगी तोंडेही प्रथम पुष्कळ वेंगाडणारच; वेळी वैद्यालाच शत्रूही समजणार. बहिष्कार घालतो

म्हणणार! पण वैद्यानेही ते सोसलेच पाहिजे. आमच्या निवडक लेखांचा संग्रह पुस्तकरूपाने किर्लोस्कर मंडळीने नुकताच प्रकाशित केला आहे. तेव्हा बुद्धिक्षयाची बाधा असलेल्यांनी तो संग्रह निदान दहा वेळा तरी अवश्य वाचावा. त्या विषबींदूंची लस दोन सप्ताह तरी प्रत्यही टोचून घ्यावी, म्हणजे आजकालच्या विज्ञानयुगातही टिकाव धरण्याइतकी त्यांची प्रकृती सुधारेल, अशी या सर्व महाराजांना आम्हा प्रजाजनांची विनंती आहे.

‘गोरक्षण’ हे अज्ञानयुगाचा एक उत्कृष्ट अस्थिशेष (फॉसिल) कसे आहे याचा आणखी एक पुरावा हवा असेल तर सहभोजनांविषयी किर्लोस्कर मासिकातून येणाऱ्या आमच्या लेखांतील अनेक वाक्ये उतारून त्यांचा जो धर्म बुडाला म्हणून आक्रोश चाललेला असतो, तो एका बाजूस पाहा—आमि लगोलग गोमय, गोमूत्राचे स्वादिष्ट सरबत पीत पीत ते ज्या म्टक्या मारते ते ऐका! अगदी सुस्वच्छ अब्राह्मणासह, मग तो तुकाराम का असेना, शुद्ध ताजी ऊन ऊन खीर खाताना त्यांना शिसारी येते. पण अगदी ताजे वाफ निघणारे ऊन ऊन शेण नि गोमूत्र म्सळलेले सरबत खाता-पिताना त्यांना मिटक्या मारता मारता पुरेसे होते! कारण? धर्मछाप! गोमय, गोमूत्र सोवळ्यानेसुद्धा खाणे पिणे ‘पुण्य’ ‘पवित्र’ ‘धर्म्य’ म्हणून पोथी सांगते! मनुष्याने स्वच्छ मनुष्याशेजारी बसून सुस्वच्छपणे सुग्रास अन्न खाणे ‘अधर्म’ म्हणून पोथी सांगते! बस्! या पोथीछापासरशी शेण नि गोमूत्र खाणेपिणे हा धर्म, सहभोजन, खीर खाणे हा अधर्म!

त्यातल्या त्यात समाधानाची गोष्ट इतकीच की, ह्या पंचगव्याच्या डोहात बुडालेले काही सनातनी तरी किर्लोस्कर मासिकातील विचारसूत्रांच्या आधारे बुद्धी बचावून काठावर सुखरूपपणे येत आहेत. ह्या बचावलेल्यांत आमचे सन्माननीय धर्मबंधू भालाकार ह्यांचे नाव प्रमुखपणे सांगता येते. भालाकारांना सनातन बेशुद्धीत मधून मधून शुद्धीचे जे झटके येतात त्यांपैकी एका शुद्धीवरच्या झटक्यात पंटगव्यात गोमूत्र-गोमय कोळून पिणे हे गदळपणाचे आहे किंवा निदान त्याज्य तरी आहे हे पटले आणि त्यांनी पुण्याच्या एका सभेत गेल्या महिन्यात तसे पुन्हा एकदा स्पष्टपणे सांगितले! दूध, दही, तूप बदाम नि केशर हे त्यांचे ‘भालास्मृती’तील नवे पंचगव्य होय! असेना का! आचार कालमानाने बदलण्यात अधर्म घडत नाही असे एक व्यापक तत्व तरी त्या अकिंचित्कर गोष्टीने भालाकारांनी मान्य केले हेही काही थोडे नाही. दुसरी एक गमतीची गोष्टही, जी त्यांच्या व्याख्यानात भालाकारांनी मानली ती ही की, सहभोतकांना आदन्म जातिबहिष्कृत न होण्याचे साधनही हेच त्यांचे नवीन पंचगव्य होय. सहभोजकांनी हे भालाकारी पंचगव्य प्राशिले की, ते प्रायश्चित त्यांना पुरे आहेसे दिसते. एवढेच असेल तर कोणत्याही सहभोजनानंतर असले अनापेक्षार्ह पंचगव्य कोणीही आनंदाने पिईल. पण प्रायश्चित म्हणून नव्हे, तर लवंग-सुपारीसारखी एक मुखशुद्धी म्हणून!

ह्या सहभोजनाच्या घणाघाईखाली एकदा का रोटीबंदीच्या बेडीचे तुकडे उडाले की, पोथीजात जातिभेदाचे कंबरडे मोडलेच म्हणून समजावे, हे आमचे निदान ह्या गयाळवर्गास तंतोतंत पटले आहे; म्हणूनच सहभोजनाचे नाव निघताच ‘गोरक्षण’च्या छातीत धडकी भरते. वास्तविक पाहता सहभोजनादी चळवळींचा गोपूजनाशी काही संबंध नाही. असलाच तर गोपूजन नि रोटीबंदी ही दोघेही धर्मभोळेपणाची औरस संतती, सख्खी भावंडे इतकाच. पण ‘गोरक्षण पत्रात’ सहभोजनादी

जात्युच्छेदक चळवळीविरूद्ध कितीतरी स्तंभ खरडलेले असतात! आमचे जात्युच्छेदक असे एक ना एक वाक्य 'विषबींदू'त दर अंकी बहुधा येते ते चांगलेच होते. पण त्याच्याविरूद्ध म्हणून 'दुग्धबींदू'त गांधीजींच्या शेळदिधाचे जे बिंदू मिसळलेले असतात ते पाहून मात्र त्या गयाळ विसंगतीचे हसू आल्यावाचून राहत नाही. 'जातिभेदाच्या दुर्जिक्य दुर्गास मुळातच असा शाप झालेला आहे की, बाँबगोळ्यांच्या माऱ्यानेदेखील तू कोसळणार नाहीस; पण जर का कधी तुझ्यावर कोणी बुंदीगोळ्यांचा मारा केला तर मात्र तुझा तत्काळ चुराडा उडेल!' हे वाक्य 'विषधारां'त देऊन त्याविरूद्ध ज्या 'दुग्धधारात' गांधीजींचे कुठले तरी एक वाक्य 'गोरक्षण' देते की,, 'जातिभेद हा मूळ श्रमविभागाच्या तत्वावर उभारलेला होता!' आणि त्या वाक्याच्या उल्लेखाने गोरक्षण स्वतःची अशी समज पाडून घेते की, जणू काय गांधीजी सहभोजन, अस्पृश्यताविनाशादी जातिभेदोच्छेदक कार्यक्रमाच्या विरूद्ध आहेत. गांधीजी जरी सहभोजनाच्या विरूद्ध असते तरी तेवढ्यामुळेच काय ती चळवळ चुकीची ठरली नसती ही गोष्ट निराळीच म्हणा. पण वस्तुतः गांधीजींचे शेळपट दुग्धबिंदूदेखील ह्या रोटीबंदी, स्पर्शब्दी. वेदोक्तबंदी पर्भृती बेड्या तोडण्याच्या जातिभेदोच्छेदक प्रकरणी 'विषबींदू'सारखेच गयाळपणास घातक आहेत. हे 'गोरक्षण'कारांच्या लक्षात णसावयास पाहिजे. गांधीजींनी एका महाराच्या मुलीला स्वतः पाळले, तिच्या हातचे नि तिच्यासह खाणेपिणे, बसणे, उठणे उघडपणे केले आणि शेवटी तिचे लग्न एका ब्राह्मणाशी स्वसंतोषाने लावून दिले! स्वतःच्या मुलाशी मात्र कोण्या महार मुलीचे लग्न न लावता जरी त्यांनी उच्चतर ब्राह्मण मुलीचेच लग्न लावले, तरी त्यायोगेच त्यांनी जुन्या जातिभेदाच्या दृष्टीने पहिल्या लग्नाहूनही घोरतर संकर घडविला! कारण स्मृतींना त्यातल्या त्यात अनुलोम विवाह क्षम्य वाटतो; ब्राह्मणादिकांनी महारादिकांच्या कन्या अनुक्रमे वरणे एक वेळ स्मृती सोशील, पण व्यतिक्रम—वाण्याने ब्राह्मणाची कन्या करणे हा प्रतिलोम संकर—केवळ 'संकरो नरकायैव'च असणार! पण स्वतःस सोयिस्कर असे तेही 'पाप' गांधींनी केले. त्यांनी भंग्याचे काम तर गायत्रीजपाइतके पवित्र मानले आहे. स्वतः भंगीकाम केले आहे. शेकडो ब्राह्मणांकडून आज या वेळी फैजपूरला ते करवीत आहेत. इतकेच नव्हे, तर गांधीजींनी त्या फैजपूरला एका व्याख्यानात जे भंगीस्तोमसूक्त गायले ते त्यांच्या एका चरखास्तोमसूक्ताच्याच काय ते पंक्तीस बसविता आल्यास यावे इतके उत्स्फूर्त आहे!

भंगीकाम साधल्यावाचून स्वराज्य कसले मिळणार? 'स्वराज्य मिळवायचे तर भंगीकाम साधले पाहिजे, पवित्र समजून केले पाहिजे' हेच तर त्या त्यांच्या भंगीस्तोमसूक्ताचे पालुपद होते! स्वराज्यासंबंधी त्या सूक्ताची चर्चा आम्हाला करता येत नाही आणि स्वराज्याची आता फारशी चिंताच फरली नाही. कारण गांधीजींते वरील सूक्त सांगतच आहे की, भंगीकाम साधण्याइतके ते स्वराज्य काही अंशी तरी आता अनायासेच सुसाध्य झाले आहे! पण येथे सांगावयाचे ते इतकेच की चौंडे महाराजादी गयाळ सनातन्यांनी गांधींच्या संगतीपासून सावध असावे! गयाळ हे गाईचे भंगी आनंदाने होतील; गोमयाची पाटी डोक्यावर घेऊन जाणे उलट पावनच मानतील; पण गांघीजींच्या संगतीची फार लगट केल्यास भंग्याची पाटी चौंडेमहाराजांनादेखील डोक्यावर देण्यास गांधीजी सोडणार नाहीत हे स्पष्ट सांगण्यात आम्ही शिष्टाचाराचा लवलेशही भंग करतो असे स्वतः गांधीजीही म्हणू शकणार नाहीत. गांधीजी आमि चौंडेमहाराज भंगीपाटी डोक्यावर घेऊन जोडीने चालत आहेत, असे जोवर होत नाही तोवर गांधीजी चौंडेमहाराजांना पुरते साधू, पुरते शिष्ट समजणार नाहीत, असाच अधिक संभव! आज या वेळी गांधीजींच्या घरात (चुकलो आश्रमात! कारण गांधीजी ज्या घरात राहतात त्यास आश्रम

आणि ज्या प्रासादात राहतात त्यास पर्णकुटी म्हणायचे असते!) राहतात त्या घरात एक अस्पृश्य सैंपाकी आणून ठेवल्याची बातमीही आम्ही जाता जाता, 'गोरक्षण'कारांच्या कानावर घालतो आणि जात्युच्छेदक प्रकरणी तरी वरील कारणासाठी यापुढे त्यांनी गांधीजींची वाक्ये 'दुग्धधारा'तून न छापता आमच्या वाक्याखाली 'विषधारां'तून छापावी अशी चेतावणी (caution) देतो.

आणि या लेखापुरती शेवटची चेतावणी जी 'गोरक्षण'कारांना आम्ही देऊ इच्छितो, ती लोकमान्य टिळकांच्या नावाविषयी! किर्लोस्करातील 'भूतदया की भूतबाधा? ' या आमच्या लेखाने दिल्लीच्या हिंदू महासभेच्या कार्यालयापासून ते गोरक्षण कार्यालयापर्यंत बरीच अनुकूल-प्रतिकूल खळबळ उडविली आहे, हे आमच्याकडे आलेल्या पत्रांवरून नि छापलेल्या चर्चेतून दिसून येते. त्यांपैकी 'गोरक्षण'चा जो प्रश्न इथे चालू आहे त्यापुरते बोलावयाचे म्हणजे, त्यात त्या लेखाविषयी जे कितीतरी स्तंभ दोघातिघा लेखकांनी लिहिले आहेत, त्यांत आम्हास लोकमान्य टिळकांच्या नावाने उपदेशाच्या चार गोष्टी ते सांगत आहेत. श्री शिखरे 'गोरक्षण'तील आपल्या लेखात उपरोधिकपणे विचारतात,

'मांसाहार वर्ज्य नाही, एवढेच नव्हे, तर अमेरिकेत गेल्यावर गोमांससुद्धा खाण्यास हरकत नाही, असा शास्त्रार्थ किर्लोस्करीमुखे बॅ. सावरकर प्रतिपादितात! मग लो. टिळकांसारखे हाडाचे हिंदू विलायतेतही मांसाहार न करता परत आले, याबद्दल त्यांना धन्यवाद काय म्हणून द्यावेत? मुसलमानही डुकराचे मांस वर्ज्य मानतो. आमचे बॅरिस्टरसाहेब गाईचेही मांस वर्ज्य मानीत नाहीत! ' इत्यादि इत्यादि.

याविषयी थोडक्यात बोलायचे म्हणजे असे की, लोकमान्यांनी मांस खाल्ले नसेल तर तो त्यांच्या वैयक्तित आवडीनिवडीचा प्रश्न. मांसाहार करणे म्हणजे काही मोठे शतकृत्य करणे नव्हे. त्यावाचून त्यांचे अडले नसेल तर लोकमान्यांनी केले ते त्यांच्यापुरते ठीकच. पण त्यात 'शुद्धते'चा वा 'शास्त्रार्था'चा वा 'हिंदूत्वा'चा संबंध आणू नका म्हणजे झाले. शास्त्राविषयीच म्हणावयाचे तर 'लोकमान्य विलायतेतही मांसाहार न करता शुद्धतेने परत आले' याच वाक्यात श्री शिखरे यांनी शास्त्राची चांगलीच शोभा केली आहे नाही काय? आणि नकळत! 'गोरक्षण' पत्रास लेख शोभावा म्हणूनच त्यांनी असा गयाळ विसंवाद आपल्या एका वाक्यात जाणूनबुजून खच्चून भरला असल्यास गोष्ट निराळी! नाहीतरी ते एक पट्टीचे लेखक आहेत! त्यांच्या ध्यानात आले नाही की, मांसाहार न करण्यात टिळकांनी 'शास्त्र' पाळले नि ते 'शुद्ध' राहिले गे सांगता सांगताच ते विलायतेत गेले, सुटाबुटासुद्धा, मुकटा न नेसता, म्लेंच्छांसह नि ब्राह्मणांसह चहा, भात-भाजी सेवून प्रत्यही सहभोजने झोडली, इतकेच नव्हे तर अंड्याचा मसाला ज्यात घालण्यात येतो त्या पावबिस्कुटांवरही यथेच्छ हात मारिला. इत्यादि अनेक कृत्यांत प्रसंगी लोकमान्यदेखील'शास्त्र' गुंडाळून ठेवीत नि 'अशुद्ध' होत हेही आपणच सांगून टाकीत आहोत, याचे शिखऱ्यांना भानच राहिले नाही! ! पण तसे पाहता विलायतच कशाला, प्रत्यक्ष पुण्यात मिशनमध्ये साहेबाची चहाबिस्कुटे टिळकांनी एका जातिनिर्विशेष सहाशनात सेविली होतीच की! आणि हे प्रायश्चित्तार्ह पाप नव्हेच म्हणून उलट तंटेबखेडेही केले होते हे प्रसिद्धच आहे! ब्राह्मणांनी मांसाहार तेवढा सोडला असता विलायतेत जाण्यास आणि म्लेंच्छांसह शाकाहार, भात, भाजी, चहा, बिस्कुटे, पाव, पाणी ओवळ्याने सुटाबुटांसह सेविण्यात काही हरकत नाही, त्यामुळे

ब्राह्मण ‘अशुद्ध’ होत नाही, असे आज ज्याला ‘शास्त्र’ म्हणतात, त्यात सांगितले आहे काय? शंकाराचार्य (सनातनी) ताय म्हणतात ऐकाः

‘परदेशगमन कोणी केले, तर त्यास जातिबहिष्कार नसावा’ असे आम्ही स्वतः रत्नागिरीस जेव्हा शिष्यस्वामी शंकराचार्य आले तेव्हा त्यांच्या वतीने बोलणाऱ्या वे. शा. स. गंडाळे, धारूरकरशास्त्री प्रभृतींस विचारले. ‘सावरकरांच्या बालेकिल्ल्यावर जगद् गुरूंची स्वारी’ असा हंस प्रभृती पत्रांत उद् घोष करून शास्त्रीमंडळी चढून आलेली! परदेशगमन निषेधिल्याने आपली जागतिक हिंदू राज्ये, दिग्विजय, सामुद्रिक व्यापारात कसे ठार झाले, आपण विद्येत, विज्ञानात कसे मागासलो, रणात कसे हरलो, तो पाढा आम्ही वाचला. पण गंडाळे, धारूरकर प्रभृती शास्त्र्यांचा आपला पहिला पाढा पढ पंचावन! त्यांनी ठासून सांगितले की, ‘शुद्राने परदेशगमन केले तरीही पापच, पण प्रायश्चित्तार्ह; परंतु ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य यांनी समुद्रगमन केले, तर त्या पापास निष्कृतीच नाही! त्यांनी आजीव गावाबाहेर बहिष्कृतावस्थेत राहावे. पुत्रकलत्रांनादेखील त्यांचा संपर्क झाला असता वाळीतच पडावे लागेल! शास्त्र हे असे आहे. परिणामबिरिणाम आम्हास सांगू नका! ’ गंडाळे, धारूरकर मंडळींनी हे जे शास्त्र सांगितले ते स्मृतिवचनांना धरून आहे हेही खरे. त्यात कुचराई इतकीच की, वरील स्मृतीच्या वचनांना हे महाराष्ट्रीय शास्त्री स्वतःच्या प्रकरणी मात्र लावू धजत नाहीत. कारण मनुस्मृतीप्रमाणे कोणाही द्विजीला ‘हिमवद्विंध्ययोर्मध्ये’ असलेल्या आर्यावर्ताबाहेरसुद्धा राहण्याची ना आहे! पंढरपुरादी महाराष्ट्रीय प्रदेश हाचमुळी म्लेंच्छदेश आणि त्यात पिंड पोशीत राहणारे शास्त्री हे स्वतःच मुळी व्रात्य होत!

*आसमुद्रातु वै पूर्वादासमुद्रातु पश्चिमात् ।*

*तयोरेवान्तरं गिर्योरार्यावतं विदुर्बुधाः ।। २२*

*कृष्णसारस्तु चरति मृगो यत्र स्वभावतः ।*

*स ज्ञेयो यज्ञियो देशो म्लेंच्छदेशस्त्वतः परः ।। २३*

*एतान् द्विजातयो देशान्संश्रयेरन्प्रयत्नभिः ।*

*शूद्रस्तु यस्मिन्कस्मिंश्च निवसेद् वृत्तिकशितः ।। २४*

(मनु. २. टीकाही पाहा.)

बरे, शिखऱ्यांनी नकळत मानले त्याप्रमाणे लोकमान्यांच्या परदेशगमनाने केलेल्या शास्त्रातिक्रमणाचा नि अशुद्ध, अस्पृश्य नि आजन्म पतित झाल्याचा दोष सोडला, तरी श्री. शिखऱ्यांनी त्यांचा जो कळून सवरून गुण म्हणून सांगितला आहे त्याविषयी तरी ‘शास्त्र’ काय म्हणते हे शिखऱ्यांनी थोडेसे न्याहाळावे! ‘लोकमान्य टिळक मांसाहार न करता शुद्ध राहिले’ ह्या शिखऱ्यांच्या शब्दाशब्दांत विसंगती नि विपर्यास भरलेला आहे! जर खरोखरीच देशी वा विदेशी लोकमान्यांनी मांसाहार असा कधीच केला नसेल तर शिखऱ्यांनी ती गोष्ट अशी मोठमोठ्याने तरी बोलू नये. जर का ती मनुभगवानांच्या कानावर गेली तर टिळकांविषयी त्यांचे मत किती कलुषित होईल, याची शिखऱ्यांनी काहीतरी चिंता वाहावी! ब्राह्मणकुलात जन्मून मांस कधी खाल्ले नाही म्हणूनच त्या अक्षम्य

अनाचारास्तव लो. टिळकांना जे शास्त्रातिक्रमाचे महापाप लागले ते ‘शास्त्रा’प्रमाणे इतके मोठे होते की, त्याची निष्कृती त्या थोर पुरूषाची सारी पुण्याईदेखील करू शकती ना! वेदानुसार यज्ञपुरोडाश ब्राह्मणास प्रत्यही आचमनाप्रमाणेच कर्तव्य! वेदकाली मांसाहार यज्ञीय कर्तव्य असे, हे काही पाश्चात्त्यांच्या भाषांतरावरून कोणी सांगावयास नको, स्वतः मनुभगवान तो इतिहास सांगतात की, ‘बभूवुर्हि पुरोडाशा भक्ष्याणां मृगपक्षिणाम् ।। पुराणेष्वपि यज्ञेषु ब्रह्मक्षत्रसवेषु च ।।’ ब्राह्मणक्षत्रियांनी अनेक यज्ञांत पशुपक्षांचा पुरोडाश सेविला आहे! (मनु. ५ । २३). अज्ञाची गोष्ट सोडली तरी श्राद्धादिक आचारात तर मांस खाणे नि खावविणे अत्यंत शास्त्रिय, ब्राह्मणाचे अवश्य कर्तव्य इतकेच काय पण ‘नियुक्तस्तु यथान्यायं यो मांसं नात्ति मानवः । स प्रेत्य पशुतां याति संभवान्येकविंशतिम् ।।’ (मनु. ५ । ३५ ). जो श्राद्धात मांस खाणार नाही त्यास एकवीस जन्म पशुयोनी प्राप्त होईल, असा कचकचीत शाप आहे. शास्त्रांचा पाया—सर्व स्मृतीतील आद्यस्मृती जी मनुस्मृती—तीतच. बरे, मांस तरी कसले? तर श्राद्धपक्षी ब्राह्मणांना प्रशस्त म्हणजे म्हशीचे मां नि वराहमांस, रानडुक्कराचे! त्यायोगे पितरांची तृप्ती एकच नव्हे तर दहा महिने होते! ‘दशमासांस्तु तृप्यन्ति वराहमहिषामिषैः ।।’ (मनु. ३ । २७० ). पिकरांच्या प्रकरणी जे कर्तव्य तेच पुत्राच्या प्रकरणी. कारण प्रत्येक ब्राह्मणाने जन्मल्यानंतर पहिले अन्न असे जे खाणे शास्त्रसंमत, जो पुत्राचा अन्न प्राशनसंस्कार, तोच सांगतो की, ब्राह्मण अपत्याचे बाळकडूच मुळी मांसाहार! कारण गृहसूत्रात अन्नप्राशनसंस्काराच्या प्रसंगी अपत्यास प्रथमान्न म्हणून समंत्रक बकऱ्याचे मांस, तित्तिर मांस, वा मत्स्य यांचा रस्सा सेववावा, असेच सांगितले आहे. अशा रीतीने मांसाहार करणे हे पाप नसून, उलट न करणे हेच शास्त्रांनी शास्त्रातिक्रमण गणलेले आहे!

तेव्हा शास्त्रवचनाचे नाव ढसराईवारी सहसा कोणी काढू नये हेच बरे. शास्त्रवचने जर पाहू लागलो तर शंकराचार्यांपासून शिखऱ्यांपर्यंत आपणा सर्वांची भंबेरी उडाल्यावाचून राहणार नाही. शंकराचार्यांचा संन्यास ह्याच मुळी अधर्म; कलिवर्ज्य ! ! लोकमान्यांसारख्या पुण्यश्लोक पुरूषांनी लोकहितास्तव त्यांच्या कालात त्यांच्या स्वभावानुरूप काही शास्त्रवचने तुच्छविली, काही पाळली; कारण सहस्त्रावधी वर्षांपूर्वीचे सगळेच जुनाट विधिनिषेध जर आज कोणी व्यक्ती वा समाज पाळू म्हणेल तर त्याला पुढे पाय टाकण्याची सोयच नाही! त्या समाजाला आज जगणेच अशक्य! आजच्याविषयी विचाराल तर, आपल्या हिंदू राष्ट्राच्या अभ्युदयार्थ आजच्या परिस्थितीत जो जो विधिनिषेध उपकारक तो तो आमचे आजचे शास्त्र! त्याची ती उपयोगिता ह्याच आमचा शास्त्राधार! आजच्या परिस्थितीत जो लोकधारणास साहायक तोच आमचा आजचा धर्म! ! आणि आम्ही त्याच ‘रक्षितसो धर्माते आम्हासी धर्म ठाउका नान्य ।।’

*—किर्लोस्कर, फेब्रुवारी १९३७*

१३ . आजच्या तिबेटातील काही गमती !

भगवान गौतम बुद्धाने प्रवर्तिलेल्या धर्मसुधारणांमध्ये अत्यंत आवश्यक अशी एक सुधारणा ही होती की मनुष्याने ईश्वरप्राप्तीसाठी स्वतःच्या देहाचा नाना प्रकारच्या अघोरी पापांनी ठगीचच्या ठगीच दंडू नये. उपाशी राहून मरणे, एकाच पायावर उभे राहणे, एक हात वर उचलून तो लाकडासारखा निर्जीव नि बधिर झाला, तरी जन्मभर तसाच ठेवणे, खिळ्यांच्या टोकांची शय्यातयार कून तीवर निजणे, अवयव जाळून घेणे, पंचाग्नीत भर ग्रीष्मात तापत बसणे अत्यादी देहदंडाची अघोरी तपे ही काही कल्याणाची साधने नव्हेत. अशा आसुरी उपायांनी प्रासादणारा देव हा मनुष्यावर दया करणारा देव नसून मनुष्याचा अत्यंत छळक असा कुणी राक्षसच असला पाहिजे! देव जर दयाळू असेल तर तो आपल्या भक्तांची उपांगे विस्तवात सरपणासारखी खुपसून त्या शेगडीवर शेकत बसेल तरी कसा? अशा कोटिक्रमांनी बुद्धाने उग्र नि अघोरी अशा अनेक देहदंडनीय तपांचा, उपासांचा नि यज्ञयागदिक हिंसात्मक कर्मकांडांचा तीव्र निषेध केलेला आहे आणि वारंवार बजावले आहे की, लोकांची दुःखे निवारणे, रोग, उपासमार, हत्या इत्यादी संकटांपासून लोकांची मुक्तता करण्यासाठी सतत झटणे, हे खरे तप होय.

निर्वाण होण्याच्या आधी, मृत्युशय्येवर पडले असता बुद्धभगवंतांनी आपल्या शिष्यांना शेवटचाउपदेश दिलाः

“ चरथ भिक्खवे चारिकं ।। बहुजनहिताय, बहुजनसुखाय, लोकानुकम्पाय अत्थाय हिताय सुखाय देवस्यानुशासनम् ! ! ” ह्या अत्युदार शब्दांत बुद्धाने धर्मप्रसाराचा आपला अंतिम आदेश दिला.

“ जा! भिक्षूंनो, जा! बहुजनांचे हित साधीत, बहुजनांच्या सुखास्तव, लोकांवर करूणा करण्यासाठी, सतत झटत ह्या माझ्या अनुशासनाचा प्रसार दशदिशांना करा जा! ”

ह्या आदेशास मस्तकी धरून आपल्या आर्यावर्तातील लक्षावधी धर्मप्रचारक हिमालयांना नि सागरांना उल्लंघून एकीकडे उत्तर धृवाकडील ज्ञात टोकांच्या हिममालापर्यंत तर दुसरीकडे मेक्सिको-ब्राझिलच्या ग्वाटेमालापर्यंत (गौतमालयापर्यंत) या आर्यावर्तातील लक्षावधी बौद्ध भिक्षू त्या बुद्धानुशासनाचा संदेश सांगत गेले! जेव्हा प्रवास अत्यंत कष्टमय होता, बहुधा पायीच होता, तेव्हा गेले. गोबीच्या वालुकारण्यात, तिबेटच्या हिमारण्यात, दक्षिण अमेरिकेच्या ग्रीष्मारण्यात रखडत, कुडकुडत. उकडत अनेकदा बंदिवास, छळ आमि हत्याही झाल्या असता आर्यावर्तातील त्या लक्षावधी भिक्षूंनी मनुष्यजातीची शतकोशतके सेवा केली. ज्ञान, विज्ञान, भाषा, शिक्षण, औषधी, शीलसंयमांची आपली अमूल्य आर्यसंपदा ‘बहुजनहिताय, बहुजनसुखाय, लोकानुकम्पाय’ देशविदेशी मुक्त हस्तांनी वितरली. त्यांच्या काळात नि त्यांच्या काळापर्यंत मनुष्यजातीची कोणीही केली नाही अशी अतुलनीय सेवा नि शुश्रूषा ह्या लक्षावधी हिंदू भिक्षूंनी केली आहे!

त्या वेळी मोठमोठया दुर्लंघ्य पर्वतांना उल्लंघून तिबेटमध्येही आपले शतावधी संन्यस्त बुद्ध भिक्षू जाते झाले. सारा तिबेट भगवान बुद्धाला शरण रिघाला.

पण प्रत्येक धर्ममताची, संघाची वा संस्थेची प्रगती जेव्हा काळाच्या प्रगतीच्या पावलाशी पाऊल ठेवून चालू शकत नाहीशी होते, तेव्हा शेवटी तिची दुर्दशा झाल्यावाचून राहत नाही. बुद्धसंघाची शेवटी त्याच कारणामुळे दुर्दशा उडाली. ज्या तत्कालीन वैदिक कर्मकांडाचा बुद्धाने तीव्र विरोध केला, त्याहून निराळे पण तितकेच कुटिल नि बुद्धिशून्य कर्मकांड बुद्ध धर्मातही शिरले. वेद त्रिकालाबाधित नि ईश्वरोक्त प्रमाण नव्हे म्हणून बिद्धिवाद करणाऱ्या बुद्धाचे ग्रंथच त्रिकालाबाधित नि ईश्वरोक्तासारखेच अशंकनीय प्रमाण होऊन बसले! देवाला नाकारणाऱ्या भगवान बिद्धालाच त्याच्या अनुयायांनी महादेव बनवून टाकले. वेदमंत्राचा शंभर वेळा नुसता उच्चार करीत राहिले की मोक्ष मिळतो, वा पाऊस पडतो, वा संतती वा संपत्ति लाभते वा शत्रू नष्टतात, अशी निष्ठा ठेवणाऱ्या धर्मभोळेपणाची सारखी टर उडविणारा जो बुद्ध त्यांच्यात संघातून ‘ॐ मणिपद्महम्’ वा ‘नमो बुद्धाय’ इत्यादी मंत्रांची लक्षलक्ष आवर्तने केली की, भूते पळतात, शत्रू हरतात, मोक्ष मिळतो ही श्रद्धा बोकाळली. मंत्रतंत्राचे जंजाळ न भूतो न भविष्यति असे वाढले. देहदंडनाच्या तपांना अघोरी म्हणून निंदिणाऱ्या बुद्धाच्या धर्मात आसुरी देहदंडनाचे विलक्षण प्रकार धर्माचार होऊन बसले; कुधारणा, भाबडेपणा, धर्ममूर्खता यांचा नुसता बुजबुजाट झाला!

कोणतीही व्यक्ती वा ग्रंथ त्रिकालाबाधित, अस्खलनीय, अशंकनीय असे सार्वकालीन परम प्रमाण मानले गेले की, त्या धर्माची नि समाजाची प्रगती खुंटलीच म्हणून समजावे! त्या व्यक्तीच्या वा त्या ग्रंथाच्या उंची-लांबी-रूंदीहून तो समाज अधिक असा वाढू शकतच नाही!—शकणार नाही! दोन हजार वर्षांपूर्वीची ती परम प्रमाण व्यक्ती वा तो सर्वज्ञानमय ग्रंथ असला तर तो समाज नि तो धर्म दोन हजार वर्षांनी मागासलेलाच राहिला पाहिजे. मग तो ग्रंथ ईश्वरनिष्ठ नि ईश्वरोक्त वेद असो, अवेस्ता असो, बायबल असो, कुराण असो, वा अगदी एखादा अर्वाचीन असा शिखांचा गुरूग्रंथ असो; किंवा ती व्यक्ती निरीश्वरी वा अज्ञेयवादी कोणी बुद्ध असो, महावीर असो!

राष्ट्रच्या राष्ट्र अशा धर्मभोळेपणापायी भूतकाळाच्या खडडयातल्या खडयातच कसे दबून पडते, इतर विज्ञानवादी समाज प्रगतीच्या पथावर एक युगच्या युग पुढे गेले असताही ते धर्मभोळे राष्ट्र सहस्त्रावधी वर्षांपूर्वीच्या अज्ञानातच कसे चाचपडत मागासलेले राहते, त्याचे कोणास जर एखादे उत्कृष्ट उदाहरण हवे असेल तर त्याने एकदा आजच्या तिबेटाचे छायाचित्र पाहावे!

तिबेट देशाची राज्यघटनाच मुळी अंधश्रद्धेच्या धार्मिक साच्यात ढाळलेली! तिबेटच्या राज्यशक्तीचा मुख्य कर्णधार, तिबेटाचा राज्यकर्ता नि अधिशास्ता, हाच मुळी संन्यस्त भिक्षू संघाचा जो धर्माध्यक्ष तो असतो. त्यास दलाई लामा म्हणतात. तिबेट देशाच्या, धर्माच्या नि राज्याच्या रक्षणआचा सारा भार ‘चेकयांग’ ह्या देवतेने आपल्या शिरावर घेतलेला आहे आणि ती देवता कोण्या ना कोण्या व्यक्तीमध्ये स्वेच्छेनुसार संचरत राहते, असा तिबेटाच्या राज्यशासनाचा मूळ सिद्धान्त! ह्या

देवतेचाच अभिप्राय प्रत्येक राजकीय अशा महत्वाच्या प्रश्नी घेतला जातो, नि तिच्या अभिप्रायाप्रमाणे संधिविग्रहादी महत्वाचे राजकारणही हाकले पाहिजे, ही राजनीती! अवलोकितेश्वराची एक मूर्ती आहे, ती बोलू शकते, असा विश्वास आहे आणि राज्याविषयी, दलाई लामाविषयी, रोगपरचक्रादिकांच्या आपत्तीच्या प्रसंगी तिचाही दैवी अभिप्राय विचारण्यात येतो.

दलाई लामा मृत्यू पावला, तरी तो मेला असे समजावयाचे नसते. एक व्यक्ती मेली तेव्हा आता राज्यपदावर दुसरी स्थापायची, तिची निवड कशी करावयाची, हा प्रश्नच त्यांच्यापुढे नसतो. कारण तिबेटाच्या राज्यशास्त्रातील सिद्धान्ताप्रमाणे दलाई लामा ही व्यक्ती मुळी मेलेलीच नसते! दलाई लामाने एक देह सोडला न सोडला तोच तो तिबेटमध्येच कुठेतरी नवा जन्म घेतो, नव्या देहात प्रवेश करतो. प्रजेचे काम एवढेच की, त्या दनाई लामाने तो जन्म तिबेटात कुठे घेतला आहे, तेवढे शोधून काढावयाचे!

तो शोध कसा लावायचा? त्याच्या अनेक आश्चर्यकारक पद्धती राज्यघटनेनुसार ठरलेल्या आहेत, ‘चेकयांग’ या राष्ट्राध्यक्ष देवाचा संचार होऊन तो काही जे सांगेल, ते साधन एक; अवलोकितेश्वराच्या मूर्तीच्या मनात बोलावयाचे आले, आणि अशा वेळी ती तिच्या पुजाऱ्यासमक्ष तरी एकांती बहुधा काही ना काही बोलल्यावाचून सहसा राहत नाही,—ते साधन आणखी एक; पण ह्या वा इतर साघनांपेक्षा मुख्य निर्णायक साधन म्हणजे दलाई लामा ज्या क्षणी पूर्वीचा देह ठेवते झाले तो क्षण! इकडे ज्या क्षणी त्यांनी एक देह ठेवला, त्याच क्षणी दुसऱ्या देहात प्रवेशून जन्म घेतला असलाच पाहिजे! यासाठी अगदी त्या क्षणी कोणाचे बालक जन्मले, याचा साऱ्या तिबेटभर कसून शोध केला जातो. जर त्या क्षणी जन्मलेली एकाहून अनेक मुलेही सापडली—असे कधी कधी होतेच—तर त्या सर्वांना आणवून धार्मिक अशा मंत्रतंत्र-जपजाप्यांच्या मोठया अवडंबरासह पुढच्या परीक्षेसाठी राजकीय डौलात ठेवले जाते. सर्व राज्यांतील मुख्य मुख्य अधिकारी—म्हणजेच पुरोहित भिक्षुकवर्ग—एकत्र बोलविण्यात येतात! तिबेटात राज्याधिकार हा धर्माधिकाराहून भिन्न नाहीच! यामुळे सारे राजकीय अधिकारी बहुधा भिक्षुकमंडळातीलच असतात, भिक्षूंची सैन्येही असतात. त्या साऱ्या प्रमुख भिक्षुमंडळाच्या पोथ्यापुराणांतील शकुनादिक शंकाकुशंकांचे समाधान होऊन जर एखादे मूल दलाई लामाच्या लक्षणांनी युक्त ठरले तर लगेच ‘श्रीदलाई लामा सापडले!’ म्हणून साऱ्या राज्यभर दवंडीवर दवंडी पिटविली जाते! गावोगावी आनंदोत्सव चालू होतो.

परंतु प्रत्येक दलाई लामाच्या देहत्यागानंतर त्याने पुनर्जन्म घेतलेले मूल मोठे होईतो जो कित्येक वर्षांचा काळ जातो, त्यांत राज्यव्यवस्था कोणाच्या हाती देण्यात येते? काय प्रकट योग्यतेने जो राज्यधुरा वाहण्यास समर्थ असतो त्याच्या हाती? छट्! तोही प्रश्न दैविक, धार्मिक, भाबडट कसोटीनेच सोडविला जायचा! चेकयांग सांगेल किंवा अवलोकितेश्वराच्या मूर्तीपुढे चिठठया टाकून जो कौल मिळेल, त्या व्यक्तीस राज्यपालक नेमण्यात येते. जोवर तो अर्भक दलाई लामा सापडला नाही किंवा मोठा झाला नाही तोवर!

बरे, केवळ दैविक आदेशानुसार दलाई लामा वा राज्यपालक नेमण्याच्या या खुळचट प्रकारामुळे कट, कारस्थाने, लाचलुचपत ह्यांना तरी आळा बसतो काय? मुळीच नाही! दलाई लामा ज्या क्षणी देहत्याग करतो, त्याच क्षणी आपले मूल जन्मले, म्हणून खोटेच सांगणारे आईबाप अनेक निघतात. जी दोन वा दहा मुले सर्व राष्ट्रांच तेव्हाच जन्मली म्हणून पुढे आणली जातात, त्यांच्यात्यांच्याशी हितसंबंध असणारे पक्ष आपापलाच मुलगा खरा पुर्नजन्माचा दलाई लामा होय हे सिद्ध करण्यासाठी वाटेल तो बरावाईट मार्ग स्वीकारून भांडणतंटयाना सिद्ध होतात. चिठठया टाकण्यात लबाडी झाली किंवा पुजारीच खोटे बोलला, अशी संका वाटून किंवा चेकयांग देव संचारलेली व्यक्ती पक्षपाती वा मिथ्याचाली आहे असा आक्षेप निघून, पक्षविपक्ष माजायचे ते माजतातच, वर्षानुवर्षे यादवी युद्धे ती चालतातच!

पुन्हा अत्यंत खुळचट असा पुनर्जन्मवादाचा कौल घेण्याची पद्धत स्वीकारल्याने तिबेटवरचे हे राज्यशासक दलाई लामा एकाहून एक वरचढ असे महापराक्रमी वा महाबुद्धिमान राज्यकर्ते निपजले की काय? प्रत्यक्ष अनुभवान्ती ठरले की काय? देवाने निवडलेले हे राज्याधिशास्ते, प्रकट गुणानुरूप माणसांनी निवडलेल्या इतर देशांच्या अधिशास्त्यांहून अधिक राज्यकार्यधुरंधर ठरले की काय? छे छे! अगदी उलट! देवाने नेमलेल्या म्हणून ज्या दलाई लामांना तिबटच्या धर्ममूर्ख राज्यघटनेनुसार आजवर अधिशास्ते नेमण्यात आले, त्यांतील एकही दलाई लामा त्या चांभाराचा मुलगा जो स्टॅलिन किंवा लोहाराचा मुलगा जो मुसोलिनी त्यांच्या पासंगासही पुरण्यासारखा पराक्रमी निघालेला नाही, राज्यकार्य धुरंधर निघालेला नाही! उलट, त्या प्रकट गुणांनीच राज्याचे अधिशास्ते होणाऱ्या स्टॅलिन-मुसोलिनीसारख्या माणसांच्या तलवारींच्या तेजापुढे हे देवाच्या नावे निवडून आलेले दुर्बळ दलाई लामा आणि त्यांचे राज्यदंड सूर्यापुढे घुबड दिपावे तसे, दिपून गेलेले आहेत, जात आहेत! हे देवाचे प्रतिनिधी दलाई लामा ज्याच्यावर सतत राज्य करतात तो तिबेट चीनच्या सम्राटांचा शतकानुशतके दास झालेला आहे! देवासदेखील न मानणाऱ्या नि स्वतः लहानपणी जोडे शिवून विकणाऱ्या त्या स्टॅलिनच्या प्रकट कर्तृत्वाने त्याचे रशियन राष्ट्र आज जे जगातील प्रबळक्षम राष्ट्र होऊन बसले, ते पाहा! त्या लोहाराच्या मुलाला सेनाकर्ते नि राज्यकर्ते नेमणारे ते इटलीचे प्रबळ राष्ट्र पाहा! आणि आपल्या राज्याचे सर्वाधिकार त्या दलाई लामाच्या हाती सोपविणाऱ्या या धर्मप्रमाण तिबेटाचे हे पाप्याचे पितर पाहा! !

तिबेटची वर दिलेली राज्यघटना जितकी भाबडटतितकीच त्याची राष्ट्रीय सैन्यघटनाही आचरट! आचरट म्हणजेच देवखुळ्या आचारांच्या नि मंत्रतंत्र, जारणमारणांच्या जंजाळात गुरफटलेली! दलाई लामा मुख्य सेनापती; त्याच्या हाताखालील शतावधी मठांतून मंत्रतंत्राच्या पूजापाठात जन्मभर मुरत पडणारे जेवढे भिक्षू ते सारे सैनिक; जुनाट पद्धतीची खड्गे, तोमर त्रिशूळ, परशू ही आयुधे—अगदी नवीनातील नवीन भयंकर शस्त्र म्हणजे तोंडातून गजांनी दारू ठासावयाच्या तोडयाच्या काही बंदुका! नाना प्रकारचे भोप्यासारखे चित्रविचित्र वेश केलेले आणि असली आयुधे परजलेले हजारो भिक्षू युद्ध पुकारले जाताच रणांगणात उतरतात!

आपणांस अशी कीव येईल की, भिक्षूंचे सैन्यबळ अर्वाचीन रशियाच्या लाल सेनेपुढे वा ब्रिटिशांच्या तोफांपुढे कसे टिकाव धरील, तर त्या तुमच्या अश्रद्धेची तिबेटच्या देवसेनानी दलाई लामालाही कीव आल्यावाचून राहणार नाही! कारण त्यांचे नुसते सैन्यबळ पाहुनच तुम्ही चकलात! पण ह्या मानवी सैन्यबळामागे असलेले तिबेटचे दैविक आत्मबळ जे आहे, ते जर तुम्ही पाहाल तर तुम्हीदेखील तोंडात बोट घालाल नि म्हणाल की, रशिया तर काय, पण रशियाचा देव आला तरी त्याचे तिबेटच्या पुढे काही एक चालणार नाही! ते दैविक बळ म्हणजे ह्या सैनिक बळाच्या मागोमाग येणारा हा हजारो भिक्षूंचा दळभार पाहा! त्यांच्यापाशी कोणत्याही अद्ययावत् तोफा, बॉम्ब, विषारी वायू वा विमानांचे ज्यांच्यापुढे काहीएक चालणार नाही, अशी ही दोन अमोघ आयुधे जी आहेत, ती पाहिलीत का?

मानवी सैन्याच्या मागोमाग ते तिबेटचे दैविक सैन्य जे चाललेले असते त्यातील शेकडो भिक्षुवीर तोंडाने नाना प्रकारचे सैनिक मंत्र संघशः मोठमोठयाने पठत चालतात. त्या मंत्रांनी भारलेले हजारो ताईत, गंडे, दोरे सैनिकांच्या गळयात, दंडात, हातात, वक्षःस्थलांवर अभेद्य कवचासारखे जखडलेले असतात. आपल्या इकडे सर्वारिष्टशांतिप्रीत्यर्थ जसे दुसरे काहीएक करण्यापेक्षा अधिक भर कोण्यातरी कोपऱ्यात पेटलेल्या यज्ञकुंडातील हवनावर टाकणे पुरेसे असते, तसेच नाना प्रकारची तंत्रसाधने मठामठांतून अशा युद्धांमध्ये जय मिळविण्यासाठी टाललेली असतात. मरणाचे नि उच्चाटनाचे भयंकर मंत्र लक्षलक्ष वेळा आवर्तून या मंत्रित जलांचा वा मुठींचा मारा शत्रुसैन्याच्या प्रतिमेवर सारखा होत असतो. त्याचप्रमाणे त्यावाचून भूते नि शत्रू पळविणाऱ्या लहानमोठया सहस्त्रावधी घंटांना सारखे बडवीत चालणारा आणि त्या तुमुल घंटानादांनी दशदिशा कंपविणारा हजारो भिक्षूंचा दळभारही त्या मानवी सैनिक बळाला दैविक आत्मबळाचा पाठिंबा देत रणांगणावर चालून जात असतो, तो निराळाच!

जपानने युरोपच्या तोडीस तोड म्हणून तोफेस तोफ, बॉम्बला बॉम्ब, विमानास विमान भिडविले खरे; पण जपानला ते करणेच भाग होते; कारण भुते पळविणाऱ्या घमटा होत्याच कुठे मुळी त्यांच्यापाशी! !

आता तिबेटच्या सामाजिक स्वरूपाची काही कल्पना येण्यासाठी त्याचे दोन-तीन विशेष सांगू.

पहिली महत्वाची नि अभिनंदनीय गोष्ट म्हणजे ही की, तिबेटात जातिभेद मुळीच नाही. सर्वजण—मग भिक्षू असो की गृहस्थ, श्रीमंत वा दरिद्री—एकाच जातीचे समजले जातात. म्हणजे त्यांच्यात जन्मजात अस्पृश्य कोणी नाही; रोटीबंदी नाही; इतकेच नव्हे तर बेटीबंदीही नाही. ते सारे बुद्धधर्मी अहिंसक असले तरी खातात मांस नि अंडी. आपल्या इकडेही अहिंसकांचा एक पंथ जो आताशी निघाला आहे, तो जसा मनोवाक्कायशः अहिंसेचा जयजयकार करीत असताच सभांतून एकमेकांवर निःसंकोचपणे अंडयाचा माराही करीत असतो, तसेच हे!

तिबेटातील एक कौटुंबिक विशेष म्हणजे, एका स्त्रीस एकाच वेळी अनेक पती असू शकतात, हा होय. भूतानमध्ये नेपाळातील काही हिंदू जातींतही आणि तिबेटात बहुपतित्वाची चाल आजही अगदी रूढ आहे. तीत कोणत्याही प्रकारची अनीती आहे, अधर्म आहे, असे त्यांना सांगितले तरी पटत नाही. जसे आपल्या इकडे एकाच पुरूषाला एकाच वेळी अनेक भार्या असणे, ही एक अगदी स्मृतिमान्य शिष्टाचाराची गोष्ट, अधर्म नव्हे; तशीच तिकडे एका स्त्रीला एकाच वेळी अनेक पती असणे हा एक अगदी चालू आचार, अधर्म्य तर नव्हेच नव्हे. त्यातही विशेष हा की, कुटुंबात जर अनेक भाऊ असले आणि एकाच भावाने लग्न केले तर त्याची जी पत्नी ती इतर सर्व सख्ख्या भावांचीही धर्मपत्नीच समजली जाते. या चालीत त्यांना लवलेशही अनीती वा अधर्म वाटत नाही. उलटपक्षी एका भावाने आपल्यापुरतीच तेवढी बायको आणावी आणि त्याचे इतर भाऊ तसेच अविवाहित पडलेले असता आपण तेवढे एकटयाने दांपत्यसुख भोगण्याचा आप्पलपोटेपणा करावा, हीच प्रवृत्ती त्यांना अत्यंत नीच वाटते!

विवेकानंद एकदा अशा कुटुंबातील काही लोकांना जेव्हा म्हणाले की, ‘आपल्या भावाच्या पत्नीशी असा व्यवहार ठेवणे अनैतिक आहे. भ्रातृजाया ही मातेसमान मानणे हाच मनुष्यधर्म!’ तेव्हा त्या लोकांना मोठे आश्चर्य वाटले! त्यानी विवेकानंदांना जसे तेव्हा हटकले, तसेच ते त्यांना हसणाऱ्या सर्वांना उपहासून हटकतात की, ‘तर मग आम्ही आमच्या सख्ख्या भावांची प्रतारणा करून, त्यांना त्या सुखाचा वाटा न देता एकटयानेच ते दांपत्यसुख भोगावे काय? मांस, लोणी, घर, धन, आम्ही भाऊ भाऊ जर वाटून घेतो, कोणतेही सुख आप्पलपोटेपणाने एकटेच तेवढे भोगीत नाही, तसे करणे हे सख्ख्या भावाशी कपट करणेच समजतो, तर त्या सर्व सांसारिक सुखातील अत्यंत सरस नि प्रेमळ असे जे नववधूच्या प्राप्तीचे सुख त्याचा वाटा तर त्यांना दिलाच पाहिजे, नव्हे काय? हा तर निव्वळ अधमपणा होय की, पत्नी तेवढी एकाच भावाने लाटावी! भ्रातृप्रेमाला कलंक लावणारा हा असा स्वार्थीपणाचा उपदेश आम्हास देऊ नका! असा अधर्म आम्ही केव्हाही आचरणार नाही!’

भूतानी लोकांना विवेकानंदांना जे असे उत्तर दिले, तिबेटी लोक आजही जे असे ठासून सांगतात, ते काही त्यांच्यासारखी ‘भुते’ किंवा ‘भंगड’ लोकच या कलियुगात तेवढे सांगतात, असे नाही! कलियुग लागण्यापूर्वी जेव्हा प्रत्यक्ष धर्मराजापुढे द्रौपदी ही अर्जुनाने वरली असता ती त्याची एकटयाची पत्नी समजावी वा पाची पांडवांची समजावी हा प्रश्न पडला, तेव्हा कुंतीने नि व्यासांनीही त्याचे असेच उत्तर अशाच कोटिक्रमाने समर्थून दिलेले आहे! या आडवळणी गावी संदर्भग्रंथ हाताशी नसल्यामुळे नेहमाच लेखांतून उतारे देण्याच्या कामी फार नड पडते; नाहीतर महाभारतातील ते मूळचे श्लोक अथे अगदी जसेच्या तसे उतारून द्यावयास हवे होते. मूळ महाभारतातील द्रौपदीस्वयंवराच्या अध्यायातील ते श्लोक जिज्ञासूंनी अवश्य पाहावेत. कुरूवंशात द्रौपदीचा प्रश्न उद् भवण्याच्या पूर्वीही अनेक बंधूंनी एकच भार्या करण्याची चाल हा एक शिष्टसंमत कुलाचार होता, असे कुंती प्रभृतींनी धर्मराजास सांगितले आणि त्याची प्राचीन उदाहरणे उल्लेखिली आहेत. याहीपेक्षा आपल्या अंगावर शहारे आणणारी पण तिबेटात आचारधर्म समजली गेलेली एक प्रचलित रूढी अशी की, जर बापाची स्त्री मेली असेल आणि त्याच्या वडील मुलाने लग्न केले, तर ती वधू त्या पित्याची पण पत्नीच मानली जाते. उलटपक्षी कुठल्या विधवेने जर लग्न केले तर तिच्या पहिल्या पतीपासून झालेल्या साऱ्या तरूण मुली पण त्या

आईसहच त्या तिच्या नव्या पतीच्या भार्या होतात. मुली आणि आई प्रेमळ सवतीसवतींच्या नात्याने नांदतात!

आपल्यास जी गोष्ट अत्यंत किळसवाणी अनैतिक नि अधर्म्य वाटते, ती रूढी, वा चाल, वा आचार जगात आरंभीच देवाने ‘धर्म’ म्हणून सर्व मनुष्यजातीसाठी सांगून टाकलेला आहे, अशी तिबेटातील सनातन्यांची निष्ठा! नीती नि अनीती ह्या वस्तू चौकोन वा त्रिकोणाप्रमाणे अगदी ठरावीक साच्याच्या, एकठशी, एकछापी, त्रिकालाबाधित असतात किंवा आपल्या कुराणात वा पुराणात जे चांगले म्हणून वा वाईट म्हणून सांगितले आहे, तेच सर्व परिस्थितीत, सर्व मनुष्यसमाजात चांगले वा वाईट ठरलेच पाहिजे, हा हट्टवाद किती चुकीचा आहे, ते भिन्नभिन्न समाजांमध्ये प्रचलित असलेल्या धर्मांचा, रूढींचा नि शिष्टाचारांचा असा तौलनिक अभ्यास केला असता सहज समजून येते. आपल्यास जो आचार शुद्ध नि हितकर वाटतो, तो आपण आचरावा, पण तोच काय तो सनातन, त्रिकालाबाधित, ईश्वरोक्त ‘धर्म’ होय, आणि इतर साऱ्या परिस्थितीत तेच मानला पाहिजे, तो हितप्रद झालाच पाहिजे, तो अपरिवर्तनीय धर्म असलाच पाहिजे, असा धर्मवेडा दुराग्रह मात्र धरू नये.

ज्या बुद्धाने देहदंडक अशा आसूरी तपाचा तीव्र निषेध केला, त्याच बुद्धाच्या धर्माची भिक्षुदीक्षा देताना तिबेटात जे संस्कार भिक्षुगणांना करावे लागतात, ते बुद्धाच्या त्या उपदेशाची कशी मूर्तिमंत विटंबनाच असतात, त्याचेही एक उदाहरण सांगू या.

तो संस्कार प्रत्यक्ष पाहिलेला एक प्रवासी लिहितोः

‘प्रभातची वेळ. ब्राह्ममुहूर्ती. तपस्याव्रत घेण्यासाठी सज्ज असे भिक्षुगण स्नान करून शुद्ध वस्त्रे धारण करून आले. शाक्यमुनींच्या विशाल मूर्तीसन्मुख मंत्रपठन चालू झाले. कधी एकेकी तर कधी सारेजण मिळून उच्च स्वराने मंत्रघोष होऊ लागला. मोठमोठे लाकडी ढोलही वाजू लागले. जवळ जवळ सत्तर भिक्षुगण टेकून बद्धांजली होत्साते दीक्षेस सिद्ध झाले. मेण, कोळसे, शाईच्या कुप्या प्रभृती संभार एका बाजूस ठेवलेला होता. चटईवर बसून बाकावर त्यांनी हात ठेवले. प्रधान भिक्षुगणाने शाईची बारा-बारा चिन्हे प्रत्येक दीक्षेच्छूच्या मस्तकावर केली. धूप न् उदबत्या पेटविल्या गेल्या. सर्वजणांनी मिळून प्रार्थना म्हणण्यास आरंभ केलाः नमो पेनशितो शिःकिया मौनी फूः !’ ‘हे शाक्यमुने, तुला, प्रणाम असो! आम्ही तुला शरण रिघत आहोत!’ या मंत्राच्या घोषात सारे तन्मय होत असता प्रधान भिक्षूंनी त्या दीक्षेच्छूंच्या टाळूवरील त्या शाईच्या चिन्हातून जळजळीत निखारे ठेवण्यास आरंभिले होते. दीडदोन मिनिटांच्या आत टाळूच्या कातडयापर्यंत निखाऱ्यांची आग पोचली. चटके बसू लागले, तो तो अधिक बळाने तो मंत्रपाठ ते सारेजण उंच उद्-घोषू लागले. मस्तकावरची कातडी जळू लागली. जे धीरगंभीर होते ते भिक्षू टाळू जळू लागली तरीही ‘उस्स’ न करता वारंवार मंत्र म्हणतच होते—‘नमो पेनशितो शिःकिया मौनी फूः !’ पण जे तो दाह साहू शकले नाहीत, ते कासावीस होऊ लागले. हे पाहताच प्रधान भिक्षूंनी त्या प्रत्येक दीक्षेच्छूचे मस्तक आपल्या हातांनी बळकट धरून त्यास हालू दिले नाही. जिकडे तिकडे कातडे जळण्याचा उग्र गंध दरवळून गेला. प्रत्येकाच्या

मस्तकावर ठेवलेली ठरावीक अग्निस्फुल्लिंगे जळून जाईतो तो दीक्षासंस्कार चालू होता. अशा प्रकारे प्रत्येकाच्या मस्तकावर जन्मभर राहणारी बुद्धशरणाची ती ‘तप्तमुद्रा’ मारली गेली ! डाग दिला गेला!’

स्थंडिलावर यज्ञाग्नी पेटविण्याची चेष्टा करणाऱ्या बुद्धाच्या शिष्यांनीच माणसाच्या डोक्यावर यज्ञाग्नीचे निखारे पेटवून बुद्धाचा असा न कळत सूड उगवला ! !

१४. राहुल सांकृत्यायन यांचे तिबेटामधील संशोधन

गेल्या सहा महिन्यांत फ्रान्स, जर्मनी, रशियापर्यंत ज्या भारतीय इतिहाससंशोधकाचे नाव प्राच्यविद्यापंडितांमध्ये दुमदुमून गेले आहे त्या त्रिपीटकाचार्य राहुल सांकृत्यायन यांची आणि त्यांनी महाप्रयासे केलेल्या ऐतिह्य संशोधनाची थोडीशी ओळख महाराष्ट्र वाचकांनाही या लेखाने करून देण्याचे आम्ही योजले आहे.

बिहारचे प्रसिद्ध ऐतिह्यसंशोधक पंडित जयस्वाल यांनीही त्यांच्या अलिकडेच छापलेल्या एका लेखात सांकृत्यायनांच्या या संशोधनाने भारताच्या साहित्यात नि प्राचीन ऐतिह्य साधनांत फार महत्वाची भर टाकली असल्याचे मान्य केले आहे.

बुद्धकालातील नि त्यानंतरच्या तीनचार शतकांतील भारतीयांनी लिहिलेल्या कित्येक महत्वाचे ग्रंथ तुप्त झाले होते. परंतु त्यांचे जे संदर्भ नि अवतरणे इतर उपलब्ध ग्रंथातून वारंवार सादर उल्लेखिलेली आढळतात, त्यावरून त्या ग्रंथांच्या अस्तित्वाची नि महत्वाची निश्चिती पटत असे. ते मूळ ग्रंथ पुन्हा कधी सापडतील का, त्यांच्या प्रचीनत्वामुळे बुद्धकालाच्या आपल्या प्राचीन इतिहासावर जो प्रकाश पडण्यासारखा आहे तो पडून तो इतिहास अधिक प्रस्फूट उज्ज्वलतेने झळकू शकेल काय, अशी चुटपूट गेली शंभर वर्षे तरी आपल्या भारतातील प्राच्यविद्यापंडितांनाच काय ती नव्हे तर युरोपातील प्राचीनैतिहासिक विद्वानांनाही लागून राहिली होती. पण ते ग्रंथ हुडकून काढण्याचा सतत यत्न चहूकडे चालला असताही त्यांची समग्र तर काय पण फुटकळ पानेदेखील आजवर सापडली नव्हती. परंतु त्रिपीटकाचार्य राहुल सांकृत्यायनांच्या अत्यंत त्रासदायक अशा तिबेटातील तीन वेळा केलेल्या प्रवासानंतर नि प्रयासानंतर आज ती अलोट ग्रंथसंपत्ती तिबेटातील अत्यंत दुःप्रवेश्य अशा काही मठांतून साठवून ठेवलेली आढळली आहे. त्या ग्रंथाच्या उपप्रतीच नव्हेत तर काही अतिप्राचीन ग्रंथांच्या मूळ प्रतीच सापडल्या. भारतीय साहित्याच्या, तिबेटात सापडलेल्या, शतावधी ग्रंथाना अनेक उंटांवर लादून ती विलुप्त ज्ञानसंपदा श्री. राहुलाचार्यांनी सहा-सात शतकांनंतर आज भारतात पुन्हा परत आणली आहे.

अर्वाचीन नि प्राचीन साहित्याचे अध्ययनात पंडितपद संपादिलेल्या आचार्य राहुलजींचा जन्म संयुक्त प्रांतातील एका ब्राह्मण कुटुंबात झाला. चालू राजकीय आंदोलनात त्यांना दोनदा बंदिवासही भोगावा लागला. समाजसत्तावादावरही त्यांनी एक पुस्तक लिहिलेले आहे. इंग्रदी, संस्कृत नि पाली या तिन्ही साहित्यातील तुलनात्मक तत्वज्ञानाचा नि धर्मशास्त्राचा त्यांनी विशेष अभ्यास केलेला आहे. तिबेटात भारतीयांची जी ग्रंथसंपत्ती आहे तिचे एकदा कसून संशोधन व्हावे, नि तिबेटातील मोठमोठया ज्या प्राचीन मठातील विशाल ग्रंथसंग्रहावर अद्ययावत् संशोधनाचा चिकित्सक प्रकाश असा पडलेलाच नाही त्यांच्यावरही त्या शोधज्योतीचा झोत पाडून इतिहासादिक विषयी भारतासंबंधी अशी जी काय माहिती मिळू शकेल ती एकदा निश्चित करून टाकावी, ह्या हेतूने त्यांनी तिबेटमध्ये नानाविध संकटांना नि अरिष्टांना तोंड देऊन तीनदा प्रवास केला. महिनोगणती त्या पुरातन नि प्रजीर्ण मठांतून कडक थंडीतसुद्धा एकसारखे कुडकुडत बसून अनेक दुर्मीळ ग्रंथांचा अभ्यास केला. त्यात जेव्हा त्यांना भारतीयांचे हरवलेले ग्रंथ सापडले तेव्हा त्यांना कृतकृत्य झाल्यासारखे वाटले; नवा उत्साह नि नवी

शक्ती संचरली. दिवसानुदिवस मांडी मोडून बसून त्यांनी त्या मोठमोठया ग्रंथांना प्रतिविण्याचे परिश्रम चालविले. केव्हा केव्हा थकव्याने नि थंडीने त्यांना मूर्छा यावी! तेव्हा तिबेटातील रीतीस अनुसरून मांसाहार नि मध या औषधींना ते सेवू लागले! पण कार्य सोडले नाही. शेवटी जेव्हा विलुप्त अशा भारतीय ग्रंथांची भांडारेच उपलब्धू लागली तेव्हा प्रतिविण्याची हाताची शक्ती अपुरी पडणारच असे पाहून त्यांनी पानापानांची छायाचित्रे घेण्याचा सपाटा चालविला. अशा परिश्रमानंतर ते प्रतिविलेले ग्रंथ, नि मूळचेच जे आणता आले ते मूळ ग्रंथ मिळून त्या शतावधी पुस्तकांना अनेक उंटांवर लादून त्यांनी हिंदुस्थानात परत आणले.

ह्या ग्रंथांची कच्ची टिपणी निरीक्षून नि ज्या ग्रंथांच्या शोधास्तव युरोपियन नि भारतीय प्राच्यविद्यापंडित आजपर्यंत खटपटत होते ते ग्रंथ उपलब्धिल्याचे समक्ष पाहण्यासाठी ते हिंदुस्थानात यावयास निघाले आहेत.

बुद्ध कालाच्या दीडदोन सहस्त्र वर्षांच्या पूर्वीचा इतिहास नि समाजस्थिती ह्यावर प्रकाश पाडणारे भारतीय विद्वानांनी लिहिलेले हे शतावधी ग्रंथ गेली सातशे वर्षे भारतात तरी जे नामशेष झाले होते ते का? त्यांना तिबेटसारख्या परकीय देशातील जुनाट ओसाड नि अप्रसिद्ध अशा मठामठांतून प्रदीर्घ अज्ञातवासात रखडत कां पडावे लागले?

त्याचे मुख्य कारण मुसलमानी धर्मवेडाचा आततायी उत्पात! अलेक्झांड्रीयाच्या अमूल्य ग्रंथालयाला जेव्हा मुस्लिम सेनापतींनी आग लावून दिली तेव्हा तो म्हणाला होता, 'पाखंडांच्या ह्या ग्रंथांत जे कुराणातच आहे तेच असेल तर ही नसती अडगळ आहे! एक कुराण आहे ते पुरे! बरे, जर ह्या ग्रंथांमध्ये कुराणात नाही ते असेल तर हे उपद्रवी असत्य आहे! कारण जे कुराणात नाही ते सत्य असूच शकत नाही! तेव्हा दोन्ही पक्षी या ग्रंथालयाचा नाश करणेच इष्ट! '

ह्या धर्मवेडापायी ग्रीकांच्या नि रोमनांच्या ग्रंथालयांची राख झाली. पारसिकांच्या विद्यापीठांचीही तीच दुर्दशा उडाली. तक्षशिलेचे प्रख्यात विद्यापीठ विध्वंसिले गेले. बिहार प्रांतात तर मठामठांतील प्रचंड ग्रंथालयांचीच नव्हे तर सहस्त्रावधी भिक्षूंचीही कत्तल उडाली आणि शेवटी बख्त्यार खिलजीने अखिल आशियामधील सर्वोच्च महाविद्यापीठ जो नालंदा विहार त्यावरही नांगर फिरवीला! सहस्त्रावधी पंडित, पाठक, विद्यार्थी, भिक्षू, साधक, सिद्ध निवसू शकणाऱ्या त्या विस्तीर्ण विद्यानगरीच्या प्राकारांचा, तोरणांचा, मठांचा, मंदिरांचा, मूर्तींचा त्या विध्वंसक आततायाने तुकडे तुकडे उडवून चुराडा उडविला. मुस्लिम तवारीखकारच मोठया डौलाने सांगतात की, त्या नालंदा विहाराकील ग्रंथालयांना बख्त्यार खिलजीने जेव्हा आग लावून दिली तेव्हा त्या ग्रंथांच्या होळ्या महिनोगणती जळत राहिल्या होत्या!

ह्या महंमदीय उत्पातांचे संकटकाली शतावधी भिक्षूंनी नि पंडितांनी अमूल्य ते ते ग्रंथ वाचविण्यासाठी गुप्तपणे नेपाळातून तिबेटकडे धाडले. हिमालयाच्या दुर्लंघ्य तटब्दीने सुरक्षित नि अलक्षित अशा तिबेटातील मठांमठांतून त्यांच्या प्रती जतन केल्या गेल्या. पण भारतात मात्र त्यांच्या

येथील अस्तित्वाची स्मृतीसुद्धा विलोपून गेली. ती सात शतके हरवलेली ग्रंथसंपदा आज राहुलाचार्यांनी भारतात पुन्हा परत आणली आहे. त्यातील अनेक ग्रंथांच्या विवासनाची कहाणी अशी आहे!

अशा त्या विध्वंसक उत्पातातही ज्या भिक्षूंनी नि पंडितांनी आपले जीवही धोक्यात घालून अनेक अमूल्य ग्रंथ तिबेटासारख्या सुंदर नि दुष्प्राप्य अशा देशविदेशी गुप्तपणे वाहून नेऊन जतल करून ठेवले, त्यांचे उपकार आज साऱ्या जगातील प्राच्यविद्याविशारद नि ऐतिहासिक युरोप-अमेरिकेतही जे मनःपूर्वक मानीत आहेत ते काही उगीच नाहीत.

बाबिलोनियातील प्राचीन इष्टिकालेखांचे किंवा मोहेंजोदारो येथील नाणकालेखांचे संशोधन एका दृष्टीने जितके महत्वाचे, तितकेच दुसऱ्या दृष्टीने राहुल सांकृत्यायनांचे हे तिबेटीय ग्रंथसंशोधनही महत्वाचे आहे, त्यांना भूषणार्ह आहे. भारतीयांना गौरवास्पद आहे.

काशी येथील नगरगृहामध्ये प्रो. पुणतांबेकर यांच्या अध्यक्षतेखाली सांकृत्यायनांचे हिंदू विश्वविद्यालयाच्या बौद्ध व्याख्यानमालेत तिबेटीय अनुभवांवर एक विस्तृत व्याख्यान अलीकडेच झाले. परंतु व्याख्यानातील दोन-तीन चटकदार गोष्टीच काय त्या ह्या लहानशा परिचयात्मक लेखात सांगता येतील. त्या अशाः

'तिबेटमध्ये जाऊ लागताच', सांकृत्यायन सांगतात, 'मी आपले तोंड नि हात धुणे सोडून दिले, आणि त्यांना खूप गदळ होऊ दिले.' कारण तिबेटच्या सामान्य जनतेत हात वा तोंड कित्येक आठवडे साफ असे धुवीतच नाहीत! तिकडच्या कडक थंडीमुळे ही सवय जडली असावी! 'मी तोंड-हात धूत नसे; अशासाठी की त्यामुळे मी तिबेटी नसून कोणी परकीय मनुष्य आहे हे तिबेटी गावकऱ्यांना चटकन कळू नये. पण तरीही माझ्या सरळ नि लांब नाकावरून मी पकडला जाई तो जाईच.'

आपल्या इकडची नवनवी रंगीत छापाची चित्रे तिबेटातील लोकांना दाखलिली असता त्यांना फार आवडतात. आजचा छापखाना असा तिबेटात नाहीच मुळी! सांकृत्यायन म्हणतात, 'मासिकांतील स्त्रियांची अनेकरंगी चित्रे मी माझ्यापाशी जतन करून ठेवली होती.' तिबेटी लोक म्हणत, 'किती सुंदर चित्रे ही!' पण लगेच हळूहळू म्हणत, 'चः चः! पण हे नाक हो काय सरळ नि लांब! त्या उंचट नाकाने सगळे सौंदर्य बुघडून गेले बघा या सुंदर मुखडयाचे! '

तिबेटी लोकांच्या स्त्रियांची नाके अगदी नकटी नि बसकी असतात. त्या प्रियकरिणींच्या संगतीने तिच्याविषयी वाटणारी आवड त्या नकटया नाकांच्याही वाटयास आली. खडीसाखरेचा डबा भिकार टिनचा असला, आणि पातळ कोयनेलची बाटली जरी सुरेख गुलाबी रंगाची असली, तरी खडीसाखरेच्या गोडीमुळे लहान मुलांना भिकार टिनचा डबाच जास्त हवासा वाटतो. तो भिकार टिनचा डबा पाहताच जसे मन आनंदते, तसे ती पातळ कोयनेलची बाटली सुरेख गुलाबी असली तरी आनंदत नाही! कोयनेल कडू नि त्यामुळे ती सुरेख बाटलीच कडवट वाटते. तसेच हे सवयीमुळे नकटे नि बसके नाक पाहताच तिबेटी लोकांच्या मनात त्यांच्या प्रियकरिणींच्या ज्या स्मृती जागून उठतात, तशा सरळ

नि लांब नाकांनी होत नाहीत. सौंदर्याच्या कल्पनेतदेखील काही अंशी सवयींचा परिणाम असतो तो असा! तिबेटी लोक एकंदरीत सत्यवादी असतात. ते सहसा खोटे बोलत नाहीत. ते रागावले तर मारहाण करतात. शीघ्रकोपीही फार. पण त्यांच्या ‘मुख में राम और बगल में छूरी’ नसते. त्यांना केसाने गळा कापण्याची कला अद्याप चांगलीशी म्हणून साधलेली नाही. पृथ्वी वाटोळी नाही, सपाट आहे; कारण बुद्धग्रंथात ती सपाट सांगितलेली आहे, हा त्यांचा आजही अढळ विश्वास आहे. सांकृत्यायनांनी त्यांना पृथ्वी गोल असल्याचे पुष्कळ पुरावे दिले. पण त्यांच्यातील धर्ममार्तंडांचे काय किंवा खेडवळांचे काय, एकमुखी उत्तर हेच की, ‘पोथी तसे म्हणत नाही! म्हणून पृथ्वी गोल असणेच शक्य नाही! ’ ते बिचारे शान्त दान्त बौद्ध भिक्षू इतक्या निषेधावरच थांबले पण शास्त्रज्ञांनी जेव्हा युरोपला प्रथम सांगितले की, ‘पृथ्वी गोलच आहे! ’ तेव्हा त्या काळच्या त्या ख्रिश्चन मार्तंडांनी, पोपांनी नि पाद्र्यांनी ‘बायबलात पृथ्वी सपाट सांगितली आहे यास्तव ती सपाटच आहे,’ हे सिद्ध करण्यासाठी निर्विवाद पुरावा जो पुढे आणला तो त्या शास्त्रज्ञांचे डोकेच कापून टाकणे हा ! कुराणातही पृथ्वी सपाटच आहे. कदाचित असेही असेल की, कुराण पुराण लिहितो पृथ्वी सपाट होती; मागाहून गोल झाली ! !

बिहारच्या भूकंपाचे कारण तिबेटच्या लोकांनी अशाच रीतीने नक्की केले आहे. तो का झाला ते सांकृत्यायनांना तिबेटीयनांना पटेल असे सांगता येईना. तेव्हा त्या लोकांनी त्याचा अगदी बिनतोड उलगडा असा केला. ‘मांचोलोमो’ (गौरीशंकर किंवा एवरेस्ट) हे जे हिमालयाचे अत्युच्च शिखर ते वस्तुतः पर्वताचे शिखर नसून पार्वतीदेवी आहे. तिच्या भोवतालची चार शिखरे तिच्या चार दासी देवता आहेत. त्यांना असा वर आहे की तुमच्यापाशी लगट करण्यास जो साहस करील तो नष्ट होईल असे असताही गेल्या वर्षी इंग्रज लोक त्या गौरीशंकर शिखराभोवती विमानातून घिरटया घालण्याचे धारिष्टय करू लागले! त्यामुळे मांचोलोमोदेवी संतापली आणि तिने बिहारचा बिहार भूकंपात गडप करून टाकला !

आहे की नाही हा पोथीतील कार्यकारणभाव बिनतोड? अपराध केला इंग्रजाने, आणि त्याचे शासन म्हणून भूकंपात गडप झाला बिहार ! पण इंग्रज कुठचे नि बिहार कुठचा, ते एक नि दोन. हे समजण्याइतका भूगोल तरी यावयास पाहिजे ना ? आपल्या इकडे नाही का अगदी पेशवाईच्या शेवटी शेवटी एक मराठा सरदार इंग्रजी पलटणी चहूकडून चालून येताहेतसे ऐकून संतापाने एका पत्रात विचारिता झाला, ‘हे शिंचे इंग्रज लोक असे आहेत तरी किती ? ’ ह्या ऐतिहासिक पत्राचे उत्तर काय आले ते उपलब्ध नाही. पण इंग्रजांची विलायत पाहायला जर कोणी सात पिढयांत तोवर गेलाच नव्हता, समुद्रपर्यटनच जर मुळी धर्मबाह्य, तर ‘हे शिंचे इंग्रज असे आहेत तरी किती ? ’ ती शरणागती प्रत्यक्ष मोजून सांगणारा साऱ्या साम्राज्यात कोणीही सापडणे दुर्घटच होते हे उघड आहे !

तरीही गौरीशंकर (एवरेस्ट) शिखरावर ‘इंग्रज विमाने धाडू लागला म्हणून मांचोलोमोदेवीने रागावून बिहारचा भूकंप करविला,’ हा तिबेटच्या धर्मात्म्यांचा उलगडा काही झाले तरी आमच्या इकडील महात्म्यांच्या उलगडयापेक्षा काही फारसा चुकलेला नाही, इतके आपणास मान्य केलेच पाहिजे! कारण महात्मा गांधींनीही स्पष्टपणे सांगितले होतेच की नाही, ‘आम्ही अस्पृश्यता निवारून मद्रासच्या गुरूवायुरचे देवालय अस्पृश्यांस उघडले नाही, यासाठी देव रागावला आणि त्या पापामुळे

बिहारचा भूकंप झाला.’ गुरूवायुरचे देवालय त्यांना न उघडण्याचे पाप करणारा झामोरिन नि सारा मद्रास इलाखा सुखरूप. त्यांच्या घराचे एक कौलसुद्धा फुटले नाही. पण त्या मद्रासच्या झामोरिनच्या पापासाठी भूकंपात मेली बिहारची सहस्त्रावधी पुरूष, बायका, मुले. स्पृश्यांची आणि अस्पृश्यांची. ती तिकडची मांचोलोमोदेवी आणि हा इकडचा महात्मिक देव ! दोन्हीही एकाच पोथीच्या पाळण्यात वाढलेली भावंडे !

राहुल सांकृत्यायन संन्यासी, शाकाहारी, बौद्ध, अहिंसाधर्मी; पण ते बजावून सांगतात की, ‘मी तिकडे त्या बुद्ध लोकांप्रमाणेच अंडी, मांस आणि वनगाईसारखी एक गोजातिविशेष जी चर्ममृगी तिचे मांस हेच खात होतो म्हणून जगलो. भाजीपाला खाऊन तिकडे जाऊ म्हणणारे सज्जन पांडवांसारखे वाटेतच एकेक गळून पडतील ! मांस खाल्ले तेव्हा कुठे मला येऊ लागलेली मूर्च्छा बंद पडली.’

राहुलजी सांगतात, ‘जो तो विचारतो, तिबेटात आहेत म्हणून ऐकलेले ते योगींद्राचे थवेच्या थवे भेटले का ? पण त्यांचा तिकडे कोणास पत्तासुद्धा लागत नाही ! मला योगीबिगी कोणी भेटले नाहीत ! ’

जोवर तिबेट एक कल्पभूमी होती, तिकडे फारसे कोणी गेलेले नव्हते, तोवर थिऑसफीचे अनेक अतिमानुष ‘महात्मे’ आपली प्रचंड विश्वसंचालक कार्यालये तिबेटात नि हिमालयाच्या शिखरावर उघडून बसलेले असत. त्या काळच्या थिऑसफीच्या पुस्तकांतून पानोपानी ह्या महात्म्यांचा अचूक पत्ता जो द्लेला असे तो एकचः तिबेट ! पण लॉर्ड कर्झनची गोरी पलटणे तिकडे ल्हासापर्यंत जेव्हा दौडत गेली आणि विमाने जेव्हापासून त्या शिखरांवर धुडगूस घालू लागली, तेव्हापासून त्या योगी महात्म्यांनी आपली ती विश्वसंचालक मोठमोठी कार्यालये केव्हा बंद केली नि बाडबिछायतीसह ते सारेच्या सारे कुठे बेपत्ता झाले त्याचे एक अवाक्षरसुद्धा आजकालच्या थिऑसफीकल ग्रंथातून आढळत नाही !

राहिलाचार्यांनी आणलेल्या ग्रंथभांडाराची नीट छाननी झाल्यावर त्याचे सविस्तर वृत्त नि निश्चित महत्वमापन प्रसिद्धिले जाईल.

*—प्रतिभा, मे १९३७*

* * * * *